# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड२ : आदिपर्व२



# महाभारत

## खंड २रा : आदिपर्व

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवायी होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्याप्पुु र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : ६ मार्च २०१८**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचवीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे.

त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा दुसरा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई-मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते



# - महाभारत आदिपर्व खंड दुसरा प्रारंभ-

## आदिपर्व भाग एकोणसाठावा

(आदिवंशावतरण पर्व सुरू आहे)

शौनक विचारतो, अरे सुतपुत्रा, तू भृगुच्या वंशाचा महान इतिहास इत्तंभूत सांगितला आहेस, आता मला तुझ्या कडून व्यासांनी रचलेले महाभारत, ज्यात विलक्षण कथा आहेत व जे त्या यज्ञाच्या समयी मधल्या काळात सदस्यांस वैशंपायनाने गाऊन सांगितले ते संपूर्ण ऐकावयाचे आहे.

ते ऐकून सौती म्हणाले, अहो ब्राह्मणांनो, त्या यज्ञाच्या कामात मधल्या समयी बर्याच गोष्टी ज्या वेदातील ज्ञानावर आधारीत आहेत त्या व्यासांनी तेथे जमलेल्या ब्रह्मणांस सांगितल्या, ज्या पुढे महाभारत ह्या नांवांने सर्व ओळखतात.

सौती तेथे जमलेल्या ब्रह्मवृंदास सांगतो कीं, तो महान इतिहास ज्यात पांडवांची किर्ती सांगितली आहे व जे कृष्ण-द्वैपायनांनी रचली व गाईली आहे तो सर्व इतिहास यज्ञ आटोपल्यावर वैशंपायनाने पुन्हा सांगावा अशी राजा जनमेजय विनंती करतो.

ते ऐकून शौनक ऋषी बोलतात, ते सर्व आम्हाला तू तुझ्या विलक्षण प्रतिभेने युक्त अशा वाणींने सांगावेस कारण, आतापर्यंतच्या कथा श्रवणाने आमचे अजून समाधान झालेले नाही.

ती स्तुती ऐकून सौती प्रसंन्न मनाने त्याना सांगतो, तो महान इतिहास मी आपल्याला पुन्हा एकदा ऐकवतो जसा मी ऐकला. एवढे बोलून तो पुढे सांगतो, श्रेष्ठ ब्राह्मणानो, मलासुद्धा तो इतिहास आपल्याला ऐकवण्यात आनंद मिळणार आहे तरी तो तुम्ही ऐकण्यास तयार व्हावे.

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा एकोणसाठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग साठावा

(आदिवंशावतरण पर्व पुढे चालू)

सौती सांगू लागतो, जेव्हां कृष्ण-द्वैपायन व्यासांना समजले किं, राजा जनमेजय सर्पसंहारक यज्ञ आयोजत आहे तेव्हां ते खुद्द तेथे पोहोचले. कृष्ण-द्वैपायनांचा परिचय असां कीं, ते पांडवांचे आजोबा होते आणि त्यांचा जन्म यमुना नदीतील एका बेटावर कुमारी माता काली हिंस ऋषी शक्तीपुत्र पराशरांपासून झाला आहे. ते जन्मले तेंच वेद जाणत होते व त्यांनी सर्व वेदांच्या शाखांचा सुद्धा सखोल अभ्यास केला होता. त्यांची बुद्धी अशी होती कीं, ते सर्व ज्ञान, कला इत्यादी, क्षणात आकलन करीत असतं, जे इतर कोणालाही तपस्या करून अथवा व्रते करून अथवा उपवास करून अथवा यज्ञ करून अथवा परंपरेने शक्य नव्हते. व्यासांचे वेद ज्ञान उपजत होते त्यामुळे त्यांचा त्यावरील अधिकार सर्वमान्य होता. त्यांने वेद समजणे सोपे व्हावे म्हणून चार भागात विभागले जसें ते आज आपण पहातो. त्यामुळे वेदांचा अभ्यास करणे ब्राह्मणांना सोपे झाले.

ते उपजत बुद्धीने सर्व भूत काळातील गोष्टी जाणत असणारे असें व्यास ह्यांनी शंतनु राजाचा वंश पुढे चालू रहावा म्हणून पंडु, ध्रुतराष्ट्र व विदूर ह्यांना जन्म दिले.

असें ज्ञानी त्यांच्या शिष्यगणांसह राजर्षी जनमेजयांनी आरंभलेल्या यज्ञाच्या प्रांगणात आले. तेथे त्यांनी पाहिले कीं, राजा जनमेजय यज्ञ कक्षात एका सुवर्ण आसनावर विराजमान झाला आहे जसा इंद्र.

त्याच्या सभोवती सदस्य आपापल्या स्थानी बसले होते, बाजूला शुचिर्भूत झालेले इतर राजे आपापल्या स्थानी होते. अशात जसे राजा जनमेजय पहातो कीं, व्यासमुनी आले आहेत तसे तो आपले स्थान सोडून त्यांचे स्वागत करण्यासाठी पुढे येतो. त्याच्याबरोबर त्याचे नातेवाईक व चाकरमानेसुद्धा पुढे होतात. त्यानंतर सदस्यांच्या अनुमतिने राजा व्यासमुनींना सुवर्ण आसनावर बसण्याची विनंति करतो. जशी विनंति इंद्राने त्याच्या यज्ञात आलेल्या बृहस्पतिस केली होती. त्यानंतर स्वर्गीय ऋषींनी आदर केलेले आणि शाप देण्याचे सामर्थ्य असलेले ते सर्वजण आपापल्या बैठकांवर आसनस्थ झाले. त्यानंतर राजेश्वरांने (जनमेजय) त्यासर्वांचे शास्त्रविधीनुसार पुजन केले.

त्यानंतर राजा आपल्या आजोबांना (कृष्ण-द्वैपायन) आचमन करण्यासाठी पवित्र जल देतो. त्या पाण्याने ते ऋषी त्यांचे पाय व तोंड धुतात त्यानंतर ते त्या पाण्याने अर्ध्य देतात. राजाकडून ते स्वीकारतांना व्यास राजाला सांगतात कीं, अष्टीकाने विनंती केल्यानुसार तो संहार थांबवावा.

व्यास त्या स्वागताने अतिप्रसन्न होतात. पांडवाच्या वंशाचा तो राजा आपल्या खापर पणजोबांपुढे नमून त्यांना पुनः आसनस्थ होण्यास सांगून त्यांचे क्षेमकुशल विचारतो. त्याच प्रमाणे ते राजाचे क्षेमकुशल विचारतात व नंतर जमलेल्या सदस्यांची पुजा करून तो स्वागत विधी पूर्ण करतात. त्यानंतर राजा जनमेजय हात जोडून महर्षी व्यास ह्यांना विनंती करतो, अहो ब्राह्मण, आपण आपल्या डोळ्याने प्रत्यक्षतः कुरुवंशाचा व पांडवांचा इतिहास पाहिला आहे तर तो आपल्या तोंडून ऐकण्याची आम्हा सर्वांची इच्छा आहे. मला सांगा, त्या दोघांत बेबनाव होण्याचे कारण काय? जर ते सर्व विलक्षण कर्तबगार होते. ते महायुद्ध, ज्यामुळे असंख्य लोक व इतर जीव मारले गेले जेव्हां माझ्या त्या सगळ्या आजोबांत युद्धाचा भडका उडाला, कोणत्या कारणांने झाले? असें समजावयाचे कां, किं, तो एक भवितव्याचा खेळ होता व म्हणून त्यांची सरासर बुद्धी संपल्याने ते झाले. अहो श्रेष्ठ ब्राह्मण, मला सांगा सविस्तरपणे जे घडले ते सगळे. राजा जनमेजयाची ती काकुळतीने केलेली विनंती ऐकून व्यासमुनी आपल्या शिष्यास, वैशंपायनास, जे त्यांच्या बाजूच्या आसनावर विराजमान होते, आदेश देतात किं, "वैशंपायना, कौरव व पांडव ह्यांत जो वाद झाला व त्यामुळे जे कांहीं घडले ते सर्व तू आता ह्या मंडळींना सविस्तार पूर्वक सांग, जो मी तुला पूर्वी सांगितला आहे".

अशी आज्ञा गुरुकडून झाल्यानंतर तो ज्ञानी ब्राह्मण, वैशंपायन, तेथे जमलेल्या समस्त गुणीजनांना, ज्यात राजा, ऋद्विक व सदस्य होते, तो इतिहास, ज्यात पांडव व कौरव ह्यातील शत्रुत्व व त्यामुळे झालेला नरसंहार, सर्वनाश, सांगितला.

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा साठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकसष्ठावा

(आदिवंशावतरण पर्व पुढे चालू)

ऋषी वैशंपायन प्रथम आपल्या गुरुवर्यांस अष्ठाग प्रणिपात असें नमन करून आदर पूर्वक व भक्तीपूर्वकतेने बोलतात, "मी वैशंपायन, येथे जमलेल्या समस्त गुणीजनांना आदरपूर्वक आभिवादन करतो व सांगण्यास सुरुवात करतो, जे मी माझ्या गुरुवर्य, तिन्ही लोकांत ख्यातनाम असें, व्यास ह्यांच्या तोंडून ऐकले आहे ते व तसेंच. हे राजा तू हे निरुपण ऐकण्यास योग्य आहेस. ज्याला सर्वजण भारत असां नावांने जाणतात. माझ्या गुरुवर्यानी आदेश दिलेला असल्याने ते मी निर्भयतेने सांगणार आहे.

अरे राजा ऐक, मी सर्व कांहीं सांगणार आहे ज्याला ते ऐकण्याची इच्छा आहे. प्रथम मी त्या इतिहासाचा गोषवारा देतो व नंतर तो सविस्तर सांगतो.

त्या भावंडांत बेबनांव का झाला व तो द्युताचा खेळ हरल्यावर ते पांडव, कौरवांच्या राज्य हडपण्याच्या उद्देशाने अरण्यात कां धाडले गेले ते ऐक.

त्याचे असें झाले, जेव्हां पांडूच्या निधनानंतर ते पांच भाऊ आपल्या घरी परतले. आल्यावर त्या पांच जणांनी राज्यकारभार उत्तमरित्या करण्यास प्रारंभ केला. त्यांची विविध क्षेत्रातील परिपूर्णता तसेंच त्याचे सामर्थ्य, श्रीमंती आणि लोकप्रियता पाहून त्यांचे चुलतभाऊ कौरव जळफळू लागले. ते लक्षात आल्यावर कौरवांचा मुख्य भाऊ दुर्योधन व त्यांचा मित्र कर्ण आणि मामा सुवल पुत्र शकुनी, अशा तिघांनी पांडवांना सतावण्यासाठी अनेकविध क्लुप्त्या योजण्यास आरंभ केला अशा उद्देशांने कीं, हे पांच भाऊ राज्य सोडून जावेत. त्यात दुर्योधन, शकुनीच्या सांगण्यावरून पांडवांच्या हातातील सत्ता काढून घेण्याच्या योजना करू लागला. त्यातील एक, दुर्योधनाने भिमाला वीष देण्याचा प्रयत्न केला. परंतु, लांडग्याचे जठर प्राप्त झालेला तो भिम ते पचवतो. दुसरे, भिमाला असें जेवण दिले किं, तो गुंगीत झोपेल व तसा झोपलेला असतांना त्याला दोरखंडाने बांधून गंगेच्या प्रवाहात फेकून दिले व स्वतः तेथून पळून गेला. अतिशक्तिमान असा तो भिम त्याच्या प्रबळ ताकदीच्या जोरावर ते दोरखंड तोडून मोकळा होतो. बेशुद्ध अवस्थेत तो पाण्यात असतांना त्याला पाण्यातील काळे साप शरीरावर ठिकठिकाणी दंश करतात पण त्याचा भिमाला कांहींही त्रास होत नाही. भिम त्यातूनही वाचतो. हे सगळे पांडवांचा एक

काका, विदूर सर्व पहात होता व त्यांतील वैर संपुष्टात यावे म्हणून सतत प्रयत्न करीत होता. प्रत्येक वेळी विदूर पांडवांना कौरवांच्या कारस्थानांपासून संरक्षण देत असें, जसे इंद्र जगाला आनंदात ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो.

असें अनेक प्रयत्न करीत असतांना शेवटी दुर्योधनाला समजते कीं, त्याच्या सर्व कारस्थानी कारवाया विफल होत आहेत कारण, पांडवांचे भाग्य त्यांना सतत मदत करीत आहे तेव्हां त्याने शेवटचा डाव रचला, असां कीं, त्यामुळे ते पांचही भाऊ मरून जातील. त्यासाठी दुर्योधन त्याच्या इतर साथीदारांना बोलावतो व त्याचा बाप ध्रुतराष्ट्र ह्याच्या संमतीने एक योजना करतो. त्यात त्याचे साथीदार कर्ण, दुःशासन व इतर कौरव भावंडे सामील असतात. त्या प्रमाणे, एक लाखेसारख्या ज्वालाग्राही पदार्थांपासून घर तयार केले जाते. पांडव त्यांच्या निष्पाप बुद्धीने त्यांच्या चुलत भावंडांच्या मनातील कपट न समजता त्यांच्याशी सदैव प्रेमाने वागत असत त्याचा फायदा घेण्याचे ठरते. लक्षागृह तयार झाल्यावर ध्रुतराष्ट्र पांडवांना वरणावत नांवाच्या नगरीस तेथील कारभार पहाण्यासाठी पाठवतो जेथे ते लक्षागृह त्यांच्यासाठी बांधलेले असते. हे सर्व त्यांचा काका विदूर सावधपणे न्याहाळत असतो व त्याला ह्यात कांहीं कपट आहे असें समजल्यावर तो पांडवांना सावध करण्यासाठी कांहीं सुचना देतो, त्यामध्ये इतर बाबींबरोबर कौरवांचा हेर पुरोचनापासून सावध रहाण्याच्या सुचनासुद्धा त्याने दिलेल्या असतात. पांडव त्यांच्या आई बरोबर त्या नगरीला रहाण्यासाठी निघतात. विदूराने आधीच सावध केलेले पांडव आता चांगलेच सावध झालेले असतात. तेथे त्या लक्षागृहात ते एक वर्ष रहातात. त्यांच्या बरोबर कौरवांचा एक सहायक पुरोचन नजिकच्या जागेत रहात असतो असां कीं, तो पांडवांवर लक्ष देऊन असेल. त्या काळात ते पुरोचनासकट कोणालाही समजणार नाही अशी दक्षता बाळगून लक्षागृहाच्या खालून एक भुयार तयार करतात. सर्व तयारी झाल्यावर ते पांडव पुरोचनाला त्या लक्षागृहात रहाण्यास येण्याचे आमंत्रण देतात. त्यामुळे पुरोचन खुष झालेला तेथे रहाण्यास जातो. अशा वेळी पांडव योग्य समय पाहून त्या भुयारातून आपल्या आईसह पळून जातात परंतु, त्याआधी ते त्या लक्षागृहाला आग लावतात. त्यात तो पुरोचन जळून मरतो व पांडव सहीसलामत निघून जातात. असा समज सर्वत्र पसरतो किं, पांडव त्या आगीत जळून मेले. कौरव सत्तेचा ताबा घेतात व

त्यांचा अनागोंदी राज्यकारभार सुरु करतात. आता पांडवांना अज्ञातवासांत रहाण्याची पाळी आलेली असते. त्यामुळे ते जंगलात रहाणे पसंत करतात. असेंच ते एका जंगलात रहात असतांना तेथे एक झरा असतो त्या झर्या जवळ ते एक राक्षस पहातात. त्याचे नांव असते हिडींब. भिमाचे हिडींबशी युद्ध होते व त्यात तो त्या राक्षसाला मारून टाकतो. त्यानंतर भिम त्या राक्षसाच्या बहिणीशी, हिडींबाशी, राक्षस विवाह करतो. त्यांना त्यातून घटोत्कच नांवाचा पुत्र होतो. पांडव, जे व्रतस्थ जीवन व्यतीत करीत होते, आपला सुगाव लागणार नाही अशाप्रकारे जागा बदलत रहात होते. आता ते हस्तिनापुराच्या राज्याबाहेर रहात असल्यामुळे कौरवांच्या कक्षेबाहेर असल्याने सुरक्षित होते. असेंच फिरत ते एका एकचक्र नांवाच्या गांवात येतात. तेथे ते ब्रह्मचार्यांच्या रुपात रहात असतात. तेथे ते शक्तिमान पांच भाऊ एका ब्राह्मणाच्या घरी रहात असतात. ब्राह्मणाला संशय येणार नाही अशाप्रकारे खाण्यापिण्याचे पथ्य पाळत होते. त्या ठिकाणी भिमाची गांठ पडते एका खादाड राक्षसाशी, त्याचें नांव बकासूर. बकासूर दररोज एक नरबळी मांगत असें व त्या एकचक्र गांवातील लोकांचे जीवन त्यांने असहय्य केलेले असते. एकदा भिमाची पाळी त्यापुढे खाद्य म्हणून जाण्याची येते व तो जातो आणि त्या बकासुराला मारून टाकतो व एकचक्र गांवाला सुरक्षित करतो. तेथे असतांना त्यांना पांचाळ नरेश, द्रुपद, राजाच्या राजकन्येच्या स्वयंवराची खबर मिळते व ते पांचही जण तेथे जाऊन पांचाळ राजकन्या कृष्णा, जिचे नांव नंतर द्रौपदी होते, तिला जिंकतात. तेथे ते आणखीन एक वर्ष रहातात. पांडवांच्या अशा कृत्यांमुळे ते जीवंत आहेत हे जाहीर होते व म्हणून ते हस्तिनापुराला, त्यांच्या राज्यात परत जातात.

तेथे त्यांचा काका व कौरवांचा पिता, ध्रुतराष्ट्र व आजोबा, म्हणजेच भिष्म, त्यांना सांगतात कीं, दोन चुलत भावंडात वितुष्ट होऊ नये म्हणून पांडवांनी समजूतदारपणे हस्तिनापुर सोडून खांडवप्रस्थी जाऊन आपला राज्य कारभार करावा. भिष्म त्यांना सांगतात कीं, खांडवप्रस्थसुद्धा हस्तिनापुराप्रमाणेच मोठे असून तेथे त्यांना कांहीं कमी पडणार नाही. आज्ञाधारक व सत्शिल असें तें पांच भाऊ ती आज्ञा मानून पांडव आपल्या सर्व चाहत्यांच्या बरोबर खांडवप्रस्थी प्रयाण करतात. जातांना ते त्यांची सर्व दागदागिन्यांची मिळकत बरोबर नेतात. खाडवप्रस्थी ते अनेक वर्षे राहून उत्तम

राज्यकारभार करून तो प्रदेश उत्कर्षास आणतात. त्यांच्या विलक्षण राजनिती व युद्ध कौशल्याने ते आपल्या राज्याच्या सीमा वाढवून मोठा करतात. अनेक छोटे राजे त्यांना मिळून काम पहातात. चांगला कारभार व सचोटी अशामुळे ते प्रजेत सुविख्यात होतात. त्यांचे राज्य एक श्रीमंत व शक्तिमान राज्य म्हणून ख्यातनाम होते. त्यांच्या राज्यात शांतता, समृद्धी नांदत असते. अनेक वाईट शक्तिंचा ते पाडाव करून एक शक्तिमान राजे म्हणून ते नावाजतात. आपले साम्राज्य वाढवण्यात भिमांने पूर्वेकडील प्रदेश जिंकले, अर्जुनाने उत्तरेकडील, नकुलाने पश्चिमेकडील व सहदेवांने दक्षिणेकडील अशारितीने त्याच्या साम्राज्याचा विस्तार पांडवांनी केला. जणू सर्व जगच त्यांनी पादाक्रांत केले होते. ते पांच पांडव पांच सूर्यासारखे होते. सुखाने रहात असतांना एकदा अर्जुनाकडून कांहीं प्रमाद न कळतपणे होतो व त्यासाठी प्रायश्चित्त करण्यासाठी त्याला त्याचा मोठा भाऊ युधिष्ठीर, अकरा वर्षे व एक महीन्यासाठी वनवासात पाठवतो. असें समजतात कीं, ते विधालिखीत होते व म्हणून झाले. त्या काळात तो कृष्णाची भेट घेतो. त्याच्या बरोबर त्याच्या राजधानी, द्वारकेला जातो. तेथे तो कृष्णाची बहीण सुभद्रा हीच्याशी विवाह करून त्याची पत्नी मिळवतो जणूकाय इंद्राने सांचीशी विवाह केला असें ते होते.

वनवासात असतांना अर्जुन कांहीं अद्वितीय गोष्टी सहजपणे करतो. त्यातील एक, तो अग्नीला अपचनाच्या त्रासापासून बरे करण्यासाठी खांडववनातील वनौषधी जाळून बरे करतो. केशवाच्या मदतीने अनेक शत्रूंचा (पापशक्तींचा) परीपात करतो व अग्नीदेवास प्रसन्न करतो त्यामुळे त्याला अग्नीकडून गांडीव धनुष्य व त्याचा बाण ठेवण्याचा भाता, ज्याच्यातील बाण कधीही संपत नाहीत असा, मिळवतो. तसेंच एक युद्धायोग्य रथ ज्यावर गरुडाचे चिन्ह आहे तेसुद्धा पार्थाला म्हणजे अर्जुनाला तो देतो.

असाच एका प्रसंगी मायासुराला अग्नीपासून वाचवतो त्याची उतराई करण्यासाठी तो मायासूर पांडवांसाठी रत्नजडीत आलिशान, राजवाडा बांधून देतो. पुढे एका प्रसंगी जेव्हां कौरव युधिष्ठीराच्या यज्ञास उपस्थित असतात तेव्हा तो राजवाडा पाहून दुर्योधन मत्सराने उत्तेजित होऊन मनातल्या मनात ठरवतो कीं, पांडवांना द्युतात हरवून तो वाडा व त्यांचे ते राज्य त्यांच्या कडून काढून घ्यावयाचे. त्यासाठी सुवलाच्या मुलांकडून युधिष्ठीराला हरवण्याचा प्रबंध तो करतो व जसें तो हरतो, त्याला त्याचे साम्राज्य व

पत्नी द्युतात पणाला लावायला लावून ते सर्व ताब्यात घेतो. अशारितीने सर्वस्व घालवलेले पांच पांडव दुर्योधनाच्या आज्ञेनुसार बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवासात जाण्यास भाग पाडतो.

ते संपल्यावर पांडव परत येतात व आपले राज्य व इतर गोष्टी परत मांगतात परंतु कौरव ते मान्य करीत नाहीत. अनेक शिष्टाया व्यर्थ ठरतात आणि अखेरीस युद्धाशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. ते महायुद्ध होते व त्यात क्षत्रियांचा संहार होतो. पांडव जिंकतात, त्यांना त्यांचे व कौरवांचे असें सर्व साम्राज्य उद्ध्वस्त अवस्थेत मिळते.

असा आहे पांडवांच्या सत्शिल कारभाराचा व त्यांच्या सत्कर्माचा इतिहास. जे शेवटी अजिंक्य ठरतात.

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा एकसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बासष्ठावा

(आदिवंशावतरण पर्व पुढे चालू)

जनमेजय तेथे जमलेल्या ब्राह्मणांस सांगतो, अहो वैशंपायन, तुम्ही निश्चितच ही कथा, जिला महाभारत म्हणतात, थोडक्यात सांगितली आहेस परंतु, अहो वैराग्यनिधी, आता ते महाभारत संपूर्ण सांगावे कारण, मला ते तसें ऐकण्याची फार इच्छा आहे. ते तुम्हीच सांगावे असें मला वाटते. अशा कथा थोडक्यात ऐकण्यात रस नसतो. मी एक समजतो कीं, त्या महान बुद्धीमान पांडवांने ज्या अर्थी कौरवांना मारले त्या अर्थी त्यामागे तसेंच कांहीं मोठे कारण असले पाहिजे त्याशिवाय, त्यांना मारल्याने पांडवांचे कौतुक होत आहे, ते त्यांना विनाकरण मारणार नाहीत, ते तेव्हांच समजेल जेव्हां हा इतिहास मला तपशिलात ऐकावयास मिळेल. दुसरे एक मला समजून घ्यावयाचे आहे किं, पांडव एवढे शक्तिमान व शत्रूंचा संहार करण्याची ताकद असूनही कौरवांच्या छळाला कां सहन करीत होते, तेसुद्धा मला समजून घ्यावयाचे आहे. मला आणखीन कांहीं शंका आहेत किं, भिम एवढा ताकदवान असूनही अन्याय कां सहन करीत शांत बसला होता. त्याशिवाय मला समजून घ्यावयाचे आहे कीं, जिच्या नजरेत शापाची शक्ति आहे अशी कृष्णा म्हणजेच द्रौपदी तिच्यावर होणार्या अन्यायाने संतापून ध्रुतराष्ट्राच्या मुलांना मारुन न टाकता ते सर्व कां सहन करीत राहीली? मला सांगा, चारही पांडव कुंतीचे दोन भिम , अर्जुन व माद्रीचे नकुल व सहदेव सतत अपमान होत असतांना युधिष्ठीराला सदैव पाठींबा कसें देत राहीले? मला सांगा, एवढा गुणसंपन्न युधिष्ठीर जुगारासारख्या नादांत कसा पुनः पुन्हा फसत होता? श्रेष्ठ पांडव, धनंजय म्हणजेच अर्जुन ज्याचा सारथी कृष्ण आहे असा पराक्रमी असूनही ते सर्व सहन करून अखेरीस युद्धाला कां घाबरला हेता? अहो वैराग्यनिधी वैशंपायन महाराज, मला ते सर्व सांगा ज्यामुळे माझ्या शंकांचे निरसन होईल.

असें सर्व प्रश्न ऐकल्यावर वैशंपायन ऋषी बोलतात, अहो राजश्री, हे सर्व ऐकावयाचे असेल तर त्यासाठी मोठा वेळ लागेल व त्यासाठी आपल्याला समय असावयास पाहिजे. तसा समय असेल तर मी ते सर्व तपशिलात जाऊन, अभूतपूर्व बुद्धिसामर्थ्य असलेले व सर्वमान्य अशा श्रीव्यासांनी जे सांगितले तें तसेंच सांगण्यास तयार आहे. हा भारत नांवाचा इतिहास सत्यवतीच्या अद्भूत बुद्धिसामर्थ्य असलेल्या सुपुत्रांने एकंदर एक लक्ष

श्लोकांतून लिहीला आहे. त्यांनी तो इतरांना सांगितला व इतरांनी तो आणखीन इतरांना तसांच सांगितला, अशारितीने तो ब्राह्मणांच्या जगात पसरला. हा भारत नांवाचा इतिहास वेदां इतकाच पवित्र व तेजस्वी आहे. हा जगण्यासाठी जरूरी असलेल्या धर्म (कर्तव्य) अर्थ (नफा) व काम (सुख) ह्यांवर योग्य मार्गदर्शन करतो. हा ऐकल्यावर ऐकणार्यात मोक्षाची इच्छा उत्पन्न करू शकतो.

विद्वान लोक हे कृष्ण-द्वैपायनानी लिहीलेले महाभारतरुपी वेद गाऊन सज्जन, सत्त्वशिल लोकांकडून संपन्नता मिळवतात. हे ऐकून अनेक पापांपासून त्यांची सुटका होते. सुरुवातीला ह्याला नांव होते, जय, म्हणून ज्यांना जीवनात यशस्वी व्हावयाचे आहे त्यांने हा वाचावा असा संकेत आहे. एकादा राजा ह्याचे श्रवण करून जगाचा सम्राट होऊ एकतो. हा इतिहास ऐकल्याने मनाचे समाधान होते जसे काय यज्ञ केला आहे. तरूण राजाने जर हे ऐकले तर त्याच्या अर्धांगिनीसह त्याला उत्तम संतति होते. हा इतिहास पवित्र धर्मशास्त्र (कर्तव्याचे शास्त्र) शिकवतो. असें स्वतः श्रीव्यास महर्षीने सांगितले आहे. ह्याचे वाचन आज होत आहे व उद्यासुद्धा होत रहाणार आहे. हा इतिहास ऐकणार्याची सर्व प्रकारचे पाप करण्याची प्रवृत्ती नष्ट होते. ह्या इतिहासातून पांडवांची व सर्व कुलिन क्षत्रियांची, जे विद्वान व प्रसिद्ध आहेत, किर्ती वाढवतो. कृष्ण-द्वैपायनांनी सगळ्यांचे भले व्हावे ह्या एकाच उद्देशाने हे काव्य रचले आहे. ते वाचल्याने अथवा ऐकल्याने दीर्घायुष्य मिळते. जो हा इतिहास मनापासून वाचेल तो ताबडतोब पवित्र व पुण्यवान होईल. जो हा कौरवांचा इतिहास ऐकेल त्याचे कुटूंब मोठे होईल. जो ब्राह्मण पावसाळ्याचे चार महीने हा वाचेल त्याची सर्व पापे धुवून टाकली जातील. ज्याने हा वाचला त्याला वेद वाचल्याचे पुण्य मिळेल.

ह्यात देव, राजर्षी, स्वयंभू ऋषी आणि केशव जो देवादिदेव आहे, महादेव व पार्वती, त्यांचा मुलगा ज्याला अनेक दायांनी सांभाळले असा कार्तिकेय, ब्रह्मणांचे व त्याच्या वर्गाचे कौतुक केलेले आहे. ह्यात सर्व श्रृतीचा संग्रह आहे व जो पवित्र मनाचा आहे त्यांने तो चंद्रायनात वाचला तर तो ब्रह्मात विलीन होईल. श्राद्ध करतांना त्याचे वाचन केल्याने त्यानंतर जे द्याल त्यांने सर्व पितर संतुष्ट होतील. ह्याच्या वाचनाने अथवा श्रवणाने दैनंदीनी जी पापकर्मे केली जातात ती सर्व धुतली जातात.

कृष्ण-द्वैपायनानी हा इतिहास तीन वर्षात लिहून काढला. दररोज पहाटे उठून व प्रातर्विधी उरकून हा महाभारताचा इतिहास लिहीत असें म्हणून, ब्राह्मणांनी तो एक व्रत समजून वाचावा. जो ब्राह्मण इतरांना तो वाचून दाखवेल त्याचे सर्व पाप, दुष्कृत्य धुवून टाकले जाईल. हा इतिहास ऐकून जे सुख मिळेल ते स्वर्गसुखापेक्षा श्रेष्ठ असेल. जो सद्गुणी पुरुष हा ऐकेल मनापासून त्याला राजयज्ञ तसेंच अश्वमेध यज्ञ केल्याचे फळ मिळेल. असें म्हणतात, समुद्रात किंवा मेरू पर्वतावर जितकी रत्नं आहेत तितकी ज्ञानरुपी रत्ने ह्या इतिहासात आहेत. जो ह्याचे पुस्तक कोणाला दान करील त्याला पृथ्वी तिच्यावरील सर्व समुद्रनीशी दिल्याचे पुण्य मिळेल.

अहो परिक्षीत सुता, ह्याचे पुण्यवाचन आता मी संपूर्ण असें करणार आहे, ते ऐकल्याने तुला किर्ती व जय सदैव मिळेल. सत्य, सुख, मोक्ष व वैभव ह्यांबद्दल जे कांहीं आहे ते सर्व ह्यात आहे व जर ते ह्यात नसेल तर ते कोठेच नसेल.

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा बासष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्रेसष्ठावा

(आदिवंशावतरण पर्व पुढे चालू)

ऋषी वैशंपायन सांगू लागतात, फार वर्षापूर्वी उपरीचर नांवाचा एक राजा होऊन गेला. तो राजा गुणी होता व त्याला शिकार करण्याचा छंद होता. तो पौरव कुळातील ज्याला वसुकुळ असें सुद्धा म्हणतात. तो शेडी हे सुंदर व आनंदमय राज्य इंद्राच्या सुचनेनुसार जिंकतो. यथावकाश तो राजा शस्त्रसाधना सोडून एक अतिशय कठोर सत्त्वशिल जीवन जगण्यास सुरुवात करतो. त्या तीव्र तपस्येमुळे तो देवाचा राजा बनण्याच्या अवस्थेत जात होता. ते समजल्यावर इंद्र त्याला दर्शन देतो व त्याला गोड बोलून त्याची कठोर तपस्या थांबवण्याचा प्रयत्न करतो. देव बोलतात, अहो पृथ्वीचे राजे, हे व्रतस्थ जीवन आपण सोडून द्यावे व आपले राज्य सांभाळण्याचे कार्य पुनः सुरु करावे. तुमचे सद्‌गुण त्यामार्गे जगाचे कल्याण करतील. त्यासाठी आपले एक चांगला राजा म्हणून कार्य असते किं, समाजातील लोकांत सद्‌गुण वाढतील. राजा जर सद्‌गुणी असेल तर प्रजासुद्धा सद्‌गुणी होते. त्याशिवाय मृत्यूनंतरसुद्धा विविध पवित्र ठिकाणी तू जाऊन रहाशिल. जरी मी स्वर्गात आहे व तू पृथ्वीवर, असें असले तरी आपले संबंध मित्रत्वाचेच आहेत. म्हणून अरे पृथ्वीच्या राजा, तू येथेच पृथ्वीवरच रहा स्वर्गात येण्याचा प्रयत्न करू नकोस. पृथ्वी किती सुंदर आहे पहा, येथील विविध प्राणी, पवित्र ठिकाणे, धनधान्य, सुपीक शेते हे सर्व स्वर्गासारखेच आहे व स्वर्गाप्रमाणेच सुरक्षितसुद्धा आहे. पृथ्वीवर आवडेल असें वातावरण असते, आनंद करण्यासाठी कितीतरी गोष्टी येथे आहेत. हे सर्व स्वर्गापेक्षा जास्त चांगले आहे. त्यासाठी तू येथे पृथ्वीवरच रहावेस. त्याशिवाय तुझे शेडी राज्य समृद्ध आहे, जडजवाहर, रत्ने, हिरे, माणके असे कितीतरी येथे आहेत. त्याशिवाय अनेक उपयुक्त खनिजं तुझ्या राज्यात आहेत असें असतांना, तसेंच तुझ्या राज्यातील प्रजा गुणी आहे. ते गमतीतसुद्धा खोटे बोलत नाहीत. तुझ्या राज्यातील मुलं वडीलार्जित संपत्तीच्या वाटण्या करण्याचा आग्रह धरीत नाहीत, वाद होत नाहीत, कमजोर गुरांना कामाला जुंपले जात नाही, उलट त्यांना चांगले खाऊ घालून धष्टपुष्ट केले जाते, तुझ्या राज्यात चारही वर्णाचे लोक आपापली कामे बिनातक्रार करीत आहेत, मी तुला एक अशी गाडी देतो जी आकाशात तरंगत कोठेही पृथ्वीवर जाऊ शकेल. त्यामुळे तू मनात येईल तेथे जाऊ

शकशिल. मी तुला असा एक हार देईन ज्याची फुलं कधीही कोमेजणार नाहीत. युद्धात जातांना तो हार घालून गेलास तर तुला कोणीही जखमी करू शकणार नाही. तो हार इंद्राची खूण म्हणून तुझ्याकडे राहील. त्यामुळे तुझे कामसुद्धा येथे सोपे होणार आहे तरी तू स्वर्गाचे राज्य कशासाठी पहात आहेस?

उपरीचर वसु राजाच्या त्या घोर तपाला इंद्र किती घाबरला होता ते ह्या त्याच्या वक्तव्यावरून दिसून येते. एवढ्यावर तो थांबला नाही. तो वृत (इंद्र) त्या राजाला एक बांबू प्रामाणिक व शांतपणे रहाणार्यांचे संरक्षण करण्यासाठी देतो. राजा ते ऐकून आपली तपस्या सोडून राज्यात परत येतो. ते वर्ष संपल्यावर तो बांबू राजा इंद्राच्या (सक्राच्या) सन्मानासाठी जमिनीत उभा करतो. त्यानंतर ती एक प्रथा होते किं, इंद्राची पुजा करण्यासाठी एक स्तंभ उभा करावयाचा. पुराणात ह्या वसुंचे फार महत्व आहे. पुजा करण्याआधी त्या स्तंभाला उत्तम वस्त्र नेसवले जाते व सुगंधी द्रव्याचे लेपण होते. त्याला वसवदेव असें म्हणतात. त्याला दागिने चढवले जातात. अशा पुजा केल्यावर स्वतः देव इंद्र ती पुजा घेण्यासाठी येतात असे समजले जाते. शेडीचा राजा वसु उपरीचराने ही प्रथा सुरु केली इंद्राच्या सन्मानार्थ. ती केल्यास त्या राज्यात नेहमी संमृद्धी, आनंद, वैभव, कायम राहील असा आशिर्वाद इंद्राने दिला.

अशारितीने प्रसन्न झालेल्या मेघावताने (इंद्र) त्या उत्सवात राजा वसुच्या लोकांना देणग्या, दानं देऊन तो उत्सव साजरा केला. इंद्राच्या कृपेमुळे पुढे तो शेडीचा राजा सर्व जगाचा सम्राट झाला. त्याला कर्तृत्ववान व शक्तिमान पांच पुत्र होते. राजाने त्यांना निरनिराळ्या प्रांतांचे प्रमुख नेमले. त्यांपैकी एक ज्याचे नांव होते वृहद्रथची नेमणूक मगध प्रांती त्याने केली. त्याला महारथ अशी पदवी दिली. दुसरा पुत्र प्रत्यग्रह, त्यानंतर कुसम्ब ज्याला मणीवहन ह्या नांवानेसुद्धा ओळखले जाते आणि शेवटचे दोन मवेल व यदु हे सर्व महान गुणवंत व कर्तबगार असें होते. त्यापैकी कोणीही युद्धात कधीही हरले नाहीत. अहो राजश्री, हे त्या महान ऋषी, वसुचे मुलगे होते. त्या पांच मुलांनी त्यांची स्वतंत्र राज्ये विविध प्रदेशांत बनवली. त्यां राज्यांना त्यांनी त्यांची नांवे दिली. तेथे त्यांनी बरीच वर्षे राज्य केले. जेव्हां त्यांचे पिताश्री इंद्राने दिलेल्या स्वर्गीय विमानातून आकाशात फिरत असें त्यावेळी त्याच्या भोवती गंधर्व व अप्सरा गाणी गात त्याचे मनोरंजन करीत असतं. हा ऋषी जो

राजासुद्धा होता, आकाशातून फिरत असें म्हणून त्याला उपरीचर म्हणजे आकाशातून जाणारा, असें नांव मिळाले. त्याच्या राज्यातून एक नदी वहात असें, तिचे नांव सुक्तिमति असें होते. एकदा त्या नदीला एका जीवंत पर्वतांने विळखा घातला. त्या पर्वताचे नांव होते, कोलाहल. ते पाहिल्यावर उपरीचराने त्या पर्वताच्या कंबरेत लाथ मारली. त्यामुळे त्या पर्वताला भोक पडले व त्यातून ती नदी मोकळी झाली. तरीसुद्धा त्या काळात कोलाहल पासून सुक्तिमति नदीला दोन पुत्र झाले. ती दोनही अपत्ये, एक मुलगा व मुलगी, तिने, तिला कोलाहलाच्या तावडीतून तिची सुटका केली म्हणून, वसुला दिली. वसुने त्यातील मुलाला यथावकाश त्याच्या सैन्याचे प्रमुख नेमले. मुलीला, गिरिका, त्यांने त्याची पत्नी म्हणून स्वीकारले.

गिरिका ऋतुस्नात झाल्यानंतर स्नान करून वसुकडे जाते. नेमके त्याच सुमारास वसुचे पितर त्याच्याकडून श्राद्धाची मागणी करतात. ते त्यांची इच्छा त्याला सांगतात कीं, त्यांना श्राद्धात एक हरीण द्यावे. वसुने विचार केला किं, त्यांने त्याच्या पितरांची इच्छा पूर्ण केली पाहिजे. म्हणून तो शिकारीला निघाला. परंतु, त्याचे सगळे मन त्याच्या प्रिय पत्नीकडे होते. गिरिका अत्यंत सुंदर व लक्ष्मीसारखी होती. तो ज्या जंगलात शिकारीसाठी गेला होता तो परिसर रम्य होता. तो काळसुद्धा वसंतऋतुचा होता. तो राजर्षी शिकार मिळवण्यासाठी त्या वनात भटकत होता. त्या जंगलाचे वातावरण इतके प्रसन्न होते किं त्यामुळे त्याला सतत गिरिकाची आठवण येत होती. चौफेर विविध सुंदर आणि सुगंधी फुलांचे सडे पडले होते. जणूकाय ते गंधर्वांचे रान असावे. तेथे अशोक, चंपक, चुता, अतिमुक्र अशी अनेक मनाला प्रसंन्नता देणारी वनस्पती सर्वत्र होती. त्याशिवाय, पुनंग, कर्णिका, बकुळी आणि दिव्य पतल, नारळी, चंदन, अर्जुन, अशी व आणखीन बर्याच पवित्र वनस्पती तेथे भरपूर होती. त्यांच्या सुगंधामुळे तेथील वातावरण अति प्रसंन्न झाले होते. त्याशिवाय कोकीळ पक्षाच्या श्रवणसुंदर ओरडण्याने तो प्रदेश आणखीन जास्त विलोभनिय झाला होता. मधमाश्यांची पोळी झाडांवर लोंबकळत होती. अशा मोहमय वातावरणांमुळे त्याची संभोगाची इच्छा अधिक तीव्र होत गेली व त्याला गिरिकाची सारखी आठवण येत होती. परंतु, ती त्याच्या जवळ नसल्याने तो बेचैन होत होता. अशा परिस्थितीत त्याला भटकत असतांना एक अशोक वृक्ष दिसतो. त्याच्या सर्वच फांद्यावर

असंख्य फुलं लागलेली होती. त्या वृक्षाखाली तो श्रमपरिहारासाठी बसतो. त्या अतिसुंदर वातावरणात वसुचे संयमन ढळते व त्याचे वीर्य बाहेर येते. ते वीर्य गिरिकाला मिळाले पाहिजे असा विचार त्याच्यात येतो. ते करण्यासाठी राजा विचार करीत असतांना त्याला एका बाजूला गरुड बसलेला दिसतो. त्याला राजा विनंती करतो किं, त्याने ते वीर्य गिरिकेला नेऊन द्यावे. तो गरुड ती विनंती स्वीकारतो व तो ते वीर्य चोंचीत घेऊन निघतो. वाटेत त्या गरुडाला आकाशात इतर गरुड पहातात व त्यांना असें वाटते कीं, हा कांहीं मांस चोंचीत घेऊन जात आहे. ते मांस मिळविण्यासाठी ते गरुड त्याच्याशी झटापट करू लागतात. त्या झटापटीत ते वीर्य गरुडाच्या चोंचीतून निसटते व खालून वाहणार्या यमुना नदीत पडते. त्या पाण्यात एक अद्रीका नांवाची शापित अप्सरा विहार करीत असते. तिला ते मिळते, ती ते वीर्य स्वीकारते. त्यापासून तिला गर्भ रहातो. कालांतराने ती माशाच्या रुपातील अप्सरा एका कोळ्याला जाळ्यात सापडते. जसें तो तिला कापतो, त्याबरोबर त्यातून ती अद्रीका अप्सरा शापमुक्त होऊन बाहेर येते. कारण, तिला शाप देणार्या ब्राह्मणांने तसे सांगितले होते. अद्रीकेला तिचे अप्सरा रुप प्राप्त होते व ती स्वर्गात निघून जाते. त्या कोळ्याला तिच्या उदरात दोन लहान मानव सदृष्य बालके आढळतात, एक बालक पुरुष असतो व दुसरे कन्या. तो आश्चर्यचकित होतो व ती घेऊन राजाकडे जातो. ती दोनही बालके त्याच्याच वीर्यातून जन्मलेली आहेत हे तो राजा, उपरीचर, ओळखतो. राजा उपरीचर त्यांतील पुरुष बालकांस दत्तक घेतो. तो पुढे मत्स्य नांवांने मोठा सत्कर्मी राजा होतो. दुसरे बालक एक कन्या असते. राजा उपरीचर त्या कोळ्यास सांगतो कीं, दुसरे कन्या बालक त्यांने सांभाळावे. त्याप्रमाणे ती कन्या जिचे नांव सत्यवती असें तो कोळी ठेवतो त्याच्याचकडे वाढत असते. ती अतिशय सुंदर व सुहास्यवदना असते. परंतु, तिच्या अंगास माशांचा गंध येत असें. म्हणून तिला कांहींजण मत्यगंधा ह्या नांवानेसुद्धा ओळखत असतं. सत्यवतीला तो माशाचा वास आवडत नसे. ती आपल्या कोळी पालकांला मदत करण्यासाठी यमुना नदीतील पात्रात मासेमारी करण्यास जात असें. अशीच एकदा सत्यवती होडीतून जात असतांना एकदा यमुनेच्या किनार्यावर ती उतरली असतांना त्याच भागात कृष्ण द्विपात रहाणारे ऋषी पराशर तिला पहातात. तिचे सौंदर्य, शालिनता पाहून पराशर ऋषीला सत्यवती आवडली, त्यांने तिला मांगणी घातली.

सत्यवतीला तो ऋषी विनंती करतो किं, तिने त्याला मिठी मारावी. त्यावर सत्यवती त्याला सांगते, दोनही बाजूस बरेच ऋषीगण पहात आहेत. ते ऐकल्यावर पराशर ऋषी आपल्या दैवीसामर्थ्याने त्या परिसरात धुकें निर्माण करतात. त्या धुक्यामुळे कोणालाही ते दोघे दिसत नाहीत. ते पाहून सत्यवती विस्मयचकित होते व त्याला लाजून सांगते, मी कुमारीका आहे व माझ्या पित्याच्या आज्ञेत आहे. त्याच्या परवानगी शिवाय मी असें कसें करणार? अशा कृत्यामुळे माझे कौमार्य संपेल. मी त्यानंतर माझ्या घरी परत जाऊ शकणार नाही. असे जीवन मी जगू इच्छित नाही. ते सर्व ऐकून पराशर तिची बाजू समजतात व तिला आश्वासन देतात कीं, माझ्या संपर्काने तुझे कौमार्य बाधीत होणार नाही. तू कुमारीकाच रहाशिल व तुला तुझ्या पित्याच्या रोषास तोंड द्यावे लागणार नाही. पराशर तिला विचारतात, तुला कोणता आशिर्वाद पाहिजे तो मांग. मी दिलेला आशिर्वाद कधीच खोटा होत नाही ह्याची खात्री बाळग. ते ऐकून सत्यवती पराशराला बोलते, माझ्या अंगाला हा जो माशाचा गंध आहे तो जाऊन त्या ऐवजी प्रसन्न सुगंध आला पाहिजे. पराशर तिची ती इच्छा पूर्ण करतात व सत्यवतीच्या अंगाला एक प्रसन्न करणारा सुगंध येऊ लागतो. त्याच वेळी ती ऋतुस्नात होते. पराशर तिला त्याच्या मिठीत घेतात व ते दोघे त्या स्थितीत बराच काळ रहातात. सत्यवतीच्या अंगाचा सुगंध दूरवर पसरत जातो व त्यानंतर तिचे नांव गंधवती असें होते. त्या मधूर मिलनानंतर पराशर आपल्या ठिकाणी निघून जातात.

त्यानंतर गंधवती आपल्या पित्याच्या घरी न जाता पराशर ऋषी ज्या कृष्ण द्विपात रहात तेथे त्याच्याकडे राहू लागते. तेथे तिला एक तेजस्वी बालक होते. पराशरासारखेच ते बालक देदीप्यमान असते. पुढे आईच्या संमतीने ते बालक वैराग्य धारण करते. ते बालक कृष्ण द्विपावर जन्मले म्हणून त्याचे नांव कृष्ण-द्वैपायन, म्हणजे कृष्ण द्विपावर जन्मलेला, असें ठेवले जाते. पुढे त्याला व्यास ह्या नांवानेच लोक जास्त करून ओळखू लागले. कृष्ण-द्वैपायन आईला वचन देतो किं, जेव्हा ती त्याची आठवण करील तेव्हा तो तिला भेटण्यास पटकन येईल. व्यास जन्मताच ज्ञानी होते.

व्यासांनी विस्मृतीत गेलेले वेद लिहून काढले व तेवढ्याने ते थांबले नाहीत व अनेक पुराणे व महाभारत हा पांचवा वेद गणेशाच्या मदतीने लिहून घेतले. वेदांची पुनर्चना केली म्हणून त्यांना वेदांचे संपादक (व्यास) अशी पदवी मिळाली व तेंच त्यांचे नांव झाले. व्यासांनी सुमंत, जैमिनी (पूर्व मिमांसाकार), पैल, त्याचा मुलगा शुक आणि वैशंपायन असें महान शिष्य तयार केले. हे शिष्य तो महाभारत लोकांना गाऊन सांगू लागले.

त्या सुमारास वसुच्या वंशातच भिष्म, शंतनुमुळे गंगेच्या पोटी जन्मले.

त्याच सुमारास एक ऋषी अनिमांदव्य त्यांच्यावर झालेल्या एका चोरीच्या आरोपामुळे यमसदनी अडकून पडले होते. त्यांनी यमांस विनंती केली किं, मी कोणतेही पाप केलेले नाही तर माझी सुटका व्हावी व जर माझी तू सुटका नाही केलीस तर तू माझ्या सारख्या ब्राह्मणाचा मृत्यू घडवण्याचे पाप करीत आहेस म्हणून तू शुद्राच्या जन्मास येशील. अशारितीने विदूराच्या रुपांने यम त्याच कुळात अवतरतो. विदूर पूर्णतया निष्पाप असतो.

कुंतीच्या उदरात सूर्याचा अंश स्वरूप कर्ण जन्मतो.

देवकीच्या पोटी वसुदेवाचा पुत्र म्हणून कृष्ण जगाचे कल्याण करण्यासाठी जन्म घेतो. तिन्ही जगाचा स्वामी ज्याला जन्म मरण माहीत नाही असा तेजस्वी, विश्वाचा कर्ता, विश्वाचा धनी, ज्याचा कधीही नाश होत नाही. ज्याच्या मधून हे जग चालवणारे तीन गुण सत्त्व, रजस व तमस उत्पन्न होतात. जो सर्व पदार्थात असून ज्याच्यामुळे त्या सर्व पदार्थांचे अस्तित्व शक्य झाले आहे. जो पंचमहाभूतांचा पूर्वज आहे. तो सर्व गोष्टींचे नियंत्रण करतो परंतु, इतर कोणीही त्याचे नियंत्रण करू शकत नाही. जो वेदातील ओंकार आहे, संन्यास वृत्तीचे मुळ आहे, ज्या जाणीवा आपल्या ज्ञानेंद्रीयाने समजतात त्यांच्या पलिकडील जाणीवा त्याला आहेत. जो पाप-पुण्याच्या प्रभावा पलिकडे आहे. असा विधाता अंधक-वृश्नीच्या कुळात जन्मला.

त्यानंतर सत्यकी व कृतवर्मा, जे सर्व प्रकारच्या शस्त्र, अस्त्र आणि इतर सर्वच विद्येत प्रवीण आहेत. जे अतिशक्तिमान आहेत, आणि नारायणाशी प्रामाणिक होते. ज्यांचा जन्म सत्यका व हृदीका पासून झाला.

भारद्वाजाचे वीर्य एका भांड्यात वाढवून त्यापासून द्रोण (भांड्यात जन्मलेला ह्या अर्थी) उत्पन्न झाले. गौतम ऋषीचे वीर्य जे गवतावर पडले त्यापासून जुळे उत्पन्न झाले,

अश्वत्थामन (कृप) अतिशक्तिमान. त्यानंतर जन्मला द्रष्टदुम्न जो साक्षात यज्ञातील अग्नीसारखा तेजस्वी होता. यज्ञकुडातून कृष्णा जन्मली, जिच्या देखणेपणाची तुलना कोणाशीही होत नाही.

त्यानंतर आले प्रह्लादाचा शिष्य नग्नजित आणि सुवल. सुवलापासून शकुनी जन्मला जो देवांच्या शापामुळे दुर्गुणांचा साक्षात्कार ठरला. सुवलापासून गांधारी जन्मली जी कौरवांची माता झाली. ते दोघेही सर्व व्यवहारशास्त्र प्रवीण होते. कृष्ण-द्वैपायना पासून विचित्रवीर्यास ध्रुतराष्ट्र व पंडु झाले जो महाबली होता. कृष्ण-द्वैपायनांपासून शुद्र स्त्रीस विदूर जो महापुण्यवान होता. त्याचे व्यवहार ज्ञान अप्रतिम होते. पंडुच्या दोन बायकांपासून पांच स्वर्गीय तेज असलेले पुत्र झाले जे पुढे पांडव म्हणून ख्यातनाम झाले. त्या पांचांतील मोठा युधिष्ठीर जो यमाच्या वीर्यापासून जन्मतो. दुसरा भीम जो वायूच्या वीर्यापासून जन्मतो जो महाशक्तिमान व सर्व शस्त्रात प्रवीण आहे, त्यानंतर अर्जुन (धनंजय) इंद्राच्या वीर्यापासून जन्मतो. अश्वीनीकुमारांपासून पंडुच्या दुसर्या बायकोस नकुल व सहदेव होतात जे आपल्या थोरल्या भांवडांच्या नेहमी आज्ञेत रहातात. अशाप्रकारे यथावकाश ध्रुतराष्ट्राला शंभर मुलं होतात गांधारीपासून. त्यांच्यात दुर्योधन सर्वात मोठा होता. त्याचप्रमाणे एका वैश्य बाईपासून युयुत्सु नांवाचा एक मुलगा त्याला होतो. कौरवात दुर्योधनानंतर दुःशासन, दुःसाहस, दुर्मेर्शन, विकर्ण, चित्रसेन, विविंगसती, जय, सत्यव्रत, पुरुमित्र, सावत्र भाऊ युयुत्स असें असतात. <u>ते सर्व महारथी म्हणून ओळखले जातात. त्यातूनच आजचे महार आलेले आसावेत. सातवाहनाने हरवल्यानंतर ब्राह्मणांनी त्यांना महारथीचे पतन करून महार म्हणून सांगितले. ते सर्व भ्रष्ट क्षत्रिय होते. भ्रष्ट क्षत्रिय अशासाठी किं, ते असुरी संपदा दाखवतात. कुलिन क्षत्रिय ते जे दैवी संपदा दाखवतात.</u>

अभिमन्यु सुभद्रेपासून, कृष्णाच्या बहिणीपासून, अर्जुनास झाला. म्हणून तो पंडुचा नातु होता. पांडवांना आणखीन मुलं द्रौपदीपासून झाली ती अशी, ते सगळे चांगले हुशार होते व दिसण्यात देखणे सुद्धा होते. युधिष्ठीरापासून प्रितीविंध्य, भिमापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रृतकिर्ति, नकुलापासून सतनिक व सहदेवापासून श्रृतसेन हे सर्व आपापल्या कामात तरबेज होते. भिमाला हिडींबापासून घटोत्कच झाला. द्रौपदीचा भाऊ द्रूपदला

शिखंडीनी म्हणून एक कन्या होते पण एका यक्षाच्या कृपेमुळे ती मुलगा बनते व त्याचे नांव होते, शिखंडी.

त्या कुरुवंशाच्या महान व भयंकर युद्धात लढण्यासाठी हजारो राजे एकमेकांशी लढतात, त्या सर्वांची नांवे मी हजार वर्षातसुद्धा आठवून देऊ शकणार नाही. येथे मी फक्त इतिहासात (पुराणात) नोंदण्यायोग्य महत्वाच्या लोकांची नांवे दिली आहेत.

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा त्रेसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौसष्ठावा

(आदिवंशावतरण पर्व शेवटचा भाग)

एवढे ऐकल्यानंतर राजा जनमेजय बोलतो, "अहो ब्राह्मणा, ज्यांची नांवे तुम्ही सांगितली व ज्यांची सांगितली नाहीत त्या सर्वांची जास्त तपशिलात माहिती मला ऐकावयाची आहे. त्याशिवाय असें ते हजारो राजे जे महारथी होते जे जरी पृथ्वीवर जन्मलेले असले तरी स्वर्गीय शक्तिंशी सहज बरोबरी करीत होते. तुमच्या दिव्य सामर्थ्याने हे सर्व आपण सांगू शकाल".

त्याला उत्तर म्हणून स्वामी वैषंपायन सांगतात, "अरे राजश्री, असें सांगतात किं, तू जे मांगत आहेस त्याबद्दल देवसुद्धा गोंधळात आहेत कीं, हे काय आहे?" तरीसुद्धा जमदाग्नीचा मुलगा परशुराम ह्याला नमस्कार करून मी तुला ते सांगण्याचा प्रयास करणार आहे. अरे राजा जनमेजया, तो असा काळ होता जेव्हां सर्वत्र भ्रष्ट क्षत्रियांनी सत्तास्थानं काबीज केली होती व आपल्या भ्रष्ट कारभारांने सर्वत्र अत्याचार व अन्याय ह्यांचे राज्य पसरवले होते. अशा परिस्थितीत परशुरामाने पृथ्वी एकवीस वेळा भ्रष्ट क्षत्रियांपासून पुन्हा पुनः मुक्त केली. आणि नंतर महेंद्र पर्वताकडे तपस्या करण्यासाठी निघून गेला. अशावेळी त्या मृत क्षत्रियांच्या विधवा बायकांना त्यांच्या स्वाभाविक प्रेरणेनुसार माता बनण्याची इच्छा झाली. अशा बायका ब्रह्मानंदात रमलेल्या व्रतस्थ ब्राह्मणांकडे त्यांना ऋतु झाल्याच्या वेळी संतति व्हावी म्हणून विनंति करीत असतं, केवळ वासनेमुळे नाही. अशा संबंधातून असंख्य क्षत्रिय स्त्रीयांना तेजस्वी मुलं झाली. कांहीं मुलगे व कांहीं मुली होत्या. उद्देश एवढाच होता कि. तो क्षत्रिय वंश जो त्यांच्या दुर्गुणांमुळे भ्रष्ट झाला होता तो कुलिन (गुणवान) होऊन पुन्हा वाढावा आणि ब्राह्मणांचे प्राधन्य असलेली चतुर्वर्ण समाजाची व्यवस्था पुन्हा प्रस्थापित व्हावी. अशारितीने केवळ वंश वाढवण्यासाठी व वासनेशिवाय असें सर्व लोक आपापल्या धर्मपत्नींशी संबंध करू लागले. त्यामुळे एक सामर्थ्यवान असा समाज उत्पन्न झाला, अरे भरतवंशाच्या नृपा, जो पृथ्वीचे संरक्षण करणारा आहेस, समजले कां तुला? तो समाज सद्गुणी व सुदृढ होता आणि पुन्हा एकदा ही पृथ्वी कुलिन क्षत्रियांच्या संरक्षणात आली. राजे ब्राह्मणांचा सन्मान करू लागले व क्रोध आवरून आपले काम करू लागले होते. फक्त दुर्गुणी जनानांच शिक्षा होवू लागली. सज्जन सुरक्षितपणे

जीवन जगू लागले. परशुरामाने शेकडो यज्ञ केले त्यामुळे त्याला हजार डोळे प्राप्त झाले. त्या हजार डोळ्यानी तो सर्व क्षत्रियांवर लक्ष ठेवून होता असें कीं, क्षत्रिय भ्रष्ट होणार नाहीत व सर्वत्र सुबत्ता रहावी. पुण्यवान राजे राज्य करू लागले त्यामुळे निसर्ग नीट वागू लागला, पाऊस वेळेवर पडू लागला, पिकांवर रोग पडेनात, व्यापार उदीम फायद्यात राहू लागले, रोगराई नाहीशी झाली. कोणीही अवेळी मरणे थांबले व लोक दीर्घायुषी झाले. समाजातून व्यभिचार नाहीसा झाला. लग्न होण्या आधी कोणीही पुरुष परस्त्रीचा विचार करीत नसें. अशा शिस्तीमुळे ह्या भारतवर्षात लोक दीर्घायुषी झाले होते. क्षत्रियानी मोठे त्याग करून समाजासाठी संपन्नता मिळवून दिली होती. ब्राह्मण वेद, वेदांगे, उपनिषद अशांचा अभ्यास करून समाजाच्या ज्ञानात संमृद्धी आणत होते. अहो राज्ञ, त्या काळात कोणीही ब्राह्मणांने वेद विकले (पैसे घेऊन शिकवले) नाहीत. तसेच शुद्राच्या हजेरीत त्यांचे वाचन केले नाही. त्या काळातील वैश्यांनी बैलांच्या मदतीने शेती केली परंतु, ते स्वतः नांगरणी करीत नसत. कृष अशक्त जनावरांना कामाला लावत नसत पण त्यांना प्रेमांने खाद्य देत असत. गवळी वासरांनी दुध पिऊन नंतर उरलेले दुध फक्त काढत असत. व्यापारी आपला व्यवसाय सचोटीने करीत असत व त्यामुळे कोणाचीही फसवणूक होत नसें. समाजातील सामर्थ्यवान लोक आपल्या अधिकाराचा वापर करून समाजातील नैतिकता जपण्याचे काम प्रामाणिकपणे करीत असत. स्त्रिया, अपंग, असहाय वृद्ध, कमजोर असे सर्व प्रजाजन स्वतःला पूर्णपणे सुरक्षित समजत होते. जे भ्रष्ट क्षत्रियांच्या राज्यात अशक्य होते. हे जनमेजय राजा, त्या काळातील सर्व मंडळी आपापल्या जबाबदार्या समजून आपापली कर्तव्ये पार पाडीत असत. त्या काळात लोक पुण्यवंत जीवन जगत असत. समाजातील स्त्रियांना अपत्ये त्यांच्या योग्य वयात होत असत. प्रत्येक ऋतूत वनस्पती फुलं व फळं विपुल प्रमाणात देत असत. अशारितीने कृत युगाचा दृष्य निसर्गातील विश्वात कारभार व्यवस्थितपणे चालत होता. एवढे ऐकल्यावर राजा जनमेजय वैशंपायन ऋषीस विचारतो, "हे मुनीवर मला सांगा, कुलिन व भ्रष्ट क्षत्रियांत फरक तो कोणता? वैशंपायन सांगतात, अरे जनमेजया तुला हे सर्व माहित असेलच परंतु, मी पुन्हा सांगतो. भ्रष्ट क्षत्रियांत चार प्रमुख दोष असतात, ते असें, अर्वाच्यवाचा, अपेयपान, अमर्यादा आणि व्रात्यक्रिडा. हे चार दोष कुलिनांत अजिबात नसतात. *टीपः*

*आजच्या काळात ज्या वागण्याला आपण मवालीगिरी, उनाडकी म्हणतो ते सर्व दोष भ्रष्ट क्षत्रियांची लक्षणे समजावीत. मानवधर्म शास्त्र जे गौतमीपुत्र सातवाहनाने लिहीले त्यात असें सांगितले आहे किं, भ्रष्ट क्षत्रियांना राजसत्तेवर बसू देऊ नये. गौतमीपुत्राच्या काळात (इ.स. १२५) हिंदू हा शब्द नव्हता त्या काळात मानव धर्म असें हिंदू धर्मास म्हणत असत. अतिप्राचीन काळी ह्याला आर्यधर्म असें समजत होते, आर्य म्हणजे सुसंस्कृत.*

ऋषी वैशंपायन राजाला पुढे सांगतात, अरे राजा, परशुरामाने भ्रष्ट क्षत्रियांचा पायबंद केला परंतु, भ्रष्ट ब्राह्मण व भ्रष्ट वैश्यांचा बंदोबस्त केला नाही त्यामुळे पुढे समाज अधोगतीला लागला. पृथ्वीवर भ्रष्ट ब्राह्मण व भ्रष्ट वैश्य कां व कसे वाढले ते आता ऐक,

सर्व पृथ्वीतील दृष्य निसर्ग अनेकविध प्राणिमात्रांनी भरलेला होता, आणि आणखीन ऐक हे भारतवंशाच्या राजा, अशारितीने सर्वकांहीं सुखमय असतांना पृथ्वीवर, अदृष्य निसर्गातील स्वर्गात मात्र, दितीची मुलं जे दैत्य म्हणून ओळखले जातात, देवांशी होणार्या युद्धांत ते सतत हरत होते. त्यांच्या हातातून सत्ता व अधिकार काढून घेतले जात होते. असुरांनी त्यामुळे असा निर्णय घेतला होता किं, स्वर्गात नाही तर निदान पृथ्वीच्या दृष्य निसर्गात तरी आपण ताबा घ्यावा, अशा उद्देशाने असुर पृथ्वीवरील अनेक राजवंशांतून जन्म घेऊ लागले. पृथ्वीच्या दृष्य निसर्गात माणसांचे राज्य होते. माणसांपेक्षा आपण सहजपणे जास्त शक्तिमान आहोत त्यामुळे तेथे आपण माणसांवर आपल्या मर्जीनुसार सत्ता गाजवू शकू असा सारासार विचार ते करत होते. पृथ्वीतील सर्व प्रकारच्या प्राण्यात ते दैत्य म्हणजेच असुर जन्म घेऊ लागले. दैत्यातील असुर व राक्षस त्यात मोठ्या संख्येने होते. अशाप्रकारे दितीची मुलं मोठ्या प्रमाणात दृष्य निसर्गात येऊ लागल्यामुळे पृथ्वीचा कारभार बिघडू लागला. दितीच्या मुलांच्या तामसी कारभाराचा तो प्रभाव होता. दिती व दानु (दानवांची आई, प्रजापतीच्या अनेक मुलींपैकी) आणि त्यांची मुलं स्वर्गातून फेकले गेल्यामुळे त्यांच्या परिवारासह पृथ्वीचा ताबा घेण्याचा प्रयत्न करण्यास उद्युक्त झाले. पृथ्वीतील अनेक उच्च घराण्यात ते घुसले व त्यातून अन्यायकारक कारभार ते देऊ लागले. दैत्यांची मुख्य योजना अशी होती कीं, जन्माधारीत वर्ण व्यवस्था पृथ्वीवर आणावयाची व गुणकर्माधारीत वर्णव्यवस्था बाद करावयाची. असें करण्यासाठी ते अनेक ब्राह्मणांच्या वंशात जन्म घेऊन व्यवस्था बिघडवण्यासाठी प्रयत्न करू लागले. असे

केल्यामुळे त्यांना मानव समाजात त्यांचा पापकारक कारभार प्रस्थापित करणे सोपे होणार होते. ते त्यानी शक्य केले व त्या पद्धतीने त्यांनी गुणकर्माने योग्य ठरलेल्या ब्राह्मणांना, क्षत्रियाना, वैश्यांना व शुद्रांना त्रास देण्यास सुरुवात केली. ब्राह्मण, क्षत्रिय, सुत व वैश्य अशा कुळांत ते जन्म घेत व त्यांच्या कुकर्माने त्या त्या घराण्याचे नांव बदनाम करीत होते. असत्य, अत्याचार, अनैतिकता, मग्रुरी, क्रौर्य व हिंसा ह्यांने सर्व पृथ्वी भरून गेली. स्त्रिया, अपंग, असहाय वृद्ध, कमजोर असे सर्व प्रजाजन व तसें प्राणिमात्र त्यांच्या अशा कामामुळे संत्रस्त झाली होती. एवढे साध्य झाल्यावर त्यांनी पृथ्वीवरील महान ऋषी, तपस्वी ह्यांच्या आश्रमात जाऊन त्यांचा जबरदस्तीने उपमर्द करू लागले. आता परिस्थिती अशी झाली कीं, पृथ्वीचा भार त्या पापामुळे इतका जास्त झाला कीं, तो सहन करणे तीला अशक्य झाले. पृथ्वीला सावरणारा शेषसुद्धा डळमळू लागला. सर्वांनी प्रजापतीची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्यांत ब्राह्मण, ऋषीवर व स्वर्गातील गंधर्व आणि अप्सरा सामील होते. प्रजापतीला जे काय होत होते त्याची आधीच कल्पना होती. प्रजापती सर्वांचा कर्ता असल्याने त्याला त्याच्या निर्मित प्राणिमात्रांच्या, देव व दैत्य व दानव ह्यांच्या सह, मनांत जे होते ते सर्व समजत होते. तो विश्वाचा कर्ता ज्याला कांहीं इसा, शंभू, प्रजापती अशा विविध नांवांनी ओळखतात, पृथ्वीला बोलले. "अहो सर्व प्राणिमात्रांचा आधार असलेल्या, मी स्वर्गातील शक्तींना सुद्धा पृथ्वीवर येण्यास सांगेन. ते सर्वकांहीं व्यवस्थित करतील".

वैशंपायन पुढे सांगू लागले, एवढे बोलून प्रजापतीनी पृथ्वीला निरोप दिला. त्यानंतर त्यानी सर्व देवांना आदेश दिले कीं, त्यांनीसुद्धा पृथ्वीवर अवतार घेण्यास प्रारंभ करावा. दैत्य व दानव ह्यांच्या कारवायांमुळे पृथ्वीवरील पापाचा भार जो वाढला आहे तो कमी करण्यासाठी हे आवश्यक आहे. त्यांनी सर्व गंधर्व आणि अप्सरा ह्यांनासुद्धा पृथ्वीवर जन्म घेण्याचे आदेश दिले. मनुष्य ह्या दैत्य व दानवांपुढे टिकाव धरू शकणार नाहीत म्हणून असें करणे आवश्यक होते हे सर्व देव समजले. त्यांनी ओळखले कीं, पृथ्वीचा ताबा त्यांनी घेणे देवांना मानवणार नाही हे इंद्रासह इतर सगळ्या देवांनी लक्षात घेतले. ते त्यासाठी पुढील कारवाईसाठी नारायणांस वैकुठी जाऊन भेटले. देवांच्या शत्रूस ठार मारणारा नारायण आपल्या साजासह तेथे विराजमान होते.

नारायण आपली दृष्टी आपल्या उरावर स्थिर करून योगीक आसनात ध्यान करीत होते. तेथे गेलेल्या देवांत त्यांचा राजा इंद्र नारायणांना आदर पूर्वक अभिवादन करून विनंती करतात कीं, "अहो प्रभू आता आपल्याला पृथ्वीवर अवतार घ्यावा लागेल. त्यावर हरी (नारायण) इच्छा व्यक्त करतात, "तसें होवो (तथास्तु)"!

अशारितीने आदिपर्वातील आदिवंशावतरण पर्वाचा चौसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पासष्ठावा

(संभव पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, नारायणांनी आपली इच्छा जाहीर केल्यावर इंद्र नारायणांशी सल्लामसलत करू लागतात. कशाप्रकारे नारायणांनी अवतार पृथ्वीवर घ्यावा ते ठरवले जात होते. त्यामध्ये इतर मंडळींनी काय काम करावे, कसें करावे इत्यादी गोष्टींवर विचार विनिमय झाला. त्याप्रमाणे ठरल्यानुसार इंद्र देवांना आवश्यक त्या सुचना देऊन स्वर्गाकडे निघतात. त्यानुसार ते देव पृथ्वीवर विविध घराण्यांतून मानवी जन्म घेतात. असुरांचा पराभव करून पृथ्वी त्यांच्यापासून मुक्त करण्याचे काम अशारितीने आरंभले गेले. जेणेकरून तिनही लोक (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ) पापमुक्त होतील. विविध देव मानवांतील ब्रह्मर्षी, राजर्षी असें अवतार घेऊन येत राहीले. त्यांनी वेळोवेळी अनेक असुर, राक्षस, नाग, गंधर्व जे माणसांस खात होते त्यांचा नाश केला. त्या देवांच्या अवतारी पुरुषांस त्यांच्या बालपणीच्या अवस्थेतसुद्धा, ते राक्षस, दानव, दैत्य, मारू शकत नव्हते एवढे ते अवतारी सामर्थ्यवान होते.

जनमेजय राजा मोठ्या कुतुहलाने ऋषी वैशंपायनांना विचारतो, "मी माझ्या बालपणापासून ह्या देव, दैत्य, दानव, गंधर्व, अप्सरा, माणसे, यक्ष, राक्षस अशांचे ऐकत आहे तरी त्यांबद्दलची खरी माहीती आपण मला सांगून माझी जिज्ञासा पूर्ण करावी".

ते ऐकून आनंदीत झालेले वैशंपायन राजाला बोलतात, "मी निश्चितच तुला ती सर्व माहीती आता सांगतो".

वैशंपायन सांगू लागतात, "ब्रह्माला सुरुवातीला सहा इच्छापुत्र झाले. त्यांची नांवे अशी, मरीच, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह आणि क्रतु. त्यातील मरीचाचा मुलगा कश्यप, त्यापासून अनेक प्राणी उत्पन्न झाले.

अनेक प्रजापतींपैकीं दक्ष नांवाच्या प्रजापतीला तेरा भाग्यवान मुली झाल्या. त्यांची नांवे अशी, अदिती, दिती, दानु, कला, दानयु, सिंहीका, कृर(क्रोध), प्रज्ञा, विश्वा, विनता, कपिला, मुनी आणि कद्रु. ह्यांची अनेक मुलं व त्यांची मुलं असंख्य झाली. अदितीपासून बारा आदित्य झाले जे, विश्वावर राज्य करीत आहेत.

अरे जनमेजया, मला जशी त्यांची नांवे आठवतात तशी सांगतो, ती अशी, धात्री, मित्र, आर्यमन, शक्र, वरूण, अंश, वग, विवस्वात, उषा, सवित्री, तष्त्री आणि विष्णू, ह्यासर्वात जो लहान आहे तो सर्वात जास्त सामर्थ्यवान आहे.

दितीला एक मुलगा होता त्याचे नांव आहे हिरण्यकश्यपू. तो एक महान राजा होता, दितीच्या मुलांना दैत्य असें बोलतात. दैत्य त्यांच्या अहंमन्यतेसाठी कुप्रसिद्ध होते. त्याला पांच मुलगे झाले. त्यातील मोठा प्रल्हाद, त्यानंतर संघराधा, तिसरा अनुह्रद त्यानंतर जे दोन होते त्यांची नांवे शिवी व वष्कल अशी होती.

प्रह्लादाला तीन मुलं झाली. त्यांची नांवे अशी, विरोचन, कुंभ आणि निकुंभ . ते सामर्थ्यवान होते. विरोचनाला वली नांवाचा मुलगा होता. तो पुढे असुरावन म्हणून ख्यातनाम झाला. असुरावन मोठा भाग्यवान होता कारण तो रुद्राची आराधना करीत असें. त्याला महाकाल असेंसुद्धा म्हणत असत.

दितीची बहीण दानु, तिला चाळीस मुलगे झाले. त्यातील सर्वात मोठ्याचे नांव होते विप्रचित्ती. तो ख्यातनाम होता. दानुच्या मुलांना दानव म्हणतात. तेसुद्धा दितीच्या मुलांप्रमाणे, दैत्यांप्रमाणे, अहंकाराने पिडीत होते व त्यांच्यात अहंकारामुळे जे दोष वाढतात ते सर्व आढळत होते. विप्रचित्ती शिवाय संवर, नमुची, पुलोमन, असिलोमन, केसी, दुर्जय, अयस्सिरस, अश्वसिरस, अश्वशंकू, गगनामर्धन, वेगवत, केतुमत, स्वर्भानु, अश्व, अश्वपती, वृशपर्वन, अजक, अश्वग्रीव, सुक्षम, तुहुंद, एकपाद, एकचक्र, विरुपाक्ष, महोदर, निशंद्र, निकुंभ, कुपत, कापत, सरभ, सुलोभ, सूर्य, चंद्रमास हे दानुच्या घरातील विशेष नावाजलेले होते. अर्थात, आकाशातील सूर्य व चंद्र हे ह्यांपैकी नाहीत ते वेगळे आहेत.

दानुच्या वंशात आणखीन कांहीं ख्यातनाम राजे झाले त्यांची नांवे अशी, एकाक्ष, अमृतप, प्रल्मव, नारक, वत्रपी, शत्रुतपन, शठ हे मोठे असुर होते. गविष्थ, वनयु, दीर्घजीवा. अरे जनमेजया, ह्या सर्वांची असंख्य मुलं व त्यांची मुलं होती. दैत्य व दानव हे दोनही गट देवांच्या विरुद्ध असतात व त्याप्रमाणे त्यांचे विरोध सदैव होत असतात. ते देवां इतकेच शक्तिमान असतात. दानव जेव्हां मानव जन्म घेतात तेव्हां त्यांना असुर म्हणतात व दैत्य जेव्हां मानव जन्म घेतात तेव्हां त्यांना राक्षस म्हणतात

असा साधारण नियम आहे. ह्या दोघांचा एकच वैरी असल्यामुळे देवांशी लढण्यात ते एकमेकांना मदत करीत असतात. देव व ह्यांच्यातील फरक अहंकाराबाबतचा असतो.
सिंहिकाला राहू झाला. ज्यांने सूर्य व चंद्रास ग्रासण्याचा प्रयत्न केला. सुचंद्र, चंद्रहंत्री व हंद्रप्रमर्दन ह्या तिघांना असंख्य असुर, दानव अपत्ये झाली ती कृर (क्रोध) सारखी दुष्ट, खुनशी, अत्याचारी होती जशी त्यांची आई. त्यांतून भ्रष्ट क्षत्रिय, भ्रष्ट ब्राह्मण व भ्रष्ट वैश्य उत्पन्न झाले. ते शक्य व्हावे म्हणूनच दानवांनी माणसात असलेली गुणकर्म विभागशः वर्ण व्यवस्था बुध्द्या (जाणून बुजून) बंद करून आजची जन्मावर आधारीत वर्णव्यवस्था प्रचारात आणली म्हणजे वंशाने ते आपली पकड समाजावर कायम करू शकतील. गुणकर्मशः व्यवस्थेत ते शक्य नव्हते. त्यात त्यांना यश आले. देव व त्यांचे सहायक ह्यांना त्या घराण्यात ते जन्मू देत नव्हते. त्यामुळे देवांनी शुद्रांत अथवा अकुलांत जन्म घेऊन आपली कामे करावी लागली ते प्राप्त व्यवस्थेनुसार सोपे नव्हते. प्रस्थापित ब्राह्मण जे दानव असल्यामुळे शुद्रात अथवा अकुलांत जन्म घेणार्या देवांना समाजात काम करणे अशक्य करून ठेवत असत. अशारितीने अनेक धर्ममार्तंड व राजे दानव असल्यामुळे समाजात तामसी प्रवृत्ती वाढवण्यात त्यांना यश येत होते. असें भ्रष्ट ब्राह्मण अधर्माला धर्म सांगू लागले. भ्रष्ट वैश्यांनी चोरीला व्यापार समजण्यास सुरुवात केली.
प्रजापतीच्या इतर कांहीं मुलींच्या मुलांनासुद्धा दानव असें समजले गेले आहे. दानयुला चार मुलं होती. ते असुरांत अग्रणी होते. ते असें, विक्षर, वल, वीर आणि वृत्र.
कलाला यम व तशीच आणखीन मुलं होती ती यमाप्रमाणे प्रतिस्पर्ध्यास घातक होती. सर्व असुर, जे मानव रुप घेऊन जन्म घेत ते अनेक उत्तम गुणांनी युक्त असत. पण त्यांची कृती पापकारक असें. आपल्या सगळ्या उत्तम गुणांचा (बुद्धी, चातुर्य, कसब, दूरदृष्टी, नियोजकता, धुर्तता इत्यादी) ते दुष्कृत्यासाठी वापर करीत असत. क्रौर्य, कपटीपणा, विश्वासघात, दुष्टपणा, हिंसकता हि त्याच्या कामाची तर्हा होती शत्रुचा नाश करतांना ते बिलकुल दयामाया दाखवत नसतं. शिस्तीची सबब सांगून क्रौर्य करीत.

कलाचे मुलगे विनाशना आणि क्रोध, त्याशिवाय क्रोधहंत्री आणि क्रोधशत्रू आहेत. आणखीन बरीच मुलं कलाची होती. शुक्र हा एका ऋषीचा मुलगा होता तो ह्या असुरांचा मुख्य पुरोहीत होता. त्याला चार मुलं होती तीसुद्धा असुरांचे पौरोहित्य करीत असत. त्यांची नांवे अशी, तश्तधर आणि अत्री, दुसरी दोन साक्षात कुकर्मी होती. त्यांचे तेज साक्षात सूर्यासारखे होते व त्यांनी ठाम निर्णय केला होता कीं, ते समस्त ब्राह्मणांचे क्षेत्र त्यांच्या ताब्यात घेऊन माणसाला भ्रष्टाचाराकडे न्यावयाचे. भ्रष्ट ब्राह्मणांच्या मदतीने भ्रष्ट धर्म स्थापून समाजाला भ्रष्ट करण्यात ते यशस्वी झाले होते. वेदांना भ्रष्ट करणे असे अनेक प्रकार ते करून धर्म बिघडवत होते. परशुरामाने सर्व भ्रष्ट क्षत्रियांचा नाश एकवीस वेळा केला होता त्याचा राग त्या शुक्राचार्याच्या मुलांना होता. त्यासाठी ते अनेक असुरांना त्याच्या वंशात जन्म घेण्यास तयार करीत होते.

एवढे सांगून वैशंपायन ऋषी राजा जनमेजयांस सांगतात कीं, जे मी असुर व देवांबद्दल पुराणात वाचले ते सगळे तुला सांगितले. त्यांची प्रजा, त्यांचे सामर्थ्य व कर्तृत्व, हे जरी सर्व चर्चेत नसले तरी विनताचे मुलगे तर्ख्य आणि अरिष्टनेमी आणि गरुड व अरुण व मुली आरुणी व वारुणी ख्यातनाम होत होते. शेष म्हणजेच अनंत, वासुकी, तक्षक, कुमार, कुलिका हे कद्रुची मुलं होती. कद्रुची आणखीन मुलं होती, भिमसेन, उग्रसेन, सुपर्ण, वरुण, गोपती, ध्रृतराष्ट्र, सूर्यवर्चस, सातवा सत्यवचस, अर्कपर्ण, प्रयुक्त, भिम, चित्ररथ, हे मोठे विद्वान तपस्वी म्हणून प्रसिद्ध होते. गंधर्वांतील कालशिरस, राजा पर्जन्य, हा चौदावा होता. कली पंधरावा, नारद सोळावा हे देव व गंधर्व आणि मुनीची मुलं होती. मुनी दक्षाची मुलगी होती. मी आणखीन कांहीं मुलींची माहिती देतो. अनवद्या, मनु, वंश, आसुरी मार्गनाप्रिया, अनुपा, शुभगा, वशी ह्या प्रजापतीच्या मुली होत्या. त्यांत प्रज्ञा, सिद्धा आणि पूर्णा, व्हरीण, पूर्नायुस, अशा ख्यातनाम होत्या.

अहो राजश्री जनमेजय आणखीन ऐक, ब्रह्मचारी, रतिगुणा, सुपर्णा जे सातवे होते, विश्ववसु, भानु, सुचंद्र दहावे होते ते प्रज्ञाचे होते. हे सर्व गंधर्व कुळातील होते. प्रज्ञा काश्यपाची बायको होती तिने अप्सरांना उत्पन्न केले. त्यांत अलमवुशा, मिश्रकेशी, विद्युतपर्णा, तिलोत्तमा, अरुणा, रक्षिता, रंभा, मनोरमा, केशीनी, सुवाहू,

सुरता, सुरजा, सुप्रिया तिच्या कन्या होत्या. अतिवाहू, ख्यातनाम हाहा हुहू, तमवृ हे तिचे मुलगे गंधर्व होते.

अमृता, ब्राह्मण, गंधर्व, अप्सरा कपिलमुनी पासून उत्पन्न झाले आहेत. अशारितीने हे देव, दानव, दैत्य आणि गंधर्व, अप्सरा, सर्पांत सुपर्ण, रुद्र व मरुत हे वंश कसे उत्पन्न झाले ते मी तुला सांगितले. पुढे त्यांची वाढ अमाप झाली जिच्याबद्दल कांहीं सांगता येणार नाही. हि परंपरा समजून घेणे चांगले आहे कारण, त्यातून बर्याच गोष्टींचा उलगडा होतो. म्हणून ही माहिती सर्वांनी ऐकली पाहिजे.

जो ही परंपरा सर्वांपुढे सांगेल तो दिर्घायुषी व जीवनात यशस्वी होईल.

अशारितीने आदीपर्वातील संभव पर्वाचा पासष्टावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सहासष्ठावा

(संभव पर्व चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, आपल्याला माहित आहे किं, ब्रह्माला सहा श्रेष्ठ इच्छा पुत्र झाली होती. त्याशिवाय आणखीन एक स्थानु होता, त्याला अकरा श्रेष्ठ दर्जाची इच्छामुळं झाली होती. त्यांची नांवे अशी, मृगव्याध, सर्प, निरिती, अजयकपट, अहिव्रध्न आणि पिनाकी हे शत्रूचा नाश कणारे होते. दहन, ईश्वर, कपाली हे तेजस्वी होते, स्थानु व भार्गव असें अकरा रुद्र म्हणून ओळखले जातात. आपण आधी पाहिले आहे किं, मरिची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह व क्रतु हे ब्रह्माच्या इच्छेतून निर्माण झालेले आहेत.

त्यातील अंगिरसाला तीन मुलं होती त्यांची नांवे अशी, बृहस्पति, उतथ्य व संवर्त. ते महान ऋषी होते ज्यांची व्रतस्थता वाखाण्यासारखी होती.

अत्रीला मात्र बरीच मुलं झाली होती. हे सगळे ऋषी असल्याने त्यांचे वेदाचे ज्ञान व तपस्विता निःसंशय श्रेष्ठ होती.

"अरे जनमेजय राजा, ऐक, पुलस्त्याची मुलं राक्षस, वानर (शरीर माणसाचे व तोंड माकडाचे), किन्नर (माणसाचे शरीर व तोंड घोड्याचे), यक्ष अशा प्रकारातील होती.

पुलहाच्या अपत्यांत सुलभ (पंख असलेली पाखरे), सिंह, किंपुरुष (माणसाचे शरीर व तोंड सिंहाचे), वाघ, अस्वलं, लांडगे, कोल्हे, असे होते.

क्रतुच्या अपत्यांत महान तपस्वी ययवरस, सुरयास व वालखिल्य ऋषी जे व्रतस्थ राहून यज्ञकर्मात प्रवीण व पृथ्वीचे संरक्षक होते. त्यांच्या सतत तपस्या करण्याने होणार्या पुण्यसंचयामुळे पृथ्वी सावरली जात असते असें समजतात. ब्रह्माच्या उजव्या पायाच्या आंगठ्यातून उत्पन्न झालेले ऋषी दाक्ष, जे संपूर्ण संयमित चित्ताने वैराग्य पाळतात व त्याचप्रमाणे, ब्रह्माच्या डाव्या आंगठ्यातून उत्पन्न झालेली दाक्षाची भार्या दाक्षा ह्यांना पन्नास मुली झाल्या. त्या सर्वजणी निर्दोष देहकांती असलेल्या रुपसुंदर होत्या. ऋषी दक्षाने त्यां सर्व मुलींना त्याच्या मंत्रसामर्थ्याने पुत्रिका ठरविले अशांने त्यांच्या पासून होणार्या मुलांना त्यांच्या पित्याचा वारसा व मातेकडील वारसा असें दोनही हक्क सांगता येत होते. पवित्र नियमांनुसार दक्ष त्याच्या दहा कन्या धर्माला देतो. सत्ताविस मुली

चंद्राला देतो. तेरा ऋषी काश्यपाला देतो. आता मी धर्माच्या दहा बायकांची नांवे घेतो ती नीट ऐक. त्या अशा, किर्ती, लक्ष्मी, धृती, मेधा, पुष्टी, श्रद्धा, क्रिया, बुद्धि, लज्जा व मती. अशा ह्या यमाच्या (धर्माच्या) बायका आहेत.
सर्व जगाला माहित आहे कीं, चंद्राच्या सत्ताविस बायका आहेत. पवित्र लग्न बंधाने त्या त्याला बांधलेल्या आहेत. त्या वेळेचे नियमन करतात. त्यामुळे काळाचा क्रम सांभाळणे शक्य होते.
ब्रह्माला आणखीन एक मुलगा आहे त्याचे नांव आहे मनु. मनुला एक मुलगा प्रजापति नांवाचा आहे. त्याचे आठ पुत्र आहेत त्यांना वसु म्हणतात. त्यांची नांवे अशी, धारा, ध्रुव, सोम, अह, अनिल, अनाल, प्रत्युशा व प्रभास. त्यांच्यातील धारा व सत्यज्ञानी ध्रुव हे त्याला धुम्र पासून झाले. सोम व अनिल (श्वसन) प्रज्ञावंत श्वासा पासून झाले. अह रतास झाला, अनाल (हुताशन) शांडिल्यापासून व प्रत्युशा व प्रभास हे प्रभातापासून झाले. वसु ही दैवते प्राण्याला जगण्यास मदत करतात.
धाराला दोन मुलगे द्रविण व हुत-हव्य-वह. ध्रुवाचा मुलगा काळ, सर्वशक्तिमान, जो सर्वांचा शेवट करतो. चंद्राचा मुलगा वर्चस, त्याला त्याची पत्नी मनोहरा पासून तीन मुलगे असतात, शिशिर व रमण हे त्यातील दोन, अहची मुलं ज्योती, समा, संत व मुनी. अग्नीचा मुलगा, देखणा कुमार जो जंगलातील गवतात जन्मतो. त्याला कर्तिकेय असें सुद्धा म्हणतात कारण, त्याला कृत्तिका व इतर जणींनी वाढवले. कार्तिकेयाला आणखीन तीन भाऊ असतात ते असें, शख, विशख, नैगमेय. अनिलाची पत्नि सिवा. सिवाचे मुलगे, मनोजव, अविज्ञात, अगति. प्रत्युशाचा मुलगा, ऐशी ज्याला देवल म्हणूनसुद्धा ओळखतात. देवलाला दोन मुलगे असतात जे फार क्षमाशिल म्हणून ख्यातनाम आहेत. बृहस्पतिची बहीण जी पहिली स्त्री जीने संन्यास व्रत पाळले. ती सर्व जग फिरली आणि तिने आठवा वसु प्रभास ह्याच्याशी लग्न केले. तिने विश्वकर्माला जन्म दिला. सर्व कला व स्थापत्य, यंत्रविद्या इत्यादींचा तो प्रवर्तक आहे. विश्वकर्माने देवांचे रथ, महल (वाडे) वगैरे गोष्टींची निर्मिती केली. मानवालासुद्धा त्यांनेच यंत्रकला शास्त्र दिले. त्या कारणांनी मनुष्य त्याची पुजा करतात. हा विश्वकर्मा अनंत व नित्य आहे. त्याशिवाय ख्यातनाम धर्म जो सर्व आनंद देणारा आहे. माणसाची

सहनशिलता ज्याच्यामुळे व्यक्त होते तो ब्रह्माच्या उजव्या छातीतून उत्पन्न झाला. आणि आहस्त (धर्म) ह्याला तीन मुलगे आहेत. ते कोणालाही मंत्रमुग्ध करू शकतात. त्यांची नांवे समा (शांति), काम (इच्छा) व हर्ष अशी आहेत. त्यांच्यामुळे ह्या जगाचा कारभार चालू रहातो. कामाची भार्या रति, सामची प्राप्ति व हर्षाची भार्या नंदा. त्यांच्यावर सर्व जगाची भिस्त असते. मरिचीच्या मुलाचे नांव काश्यप, काश्यपाची संतति देव व असुर म्हणून काश्यपाला ह्या जगाची पिता समजतात. त्याच प्रमाणे, तश्त्री, वडवाच्या (घोडीच्या) रुपात होती ती सवित्रीची बायको झाली. तिने दोन जुळे उत्पन्न केले त्यांना अश्विनी असें समजतात. अहो राजा, अदितीला बारा मुलगे झाले त्यातील सर्वात मोठा इंद्र व लहान विष्णू आहे. विष्णूवर जगाचे पालन करण्याची भिस्त ब्रह्मांने सोडली आहे. असें हे तेहतीस देव आपण पाहीले, (आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, प्रजापति आणि वशत्कार). आता मी त्या तेहतिस देवांच्या अपत्यांची माहिती त्यांच्या पक्ष, कुळ व गणानुसार जी आहे ती सांगतो. रुद्र व साध्या, मरुत, वसु, भार्गव, विश्वदेव, हे प्रत्येकी पक्ष म्हणून ओळखले जातात. गरुड, विनताचे मुलगे, अरुण, तेजस्वी बृहस्पति हे सगळे आदित्यात गणले जातात. अश्विनीकुमार, सर्व वनस्पति, छोटे प्राणी गुह्यकात गणले जातात. हे देवांचे गण म्हणून ओळखले जातात, त्यांची स्तुती केली तर माणसाची सर्व पापं धुतली जातात.

त्यानंतर सांगतो भृगुबद्दल, तो ब्रह्माची छाती फाडून बाहेर आला. सर्वज्ञ शुक्र एक ग्रह बनला व पृथ्वीवर पाऊस पाडणे, इतर नैसर्गिक आपत्ति ह्यांचे नियंत्रण अवकाशातूनच करतो. त्याप्रकारे तो ह्या तिनही जगांतील [पृथ्वी (दृष्य निसर्ग), स्वर्ग व पाताळ (अदृष्य निसर्ग)] प्रजातिंचे संरक्षण करतो.

महान शुक्र ज्यांने मोठी तपस्या करून स्वताचे दोन भाग केले व त्याद्वारा तो देव व असुर, दैत्य ह्यांचा गुरु झाला. अशारितीने ब्रह्मांने शुक्राला कामाला लावल्यानंतर भृगुला च्यवन नांवाचा एक महान मुलगा झाला. च्यवन सूर्यासारखा तेजस्वी, पुण्यवान आणि ख्यातनाम झाला.

च्यवनाचा जन्म मातेच्या उदरातून रागामुळे ठरल्या वेळेआधी झाला त्यामुळे तिची सुटका त्या राक्षसाच्या तावडीतून झाली. मनुची मुलगी अरुषी हिचा विवाह च्यवनाशी होतो.

तिला उर्व होतो, तो त्याच्या आईची मांडी फाडून बाहेर येतो. उर्वाला रिचीक व आणखीन शंभर मुलगे झाले. तो लहानपणीच मोठा तपस्वी झाला व त्याचा सर्वात लहान मुलगा जमदग्नी. जमदग्नीला चार मुलगे झाले. त्यातील सर्वात लहान परषुराम जो त्याच्या मोठ्या भावंडापेक्षा जास्त कर्तबगार होता. तो सर्व शस्त्रांच्या वापरामध्ये वाकबगार होते, त्यांने भ्रष्ट क्षत्रियांचा निप्पात केला व पृथ्वीला भ्रष्ट क्षत्रियांपासून त्रेतायुगात मुक्त केले. उर्वाच्या शंभर मुलांची असंख्य अपत्ये पृथ्वीवर पसरली.

ब्रह्माला आणखीन दोन मुलगे झाले धात्री व विधात्री. ते मनुबरोबर राहतात. त्यांची बहिण लक्ष्मी जी कमळात वास्तव्य करते. लक्ष्मीची अध्यात्मिक मुलं आकाशात भ्रमण करणारे घोडे असतात. शुक्राला झालेली मुलगी, दिवी वरुणची मोठी बायको झाली. तिला एक मुलगा, वल व मुलगी सुरा होतात. त्यांच्यामुळे देवांना त्या मिळू लागल्या. हे होत असतांना अन्नाचा पुरवठा अपुरा झाल्याने प्राणी एकमेकांना खाऊ लागले. त्यातून अधर्म जन्मला. अधर्माची बायको, निरिती तिला राक्षस जन्मले. ते अमर्यादपणे पापाचरण करू लागले. भय व महाभय आणि मृत्यू उत्पन्न झाले. त्यातून पुढे कांही उत्पन्न झाले नाही कारण सर्वच त्यांनी नष्ट केले होते.

तम्राला पांच मुली झाल्या. त्या काक, घार, कोंबडी, हंस, पोपट. काकपासून कावळे उत्पन्न झाले. घारीपासून गिधाड, ससाणा, गरुड असे पक्षी झाले. हंसातून बगळे, तत्सम पक्षी आले. पोपटातून तत्सम गोड चिवचिवाट करणारे पक्षी झाले.

क्रोधाला नऊ मुली झाल्या. मृगी, मृगमंदा, हरी, भद्रमना, मातंगी, शर्दुली, श्वेता, सुरभी, सुरसा. त्यांतून अनेक प्राणी उत्पन्न झाले. भद्रमनातून ऐरावत उत्पन्न झाला. हरीपासून सर्वप्रकारची माकडे उत्पन्न झाली. त्याच प्रमाणे, गाय, म्हैस इत्यादी उत्पन्न झाले. शार्दुलीपासून वाघ, सिंह, चित्ता असें मांसाहारी प्राणी झाले. मातंगापासून हत्ती, पाणघोडे असें श्वापदं उत्पन्न झाली. सुरभी पासून रोहीणी व गंधर्वी दोन मुली झाल्या. तिला आणखीन दोन मुली होत्या, विमला व अनला. अनलापासून कांहीं रसाळ फळं देणारी माडवर्गातील झाडं झाली. अरुणांनी दोन शक्तिमान मुलांना जन्म दिला, संपती व जटायु. सुरसानी नाग, सर्प ह्यांना उत्पन्न केले. विनताने गरुड व अरुण दिले.

अशारितीने पृथ्वीवरील विविध प्राणी उत्पन्न झाले. हे ऐकणारा त्याच्या सर्व पापांपासून मुक्त होतो. त्याचा पुनर्जन्म सुधारतो".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा सहासष्टावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सदुसष्ठावा

(संभव पर्व चालू)

जनमेजय बोलतात, अहो अति पुज्य, मी आपल्याकडून माणसाच्या जन्मात अवतरलेले देव, गंधर्व, राक्षस व असुर आणि पशुंमध्ये सिंह, वाघ, साप व इतर प्रजातीत जन्मलेले अशा सर्वांची माहिती समजून घेऊ इच्छितो. त्यांचे त्या अवतारातील कार्य काय होते ते सांगा. ते ऐकल्यावर वैशंपायन ऋषी बोलतात, "अरे, माणसांच्या राजां, मी प्रथम स्वर्गीय व दानवी प्रजातींची माहिती जे मानव अवतारात पृथ्वीवर आले त्यांची माहिती सांगतो.

पहिला दानव जो मानव अवतार घेऊन आला त्याचे नांव विप्रचित्ती असें आहे. तो नरपुङ्गव होता. त्याला मानव अवतारात जरासंध म्हणून ओळखतात. दुसरा दैत्य दितीचा मुलगा, हिरण्यकश्यिपु, माणसात त्याचे नांव शिशुपाल होते. प्रह्लादाचा धाकटा भाऊ संघलाद माणसांत शल्य म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याच्या मानव जातीला वल्हीक म्हणून ओळखतात.

तेजस्वी अनुह्लाद हा प्रह्लादचा धाकटा भाऊ, तो माणसांत धृष्टकेतू म्हणून ओळखला गेला. दितीचा आणखीन एक मुलगा, सिवी, तो माणसा दृम म्हणून पृथ्वीचा एक मोठा सम्राट झाला.

असुरात वश्कल पृथ्वीवर भागदत्त ह्या नांवाने ख्यातनाम झाला. त्याशिवाय आणखीन पांच असुर जे बलाढ्य होते ते, अयशिर, अश्वशिर, अयशंकु, गगन मुर्धन, आणि वेगवत हे होते. ते सगळे केकय नांवाच्या राजघराण्यात जन्मले. ते सर्व ख्यातनाम राजे झाले. परंतु, ते असुर असल्याने त्यांचे काम करणे असुरीसंपदाने युक्त म्हणजे क्रौर्य व अमानुषताने भरलेले होते. केतुमत नांवाचा असुर त्याच्या भयावह कर्माने पृथ्वीवर ओळखला जाऊ लागला. त्याचे माणसातील नांव अमितुज होते. महान असुर स्वरभानु पृथ्वीवर आल्यावर उग्रसेन ह्या नांवांने ओळखला गेला. अश्व नांवाचा असुर पृथ्वीवर अशोक म्हणून नांवाजला गेला. त्यांने साम्राज्य प्रस्थापित केले. अश्वाचा धाकटा बंधु अश्वपति, दितीचा मुलगा, पृथ्वीवर हर्दिक्य नांवाने ओळखला गेला. आणखीन एक दितीचा मुलगा, वृशपर्व माणसांत दीर्घप्रज्ञा म्हणून ओळखला गेला. त्याचा धाकटा भाऊ अजक, शल्व नांवाने ख्यातनाम होता. अश्वग्रीव्हाचा रोचमन झाला. आणखीन एक

असुर, सुक्ष्म जो त्याच्या कर्तृत्वासाठी ख्यातनाम होता तो वृहद्रथ नांवाने ओळखला गेला. असुरात प्रसिद्ध असलेला असुर तुहुंड पृथ्वीवर सेनाबिंदू नांवाने ओळखला गेला. असुरात ओळखला जाणारा इशुप पृथ्वीवर नग्नजित झाला. एकचक्र पृथ्वीवर प्रितिविंध्य झाला. अनेक शस्त्रांत तरबेज असलेला असुर विरुपाक्ष, चित्रवर्मन म्हणून माणसांच्या राज्यात ख्यातनाम झाला. दानुच्या मुलांपैकीं पहिला दानव होता हर, तो पृथ्वीवरील सर्वच त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून सत्तेवर आला. त्याचे माणसातील नांव होते सुवाहू. आणखीन दुसरा दानव, सुहत्र, ज्याने त्याच्या शत्रूंचा नाश केला त्याचे पृथ्वीवरील नांव सम्राट मुंजकेशा होते. सदैव अजिंक्य राहीलेला दानव, निकुंभ, माणसात जन्मला ते त्याचे नांव होते, देवधीपा जो पृथ्वीवरील पहिल्या सम्राटातील एक होता. दितीच्या विख्यात मुलांपैकीं एक सरभ, जो पृथ्वीवर पौरव नांवाचा ऋषी म्हणून ओळखला जाऊ लागला. कुपथ हा असांच एक शक्तिमान असुर जो सुपरस्व म्हणून माणसांत ओळखला गेला. श्रेष्ठ असुर क्रथ पृथ्वीवर एका पर्वताच्या रुपात पर्वतेय, अवतरला. पर्वतेय हा सोनेरी डोंगर होता. असुरातील दुसरा प्रह्लाद वल्हीकांच्या राज्यात जन्मला. दितीच्या मुलातील प्रसिद्ध असुर चंद्र पृथ्वीवर चंद्रवर्मन म्हणून आला. तो कंबोजचा राजा झाला. दानवातील अर्क पृथ्वीवर राजर्षी ऋषीक म्हणून अवतरला. असुर मृतप पृथ्वीवर राजा पश्चिमानुपक म्हणून आला. असुर गरिष्ट पृथ्वीवर राजा दृमसेन म्हणून आला. असुर मयुर राजा विश्व म्हणून आला. मयुरचा धाकटा भाऊ सुपर्ण पृथ्वीवर कलाकिर्ती म्हणून आला. बलाढ्या असुर चंद्रवंत्री राजर्षी शुनक बनला. चंद्रविनासन असुर राजा जनक म्हणून आला. असुर दीर्घजिव्हा काशीराजा झाला.

क्रह ज्याने चंद्र व सूर्याला सतावले, ज्याला सिंघीकाने आणले, तो सम्राट क्रथ झाला. दानयुच्या चार मुलांपैकी, मोठा विक्षर पृथ्वीवर वसुमित्र नांवाने आला. विक्षराचा धाकटा भाऊ पांड्य देशाचा राजा झाला. असुर वलिन पृथ्विवर राजा पौंड्र-मत्स्यक म्हणून आला. असुरात प्रसिद्ध असलेला वृत्र पृथ्वीवर राजर्षी मनमत म्हणून आला. वृत्राचा धाकटा भाऊ क्रोधहत्री अवतरला राजा दंड. असुर क्रोधवर्धन दंडधर नांवाने आला. कलेयाची आठ मुलं पृथ्वीवर यशस्वी राजे झाले. त्यांतील सर्वात मोठा मगध देशाचा राजा जयत्सेन म्हणून आला. दुसरा मुलगा जो इंद्रासारखा सामर्थ्यवान होता अपराजित्त.

तिसरा मुलगा जो बहुरुपी होता, निशादांचा राजा झाला. चौथा मुलगा श्रेनिमत, राजर्षी झाला. पांचवा मुलगा, पृथ्वीवर राजा महंज म्हणून ओळखला गेला. सहावा मुलगा जो त्याच्या बुद्धीसामर्थ्यासाठी मशहूर होता तो राजर्षी अभुत्र झाला. सातवा मुलगा पृथ्वीमध्ये समुद्रसेन म्हणून ख्यातनाम झाला. तो सर्व धर्मशास्त्राचा जाणकार होता. आठवा मुलगा, वृहत पृथ्वीवरील समस्त प्राणीमात्रांचे भले करणारा राजा होता. तो असुर असुनही दुष्ट, अमानुष, पापकारक नव्हता. तो देवांसारखा पुण्यप्रभावी होता.

असुर कुक्शी सोनेरी पर्वताच्या रुपात अवतरला. महाशक्तिमान क्रथन सम्राट सुर्याक्ष म्हणून आला. एक देखणा असुर सूर्य वह्लिकांचा राजा झाला त्याचे नांव दरद होते. असें सर्व शक्तिमान राजे असुर कुळात जन्मले त्या असुर कुळाचे नांव होते क्रोधवस. ज्यांच्या बद्दल मी तुला आधीच सांगितले आहे. त्याशिवाय आणखीन कांहीं राजे त्यांची नांवे अशी, मद्रक, कर्णवेश्ट, सिद्धार्थ, कितक, सुवीर, सुवाहु, महावीर, वहिल्क, क्रथ, सुरथ, चिरवस, भूमिपाल, दंतवक्र, देखणा राजा नील, दुर्जय, रुक्मी, राजा जनमेजय, अशद, वायुवेग, धुरितेजस, एकलव्य, सुमित्र, वटधान, गोमुख. राजांचा आणखीन एक गट ज्यात करुशक, खेमधुर्ती, श्रृतायू, उद्वह, वृहत्सेन, क्षेम, उग्रतीर्थ, कलिंग देशाचा राजा मतिमत, राजा ईश्वर हे राजे असुरांच्या क्रोधवसा वंशातील होते. कालनेमी नांवाचा एक भयंकर असुर पृथ्वीवर अवतरतो. महाशक्तिमान व समृद्धी आणि कतृत्व हे त्याचे गुण होते. तो बलवान उग्रसेनाचा मुलगा होता व त्याचे नांव कंस होते. असुरांमध्ये देवक म्हणून ओळखलेला असुर जो इंद्राइतका प्रबळ होता, एका गंधर्वाच्या वंशात जन्म घेतो. द्रोण जो भारद्वाज ऋषीचा मुलगा समजला जातो तो कोठल्याही स्त्रीच्या उदरातून जन्म घेत नाही तर तो स्वर्गीय ऋषी वृहस्पतिच्या अंगातून निघतो. द्रोण धनुर्विद्येत सर्वश्रेष्ठ असतो. तो सर्व वेदांचा जाणकार असतो. त्याच्या कर्तृत्वामुळे तो त्याच्या वंशाचा अभिमान बनला होता. त्याचा मुलगा अश्वत्थामा ज्याचे डोळे कमळासारखे सुंदर होते. तो बलवान होता व शत्रूंना त्याची रास्त भिती वाटत असें. पृथ्वीवर तो महादेव, यम, काम व क्रोध ह्यांच्यातून उत्पन्न झाला होता. त्याला इंद्राचा आधार होता परंतु, वशिष्ठ ऋषीचा त्याला शाप होता. आठ वसु गंगेच्या पोटी जन्म घेतात तिचा पति शंतनुमुळे. त्यातील सर्वात लहान होता भिष्म, कुरु वंशाची ताकद वाढण्याचे काम त्यांने केले. वेदांचा त्याचा

अभ्यास होता व तो शत्रूंचा नाश करणारा होता. त्याचे शस्त्रास्थांचे ज्ञान वाखाणण्यासारखे होते. त्याचा मुकाबला भृगु कुळातील जमदाग्नीचा मुलगा, परशुरामाशी झाला होता कारण, परशुराम सर्वच क्षत्रियांवर लक्ष देऊन असतो हे तुला माहित असेलच. अरे राजा, कृप नांवाचा एक ब्राह्मण रुद्र वंशाचा होता. त्याचे सामर्थ्य विशेष होते. महारथी शकुनी जो त्याच्या शत्रूंचा पाडाव लिलया करीत असें तो जणू साक्षात द्वापार युगाचा प्रतिनिधी होता. सत्यकी असा क्षत्रिय जो वृश्नी वंशाचा अभिमान होता. तो मरुत देवाचा अंश होता. देवलोकातील राजर्षी दृपद, पृथ्वीवर राजा म्हणून आला व तोसुद्धा वृश्नी कुळाचा होता. एक राजर्षी विराट ज्याने अनेक दुष्मानांचा विनाश केला होता तो त्याच दैवी कुळात जन्मला होता. अरिष्ठ जो पृथ्वीवर हंस म्हणून आला तो कुरु वंशात जन्मला होता व तो गंधर्वांचा राजा झाला. धृतराष्ट्र जो कृष्ण-द्वैपायनाच्या वीर्याने उत्पन्न झाला तो आजानुबाहू असतो व त्याच्या मातेच्या चुकीमुळे व एका ऋषीच्या शापामुळे अंध होतो. त्याचा धाकटा भाऊ पंडुचा सत्य आणि पुण्यप्रभावी जीवन व्यतीत करण्यावर विश्वास होता. अरे राजा जनमेजया, तुला सांगतो किं, विदूर जो न्यायदेवतेचा अंश होता, त्याचा जन्म अत्रीऋषी कडे झाला. कुरुवंशाचे नांव बदनाम करणारा असुरी प्रवृत्तीच्या दुर्योधनाचा जन्म कलीपासून झाला. तो सर्वच प्राणिमात्रांना मारून टाकण्याचे स्वप्न पहात होता. त्याने जे द्वेषाचे रोप लावले त्यामुळे सर्व लोक मारले गेले. महाभारत युद्धाचा तो कारक होता. पुलस्त्य राक्षसाच्या कुळातील ते शंभर राक्षस दुर्योधनाचे भाऊ म्हणून जन्मले होते. त्यात दुर्योधना नंतर दुःशासन मोठा होता. त्याशिवाय दुर्मुख, दुःशाह, आणि इतर एकंदर शंभर जण दुर्योधनाला त्याच्या कुकर्मात मदत करीत होते. ते सगळे पुलस्त्याचीच पिलावळ होती. ह्या शंभर कौरवांशिवाय धृतराष्ट्राला आणखीन एक वैश्य बाईपासून मुलगा झाला होता त्याचे नांव युयुत्सु होते. एवढे ऐकल्यावर जनमेजय वैशंपायन ऋषींना विनंति करतो कीं, "अहो ऋषी, मला त्या सर्व कौरवांची नांवे त्यांच्या ज्येष्ठते नुसार सांगा".

ते ऐकल्यावर राजाची इच्छा पूर्ण करण्यासाठी ते कौरवांची नांवे त्यांना आठवतात तेवढी सांगू लागतात. ती अशी, दुर्योधन, युयुत्सु, दुःशासन, दुःशाह, दुःशाल, दुर्मुख, विविंगसती, विकर्ण, जलासंध, सुलोचन, विंद, अनुविंद, दुधर्ष, सुवालू, दुशप्रधार्शन, दुर्मर्सन, दुश्कर्ण, दुरमुख, काम, चित्र, विचित्र, चित्राक्ष, चारुचित्र, अंगध, दुर्मद,

दुशप्रधर्श, विवित्सु, विकट, सम, उर्ननाभ, पद्मनाभ, नंद, उपनंदक, सेनापति, सुशेन, कोंदुदर, महोदर, चित्रवाहू, चित्रवर्मन, सुव्रमन, दुर्विरोचन, अयोवाहू, महावाहू, चित्रवर्मन, सुकुंडल , भिमवेग, भिमवल, वलकी, भिमविक्रम, उग्रयुधा, भिमैर, कनकायु, धृडयुद्ध, धृडवर्मन, धृडक्षत्र, सोमकिर्ती, अनादर, झरासंध, धृडसंध, सत्यसंध, सहस्त्रवाही, उग्रश्रवस, उग्रसेना, क्षेममुर्ती, अपराजित, पंडितक, विस्लाक्ष, दुर्धर, धृधहस्त, सुहस्त, वटवेग, सुवर्चस, आदित्यकेतु, वह्वसन, नागदत्त, अनुऐन, निशांगी, कुवची, दंडी, दंडधर, धनुग्रह, उग्र, भिमरथ, वीर, वीरवाहू, अलोलुप, अभय, रुद्रकर्मन, त्यांच्या बरोबर धृदरथ, अनध्रीश्य, कुंडवेद , विरवी, दीर्घलोचन, दीर्घवाहू, महावाहू, व्युधोरु, कनकंगन, कुंडजा , चित्रक, ह्यांच्यासह एक कन्या झाली होती. तिचे नांव दुःशला ती त्या शंभर मुलांत गणली जात नव्हती. युयुत्सु गांधारीचा नव्हता पण तो सुद्धा त्या कौरवांत गणला जात होता. अरे राजा मी आता तुला सर्व कोरवांची नांवे सांगितली आहेत. ते सर्व युद्ध कलेत तरबेज होते, महारथी होते. त्याशिवाय ते वेदशास्त्राचे पूर्णपणे ज्ञानी होते. त्या सगळ्यांनी धर्मशास्त्राच्या सर्व ग्रंथांचा चांगला अभ्याससुद्धा केला होता. विद्वत्ता व युद्धकला त्यांना चांगली अवगत होती. त्या सर्वांची त्यांना साजेशा बायकांबरोबर लग्ने झाली होती. कौरवांच्या सम्राटाने त्याच्या एकुलत्या एक कन्येचा विवाह सिंधदेशाच्या राजा, जयदैत्य बरोबर मोठ्या थाटामाटात लावून दिला होता. सिंधदेशाचा राजा जयदैत्यचा विवाह शकुनीच्या सल्ल्यानुसार लावला गेला होता.

पांडवांतील युधिष्ठीर, धर्माचा (यमदेव) अंश होता, तसेंच भिमसेन वायूचा अंश होता, अर्जुन स्वर्गाचा राजा, इंद्राचा अंश होता, नकुल व सहदेव जे अतिसुंदर होते ते अश्विनीकुमारांचा अंश होते. पांडवांचा एक पुतण्या अभिमन्यू, अर्जुनाचा मुलगा, त्याच्या वर्चस (चंद्राचे कुळ) कुळाचा अभिमान होता तो चंद्राचा अंश होता. त्याच्या जन्माआधी चंद्र देव सांगत होते कीं, हा अभिमन्यू माझ्या हृदयाचा भाग आहे व म्हणून मी त्याला सोडू शकत नाही परंतु, पृथ्वीवरील असुरांचा नाश करण्यासाठी मी त्याला देत आहे. तरीसुद्धा तो जास्तकाळ तेथे रहाणार नाही. त्याचप्रमाणे, नर जो नारायणाचा सहवासी, तो प्रथम अर्जुन म्हणून पृथ्वीवर जाईल व पंडुच्या पदरी निपजेल. माझा मुलगा, अर्थात् अभिमन्यू त्याच्या पोटी जन्म घेईल. फक्त सोळा वर्षे तेथे राहील. त्याच्या सोळाव्या वर्षी महायुद्ध

सुरु होईल व अशा युद्धात नर व नारायण दोघेही नसलेल्या प्रसंगी हा माझा मुलगा चक्रव्युह तोडून युद्ध करेल, अनेक बलाढ्य योद्ध्यांना तो यमसदनाला पाठवेल. माझा प्रिय मुलगा एका पुत्राला जन्म देऊन तो नष्टप्राय झालेला भरतवंश पुढे चालण्यासाठी मदत करील. असें चंद्राचे बोलणे ऐकून स्वर्गस्थ ज्ञानी एकमतांने सांगतात कीं, तथास्तु. एवढे सांगून वैशंपायन जनमेजय राजाला सांगतात कीं, आतापर्यंत मी तुला तुझ्या पूर्वजांची माहिती रितसरपणे सांगितली आहे.

आणखीन सांगतो कीं, महान महारथी धृष्टद्युम्न अग्नीचा अंश होता. तसेंच शिखंडी जन्मता मुलगी होता व तो एक राक्षस होता. द्रौपदीला जे पांच मुलगे झाले ते स्वर्गातील होते. त्या पांच मुलांची नांवे अशी, विश्वास, प्रितीवींध्य, सुतसोम, श्रृतकिर्ती, सतनिक. नकुलाच्या मुलाचे नांव श्रृतसेन होते. सुर, यदु कुळातील अग्रेसर वासुदेवाचा बाप होता. त्याला एक मुलगी होती तिचे नांव प्रिथा होते. ती तिच्या सौंदर्यासाठी समस्त जगात प्रसिद्ध होती. सुराने अग्नीच्या समक्ष कुंतीभोजाला , जो त्याच्या मावशीचा मुलगा (त्याचा मावसभाऊ) होता व त्याला अपत्य नव्हते म्हणून आपले पहिले अपत्य त्याला देण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार सुर आपली पहिली संतान प्रिथा त्याला दत्तक देतो. एकदा कुंतीभोजाकडे ब्राह्मण भोजनाचे कार्य असते त्याची सर्व तयारी करण्याची जबाबदारी प्रिथावर असते. प्रिथाचे दत्तक गेल्यानंतरचे नांव होते कुंती . कुंती सर्व ब्राह्मणांची चोख व्यवस्था ठेवते त्यामुळे तिच्यावर संतुष्ट होऊन दुर्वास ऋषी तिला वरदान देतात. त्याप्रमाणे ऋषी दुर्वास तिला एक मंत्र देतात व सांगतात कीं, जर ती तो मंत्र उच्चारून कांहीं इच्छा व्यक्त करील तर ती पूर्ण होईल व पुढे ते तिला सांगतात, जर तिला कोण्या देवांशी संयोग करण्याची इच्छा झाली तर तीसुद्धा त्या मंत्राच्या प्रभावाने पूर्ण होईल. कुंतीला त्या मंत्राची प्रचिती पहाण्याचा मोह होतो व ती एक प्रयोग म्हणून तो मंत्र उच्चारून सूर्यदेवाला बोलावते. त्या बरोबर साक्षात सूर्यदेव तिच्या पुढे सादर होतात. त्याच्यामुळे नंतर तिला एक मुलगा होतो. कुंतीच्या अपेक्षेपेक्षा हे जास्तच खरे झाल्यामुळे ती बावचळून जाते व आता त्या तेजस्वी बालकाचे काय करावे हे न समजल्यामुळे ती त्याला एका झर्यात कोणालाही समजणार नाही अशाप्रकारे सोडून देते. त्या सूर्यपुत्राच्या कानात कर्णकुंडले व तसेंच छातीवर कवच जी सूर्याची लक्षणं आहेत ती होती. पाण्यात

फेकून दिलेला सूर्यपुत्र एका कोळ्याने उचलला व आपल्या पत्नीला दिला. त्या दोघांनी त्या तेजस्वी बालकाचे संगोपन केले व तो बालक ज्याचे नांव कोळ्याने वसुसेन असें ठेवले. जसा तो मोठा झाला तसा तो त्याच्यातील उपजत बुद्धी व सामर्थ्याने पराक्रमी झाला. त्याप्रमाणे तो ख्यातनाम झाला. त्याच्या ह्या होणार्या प्रगतीवर इंद्राचे लक्ष होते. त्याने एक गोष्ट ओळखली कीं, पुढे हा वसुसेन त्याच्या मुलाचा अर्जुनाचा प्रतिस्पर्धी होईल व त्याला प्राप्त असलेली कर्णकुंडले व कवच त्यावेळी अजिंक्य करतील . हे हेरून शक्र (इंद्र) एका ब्राह्मणाचे सोंग घेऊन वसुसेनाकडे त्यांचे दान मागतो व वासुसेन ती दोनही संरक्षक साधने त्याच्या दानशूर स्वभावानुसार देऊन टाकतो. वसुसेनाचा हा दानशूरपणा पाहून शक्र खजिल होतो व त्या पापातून मुक्त होण्यासाठी तो वसुसेनाला एक बाण देतो व सांगतो जर त्याने तो बाण कोणालाही मारला तर तो शत्रू कितीही बलाढ्य असला तरी अगदी, असुर, गंधर्व, नाग, राक्षस ह्यापैकीं कोणीही असला तरी निश्चितपणे मरून जाईल. वसुसेनाच्या ह्या दानशूरतेमुळे पुढे त्याचे नांव कर्ण झाले. कर्ण कुंतीचा पहिला मुलगा असूनही सुत (शुद्र) वंशाचा म्हणूनच वाढत होता. त्याच्या शौर्यामुळे व इतर उत्तम गुणांमुळे तो कौरवांना प्रिय झाला व तो दुर्योधनाचा मुख्य सल्लागार झाला.

वासुदेव (श्रीकृष्ण) महाशक्तिमान व नारायणाचा अंशावतार व त्याचा मोठा भाऊ बलराम जो नागशेषाचा अंशावतार होता, ते सर्व महाबलाढ्य होते. अरे राजा आणखीन कांहीं सांगतो, तो प्रद्युम्न सनतकुमाराचा अंश होता. अशारितीने स्वर्गातील बरेच देव व ऋषी पृथ्वीवर असुरांचा नाश करण्यासाठी एकामागोमाग येऊन ठेपले होते. देवांच्या मागेमाग अप्सरा सुद्धा इंद्राच्या आदेशानुसार पृथ्वीवर येत होत्या.

साक्षात श्री सुद्धा पृथ्वीवर नारायणाला मदत करण्यासाठी अवतरली होती. तिने रुख्मिणीचे रुप घेतले होते. द्रौपदीसह सर्व पांडवांच्या स्त्रीया बनून त्या वावरत होत्या. द्रौपदी मध्यम बांध्याची, सडपातळ, काळीसावळी, घट्ट व कुरळा केशभार असलेली अशी अतिशय सुंदर दिसत होती, ती द्रुपदाची मुलगी बनून आली होती. तिच्या अंगाला निळ्या कमळांचा सुगंध होता. कमळाच्या पाकळीसारखे तिचे नेत्र होते.

दोन देवता सिद्धि व धात्री कुंती व माद्रीच्या रुपांने पृथ्वीवर अवतरल्या होत्या . देवी मति सुवलाची मुलगी गांधारी बनून आली होती. अरे राजा अशारितीने मी आतापर्यंत पृथ्वीवर

अवतरलेल्या सर्व देव व असुरांची माहिती त्याच्या क्रमाने (देव, असुर, गंधर्व, अप्सरा आणि राक्षस,) सांगितली आहे.

जे सम्राट म्हणून आले, जे ऋषी बनून आले, जे यदुकुळात जन्मले, जे इतर राजवंशात अवतरले, जे क्षत्रिय म्हणून आले आणि जे ब्राह्मण, वैश्य म्हणून आले अशा सर्वांची माहिती मी तुला सांगितली आहे. मी सांगितलेली हि माहिती जे योग्य मनस्थितीत ऐकतील ते कधीही जीवनात दुःखी होणार नाहीत.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा सदुसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अडुसष्ठावा

(संभव पर्व पुढे चालू)

हे सर्व ऐकल्यावर राजा जनमेजय बोलतात, अहो ब्राह्मण, मी आता पर्यंत त्या अनेक देव, राक्षस, दानव, दैत्य, गंधर्व, आणि अप्सरांच्या अवतारांची माहिती ऐकली. आता मला कुरुवंशाच्या आरंभापासूनची माहिती ऐकण्याची इच्छा आहे. त्याकरतां आपण ती सगळी माहिती ह्या जमलेल्या सर्व सज्जनांच्या समक्ष ती सांगावी. हे ऐकल्यावर संतुष्ट झालेले वैशंपायन राजाला उद्देशून सांगू लागतात, ह्या घराण्याचा मुख्य पूर्वज, दुश्मंत (दुश्यंत) राजा होता. त्याचे राज्य चार समुद्राने सिमीत केले गेले होते. पृथ्वीच्या चौथ्या भागावर त्याचे राज्य पसरलेले होते. त्याशिवाय समुद्रातील अनेक बेटांवरसुद्धा त्याची सत्ता होती. त्या अजिंक्य राजाची सत्ता म्लेच्छ लोकांच्या राज्यावर सुद्धा होती. त्याच्या राज्यात लोकांत वर्णसंकर होत नव्हता. म्हणजे लोक आपल्या जातीवर्णातच लग्न करीत असत. त्याच्या राज्यात शेती करीत नसत. कारण जमिनीत आपसुकपणे विविध पिके भरपूर उगवत असत. कोणीही माणूस पाप करीत नसें. सर्व लोक पुण्यप्रभावी होते. तेथे कोणीही चोरी करीत नसत. त्यामुळे ती भिती नसें. अरे राजा, तेथे कधीही दुष्काळ पडत नसें. कधीही रोगपिडा होत नव्हती. कोणीही त्यामुळे आजारी होत नसत. चारही वर्णाचे लोक आपापल्या कर्तव्यात मग्न असत त्यामुळे सर्व कारभार सुनियंत्रित होत असें. त्याकाळात धर्म नव्हते. कारण कांही मिळवण्यासाठी कोणीही कोणत्याही देवतेला विनंती करीत नसत, ज्यासाठी हल्ली लोकांना धर्माची गरज वाटते. दुश्मंत राजाचे प्रजाजन भयमुक्त जीवन व्यतीत करीत असत. पावसाळ्यात पर्जन्य देव (इंद्र) पुरेसे पर्जन्य राज्याला देत असें. त्यामुळे पाण्याचा प्रश्न कधीच पडत नसें. शेतात पिकणारे पीक चवदार व रसवंत असें. त्याच्या राज्यातील इतर प्राणी पुष्ठ होते. त्याच्या राज्यात भ्रष्ट क्षत्रिय, भ्रष्ट ब्राह्मण व भ्रष्ट वैश्य नव्हते. त्यामुळे असुरीसंपदा आढळत नव्हती. राज्यातील ब्राह्मण आपली ज्ञान साधना व अध्यात्मिक तपस्या प्रामाणिकपणे करीत असत. सुत त्यांची वैज्ञानिक साधना प्रामाणिकपणे करत असत.

दुश्मंत राजा शरीराने फारच प्रबळ होता. तो त्याच्या राज्यातील मंदार पर्वत ज्याच्यावर विविध झाडे असूनही सहजपणे चढून जाऊ शके. राजा दुश्मंत युद्ध कलेत निष्णात होता.

लांब उभा असलेल्या शत्रूवर तो दुरून गदा फेकून त्याला मारू शके. जवळ असलेल्या शत्रूचा तो तलवारीने मारून नाश करीत असें. अनेक शत्रू एकदम हल्ला करून आले तर तो त्यांच्यात घुसून त्यांना मारू शकत असें. त्याला त्याकाळातील प्रचलित सर्व शस्त्रे चालवू शकत असें. तो विविध प्रकारच्या प्राण्यांवर जसें हत्ती, घोडे, उंट वगैरे प्राण्यांवर उत्तमरित्या स्वार होत असें. त्याच्या ताकदी बद्दल त्याची तुलना विष्णूशी होत असें. तो सूर्यासारखा तेजस्वी दिसत असें. त्याचे व्यक्तिमत्व सागरासारखे उदात्त व त्याची धीरोदात्तता पृथ्वीसारखी होती. तो त्याच्या गुणी जनतेवर मोठ्या सात्त्विक पद्धतीने राज्य करीत असें.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा अड्ुसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकोणसत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

एवढे ऐकल्यावर राजा जनमेजय बोलतो. अहो ऋषीवर्य मला पवित्र भरतच्या जन्माची व शकुंतलेची कथा ऐकण्याची फार इच्छा आहे , तरी ती सांगावी. मला दुश्मंताने शकुंतला कशी मिळवली ते ऐकण्याची उत्सुकता आहे तरी ते सर्व सांगावे. तुम्ही हे सर्व जाणता म्हणून तुमच्याकडून ते मला समजून घ्यावयाचे आहे. हे ऐकल्यावर संतुष्ट होऊन वैशंपायन ऋषी बोलतात, एकदा राजा दुश्मंत आपल्या सर्व फौजफाट्यासह ज्यात पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, रथ असें सगळे होते, त्यांच्याकडे विविध शस्त्रास्त्रे होती. त्यांच्या अशा जाण्यामुळे मोठा आवाज होत होता. त्यात शंख, ढोल ह्यांचे ध्वनी होते व त्याबरोबर रथांच्या चकांचा व घोडे, हत्ती ह्यांच्या खिंकाळण्याचा असा फार मोठा गलबलाट सर्वत्र होत होता. ते कौतुक पहाण्यासाठी नगरातील वस्त्या वस्त्यातून, घरा घरातून प्रजाजन ते विलोभनीय दृश्य पहाण्यासाठी खिडक्या सज्जातून पहात होते व राजा दुश्मंताचे कौतुक करीत होते. राजाचे ते सामर्थ्य पाहून कोणीही शत्रू त्याच्याशी लढण्याचा विचारसुद्धा करीत नसतं. प्रजाजनांतील बायका त्याच्यावर फुलांचा वर्षाव करीत होते. त्याला शुभेच्छा देत होत्या. ब्राह्मण त्याला आशिर्वाद देत होते. अनेक क्षत्रिय, ब्राह्मण व वैश्य आणि शुद्र त्या मिरवणूकीत सामील झाले होते. राजा दुश्मंत एका मोठ्या हत्तीवर विराजमान होता. ज्या वस्तीतून ती वैभव यात्रा जात होती त्या वस्तीतील लोक कांहीं अंतर त्या बरोबर चालत व यात्रा दुसर्या वस्तीत शिरली कीं ते परतत असतं आणि त्या वस्तीतील लोक नव्याने त्या मिरवणूकीत सामील होत असत पुढच्या मोहल्ल्यापर्यंत. ती त्या काळातील पद्धत होती. वस्ती संपल्यावर एकटा राजा त्याच्या उडणार्या रथातून त्याच्या राज्याच्या इतर भागाचा दौरा करीत असें. त्याच्या राज्यातील वनांतील विविध वृक्ष, झाडे, वेली तो त्या मार्गाने न्याहाळत असें. तो शेतांची पहाणी करीत असें. मानव वस्ती बाहेरील तो निर्जन प्रदेश जो अनेक योजने पसरलेला आहे त्यात असंख्य इतर प्राणी आनंदाने बागडत असलेली तो पहात असें. त्यांत वाघ, सिंह, हरीण, गाई, वनगाई, शेळ्या, मेंढ्या असें विविध होते. त्यांची वाढती संख्या नियंत्रित करण्यासाठी राजा त्या प्राण्यांची शिकार करीत असें.

राजाने ह्या शिकारीमुळे मर्यादा ओलांडली होती व त्यामुळे त्रस्त झालेले विविध श्वापद तो प्रदेश सोडून जाऊ लागली. वनातील जंगली हत्ती त्या शस्त्रधारी सैनिकांवर चालून गेले व त्यात राजाचे अनेक लढवय्ये चिरडले गेले. एकच हलकल्लोळ झाला. जो नैसर्गिक वनप्रदेश प्राणीमात्रांनी विपुल होता तो ओसाड झाला. जे सैनिक उरले होते त्यांना वाघ व सिंहांनी फाडून खाल्ले.

अशारितीने आदिपर्वाच्या संभव पर्वाचा एकोणसत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

अशारितीने असंख्य प्राणिमात्रांना मारून तो राजा त्याच्या उरलेल्या फौजेसह पुढचा प्रवास सुरु करतो. तो त्याच्या राज्यातील दुसर्या प्रदेशात शिरतो. तेथेसुद्धा त्याला आणखीन शिकार करावयाची असते. परंतु, तो पहातो कीं, तो प्रदेश वाळवंटाचा आहे. त्या प्रदेशातून जातांना त्याचे व त्याच्या फौजेचे फार हाल होतात कारण त्या भागात पाणी नसते. त्या ओसाड प्रदेशातून तो पुढे आणखीन एका प्रदेशात प्रवेश करतो. त्या प्रदेशात तो पहातो कीं, तेथे ठिकठिकाणी ऋषी व मुनी त्यांचे आश्रम चालवत आहेत. तो त्याच्या मंत्री व आमात्या बरोबर त्या प्रदेशाचे निरीक्षण करीत फिरत असतो. त्या प्रदेशात थंड आल्ह्ददायक वारा वहात होता. सर्व वातावरण अतिप्रसन्न होते. चौफेर वृक्ष फळा फुलांनी डवरलेले दिसत होते. जमीन सर्वकडे हिरव्यागार गवताने झाकलेली होती. असा प्रदेश अनेक योजने पसरलेला होता. झाडांवर इतस्ततः उडणारे असंख्य पक्षी कर्णमधूर चिवचिवाट करीत होते. कांहीं वृक्ष एवढे विशाल होते त्यांच्या अवाढव्य फांद्या चौफेर पसरलेल्या होत्या व त्यांच्या सावलीत खालील जमीन झाकलेली होती. त्या वृक्षांवर वेलींची जाळी पसरलेली होती. त्यांच्या रंगीबेरंगी सुगंधी फुलांवर मधमाशा त्यातील मकरंद शोषण्यासाठी घोंगावत होत्या. फळं नाहीत असा एकही वृक्ष तेथे नव्हता. अशा सुप्रसन्न वनात दुश्मंताचे सैन्य शिरले होते. त्या सैनिकांच्या अंगावर तेथील फुलांनी भरलेल्या झाडांची फुल वहात्या झुळकीबरोबर छिडकावा करीत होती. ते सगळे पाहून ते सैन्य व त्यांचा राजा भारावून गेले होते. जणूकाय तो प्रदेश त्यांचे स्वागत करीत होता. राजाचा थकवा दूर झाला होता. तेथे वाहणार्या वार्याच्या झुळकीतून जो परिमल सर्वत्र पसरत होता त्यामुळे वातावरण सात्त्विक व प्रसंन्न झालेले होते. राजाने पाहिले कीं, तो प्रदेश एका नदी व डोंगराळ भागाच्या मध्ये पसरलेला होता. तेथे कांहीं वृक्ष सरळ व उंच वाढलेले होते ते असें दिसत होते जणुकाय त्या इंद्रदेवाच्या स्वागतासाठी उभारलेल्या गुढ्या होत्या. तो प्रदेश निःसंशय अध्यात्मिक साधना करणार्या योग्यांसाठी परिपूर्णपणे योग्य होता. राजा थोडे अंतर पुढे गेल्यावर त्याला पवित्र अग्नीच्या होमांचा गंध येऊ लागला. त्याला दिसले कांहीं यती व वलखिल्य ऋषी आणि मुनी यज्ञ करण्यात व्यग्र होते.

तेथे पसरलेल्या वृक्षांची असंख्य फुलं जमिनीवर पडत असल्याने तेथे त्यांचा एक गालीचा तयार झाला होता त्यामुळे त्यावरून चालतांना आल्हाद मिळत होता. त्या बाजूनी पवित्र मालिनी नदी संथपणे वहात होती. तिच्या वाहत्या पाण्यात हंस, पाणकोंबड्या, बगळे आनंदाने स्वच्छंदपणे बागडत होती. मालिनी नदीचे पवित्र जल ते याज्ञिक अर्ध्य देण्यासाठी वापरत होते. हे सगळे मोठ्या प्रसन्न मनस्थितीत पहात राजा एका ओढ्याकडे आला. तेथे चक्रवाक पक्षी बागडत होते. त्या ओढ्याचे पाणी जोरांने वाटेत येणार्या धोंड्यावर आदळत असल्यामुळे त्याचे पाणी सफेद फेसाळत होते. त्या ओढ्याच्या एका बाजूस किन्नरांची (हा शब्द नपुसकांसाठी हल्ली वापरतात तो अर्थ येथे नाही) वस्ती होती. त्याशिवाय अस्वलं व माकडे सर्वत्र निर्भयपणे वावरत होती. अधून मधून तपस्या करणार्या यतींच्या वस्त्या होत्या व तेथे ते विविध अध्यात्मिक बाबींवर संवाद करीत असल्याचे त्याला दिसत होते. तो त्या सर्व तपस्व्याना अभिवादन करीत पुढे जात होता. दूरवर त्याला हत्ती, वाघ, नाग आणि सिंह सावकाशपणे फिरत असलेले त्याला दिसत होते. त्यांच्या हालचालीवरून स्पष्टपणे समजत होते कीं, त्यांचा येथील इतर प्राण्यांना कोणताही त्रास होत नव्हता. राजा दुश्मंत आता त्याला जेथे जावयाचे होते त्या ठिकाणी पोहोचला होता. तो कश्यप मुनींचा आश्रम होता. तेथे अनेक ऋषी तपस्या करीत असतं. तो प्रदेश कमालीचा सुंदर व मन प्रसंन्न करणारा होता. राजा दुश्मंत आश्रमात शिरण्याचा विचार करतो व आपल्या साथीदारांस तेथेंच बाहेर थांबण्याची आज्ञा देतो. कश्यप कुळातील थोर ऋषी कण्वना भेटण्यास तो उत्सुक होता. आश्रमात शिरल्यावर त्या सर्वबाजूंनी मोरांचे ओरडणे ऐकू येत असते. त्याला क्षणभर असें वाटते कीं, तो चित्ररथ गंधर्वाच्या उपवनात आहे. साक्षात इंद्राचे नंदनवन असावे अशा त्या पवित्र ठिकाणी तो मोठ्या आदरपूर्वक प्रवेश करतो. तो त्याची तहान व भूक विसरलेला होता. आपले राजेपण विसरून तो महान नृप त्याच्या रथातून उतरून नंदनवनात त्याच्या मंत्री, पुरोहित व आमात्यासह चालू लागतो. राजा अशा ऋषीला भेटणार होता ज्याची अध्यात्मिक योग्यता निर्विवाद होती. राजाला तो आश्रम ब्रह्मदेवाचा भाग आहे असें वाटत होते. कांहीं पक्षी त्यांचे गान गात होते व मोठी फुलपाखरे त्यांची भलीमोठी पंख हळूवारपणे हलवत एका फुलावरून दुसर्या फुलाकडे उडत होते. आश्रमातून पुढे जात असतांना त्याला

ब्राह्मणांचे वेदाचे वाचन करण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात. अनेक ऋद्विक यज्ञ करीत असलेले त्यांनी पाहिले. तेथे कृष्ण यजुर्वेद, सामवेद ह्यांचे अध्ययन होत होते. वेदातील अंगांचे अध्ययन होत होते. हे सगळे व्रतस्थ यती करीत होते.

आश्रमात दुसर्या एका जागी कांहीं जाणकार (क्षत्रिय, वैश्य, सुत) वेदापेक्षा इतर शास्त्रांचा व्यासंग करीत असल्याचे तो पहातो. त्यात न्याय (तर्क), आयुर्वेद, रसायनसास्त्र, शल्यशास्त्र, अस्थिविद्या, यंत्रविद्या, मंत्रशास्त्र, तंत्रविद्या वगैरे अभ्यासले जात होते. राजाला ते सर्व पाहून असें वाटले कीं, तो दुसर्या ब्रह्मदेवाच्या देशात वावरत आहे. त्याशिवाय व्याकरण, मोक्षधर्म, निरुक्त, फल ज्योतिष, कर्मकांड हे विषयसुद्धा अभ्यासले जात होते. इतर प्राण्यांचे संभाषण समजून घेण्याची कला तेथे शिकवली जात होती. राजा दुश्मंत जसा पुढे जात होता तसें त्याला तेथील विद्वानांचे संभाषण ऐकू येत होते. त्यात विविध विषयांवर होत असलेली चर्चा त्याला समजत होती. कोणीही वाह्यात बडबड करीत नव्हते. अनेक व्रतस्थ यति तेथे जपसाधना करण्यात व्यग्र असलेले दिसले. कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग अशा तिनही मार्गाचा प्रत्यय त्याला त्या आश्रमात येत होता. ठिकठिकाणी होमकुंडं त्यातील पवित्र अग्नीनी प्रज्वलित झालेली दिसत होती . राजाचे आगमन होत आहे हे समजल्यावर तेथील ब्राह्मणांनी त्यांचे सुंदरसा गालिचा अंथरून स्वागत केले. हे सगळे पाहून राजाला वाटले कीं. तो प्रत्यक्ष ब्रह्मातच प्रवेशला आहे. तो आश्रम तेथील ऋषींच्या तपोसामर्थ्याने संरक्षित होता हे तो गुणी राजा समजला, त्याच्याकडून संरक्षणाची जणू त्यांना आवश्यकता नव्हती. त्या आश्रमाची आणखीन माहिती मिळवण्याची त्याला जिज्ञासा उत्पन्न झाली. तो त्या प्राथमिक परिचयाने संतुष्ट झाला नव्हता. चहूबाजूनी इतर ऋषींच्या पर्णकुट्याने वेढलेल्या त्या कण्वमुनींच्या रहाण्याच्या जागी तो प्रवेश करतो.

अशारितीने आदिपर्वाचा संभव पर्वाचा सत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकाहत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी नंतर सांगतात, कण्वमुनींच्या कुटीत प्रवेश करतांना राजा त्याच्या मंत्री, आमात्य आणि पुरोहितानासुद्धा मागे थांबण्यास सांगतो व स्वतः पुढे जातो. आत शिरल्यावर त्याला तेथे तपस्वी कण्वऋषी कोठेही सापडत नाहीत. त्याला आढळते कीं, ती जागा रिकामी आहे. ते समजल्यावर राजा मोठ्याने व जोरांने ऋषींना हांका मारू लागतो. "कोणी तेथे आहे कां"? त्याच्या आवाजाचे प्रतिध्वनी ऐकू येत होते पण कोणी त्याला उत्तर देत नव्हते. थोड्या वेळांनी एक मुलगी बाहेर येते. ती अप्रतिम सुंदर असते. प्रत्यक्ष श्रीलक्ष्मी असावी असें त्याला वाटले. आश्रमात जसें वस्त्र संन्याशी नेसतात तसें कपडे तिच्या अंगावर होते. तिला पाहून राजाने तिला आदरपूर्वक अभिवादन केले. त्या कन्येने राजाला बसण्याची विनंती केली. राजा तिला न्याहळू लागला. तिचे नेत्र काळेभोर होते. त्या मुलींने राजाला पाणी पिण्यासाठी दिले जशी पद्धत असते. त्यानंतर ती राजाला शांतपणे विचारते, "राजे मी आपल्यासाठी काय़ करावे ते सांगा". तिचा कर्णमधूर आवाज ऐकून राजा दुश्मंत मोहीत झाला होता व त्याची त्या मुलीबद्दलचे कुतुहल जास्तच झाले. तिने रिवाजानुसार राजाला त्याचे पाय धुण्यासाठी पाणी आणून दिले. त्याच वेळी रिवाजानुसार ती क्षेमकुशल विचारण्याच्या उद्देशांने, त्याच्या येण्याबद्दल व प्रवासाबद्दल चौकशी करते. त्या तिच्या वागण्याने राजा संतुष्ट होतो. त्यानंतर ती त्याला विचारते राजा, "मी तुमच्यासाठी काय करावे ते सांगा".

"मी ऋषी कण्व ह्यांची भेट घेण्यासाठी व त्यांची पुजा करण्यासाठी आलो आहे". दुश्मंत तिचे अप्रतिम लावण्य न्याहाळतच, तिला सांगतो. "तरी कृपया आपण मला कण्वमुनी कोठे भेटतील ते सांगावे. ते आता कोठे गेले आहेत ते सांगाल तर बरे होईल". राजा त्याचे सांगतो.

ते त्याचे बोलणे ऐकून ती सुंदरी जिचे नांव होते शकुतला, त्यास सांगते, "माझे ख्यातनाम पिता आश्रमातून वनात फळे आणण्यासाठी बाहेर गेले आहेत, ते इतक्यातच येतील तरी आपण थोडावेळ विश्रांती घ्यावी".

वैशंपायन पुढे सांगतात, तो राजा शकुंतलेचे अप्रतिम लावण्य पहाण्यात दंग झालेला असतो. त्या लावण्याबरोबर तिचे तपस्या केल्यामुळे जे तेज येते ते सुद्धा त्याला भावते. तिच्या सर्व हालचाली, तिच्या अंगाची ठेवण, तारुण्याने रसरशीत असलेली तिची बोलण्याची तर्हा अशा बर्याच गोष्टीमुळे राजाच्या मनात शकुंतले बद्दल कांहीं विषेश भावना उत्पन्न होते. थोड्या क्षणात राजा भानावर येतो व संभाषण पुढे चालू करतो, "आपण कोण व ह्या आश्रमात कशा, केव्हा आपण ह्या आश्रमात व कां आल्या अहात"? राजाची प्रश्नांची सरबत्ती चालू झाली कारण तो तिच्या सौंदर्याने वेडा झाला होता. त्याच्या मते अशी कन्या एकाद्या राजवाड्यात असली पाहिजे ती अशा बैराग्यांच्या आश्रमात कशी, असे प्रश्न त्याच्या मनात येत होते. राजा मोकळ्या मनांने तिला सांगतो, "अहो लावण्यवती मी तुम्हाला पहाताच तुमच्या प्रेमात पडलो आहे". ते ऐकून शांतपणे शकुंतला त्यास शांत होण्याची खूण करते. तिच्या ह्या अशा पोक्तपणामुळे राजा अधिकच घायाळ होतो.

राजाची तिच्याबद्दलची उत्सुकता अधिकच वाढते व तो विचारतो, "मला समजून घ्यायचे आहे कीं, आपण अशा आश्रमात कशा"? त्याची उत्सुकता शकुंतलेला समजते परंतु , ती संयमाने त्याला सांगते, "अहो राजे, मी कण्वमुनींची कन्या आहे, मग मी येथे नसणार नांहीतर कोठे असा प्रतिप्रश्न ती राजाला विचारून त्याचे समाधान करते.

राजा ते ऐकून आश्चर्य करतो कारण त्याच्या माहितीनुसार कण्व पूर्ण ब्रह्मचारी आहेत, मग त्यांच्या वीर्यातून कसे कोणी जन्मू शकते अशी शंका त्याला पडते.

राजा त्याच्या मनातील ही शंका तिला बोलून सांगतो व एकापरीने तो तिच्या बोलण्याला मानत नाही असें दाखवतो. राजा तिला ती खोटे बोलते असे एकापरीने सुचवतो. ते ऐकून शकुतला त्याच्या मनातील शंका रास्त असल्याचे दर्शवत सांगते, "अहो राजे, मला जे माझ्या जन्माबद्दल ऋषींनी सांगितले ते त्यांच्या शब्दात तुम्हाला सांगते, म्हणजे तुमच्या मनातील शंका पूर्णपणे दूर होईल. शकुंतला राजाला सांगू लागते , "विश्वामित्र ऋषी घोर तपस्येत असतांना त्यांची तपस्या भंग करण्यासाठी इंद्रांने मेनकेला त्याच्याकडे पाठवले होते. कारण इंद्राला विश्वामित्राचे सामर्थ्य अधिक वाढू नये असें वाटत होते. विश्वामित्राच्या त्या घोर तपश्चर्येमुळे इंद्राचे स्थान डळमळीत होईल अशी त्याला भिती वाटत होती. विश्वामित्राची तपस्या मोडून काढण्यासाठी तो स्वर्गातील अप्सरेला पाठवण्याचे ठरवतो. तो

इंद्र त्याची ती भिती मेनकेला सांगतो व तिला विश्वामित्राचे तपोभंग करण्याची विनंती करतो.

ते ऐकून मेनका इंद्राला सांगते, "अहो शक्र, विश्वामित्र हे एक महान ऋषी आहेत व त्यांच्या क्रोधाची कल्पना आपल्याला आहे, तुम्हीसुद्धा त्याच्या ताकदीला व रागीटपणाला घाबरता मग अशात माझा बळी तुम्ही कशासाठी देत आहात. तुम्हाला माहित आहे, विश्वामित्राने कसे वशिष्ठाच्या मुलांचे रागाच्या भरात बळी घेतले". जे जन्माने क्षत्रिय व नंतर कर्माने ब्राह्मण झाले अशा महान ऋषीच्या रागाची मी बळी ठरेल त्यापासून तुमच्याकडे कांहीं संरक्षण आहे कां? हे असें यति आहेत ज्यांने केवळ अर्ध्य देण्यासाठी एक कौशिकी नांवाची पवित्र नदी उत्पन्न केली जीला कोणीही बांध घालू शकत नाही. ज्यानी त्याच्या पत्नीला तिच्या कष्टाच्या क्षणी आधार दिला त्या मंतंग (त्रिशंकू) ऋषीचे ते उपकार फेडण्यासाठी विश्वामित्र स्वतः त्याचे पुरोहित झाले, तो भयंकर दुष्काळ संपल्यावर ते त्यांच्या आश्रमात परत आले जो कौशिकीच्या किनार्यावर होता व नंतर त्यांने त्या नदीचे नांव परा ठेवले, ज्यांने रागाच्या भरात एक नवीन विश्व उत्पन्न केले त्यात असंख्य श्रवणासारखे तारे निर्माण केले. त्याच्या भयाने आपण स्वतः अमृत पिण्यासाठी धडपडत होता, ज्याने त्रिशंकूला त्याच्या शापापासून संरक्षण दिले, अशा प्रखर शक्ति असलेल्या साधूच्या भानगडीत मी पडू इच्छित नाही. आता तू मला सांग, मेनका इंद्राला विचारते, त्याच्या रागापासून मला तू कोणते संरक्षण देऊ शकतोस ते सांग". तू माझे संरक्षण अशा कोणत्या प्रकारे ह्या रागीट ऋषीपासून करणार आहेस? तुला माहित आहे किं, त्याच्या एका शापाने तिनही जगं (स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ) जाळून टाकूं शकतो , सर्व पृथ्वीचा थरथराट होऊ शकतो, तो महान मेरू पर्वताला पृथ्वीतून उपटून लांब कोठेतरी फेकूं शकतो, पृथ्वीच्या दहाही दिशांची फेरी तो एका क्षणात करू शकतो, ज्याचे मुख एकाद्या जळणार्या यज्ञकुंडासारखे आहे , ज्याचे दोन डोळे जणू एक चंद्र व दुसरा सूर्य, ज्याची जीभ साक्षात यमच आहे, एवढे बोलून नंतर मेनका इंद्राला विचारते, अशा प्रबळ तपस्या असलेल्या ऋषीला मी कसें काय माझ्या कह्यात खेचू शकेन? मला वाटत नाही कीं, मी त्याला स्पर्श करू शकेन. ज्याच्या नुसत्या स्मरणांने यम, सोम, अनेक श्रेष्ठ ऋषी, साध्य, विश्वासु, वालखिल्य असें सगळे श्रेष्ठ ऋषी घाबरून जातात, अशा तपस्व्याकडे मी पाहू तरी

शकेन कां? असें प्रश्न विचारून नंतर ती इंद्राला सांगते, असें असले तरी मी तुला मदत करण्याचा प्रयत्न करीन पण त्यासाठी तुला, स्वर्गाच्या राजा, कांहीं गोष्टींची व्यवस्था करावी लागेल. मी जशी विश्वामित्रापुढे जाईन तसा मरुतदेव (वारा) मंदपणे वाहून वनातील सुगंध विश्वामीत्राच्या नाकापर्यंत पोहोचवू लागेल ज्यामुळे प्रसन्न वातावरण निर्माण होईल व तो माझे वस्त्र खेचून काढील व मला विवस्त्र करील. त्याच वेळी मन्मथ (कामदेव) मला मदत करील. ते ऐकून इंद्र सांगतो कीं, त्या सर्व गोष्टांची व्यवस्था होईल. असे सर्व व्यवस्थित ठरवून मग मेनका हे नवीन आव्हान यशस्वी करण्यासाठी मोठ्या उत्साहाने विश्वामित्राच्या आश्रमाकडे कूच करते.

अशारितीने आदिपर्वाच्या संभव पर्वाचा एकाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग बाहत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

शकुंतला त्याला पुढे सांगते, कण्व पुढे मला सांगतात, मेनकेच्या सांगण्याची पूर्तता करण्यासाठी इंद्र वार्याला त्याचे काम सांगतो. वार्याने मोहमय सुगंध विश्वामित्राच्या आश्रमाकडे पोहोचवण्याचे काम करण्याचे आश्वासन इंद्राला दिले. मेनका तेथे पोहोचण्या आधी हे सर्व होणे आवश्यक होते. विश्वामित्राला संशय येईल असें कांहींही तेथे व्हावे हे त्याला मान्य नव्हते. हळूवारपणे ती स्वर्गीय अप्सरा त्या तपस्व्याच्या घरात शिरते. असा तो महान ऋषी ज्याचे सर्व पाप नष्ट झाले होते. तिने पाहिले कीं, विश्वामित्र आणखीन घोर तपस्येच्या तयारीत होते. ते पाहून मेनकेला इंद्राची भिती किती रास्त आहे ते जाणवले. मेनका विश्वामित्राच्या समोर येते व त्याचवेळी वारा तिचे शुभ्र वस्त्र उडवून देतो. तिचे सौंदर्य त्यामुळे विश्वामित्रास दिसते. ती नग्न झाली होती, ते वस्त्र मिळवण्यासाठी ती त्यामागे धावू लागते. विश्वामित्र तिला व तिच्या नग्न सौंदर्याचे दर्शन घेत रहातो. मेनका विश्वामित्राकडे काकुळतीने पहाते व आपले नग्न शरीर हातांने झाकण्याचा प्रयत्न करण्याचा बहाणा करीत त्याला ते वस्त्र मिळवून देण्यासाठी विनंती करते. तो पर्यंत वार्याने तिचे वस्त्र कोठल्या कोठे उडवून नेले असल्याने ते वस्त्र पुनः मिळणे केवळ अशक्य होते. अशा परिस्थितीत तिला दुसरे वस्त्र देण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. सुसंस्कृत विश्वामित्र तिला आश्रमातील दुसरे कांहीं कपडे, जे तिला नेसता येतील ते, देण्यासाठी मेनकेला आश्रमाच्या आतील भागात बोलावतात. अशा बहाण्याने मेनका विश्वामित्राच्या आश्रमात तशीच शिरते. आत पाहिल्यावर त्यांना असें समजते कीं, आश्रमात कांहीं मेनकेला नेसता येतील असें कपडे नसतात. मेनका घाबरल्याचे सोंग घेऊन विश्वामित्राची सहानुभूती जिंकण्यात कामयाब होते. अशारितीने तिचा पहिला प्रयत्न यशस्वी झालेला असतो. विश्वामित्रावर तिच्या सौंदर्याचा व त्यावेळी वहात असलेल्या मादक सुगंधाचा प्रभाव होत असतो. ते तिला त्याच्या आश्रमात रहाण्याची मुभा देतात. ती तशीच विवस्त्र अवस्थेत त्या आश्रमात राहू लागते. त्याचा व्हायचा तोंच परिणाम विश्वामित्रावर सावकाशपणे होण्यास सुरुवात होते. मेनकेचे सौंदर्य व तिच्या हालचाली, वागण्याची तर्हा अशा सर्व गोष्टांमुळे ऋषीवर्य नकळतपणे प्रभावित होत होते. विश्वामित्र तिला त्यांचे वस्त्र देतात ते नेसल्याने ती

अधिकच आकर्षक दिसू लागते. मेनकेचे सतत घाबरल्याचे नाटक विश्वामित्रास तिच्याजवळ खेचण्यात मोठी मदत करत असते. आपण फारच असहाय आहोत ते दाखवण्यासाठी ती त्याला वेळोवेळी स्पर्श करण्यास सुरुवात करते. त्या स्पर्शाचा जो परिणाम अपेक्षित होता तो होण्यास सुरुवात होते. कामदेव त्याचे काम उत्तमरित्या करीत असतो. रात्रीच्या प्रहरी आपल्याला फार भिती वाटते असें दाखवून ती अप्सरा त्याच्या बिछान्यात घुसते व त्याला धरून झोपते. विश्वामित्रास कांहींच संशय येत नाही व त्याउलट तिच्या असहायतेमुळे ते नकळतपणे तिच्या अधिक जवळ जाऊ लागतात. माणसाचे अनेक अहंकार असतात त्यातील विश्वामित्राचा त्याच्या तपस्येशी निगडीत अहंकार जर मेनकेने चाळवला असतां तर तो महायोगी सावध झाला असतां व तिचा, शाप देऊन त्याने भस्म करून, नाश केला असतां हे ती धुर्त अप्सरा जाणून होती व त्याप्रमाणे ती सर्व डाव खेळत होती. तिने विश्वामित्राचा पुरुषी अहंकार जागृत ठेवण्याची दक्षता बाळगली होती. त्यांचा महायोगी अहंकार जागृत होऊ दिला नाही. एका असहाय अबलेची आपण मदत करीत आहोत अशी भावना त्या कौशिकात (विश्वामित्र कुशिक कुळाचा म्हणून त्याला कौशिक असें सुद्धा नांव आहे) सतत रहावी ह्याची दक्षता ती राखून होती. ह्या सर्व गोष्टींचा इंद्राला अपेक्षित तो परिणाम होतो व विश्वामित्र मेनकेच्या प्रेमात पडतात केवळ तिच्या असहायतेच्या नाटकाचा तो परिणाम असतो पण त्याचा व्हायचा तो परिणाम झालेला असतो. मेनकेला त्यातून एक कन्या होते जेव्हां ती मालिनी नदीच्या किनार्याला रहाण्यास जाते. ते त्यांचे अपत्य ती घेऊन विश्वामित्रास सांगते कीं, ते अपत्य त्यांने स्वीकारावे. विश्वामित्रास त्याचा तपोभंग झाल्याचे त्यावेळी लक्षात येते, इंद्राचा उद्देश सफल झालेला असतो. उशीरा विश्वामित्रास इंद्राचा डाव समजतो पण आता त्याचा कांहीं उपयोग नसतो कारण विश्वामित्राचे तपोसामर्थ्य त्या संभोगामुळे कमी झालेले असते व त्याचे इंद्राला त्याच्या स्थानातून खाली खेचण्याचे उद्दीष्ट संपुष्टात आलेले असते. मेनका त्या कन्यारत्नास त्या मालिनी नदीच्या किनार्यावर जंगलात जेथे हिंस्र श्वापदांचा वावर असतो सोडून स्वर्गात निघून जाते. ते स्वर्गीय अपत्य हिंस्र श्वापदांच्या आहारी जाऊ नये म्हणून ब्रह्मदेव शकुंताना (गिधाडांना) त्याचे संरक्षण करण्यास सांगतो. एवढे सांगून त्यानंतर शकुतला दुश्मंत राजास सांगते कीं, तिला तिचे पिता सांगतात कीं, ते त्या मालिनी

नदीच्या किनार्यावर अर्ध्य करण्यासाठी गेले होते कारण त्यांचा आश्रम तेथून जवळच होता. तेथे ते मला त्या अवस्थेत पडलेली पहातात. कण्वमुनी तेथे आल्यावर ती पहारा करणारी गिधाडे निघून जातात. कण्वमुनी मला उचलतात व त्यांच्या आश्रमात आणतात व तेव्हांपासून मी त्यांची कन्या म्हणून त्यांच्या बरोबर रहात आहे. हि माझी जन्म कहाणी आहे एवढे सांगून शकुतला थांबते. एवढे ऐकल्यानंतर दुश्मंत राजाच्या मनातील शंका दूर होते परंतु, त्याला समजत नाही कीं, तिचे नांव शकुतला कां ठेवले. तो प्रश्न ऐकल्यावर थोडे हसत ती सांगते कि, त्याचे कारण जेव्हां कण्वमुनी माझ्याजवळ गेले तेव्हा त्यांना समजले कीं, ब्रह्माने माझे हिंस्त्र श्वापदांपासून संरक्षण करण्यासाठी शकुंतांची नेमणूक केली आहे म्हणून माझे नांव शकुंतला म्हणजे शकुंताने वाचवलेली असा आहे . म्हणून माझे नांव शकुंतला आहे . राजाच्या सर्वच शंकांचे समाधान तिने केले.

कण्वमुनी तिला त्यांची कन्या मानतात तसेंच शकुतलासुद्धा त्यांना तिचे पिता समजते हे राजाला समजले. माझे खरे पिता कोण ते मला माहीत नाही म्हणून मी कण्वमुनीनाच माझे बाबा समजते असें सांगून शकुंतला दुश्मंताला विचारते कीं, त्यांचे एवढ्या सांगण्याने समाधान झाले कां?

अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा बाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्र्याहत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

एवढे सांगून झाल्यावर वैशंपायन पुढील कथा सांगण्यास सुरुवात करतात. राजा दुश्मंत ते ऐकून समजतो कीं, ही कन्या एका ऋषी व अप्सरेची अपत्य आहे तेव्हां तिच्या उच्चतेबाबत कोणीही शंका घेऊ शकत नाही. दुश्मंत राजा तिला सांगतो कीं, तू उच्च दर्जाची आहेस ह्याबद्दल आता मला कोणतीही शंका उरलेली नाही. त्यानंतर तो तिला विचारतो कीं, ती त्याची भार्या होण्यास तयार होईल कां? राजा तिला विनंती करतो कीं, "जर ती त्याची भार्या होण्यास तयार असेल तर तो तिला उत्तमोत्तम रत्ने, सोन्याचे दागिने, रत्ने व जडजवाहीरे, मोती, उच्च वस्त्रं असें सर्व कांहीं ताबडतोब देऊ शकतो. माझ्याशी लग्न केल्याने ती त्याच्या साम्राज्याची सम्राज्ञी होईल. अहो सौंदर्यवती आपण गंधर्व विवाह करून जीवन सुरु करू".

राजाचे ते उद्‌गार ऐकून प्रथम ती सुंदरी भांबावून जाते व त्याला सांगते, "माझे पिता बाहेर गेले आहेत व त्यांच्या आज्ञेशिवाय असें कांहींही होणे शक्य नाही. ते आम्हा सर्वांसाठी वानातून फळे आणण्यासाठी गेले आहेत त्यांच्या येण्याची आपण वाट पहावी".

राजा दुश्मंत तिला बोलतो, "अहो सौंदर्यवती, माझी प्रामाणिक इच्छा आहे कीं, तू माझी धर्मपत्नी व्हावीस. मी तुझ्याशिवाय आता जगू शकत नाही. तू तुझ्या जीवनाची मालकीण आहेस, तुझ्या जीवनाचे निर्णय तुलांच घ्यावयाचे आहेत, तरी त्यासाठी तुला तुझ्या मानलेल्या पित्याची परवानगी घेण्याची कां आवश्यकता वाटते? आपल्या प्रथेनुसार आपण आठ प्रकाराने लग्न करू शकतो हे तू जाणत असशिलच". एवढे बोलून पुढे न राहून राजा दुश्मंत तिला सांगू लागतो, "आपण ज्या आठ प्रकारे लग्न करू शकतो ते असें आहेत, ब्रह्म, दैविक, अर्श, प्रजापत्य, असुर, गंधर्व, राक्षस आणि पैशाची असें ते त्यांच्या योग्यतेच्या क्रमानुसार आहेत व ते सर्व मान्यवर आहेत. स्वयंभू मनुने ते प्रमाणित आहेत असें सांगितले आहे. त्यापेक्षा आणखीन काय सांगावे"!

राजा शकुंतलेला समजावण्यासाठी आणखीन सांगत रहातो, "पहिले चार ब्राह्मणांना सांगितले आहेत, पहिले सहा क्षत्रियांसाठी योग्य समजले जातात, क्षत्रियांस राक्षस लग्नसुद्धा कांहीं परिस्थितीत मान्य आहे. असुर लग्न वैश्य व शुद्रास सुचवला आहे.

पहिल्या पांचातील सुरुवातीचे तीन योग्य समजले जातात. उरलेले अयोग्य समजले आहेत. राजा तिला सांगतो पैशाची व असुर कधीही योग्य नसतात, असें आपल्या पारंपारिक प्रथेत दिले आहे. गंधर्व व राक्षस पद्धत आपल्याला योग्य आहे, म्हणून त्यानुसार आपण लग्न केले तर तुला घाबरण्याचे कांहींही कारण नाही".

असें सांगून पुढे राजा तिला विचारतो, तिलासुद्धा आता विवाह करण्याची इच्छा असेलच. तेव्हां फार वेळ न दवडता आपण गंधर्व विवाह करावा. तुझ्यासाठी माझ्यापेक्षा जास्त योग्य उपवर तरूण तुझ्या पित्यास मिळण्याची शक्यता नाही. तरी तुझा काय निर्णय होतो ते सांग. शकुंतला त्याचे त्याच्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ केलेला युक्तिवाद शांतपणे ऐकून घेते. त्यानंतर ती दुश्मंतास ऐकवते, "अहो राजेश्री, जर तुम्ही सांगता तोच धर्माचा मार्ग असेल तर, म्हणजे मी माझ्या भवितव्याची एकमेव जबाबदार आहे तर, मी जे सांगते त्या प्रमाणे तुला सर्व गोष्टी कराव्या लागतील. "अरे पुरुवंशाच्या प्रतिष्ठीत राजा, हे तुला मान्य आहे कां? मी तुला आता माझ्या अपेक्षा सांगते व त्या पुर्ण करण्याची इच्छा तुमच्यात आहे कां ते सांगा".

नंतर शकुंतला त्याला तिच्या अपेक्षा सांगते. "तुला एक अभिवचन मला द्यावे लागेल त्यानुसार जर मला तुझ्यापासून पुत्र झाला तर तो तुझा मुख्य वारसदार ठरेल. ही माझी अंतिम इच्छा आहे ती तुला मान्य आहे कां"? जर ही माझी इच्छा तुला मान्य असेल तर आपल्या समागमास मी तयार आहे.

वैशंपायन पुढे जनमेजयास सांगतात, वासनेच्या गरमीने पेटलेला तो रजोगुणी राजा क्षणाचाही विलंब न करतां तिची ती अट मान्य करतो. केव्हां एकदाचा तिच्याशी संभोग घेतो अशी त्याची वासनामय अवस्था झालेली होती. तो तिला आश्वासन देतो, "मी तुला माझ्यासह माझ्या राजधानीत घेऊन जाईन व तेथे रितसरपणे आपण लग्नसुद्धा करू". एवढे बोलून तो राजा त्या अप्रतिम लावण्य असलेल्या शकुंतलेशी गंधर्व विवाह करतो. शकुंतला दुश्मंतास तिचा पति समजण्यास सुरुवात करते.

सर्व झाल्यावर तो वासनेने बेचैन झालेला राजा तिचा निरोप घेतो व सांगतो, "तुला सन्मानपूर्वक माझ्या राजधानीकडे नेण्यासाठी नंतर माझे आमात्य सर्व सेना घेऊन येतील". राजाचा उद्देश सिद्ध झाला होता, त्या साध्याभोळ्या वनकन्येस त्याने फसवले

होते असें वैशंपायन सांगतात. परतीचा प्रवास करतांना राजा विचार करतो, जेव्हां कश्यप वंशातील थोर ऋषी जे शकुंतलेचे पिता आहेत त्याना हे आपले कृत्य समजेल तेव्हां ते काय करतील. आपण एका ऋषीची फसवणूक केली आहे कां? ह्या शंकेने त्रस्त मनस्थितीत राजा आपल्या राजधानीत पोहोचतो.

राजा दुश्मंत आश्रम सोडून गेल्यावर लवकरच कण्वमुनी आश्रमात येतात. शकुंतला मात्र तिने केलेल्या अमर्यादे मुळे लज्जीत झालेली असते. ती त्यांचे स्वागत करण्यासाठी बाहेर येत नाही. परंतु, कण्वमुनी सर्वज्ञानी असतात, त्यांना तेथे काय होऊन गेले ते समजलेले असते. कण्वमुनी तिला सांगतात कीं, त्यांना जे कांहीं त्याच्या पश्चात घडले ते सर्व समजले आहे. ते ऐकून शकुंतला लाजेने व भितीने अस्वस्थ होते. परंतु, जेव्हां कण्व तिच्या निर्णयाचे कौतुक करतांना ती पहाते तेव्हां तिच्यात धीर येतो. कण्व तिला समजून घेण्याच्या अभिनिवेशाने सांगतात, तुझे हे वय आहे व अशा वयात प्रेम उत्पन्न होणे कांहीं गैर नाही व तू ज्या पुरुषास निवडले आहेस तो उच्च वंशाचा गुणवान, पवित्र प्रवृत्तीचा असा क्षत्रिय आहे. त्यात कांहींच तुझे चुकले नाही. ते बोलल्या नंतर कण्व तिला सांगतात, तुझा मुलगा मोठा सम्राट होईल व तो सर्व समुद्रांवर व त्या पलिकडे आपले राज्य वाढवणार आहे.

ते ऐकून शकुंतला स्वस्थ होते व नेहमीप्रमाणे कण्वांची पादपुजा वगैरे सेवा करण्यास पुढे होते. बापाने आणलेली फळे ती ठिकाणी ठेवते व पहिल्यासारखे सर्व काम करण्यास सुरुवात करते. शकुंतला तिच्या बाबांना सांगते, आपण माझ्या पसंतीस स्वीकारले आहे ते पाहून मला फार संतोष वाटला.

कण्व तिला बोलतात, "मी तुझ्या सुखासाठी त्याचा उपमर्द सहन केला आहे कारण तू जीवनात सुखी रहावे एवढीच माझी इच्छा आहे. तुझ्या सुखासाठी मी तुला एक दुवा देण्यास तयार आहे तरी, तुला काय पाहिजे ते सांग, तुला माहित आहे कीं माझा दुवा कधीही फुकट जात नाही".

ते ऐकून शकुंतला बोलते, "तात, असें करा कीं, पुरूवंशाचे राजे कधीही पराजीत होणार नाहीत व त्यांचे शत्रू नेहमी त्यांच्यापुढे त्यांना शरण रहातील.

अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा त्र्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौर्याहत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, दुश्मंत राजा, ज्याने शकुंतलेला मोठी मोठी आश्वासने दिली, आश्रमातून गेल्यावर कांहीं दिवसांत शकुंतला गर्भवती असल्याचे आश्रमातील सदस्यांना लक्षात आले. यथावकाश तिने एका देखण्या व धष्टपुष्ट मुलास जन्म दिला. ते बालक आश्रमाच्या पवित्र वातावरणात वाढत होते. तो तीन वर्षाचा झाला तेव्हां त्याच्यातील तेजस्वीतेचा प्रत्यय आश्रमवासियाना येऊ लागला. त्याचे देखणेपण व वागण्यातील सुसंस्कृतता सर्वांना जाणवत होती. त्याची गोष्टी शिकण्याची तर्हा व गती वाखाणण्यासारखी होती. त्याचे आजोबा कण्व त्याच्यासाठी सर्व धार्मिक विधी यथासांग करून त्याचे भवितव्य सुरक्षित करण्यात कांहीं उणीव रहात नाही ह्याची दक्षता बाळगत होते.

त्या मुलाचे दांत मोत्यासारखे शुभ्र चमकत असत, त्याचे छोटे बाहु त्याच्या शरीराच्या ताकदीची झलक देत होते. जणुकाय तो त्या लहान वयातसुद्धा एकाद्या सिंहास त्या बाहूंनी मारू शकला असता. त्याचे कपाळ भव्य होते व त्याच्या केसाच्या बटा त्याच्या खांद्यावरून रुळत होत्या. जसा काळ वाढत होता तसा तो स्वर्गीय बालक अधिकाधिक शक्तिमान व गुणवान असा वाढत होता. त्याच्या शरीरावरील शुभ लक्षणे स्पष्ट दिसत होती. त्याच्या वयाच्या मानाने त्याची होणारी वाढ लक्षणीय होती. तो एवढा ताकदवान होता कीं, आश्रमाच्या आजुबाजूस येणार्या वाघ, अस्वलं, हत्ती, जंगली रेडे व सिंह अशा मोठ्या आकाराच्या श्वापदांना तो एकटा तेथील वृक्षांना वेलींच्या मदतीने बांधून ठेवी अशासाठी कीं, त्याच्यामुळे इतरांना त्रास होऊ नये. तो आश्रमातील इतर मुलांशी खेळून त्याच्या आनंदात भर घालत असे, एकंदर तो सर्वांचा प्रिय असा आश्रमवासी झाला होता. आश्रमवासीयांनी त्याचे नांव त्याचे अनेक गुण पाहून ठेवले होते, सर्वदमन. त्याची आश्रमातील प्रगती व इतर गुण पाहून ऋषी शकुंतलेला सांगतात आता सर्वदमनला त्याच्या पित्याकडे पाठवणी करण्याची वेळ आली आहे. सर्वदमनची शारीरीक ताकद पाहून कण्वमुनी आपल्या शिष्यांशी सल्लामसलत करून असा निर्णय घेतला किं, शकुंतला व सर्वदमन दोघांना घेऊन त्यांच्या शिष्यानी दुश्मंत राजाकडे जावे व त्यांना त्याच्या सुपूर्द

करावे. शुभमुहूर्त पाहून त्याच्या पाठवण्याची तयारी ते करू लागले, आश्रमातील कांहींना शकुंतला व सर्वदमन ह्याची इतकी सवय झालेली होती कीं, त्या लोकांनी त्यांना पाठवण्याच्या निर्णयाला विरोध करू लागले. त्यांना शांत करण्यासाठी कण्वमुनी व त्यांचे सहकारी त्यांना सांगतात कीं, मुलीचे तिच्या बापाच्या घरी अशारितीने फारकाळ रहाणे तिच्या इभ्रतीसाठी योग्य नसते. विशेष करून ज्या मुलीने गंधर्व विवाह केला आहे व त्यापासून अपत्य झाले आहे अशा मुलीने योग्य समयी आपल्या पतिच्या घरी जाणे शिष्टाचाराला धरून आहे. तरी तिच्या जाण्याला कोणीही विरोध करू नये.

त्या प्रमाणे त्याचे शिष्य शकुंतला व सर्वदमनाला घेऊन दुश्मंत राजाच्या राजधानीच्या नगरी जिचे नांव होते, हस्तिनापूर, प्रयाण करतात. हस्तिनापूरी गेल्यावर ते राजाला भेटतात. त्याला त्यांच्या येण्याचे कारण सांगतात व सर्व प्राथमिक संस्कार झाल्यावर ते शिष्य आश्रमाकडे निघून जातात. शकुंतला रिवाजाप्रमाणे राजाची म्हणजे तिच्या पतिची पुजा करून त्याला सांगते कीं, हा मुलगा आपला आहे. त्यानंतर ती राजाला त्याने दिलेल्या आश्वासनाची आठवण करून देते व सांगते जसे त्यांनी कण्वमुनींच्या आश्रमात त्या दोघांची भेट झाली होती त्यावेळी गंधर्व विवाह करण्या आधी जे वचन दिले होते, त्याप्रमाणे त्यांनी सर्वदमनला त्याचा उत्तराधिकारी म्हणून जाहिर करावे.

दुश्मंत राजा मात्र सर्वकांहीं आठवूनही तिला दोष देतो व बोलतो, तू संन्याशाच्या पेहरावातील बाई हे कोणते कुभांड रचले आहेस, मला असें कांहींही घडल्याचे कसे स्मरत नाही? तो पुढे तिला सांगतो, धर्म, काम व अर्थ ह्या धर्मशास्त्रानुसार मी तुला सांगतो, तू निघून जा अथवा रहा जे कांहीं तुला योग्य वाटते ते कर पण माझा नाद सोड. हे दुश्मंतचे उद्गार ऐकून शकुंतला शरमेने अर्धमेली होते कारण ती असें कांही घडेल ह्याचा कधीच विचार केला नव्हता. ती घाबरून तेथेच एकाद्या खांबासारखी नुसती उभी राहीली, निःशब्द. हे थोडावेळच, लवकरच तिचे डोळे तांब्यासारखे लाल झाले व तिचा गौरवर्ण संतापाने आरक्त झाला, तीक्ष्ण दृष्टाने ती राजाकडे पाहू लागली. तिचा क्रोध तिला अनिवार्य होत होता तरीसुद्धा ती तिच्या वैरागी संस्काराच्या मदतीने तो नियंत्रित करीत होती. ती क्षणभर विचार करून नंतर बोलू लागते, "आपण सर्वकांहीं जाणत असतांना मुद्दाम एकाद्या हलक्या कुळातील असल्यासारखे हे बोलता ह्याची आपल्याला लाज कशी

वाटत नाही. आपले हृदय मी जे सांगते त्याचा साक्षीदार असूनही असा खोटेपणा आपण कसा करतां? कृपया आपल्या आत्म्याला स्मरून बोला म्हणजे ते तुमच्या इभ्रतीला शोभून दिसेल. तुमचे हे बोलणे एकाद्या चोराला शोभते, सत्य माहीत असूनही ते झालेच नाही असें बोलणे एका राजाला शोभत नाही, जर कोणी दुसरा असे बोलला तर तुमच्या न्यायाधीशांनी त्याला हत्तीच्या पायाखाली तुडवण्याची शिक्षा दिली असती हे आपण जाणता". "कदाचित आपण विसरला अहात कीं, प्राचीन सर्वसाक्षी नारायण तुमच्या हृदयात बसून आपले पापकृत्य पहात आहेत ह्याचा आपल्याला विसर पडला असावा". सूर्य, चंद्र असे सर्व देव आपले कर्म जाणून आहेत त्याचा, एक राजा असूनही तुला विसर पडला आहे कां? जो माणूस ह्या सर्व गोष्टांकडे दुर्लक्ष करून आपले पाप कर्म करीत रहातो तो नरकात खितपत पडतो ह्या धर्मतत्त्वाचा तुला विसर पडला आहे कां? मी तुझी गंधर्व विवाहाने पत्नी आहे हे जर तू नाकारत असशिल तर यम तुला माफ करणार नाही. ह्या सर्व गोष्टींचा तरी विचार तू केला पाहिजेस व मला, माझा तुझ्या पत्नीचा, हक्क सन्मानपूर्वक दिला पाहिजेस. हे खरे कीं, मी स्वतःहून माझ्या बाबांच्या आश्रमातून आले कारण, तू दिलेल्या आश्वासनानुसार तुझे मंत्री व सैन्य मला आणण्यासाठी पाठवण्याचा तुझा शब्द तू पाळला नाहीस. मी अशारितीने येण्याचे कारण समजून घे, आपला पुत्र हा सर्वदमन आता मोठा झाला आहे व त्याच्यावर जे राजपुत्राचे संस्कार झाले पाहिजेत ते योग्य समयी व्हावेत म्हणून कण्वमुनींच्या आदेशानुसार माझे असें येणे झाले ते समजून घे. मी कोणीच नाही अशाप्रकारे तू मला असें एकाद्या सामान्य स्त्रीप्रमाणे वागवणे तुझ्या राजपदाला शोभत नाही. एका राजाने आपल्या पत्नीस कसे वागवावे हे तुला माहित नाही असें तू मला सांगू नकोस, कारण असें तू सांगितलेस तर त्यामुळे तुझीच इज्जत चवाठ्यावर येईल. एक गोष्ट लक्षात ठेव, माझे बाबा माझी काळजी घेण्यास तुझ्यापेक्षा जास्त चांगले सक्षम आहेत, माझे हे असें आगंतुकपणे येणे केवळ आपल्या पुत्राच्या भविष्यासाठी आहे. जर तुला मी नको असेन तर मी परत जाण्यास तयार आहे. परंतु, एक गोष्ट लक्षात असू दे कीं माझा तुझ्यापासून झालेला हा आपला पुत्र हा तुझाच अवतार आहे. म्हणून वेदांत बायकोला जया म्हणजे जिच्यातून पुरुष पुनः जन्म घेतो असें सांगितले आहे. म्हणून हे लक्षात ठेव हा सर्वदमन तुझाच अवतार आहे, त्याच्यात तुझेच

सर्वगुण अधिक तेजस्वी होऊन अवतरले आहेत. म्हणून हा सर्वदमन तुझा पुत्र म्हणजे तुला पुत् नरकापासून वाचवणारा आहे. तुझ्या पूर्वजांना तोच अर्ध्य देणारा आहे त्याचा अशारितीने एकाद्या असंस्कृत माणसाप्रमाणे अपमान करू नकोस. तुला व तुझ्या पूर्वजांना त्याची गरज आहे हे विसरू नकोस. पुढे शकुंतला सांगते, "जी स्त्री गृहकृत्य जबाबदारीने सांभाळते तींच खरी गृहिणी समजली जाते. जी तिच्या पतिचा वारस जन्माला घालते तींच खरी पत्नी समजली जाते. तिच खरी भार्या समजली जाते जी आपल्या पतिशी प्रामाणिक असते. तिच खरी पत्नी समजली जाते जी दुसर्या कोणत्याही पुरुषास ओळखत नसते. पत्नी नवर्याची एकमेव सच्ची मैत्रीण असते. तसेंच तोंच खरा पति समजला जातो जो फक्त आपल्या पत्नीसच खरी मैत्रिण मानतो. पतिचा धर्मविधी त्याच्या पत्नी खेरीज पूर्ण होत नाही. त्याचा फायदा, त्याच्या सर्व इच्छा त्याच्या पत्नीभोवती असतात. प्रपंच चालवण्यासाठी मग तो देशाचा असो अथवा घरचा असो पतिला पत्नीची मदत घ्यावयाची असते व तीच खरी पत्नी जी त्याला सर्व प्रकारचे सहाय्य करते. प्रपंच संपल्यावर मोक्षासाठी सुद्धा पतिला त्याची पत्नीच सहाय्य करीत असते. ती त्याच्या आधी मरून स्वर्गात त्याची जागा निश्चित करते. ज्यांना पत्नी असते त्याच्या जीवनात आनंद, सुख अनुभवता येते कारण त्याच्या जीवनातील सर्व सुखाचे क्षण तिच्यामुळे उत्पन्न होत असतात. देशाच्या जीवनात सुख आणण्याचे काम राजा करतो त्या त्याच्या कार्याला त्याची पत्नी बरोबरीने मदत करीत असते हे तू लाक्षात घेतले पाहिजेस. जेव्हां पतिला वनवास भोगावा लागतो तेव्हां त्याला साथ फक्त त्याची बायको देत असते. अशा दुर्धर ठिकाणी ती त्याचा आधार असतो, त्यामुळे तो पुरुष सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देऊ शकतो. म्हणून तू हे लक्षात घेतले पाहिजेस कीं, केवळ पत्नीच पतिचा अंतिम आधार असतो. जेव्हा नवरा मरतो तेव्हां त्याची पत्नी त्याच्यासह जाण्यास तयार होते. म्हणून हे राजा, लग्नाची प्रथा समाजाने स्वीकारली आहे. एरव्ही कोणी विवाह न करतांच राहीले असते. कुटूंब व्यवस्था पति पत्नींच्या रचनेनेच सिद्ध झाली आहे. एक लक्षात असूं दे किं, प्रापंचिक जीवनात पत्नी पतिचा एकमेव आधार असतो. ज्ञानी सांगतात कीं, नवरा त्याच्या बायकोच्या पोटी पुत्राच्या रुपांने येत असतो, म्हणून नवर्याने त्याच्या बायकोकडे त्याची दुसरी आई म्हणून पहावयाचे असते. आपल्या मुलाचा चेहरा पहाताना त्या

पुरुषाला एकाद्या आरशात स्वताचा चेहरा पहाण्यासारखे असते. स्वताच्या मुलाचा स्पर्श त्याला विलक्षण स्वर्गीय सुख देते ह्याचे कारणही तेंच असते. जीवनातील त्रस्त करणार्या घटनांपासून त्याला सुटका मिळते जेव्हां तो त्याच्या पत्नीबरोबर असतो. शहाणा माणूस कधीही आपल्या बायकोचा अपमान रागाच्या भरातसुद्धा करत नाही. त्याची सुखं आनंद सर्व त्याच्या बायकोवर अवलंबून असते हे तुला वेगळे सांगावयाची गरज नसावी. बायको हे असें एक क्षेत्र आहे जेथे नवरा जन्मत असतो. मोठे मोठे ऋषीसुद्धा कोणाला प्रसवू शकत नाही जे एक स्त्री करू शकते. स्वताचा मुलगा जेव्हां त्याच्या बापाला येऊन भेटतो, मग तो अगदी माती, धुळीने माखलेला असली तरी बाप त्याला आनंदाने मिठीत घेतो. अशी सर्वत्र परिस्थिती असतांना तू मात्र असा परक्यासारखा तुझ्या मुलाशी कसा वागू शकतोस? तुझा पुत्र तुला स्वताहून भेटण्यास आला असतां तू त्याला प्रेमांने भेटण्या ऐवजी एकाद्या त्रयस्थासारखा कसा वागू शकतोस. तुला माहीत आहे अगदी मुंग्यासारखा सुक्ष्म जीव सुद्धा स्वताची अंडी जपून सांभाळते, अशा परिस्थितीत तू असा निर्दयपणे तुझ्या मुलाशी कसा वागू शकतोस, जर तू तुझ्या मुलाला स्पर्श केलास तर तुला समजेल किं हा तरूण तुझ्या वीर्याचाच अंश आहे पण तू तो स्पर्श सुद्धा करत नाहीस, असा कसा तू दुष्ट बाप आहेस? कोणत्याही सुख देणार्या स्पर्शापेक्षा स्वताच्या मुलाचा स्पर्श कितीतरी जास्त सुखकारक असतो ह्याची तुला कदाचित कल्पना नसेल. म्हणून कृपया ह्या तुझ्या देखण्या पुत्रास तुझ्या पायांची पुजा करण्याची परवानगी दे व धन्य हो. ह्या जगात असें कोणतेही सुख नाही जे स्वताच्या मुलाच्या मिठीपेक्षा मोठे आहे. अरे शत्रुनाशका, मी तुझ्या गर्भाला तीन वर्षे सांभाळून जन्म दिला आहे, अरे पुरु वंशाच्या सम्राटा, तुला माहित नाही म्हणून सांगते, जेव्हां मी प्रसव वेदना सहन करीत होती तेव्हां आकाशातून भविष्य वाणी झाली कीं, तू त्याला राज्याचा वारस सांगितल्यानंतर तो शंभर अश्वयज्ञ करील तुझ्या नांवाने, आणि तुझ्या वंशाचे साम्राज्य वाढवेल. इतर लोक दूर प्रवासासाठी जातांना दुसर्याची मुलं मांडीवर घेऊन त्यांचा पापा घेतात व आनंद व्यक्त करतात, वेदीक मंत्र आहेत ज्यांच्या उच्चाराने मुलांचे जायवळ केले जाते, तुझ्या नशिबी हे सुख आले असतांना तुला हि दुर्बुद्धी कां होते ते समजत नाही. माझ्यापासून तुझा पुत्र जन्मला आहे हे तुला स्पष्टपणे समजेल जर तू त्याला नीटपणे पहाशिल, तुला तुझ्या बालपणीचा तू

पहावयास मिळेल. तुम्ही दोघे शंभर वर्षे सुखांने जगावे ही इच्छा आहे. तुझ्या वंशाची त्याद्वारा वाढ होवो अशी प्रार्थना.

एवढे बोलल्यानंतर ती त्याला, दुश्मंताला, आठवण करून देण्यासाठी त्यांच्या मिलनाच्या काळाची माहिती सांगू लागते, जेणेकरून राजाला जर विस्मरण झाले असेल तर त्याला तो प्रसंग स्मरेल. शकुंतला पुढे बोलते, तू कांहीं वर्षापूर्वी मृगयेसाठी आमच्या वनात आला होतास. तेथे आल्यावर तू माझ्या पित्याचे दर्शन घेण्यासाठी आमच्या आश्रमात आला बोतास. तेथे तुझे मी माझ्या पित्याच्या वतीने स्वागत केले होते व तेथे तू मला मांगणी घातली होतीस, एवढे बोलून शकुंतला राजाला विचारते, काय तुला हे सर्व आठवते कां? त्यावर राजा कांहीं बोलत नाही. दुश्मंताचे सगळे दरबारी ते तिचे बोलणे ऐकत असतात. त्यानंतर ती तिचे कथन पुढे चालू करते. मी त्यावेळी कुमारिका होती, पुढे ती सांगते, उर्वशी, पूर्वाचित्ती, सहजन्या, मेनका, विष्वाची आणि घ्रीताची अशा सहा प्रमुख अप्सरा आहेत. त्यातील मेनका ब्राह्मणाची कन्या आहे, ती स्वर्गातून इंद्राच्या सांगण्यावरून पृथ्वीवर अवतरली. विश्वामित्राशी तिचा संयोग झाला त्यातून माझा जन्म हिमावताच्या जवळ वाहणार्या मालिनी नदीच्या परिसरात झाला. विश्वामित्राने तिचा त्याग केल्यामुळे अस्वस्थ झालेल्या माझ्या मातेने मला नदीच्या किनार्यावर सोडून ती स्वर्गात निघून गेली. तेथे माझ्या पित्याने माझा सांभाळ केला त्यांच्या आश्रमात. हे सगळे मी तुला तेथे सांगितले, जेव्हां तू माझ्या जन्माची कहाणी मला विचारलीस. त्यानंतर माझ्या कुळाची खात्री झाल्यावर तू माझ्याशी माझ्या संमतीने गंधर्व विवाह केलास. त्यातून हा आपला मुलगा जन्मला.

हे ऐकल्यावर दुश्मंत त्याचे तोंड उघडतो व बोलू लागतो, त्याची बोलण्याची रित तुच्छतेची व तिची निर्भत्सना करण्याची होती. ओ शकुंतले, मला वाटत नाही कीं, मी तुझ्या ह्या बाळाच्या जन्मास जबाबदार आहे. बायका सामान्यपणे खोटे फार बोलतात हे सर्व माणसे जाणतात. त्यामुळे तुझ्या ह्या गोष्टींवर कोण भरवसा करणार नाही. विशेषकरून जर ते माझ्या वक्तव्याच्या विरोधात असेल तर, हे तू चांगलेच जाणतेस. सर्वांना माहित आहे कीं, ज्या मेनकेचा तू उल्लेख केलास ती इंद्राची लफडेबाज रखेली आहे. अशा बाईने विश्वामित्राला फसवून कांहीं भानगड केली व त्यातून तू जन्मलीस हे तू

आताच सांगितले आहेस त्यामुळे तू कुलीन नाहीस तर एक भानगडीतून जन्मलेली अनौरस औलाद आहेस. त्यानंतर तू सांगतेस कीं, तिने तुला एका नदीच्या किनार्यावर सोडून दिले. तुझा पिता विश्वामित्र हा सुद्धा एक अयशस्वी ऋषी आहे ज्याने ब्रह्मपद मिळविण्याचा प्रयत्न केला. तो मेनकेच्या फंद्यात सापडला ह्यातच तो किती नीच आहे ते स्पष्ट होते. कारण, जर तो प्रतिष्ठीत असतां तर त्याने तुझा आशारितीने त्याग केला नसतां. ह्यासर्व गोष्टी स्पष्ट करतात किं, तू माझ्या लायकीची अजिबात नाहीस. जर तू विश्वामित्र व मेनकेची मुलगी आहेस तर तू एवढे सगळे खोटे कां बोलतेस? कोणाचे तरी अपत्य तू माझ्या माथी कां मारण्याचा हा प्रयास करीत आहेस ते समजले पाहिजे. तुझ्या बोलण्यावर कोणीही भरवसा करणार नाही हे तुला कां समजत नाही? तुला माझी बेइज्जती माझ्या दरबारींच्या समक्ष करण्याचे धाडस कसें झाले? संन्याशाच्या अविर्भावात वावरणार्या लुच्च्ये, त्या मेनकेचे व त्या विश्वामित्राचे नांव तू कशासाठी माझ्या दरबारात बदनाम करीत आहेस. कदाचित असें असेल किं, त्यांचा तुझ्याशी कांहींच संबंध नसेल व तू तुझ्या मतलबासाठी हि कथा रचली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. एवढे बोलल्यानंतर राजा मोठी मेहेरबानी केल्याच्या अभिनिवेशात तिला सांगतो, तू सांगतेस कीं, मी तुझ्याशी गंधर्व विवाह केला आहे तर मी तुला माझ्या राणीसदनात एका खोलीची व्यवस्था करतो परंतु, हा मुलगा मात्र माझ्या येथे राहू शकणार नाही. तुला माहित आहे किं, लग्नाच्या आठ प्रकारापैकीं पहिले चार लग्न प्रकार, ब्रह्म, दैविक, अर्श, प्रजापत्य, अधिकृत समजले जातात व त्या लग्नाच्या पत्नीसच फक्त राणीचा दर्जा दिला जातो व गंधर्व विवाह करणार्या बाईस रखेलीचा दर्जा मिळतो हे तुला माहित असेलच. तरी त्याप्रमाणे तुला माझ्याकडे रहाता येईल. राजाचे असें उद्गार ऐकून शकुंतला रागांने लालबुंद होते व त्याला जवाब देते.

शकुंतला त्यावर उत्तर देते , "अहो महान राजे, दुसर्यांच्या राईएवढ्या सुक्ष्म चुका व दोष शोधून काढून त्यांना न्यायाच्या नावांखाली शासन करण्याची क्षमता बाळगणारे तुम्ही तुमची कलिंगडा सारखी भलिमोठी चूक पहाण्याचे टाळता हे तुम्हाला शोभत नाही. एक गोष्ट लक्षात ठेव किं, माझी माता स्वर्गीय अप्सरा आहे व माझे पिता विश्वामित्र ऋषी ब्रह्मासारखे विश्व निर्माण करण्याची क्षमता असलेले आहेत, तू एक मामुली राजा आहेस

जो जमिनीवर चालतो व तू तुझ्या प्रदेशाचे संरक्षण करता करता थकून जातोस, तुझ्यापेक्षा मी कितीतरी जास्त उच्च आहे हे कोणीही तुझा मंत्री व सर्व आमात्य ओळखून आहेत ह्याची जाणीव ठेव. तू राईच्या दाण्यासारखा आहेस व मी माझ्या माता पित्यांच्या उच्चतेमुळे मेरू पर्वतासारखी थोर आहे. मी मनात आणले तर स्वर्गात इंद्राकडे जाऊ शकते तू मात्र येथे जमिनीवरच रहाणार आहेस. मी स्वर्गातील इंद्र, कुबेर, यम, वरूण अशा दिव्य देवतांशी संपर्क करु शकते जे तुला कधीच शक्य नाही. तुझा अपमान करण्याचा माझा उद्देश कदापीही नाही पण तुला शुद्धीवर आणण्यासाठी हे सगळे मी भर दरबारात सांगत आहे. तुझ्या सारखी लहान माणसे थोडे यश प्राप्त झाले कीं कसे उन्मत्त होतात व कांहींही बडबडतात ते तू आता दाखवून दिले आहेस. जे खरोखर श्रेष्ठ असतात ते तुझ्यासारखे वाह्यात बडबड करीत नाहीत. डुक्कर नेहमी घाणीत चरतो कधीही स्वच्छ जागी चरत नाही तसें तुझे झाले आहे. खरेतर तुझी लायकीच नाही किं, मी तुझ्या बरोबर संसार करावा पण हि व्यवस्था विधात्याने केलेली आहे म्हणून मी तुझ्याकडे तुझ्या पुत्राला घेऊन आली आहे. तू केलेले आरोप व इतर विधाने सत्याचा विपर्यास करणारे आहेत. मी तुझ्या घाणेरड्या वर्तुणूकीबद्‌ल काय बोलणार, माझ्यावर जे संस्कार झाले आहेत त्यामुळे मी तुझ्या सारख्या मामुली माणसाच्या तोंडाला लागू इच्छित नाही. मी तुझी पत्नी आहे म्हणून मी हे स्पष्ट बोलण्या बद्दल तुझी माफी मांगते पण हे सर्व बोलण्यास तू मला मजबूर केले आहेस. तुझ्या पुत्राचा अपमान करू नकोस, तो तुझाच अवतार आहे. तुझ्या पुढील पिढ्या त्याच्यावर अवलंबून आहेत असें जे पितर सांगतात त्याकडे दुर्लक्ष करून तू तुझ्या मुलाचा जो अपमान करीत आहेस त्याची कदाचित तुला यथावकाश शिक्षा होईल. आपल्या वंशजांचा जो उपमर्द करतो त्याला देव माफ करीत नाहीत. मनु सांगतो, पांच प्रकारचे पुत्र असतात. पहिला प्रकार त्या मुलाचा जो त्याला त्याच्या पत्नीपासून होतो. दुसरा प्रकार दत्तक पुत्राचा आहे, तिसरा प्रकार आहे विकत घेतलेल्या पुत्राचा, असे दुसर्या कोणाचे वस्तुतः असतात, चौथा प्रकार आहे त्याच्यावर स्वतःच्या मुलाप्रमाणे तो प्रेम करतो, जेव्हां स्वतापासून मुल होण्याची शक्यता नसते, पांचवा प्रकार आहे त्या मुलाचा जो त्याला त्याच्या पत्नीपासून न होता इतर कोणा बाईपासून झालेला आहे. सर्व पुत्र त्याच्या पित्याच्या वंशाचे संरक्षण करणारे असतात. म्हणूनच त्याला पुत्र असें

म्हणतात. ही सर्व मुलं पित्याला नरकात जाण्यापासून बचाव करतात त्यांच्या कर्तव्य दक्षतेने, तेंच प्रत्येक पुत्राचे कार्य असते. अनेक यज्ञ करून जे मिळत नाही ते एका पुत्रामुळे पित्याला मिळते, हे तुला माहित नाही असे खोटे मला सांगू नकोस. सर्व वेदाच्या आभ्यासापेक्षा खरे बोलणे जास्त श्रेष्ठ समजले जाते. जो विनाकारण खोटे बोलतो त्याने त्या पापातून मुक्त होण्यासाठी शंभर अश्वयज्ञ केले तरी मुक्त होणार नाही. म्हणून तू तुझे आश्वासन विसरण्याचे जे नाटक करीत आहेस त्यामुळे तू बरबाद होशिल. तुझा माझ्या बोलण्यावर भरोसा नसेल तर मी आपल्या मुलाला घेऊन जाणार आहे. एक गोष्ट मात्र समजून घे कीं, तू मेल्यानंतर हा तुझा पुत्र सर्व भुवनावर ज्याच्या मर्यादा चार समुद्र ठरवतात, राज्या करणार आहे असें मी सांगते कारण, अशी आकाशवाणी त्याच्या जन्माच्या प्रसंगी झाली होती".

वैशंपायन पुढे सांगतात, शकुंतला एवढे बोलून आपल्या सर्वदमनला घेऊन तेथून निघून गेली. तिच्या जाण्यानंतर कांहीं वेळानंतर आकाशातून आवाज आला. तो आवाज दुश्मंताला उद्देशून होता. राजा तसांच त्याच्या राज दरबार्यां व पुरोहितांसह बसला असतांना सर्वांना ऐकू आला. त्या आवाजाची धार कठोर होती जणूकाय तो आवाज ज्यांचा होता ती शक्ति राजाला चेतावणी देत आहे.

"अरे दुश्मंता, तू तुझ्या पुत्राचा अपमान करत आहेस. शकुंतलेचा तू अवमान करत आहेस ह्या सर्व गोष्टी तुझ्या नाशास कारणीभूत ठरू शकतात. तुझे पूर्वज तुला ताकीद देत आहेत कीं, तू ताबडतोब तुझी चूक स्वीकारावीस व त्यांना सन्मानपूर्वक त्यांचा हक्क द्यावास. तू त्या बालकाचा पिता आहेस, शकुंतला खरे बोलत आहे. त्यांचा त्याग करून तू मोठ्या दुर्भाग्यास आमंत्रण देत आहेस. ते बालक तुझ्या पुरुवंशाचा एकमेव वारस आहे त्याला स्वीकारून तू धन्य हो. तुझा हा तेजस्वी पुत्र ह्यापुढे भरत ह्या नांवाने ओळखला जाणार आहे". ही आकाशवाणी सर्वांनी ऐकली त्याचा प्रभाव दुश्मंतासह सर्व पुरोहित, मंत्री व आमात्य अशा सगळ्या मंडळींवर झाला. त्यांनी राजाला त्याचा अविचार सोडावा व शकुंतला व सर्वदमनला सन्मानपूर्वक स्वीकारावे असा सल्ला दिला जो राजाने स्वीकारला. राजाने जाहिर केले कीं, तो त्याचा उत्तराधिकारी म्हणून सर्वदमनला स्वीकारतो व ह्यापुढे शकुंतला त्याची पट्टराणी होईल. असें जाहिर केल्यानंतर राजा दुश्मंताने त्याचे शकुंतलेशी

जे वागणे होते त्यामागील कारण, स्पष्ट केले. आकाशवाणीमुळे सर्व मामला स्पष्ट झाला व ते दोघेही खरे आहेत हे स्पष्ट झाले परंतु, जर राजाने असेंच तिच्या बोलण्यावरून त्यांना स्वीकारले असते तर त्याला त्याच्या प्रजेच्या संशयी नजरेला तोंड द्यावे लागले असते.

ते स्पष्टीकरण सर्वांना योग्य वाटले. वैशंपायन पुढे सांगतात, आकाशवाणीच्या ग्वाहीने सर्वच शंका कुशंका नाहीशा झाल्या. राजाला त्याच्या देखण्या मुलाबद्दल अभिमान वाटू लागला. त्याने सर्वदमनला जवळ घेतले व त्याच्या माथ्याचे चुबन घेतले. राजघराण्याच्या सर्व रितीरीवाजानुसार ज्या धार्मिक विधी करावयाच्या असतात जेव्हां राजपुत्राचे आरोहण होते त्या सर्व त्यांने मोठ्या अभिमानाने पूर्ण केल्या. सुगंधी द्रव्ये, अप्रतिम सुंदर फुलं व फळं, उत्तमोत्तम वस्त्र व दागिने त्या विधीत वापरली गेली होती, त्या विधीमुळे आता सर्वदमन भरत झाल्याचे जाहिर केले गेले. मोठा सोहळा त्या प्रित्यर्थ आयोजित केला गेला. स्वताच्या मुलाला स्पर्श केल्याने जे सुख पित्याला मिळते ते त्याला सर्वदमनाच्या स्पर्शाने मिळाले. दुश्मंताने शकुंतलेची माफी मागितली व तो तसा कां वागला, जरी त्याला तिच्याबद्दल कधीच शंका नव्हती, ते सांगितले. एका राजाला त्याच्या प्रजेच्या शंकाकुशंकांची दखल घ्यावयाची असते व त्यांने ज्या शंका त्यावेळी व्यक्त केल्या होत्या त्या प्रत्यक्षतः प्रजेच्या होत्या. तो तिला सांगतो कीं, "राजाला प्रजेच्या मनाची दखल घ्यावयाची असते. शकुंतला ते ऐकून समाधानी झाली व त्या दोघांतील सर्व दुरावा संपुष्टात आला". त्यानंतर दोघे ठरवतात किं, ते पुनः एकदा ब्रह्म पद्धतीने विवाहबद्ध होतील कारण, त्या बद्दलचा सल्ला त्याचे राज पुरोहित त्याला देतात. राजा दुश्मंत आपल्या धर्मपत्नीस सांगतो, "असे करण्याचे कारण लोक समजतील कीं, आपण गंधर्व विवाह केला म्हणजे आपले संबंध केवळ वैषयिक आहेत पण तसें नाही व आपले संबंध अध्यात्मिक आहेत. लोकांचे तोंड राजालासुद्धा नष्ट करू शकते म्हणून, अगदी शक्तिमान राजानेसुद्धा त्याची दखल घ्यावयाची असते. ब्रह्म विवाह केल्याने आपल्या मुलाचा दर्जासुद्धा लोकांच्या दृष्टीत सुधारेल". राजा नंतर तिला सांगतो, "माझ्या प्रिय शकुंतले, तुझे रागात काढलेले उद्‍गार मला खरेतर आवडले कारण त्यांमुळे तुझ्या पावित्र्याची साक्ष त्या शब्दांतून मला क्षणोक्षणी जाणवत होती. म्हणून त्याबद्दल कांहीं विचार करू नकोस". ते ऐकून शकुंतला आनंदीत झाली .

देवांच्या रथाला मागे टाकेल असें उत्कृष्ट रथ राजपुत्र भरत वापरू लागला. त्यांने त्याच्या साम्राज्याचा दौरा त्या वैभवात केला. त्याने पृथ्वीवरील जवळजवळ सर्वच राजांना हरवून आपले मांडलिक केले. भरताच्या वाढत्या सामर्थ्यामुळे त्याला चक्रवर्ती व सर्वभौम अशा पदव्या सर्वांनी दिल्या. त्यांने त्या काळातील रीवाजानुसार शेकडो अश्वयज्ञ व गोयज्ञ केले व सर्वांकडून तारिफ मिळवली. इंद्र व वरूण असें देव करतात ते यज्ञ त्यांनी केले. कण्व ऋषी त्याचे राज पुरोहीत म्हणून काम करू लागले. भरत कण्वमुनींना त्यांच्या पौरोहित्याच्या कामासाठी सोन्याच्या हजारो मुद्रा बिदागी म्हणून देतो. राजा भरत अनेक मोठी कर्तृत्वाची कामे करून ख्यातनाम होतो.

भरताच्या अपत्यांतून अनेक महान सम्राट जन्मले. त्यांची सर्वांची नांवे मी सांगू शकणार नाही. वैशंपायन त्याला, जनमेजयाला सांगतात, तू सुद्धा त्यांपैकी एक आहेस त्याचा तुला अभिमान वाटला पाहिजे. सत्य, प्रामाणिकपणा व पूण्य मार्ग हे त्यांच्या कार्याचे मुख्य आधार आहेत.

अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा चौर्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पंच्याहत्तरावा

(संभवपर्व पुढे चालू)

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, आता मी तुला शास्त्रात नोंदलेली भरताच्या वंशातील राजांची परंपरा जी पवित्र व धर्माशी विश्वसनीय होती व त्यांचे मजेचे व फायद्याचे प्रकार सांगतो. प्रचेता, राजश्री दक्ष, मनु सुर्याचा मुलगा, भरत, कुरु, पुरु आणि अजमिद. मी निष्पाप अशा तुला यादव वंशातील, कुरु वंशातील, व भरत वंशातील राजांची माहिती सांगणार आहे. ह्या सर्व वंशावळी पवित्र समजल्या जातात व त्यांचे स्मरण करणे पुण्यदायक समजले जाते. त्या स्मरणाने जीवनात वैभव, प्रसिद्धी आणि दीर्घायुष्य प्राप्त होते असें समजतात. हे सगळे तेजस्वी लोक महान ऋषींच्या बरोबरीचे आहेत. प्रचेताला दहा मुलगे होते. ते सगळे संन्यस्त प्रवृत्तीचे व पुण्यवान होते. त्यांच्या मुखातून बाहेर येणार्या ज्वाळा विषारी झाडे जाळून टाकू शकत. अशा वनस्पती ज्यांच्या भरमसाट वाढीमुळे माणसाचे पृथ्वीवर रहाणे दुरापास्त झाले होते. त्यांच्या नंतर आणखीन एक जन्मला त्याचे नांव आहे दक्ष. असें सांगतात कीं, त्याच्यापासून सर्व पृथ्वीवरील प्राणी उत्पन्न झाले आहेत. म्हणून त्याला सर्वांचा आजोबा मानले आहे. प्रचेतापासून उत्पन्न झालेला दक्षमुनी विर्णीशी संयोग करतो व त्यातून हजारो असे ऋषी उत्पन्न होतात जे त्याच्या सारखेच व्रतस्थ होते. नारदाने त्या हजारो योग्यांना सांख्य तत्त्वज्ञान शिकवले ज्याच्या मदतीने ते मोक्ष प्राप्त करू शकतील. त्या शिकवणूकीमुळे त्यांच्या पासून नवीन पिढी जन्मू शकली नाही. असें झाल्याने नवीन पिढी होण्यासाठी दक्षाने पन्नास कन्यांना उत्पन्न केले. त्याने त्या सर्व मुलींना पुत्रिका करून त्याचे वारस ठरवले त्यामुळे त्यांची अपत्ये त्यांचे उत्तराधिकारी ठरले. त्यामुळे त्या मुली व त्यांची मुलं (मुलगे व मुली दोघेही) सर्व धार्मिक कार्ये समान अधिकाराने करू शकत. त्या पन्नास मुलींपैकीं दहा मुली दक्षाने धर्माला (यमदेव) दिल्या व तेरा काश्यप ऋषीला दिल्या. सत्तावीस मुली चंद्राला दिल्या. त्या चंद्राला दिलेल्या मुली काळाच्या नियमनाचे काम करू लागल्या. मरिचीचा मुलगा काश्यपने त्याच्या सर्वात जेष्ठ पत्नीपासून आदित्य निर्माण केले. त्यांचा प्रमुख नेमला गेला इंद्र. विवस्वात (सूर्य) त्याचा सहायक ठरला. विवस्वाता (मार्तंड) पासून यम उत्पन्न झाला. विवस्वातने यमानंतर आणखीन एक मुलगा उत्पन्न केला. त्याची बुद्धिमत्ता विशाल

होती त्याचे नांव मनु. तो पुण्यवान व कर्तृत्ववान होता. ह्या मुळात बुद्धिमान व पवित्र अशा मनुपासून आजचा मनुष्य प्राणी उत्पन्न झाला आहे. म्हणून त्याला मानव असें म्हणतात. ह्या मानवांत मनुचे तीनही गुण बुद्धिमत्ता, कर्तृत्व व पावित्र्य आले पण ते निरनिराळ्या प्रमाणात विविध माणसांत आढळतात व त्या नुसार क्षत्रिय, ब्राह्मण व वैश्य असें वर्ण निर्माण झाले. त्यामुळे मानव समाजातील सदस्यांची विभागणी त्या त्या गुणकर्मशः केली गेली व त्यानुसार त्या सदस्याची समाजातील जबाबदारी दिली गेली ज्यामुळे मानव समाजाचे जीवन सुखकर होईल. ब्राह्मण वेदांचे (वेद म्हणजे उपलब्ध ज्ञान) अध्ययन करू लागले.

मनुने दहा आणखीन मुलं उत्पन्न केली, त्यांची नांवं अशी, वेणा, द्रिश्नू, नरिश्यान, नभग, ईक्शाकू, करूश, सर्यति, आठवी होती मुलगी तिचे नांव ईला, नववा मुलगा प्रिशाध्रु आणि दहावा नभगारिष्ट. ह्या सर्वांत बुद्धिमत्ता व कर्तृत्व असल्याने ते सर्वजण क्षत्रिय झाले. त्याशिवाय आणखीन पन्नास मुलं त्याला झाली परंतु, ती सर्व एकमेकाशी झगडा मारामारी करून नष्ट झाली.

महान ज्ञानी पुरुरव ईलाला झाला. असें सांगतात किं, इला त्याची आई व पिता असें दोनही होती, अशा एकजन्य पुरुचे राज्य तेरा द्विपांवर पसरलेले होते. जरी पुरुरव स्वतः मानव होता तरी त्याचे साथीदार मात्र अतिमानव होते. त्यांच्या सहकार्याने तो प्रबळ झाला व ब्राह्मणांना आव्हान देऊ लागला. त्यांच्या रागाची यत्किंचितही पर्वा न करता ब्राह्मणांची संपत्ती त्याने लुटली. ते सनतकुमार पहात होते. प्रथम सनतकुमारांनी त्याला समज देण्याचा प्रयत्न केला परंतु, अतिमानवी साथीदारांच्या सहकार्यामुळे उन्मत्त झालेल्या पुरुरवांने तो सल्ला झिडकारला व ब्राह्मणांना त्रास देण्याचे कार्य चालूच ठेवले. त्यामुळे सनतकुमार ऋषींचा संयम संपला व त्यानी पुरुरवास शाप देऊन नष्ट केले. पुरुरवाने गंधर्वांच्या देशातून तिन प्रकारचे यज्ञ अग्नी आणले. त्यानेच अप्सरा उर्वशीला सुद्धा आणले. तिच्यापासून त्याला सहा मुलगे झाले होते. त्यांची नांवे अशी, अयुस, धीमत, अमवसु, ध्रिधायु, वनयुस, शतायुस आहेत. ह्यांच्यातील अयुसला चार मुलगे झाले. त्यांची नांवे अशी, नहुश, वृद्धशर्मन, राजिंग्य, अनेनास, आणि एक मुलगी, स्वर्भानू. वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, अरे राजा, त्यातील नहुश अप्रतिम

बुद्धिमत्ता असल्यामुळे त्याचे राज्य त्याच्या गुणवत्तेने वाढवतो. नहुश त्याच्या पितरांचा, स्वर्गीय ऋषी व ब्राह्मणांचा आदर करतो. तो गंधर्व, नाग, राक्षस, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा सर्वांचा सन्मान करतो व त्यांचे सहकार्य मिळवतो. तो गुंड, दरोडेखोर, चोर अशा दुर्जनांचा नाश करतो. हे चांगले काम करतांना त्याने कांहीं चुकीच्या गोष्टी केल्या. त्याने ऋषींना त्याच्या पाठीवर स्वताला उचलून नेण्यास सांगितले. त्याच्या वैराग्य, तेज व सामर्थ्यामुळे तो दुसरा इंद्र बनला होता.

नहुशला पांच मुलगे झाले. ते सर्व गोड बोलणारे होते. त्यांची नांवे अशी, यती, ययाति, सन्याति, अयाति आणि ध्रुव आहेत. यतीने वैराग्य धर्म स्वीकारला व त्यात तो ब्रह्मासारखा श्रेष्ठ झाला. ययाति स्वबळावर मोठा सम्राट झाला. तू पूर्व जन्मीचा कच होता. पृथ्वीवर राज्य केले अनेक यज्ञ केले, पितरांची श्राद्धं केली, त्याने देवांचासुद्धा सन्मान केला. त्याने मोठे राज्य स्थापन केले, तो कधीही कोणाकडून हरला नाही. ययातिचे सर्व मुलगे शस्त्रांच्या वापरण्यात तरबेज होते. ते गुणवान व पवित्र होते. ते त्याला त्याच्या दोन बायकांपासून, देवयानि व शर्मिष्टा, झाले होते. देवयानीला यदु व तुर्वसु व शर्मिष्टाला द्रह्यु, अनु व पुरु. त्या सगळ्यानी बराच काळ सुराज्य लोकांना दिले.

ययातिला कुष्ठरोग झाला व त्यामुळे त्याचे शरीर कुरुप झाले, त्याचा देखणेपणा संपुष्टात आला. त्याने त्याच्या पांचही मुलांस बोलावले व त्यांना बोलला, जो तुमच्यापैकी माझे हे कुरुपपण स्वीकारेल आणि त्याचे तारुण्य मला देईल त्याला माझे राज्य मी दान करीन. मला माझे तारुण्य पाहिजे आहे व मी माझ्या बायकांबरोबर सुखोपभोग घेण्यातच उर्वरित काळ व्यतीत करणार आहे, तुमच्या पैकीं कोण तयार आहे? त्याची मुलं त्याला त्याच्या अशा विचित्र योजनेचे कारण विचारतात. तो सांगतो, माझ्या एका महान यज्ञाच्या दरम्यान एका साधूने मला शाप दिला म्हणून माझी अशी अवस्था झाली आहे. कोणीही मुलगा त्याच्या योजनेत सहमत झाला नाहीत. शेवटी त्याचा धाकटा मुलगा, पुरु तयार होतो व ययातिचे कुष्ठ तो स्वीकारतो व आपले तारुण्य त्याला देतो. ययातिचे राज्य त्यांने घेतले व ययाति आपले भोग घेण्यासाठी सुरुवात करतो.

अशारितीने एक हजार वर्षे जातात. गंधर्व राजा चित्ररथाच्या उपवनात तो त्याच्या बायकांबरोबर भोग घेत होता. तेथे विस्वाची नांवाच्या अप्सरेशी त्याची भेट झाली. एवढे

करूनही त्याची वासना कमी किंवा संतुष्ट झाली नाही उलट ती वाढतच होती. ययातिला पुराणातील कथा आठवली. त्यात दिले होते, वासना कधीही पूर्ण होत नाहीत त्यासाठी त्यांचा त्याग करावा लागतो. वासना नष्ट करण्याचा एकमेव मार्ग आहे व तो असा किं, निष्पाप जीवन जगावे व मनाने, शरीराने व बोलण्याने जो कोणतेही पाप करीत नाही त्याच्या वासना संपुष्टात येतात. तो ब्राह्मण होतो. त्या कशाचीही इच्छा नसावी. हे सगळे समजल्यावर ययाति ठरवतो कीं, ह्यापुढे सर्व भोगांचा त्याग करून तपस्या करावी. तो त्यानंतर ध्यान साधना करू लागतो. त्यानंतर तो पुरुकडून त्याचे कुष्ठ परत घेतो व त्याचे तारुण्य त्याला परत करतो. ययाति पुरुला बोलतो, तू माझा खरा वारस आहेस. तुझ्यातून माझा वंश वाढेल. त्यासाठी तो वंश तुझ्या नांवांने ओळखला जाईल. त्यानंतर ययाति आपल्या साधनेत व्यग्र झाला व यथावकाश निसर्गाच्या नियमानुसार मरतो व स्वर्गात त्याच्या दोनही बायकांसह जातो.

अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा पंचाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व शाहत्तरावा भाग

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय राजा विचारतो, अहो ऋषीवर्य मला सांगा, प्रजापतीच्या दहाव्या पिढीतील माझा पूर्वज ययाति ह्यांने इंद्राची मुलगी, जी लग्नासाठी कोणालाही मिळविणे केवळ अशक्य होते, ती स्वतासाठी पत्नी म्हणून कशी मिळवली. त्याबाबतची सगळी माहिती सविस्तरपणे मला सांगा. त्याशिवाय मोठ्या साम्राज्याचे संस्थापक जे होऊन गेले त्यांची माहिती क्रमांने सांगा. ययाति स्वतः इंद्रासारखा रुबाबदार होता. अरे जनमेजया मी तुला आता सांगतो, इंद्र व त्याची बायको वृशपर्वना दोघानीही ययातिला कसे पसंत केले व आपली मुलगी देवयानि त्याला ब्रह्म विवाहेने दिली, तो एक खास लग्नसोहळा होता.

त्या काळात स्वर्गीय देव आणि अदृश्य निसर्गातील असुर ह्यांच्यात वेळोवेळी तिनही जगांवर (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ) ताबा मिळविण्यासाठी लढाया होत होत्या. त्यासाठी शक्ति संपादन करण्यासाठी देवांनी यज्ञ करण्यासाठी अंगिरस (एक वृहस्पति) ऋषीचा मुलगा पुरोहित म्हणून नेमला. असुरांनी त्याच उद्देशाने उशनसास पुरोहित म्हणून नेमले. त्या दोनही ब्राह्मणांत त्याच्या दैविक सामर्थ्याबद्दल चढाओढ होत असें. जेव्हां असुरांची हत्या देव करीत तेव्हां त्यांना असुरांचा गुरू शुक्र त्याच्या सामर्थ्याने पुनः जीवंत करीत असें. त्यामुळे त्या दोघांतील लढाया सतत चालू रहात. त्या उलट जर देव लढाईत मारले गेले तर त्यांचा पुरोहित वृहस्पति, त्या मेलेल्या देवांना पुनः जीवंत करीत नसें. कारण, त्याला संजीवनी विद्या माहीत नव्हती. त्यामुळे देव फार काळजीत असतं. देव उशनसाला घाबरत होते. म्हणून ते कचाकडे गेले. कच, वृहस्पतिचा ज्येष्ठ मुलगा, आणि त्याला विनंती केली कीं, आम्ही देव तुला तुझी किंमत देण्यास तयार आहोत ज्या सेवेमुळे आमचा प्रश्न सुटेल. पुढे ते त्याला म्हणाले, जे ज्ञान शुक्राचार्यास आहे (म्हणजे संजीवनी विद्या) ते तुला शक्य होईल तितक्या लवकर संपादन झाले पाहिजे. वृशपर्वनाच्या दरबारात तुला ते ब्राह्मण मिळतील जे दानवांना संरक्षण देतात. तू त्याच्या पेक्षा कनिष्ठ आहेस म्हणून त्याची मर्जी संपादन करून हे काम तू करू शकशिल. तू त्याची मुलगी, देवयानीलासुद्धा चांगली वर्तुणूक, मधूर वाणी आणि सहानुभूतीने खूश करू शकशिल. देवयानी तिच्या बापाची लाडकी आहे तरी तिच्या मदतीने तू ते साध्य करू शकशिल.

फक्त तूच हे सर्व करू शकशिल. ते ऐकून वृहस्पतीचा मुलगा तयार झाला. त्यानंतर कच असुरांच्या मुख्य ठिकाणी गेला. तेथे शुक्राचार्यास भेटला. त्याच्या पुढे जाऊन तो बोलला मला तुमचा शिष्य करावे, मी अंगिरस ऋषींचा पणतु व वृहस्पतिंचा मुलगा आहे. माझे नांव कच आहे. आपण मला शिष्यत्व दिल्यास मी एक हजार वर्षे ब्रह्मचर्य आचरेन. कृपया आज्ञा द्या. ते त्याचे बोलणे ऐकून शुक्राचार्य त्याला बोलतात, मी तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवत आहे व तुला विश्वासांने वागवीन कारण तसें केल्याने तुझ्या वडलांचा मान ठेवल्यासारखे होईल.

वैशंपायन पुढे सांगतात, कच उशनसाच्या आज्ञेत राहू लागला. तो शुक्राचार्यांच्या संपर्कातसुद्धा होता. अशारितीने कच त्याची शपथ (एक हजार वर्षे ब्रह्मचर्य पाळणे) घेतो ज्याबद्दल तो शुक्राचार्यास बोलला होता. त्यानंतर त्याचा अभ्यास सुरु झाला. आपला गुरु व त्याची लाडकी मुलगी देवयानी ह्याच्या बरोबर राहू लागला. तो वयाने खूप लहान होता व त्याच्या वयाला शोभेल अशा प्रकारे त्यांने गाऊन, नाचून, वाद्ये वाजवून देवयानीचे मन संपादन करण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळात तो देवयानीच्या मनात जाऊन बसतो. तीसुद्धा तरूण असल्यामुळे त्याच्या डावात चांगलीच अडकत जाते. तिला सर्वप्रकारची मदत करणे, फुलं, फळं तिला वनातून आणून व इतर प्रकारची सेवा करून तो देवयानीचा आवडता होतो. असें करत असतांना त्याने ब्रह्मचर्याचे दिलेले वचन कसोशिने पाळले होते. अशी पांचशे वर्षे गेली. त्या काळात दानवांना (असुरांना) कचचा उद्देश समजतो. दानवांना ब्रह्मणाची कत्तल करण्याबद्दल कोठलीही पर्वा नसल्यामुळे ते डाव साधून जंगलात कच त्याच्या गुरुची जनावरं सांभाळत असतांना पकडतात व मारतात. दानवांना त्यांच्या पुनर्जीवित होण्याचे गुपित राखण्यासाठी व वृहस्पतिबद्दल असणार्या द्वेषामुळे ते कचाचा वध करतात. दानवांना भिती वाटते किं, जर शुक्राचार्यास त्याचे शव मिळाले तर ते त्याला पुनः जीवंत करतील म्हणून ते त्याच्या देहाचे तुकडे करतात व ते जंगलातील कोल्हे व लांडग्याना खाऊ घालतात. परंतु, तो खून उघडकीस येतो जेव्हां संध्याकाळी जनावरं गोठ्यात परत येतात पण कच येत नाही. देवयानीला कच जनावरांबरोबर आला नाही ते समजते. ते ती तिच्या पित्यास सांगते, "बाबा, पहा संध्याकाळचा अग्नी चेतवला गेला आहे, सर्व पशु परत आली आहेत परंतु, कच कोठे

दिसत नाही ह्याचा अर्थ कच कोठेतरी वाट चुकला आहे किंवा मेला आहे, त्याचा शोध घेतला पाहिजे कारण तो माझा प्रिय मित्र आहे व त्याच्याशिवाय मला जगणे शक्य नाही".

तिचे रडणे ऐकून शुक्राचार्य अस्वस्थ होतात व बोलतात, "माझ्या लाडक्या देवयानी, मी माझ्या शास्त्राच्या मदतीने कचला पुनः आणू शकतो". असें बोलून ते कचला हांक मारतात व त्यांच्या संजीवनी विद्येच्या प्रभावामुळे कच सदेह त्यांच्यापुढे उभा रहातो. त्याला खाणार्या कोल्ह्यांचे व लांडग्याची शरीरे फाडून त्यातून तो पुन्हा जीवंत झालेला असतो. त्याचे गुरु त्याला हे असें काय झाले ते विचारतो. कच सांगतो, "मी यज्ञासाठी संमिधा व इतर सामान घेऊन येत असतांना थकल्याने एका वडाच्या झाडाखाली विश्रांती घेण्यासाठी थांबलो असतांना कांहीं असुर तेथे आले व मला विचारू लागले, "तू कोण आहेस? मी त्यांना सांगितले किं, मी वृहस्पतिचा मुलगा आहे". मी असें बोलतांच त्यांनी माझ्यावर हल्ला केला व मारून टाकले. माझ्या शरीराचे तुकडे केले व ते कोल्ह्यांना व लांडग्याना खाऊ घातले. असें करून ते असुर मोठ्या आनंदात त्यांच्या घरी गेले. अहो श्रेष्ठ भार्गवाच्या बोलावण्यामुळे मी पुनः सदेह आलो आहे".

दुसर्या एका प्रसंगी देवयानीने फुलें आणण्यास कचला जंगलात धाडले असतांना तो वनात फुलं शोधत फिरत असतांना त्याला असुर गाठतात, त्याला मारून त्याच्या देहाचे कुटून चूर्ण करतात त्यानंतर तो लगदा ते समुद्राच्या पाण्यात मिसळून टाकतात. कच बराच काळ परत आला नाही म्हणून देवयानी बेचैन होते व त्याचा शोध घेण्यास निघते. तिचा बाप तिला काय झाले असें विचारतो तेव्हां ती त्याला सांगते तेव्हां पुनः एकदा शुक्राचार्य त्यांच्या विद्येने कचास पुन्हा सदेह उत्पन्न करतात. गुरूस जे झाले ते कच सांगतो. अशारितीने दोनदा मारूनही कच पुन्हा जीवंत झाल्याने वैतागलेले असुर त्याला मारण्याचा व त्याचा नायनाट करण्याचा डाव आखतात. ह्यावेळी ते कचास मारून त्याचा देह जाळून टाकतात त्याची राख ते शुक्राचार्याच्या सुरेत मिसळून देतात. देवयानी पुन्हा कच हरवल्याचे बापाला सांगते. कच शिवाय मला जगणे अवघड आहे तरी पुन्हा त्याला तुम्ही परत आणावे. शुक्राचार्य त्याच्या दिव्य दृष्टीने ओळखतात व तिला सांगतात, "माझ्या लाडके, आता तुझा कच अंतिम मृत्यूस गेला आहे असें वाटते. मी त्याला जीवंत करतो व तो पुन्हा मारला जातो. तू अशारितीने शोक करू नकोस तुला ते शोभत नाही. कच मर्त्य

होता म्हणून त्याच्या मरण्यावरून शोक करणे योग्य नाही". ते ऐकून देवयानी तिच्या पित्यास विचारते, "मी कां शोक करू नये माझे बाबा? तो तरूण विनाकारण मरतो ज्याचे आजोबा वृद्ध अंगिरस आहेत, जो महान तपस्वी वृहस्पतिंचा मुलगा होता, जो ऋषींचा नातु व मुलगा होता, जो स्वतः ब्रह्मचारी होता, जो सदैव कार्यक्षम व आदरणीय होता असा जर मेला तर दुःखी कां नाही व्हावयाचे ते सांगा. मी उपवास करीन व त्याच्याकडे जाईन. बाबा तो मला अतिप्रिय होता".

वैशंपायन पुढे सांगतात, तो महान ऋषी कव्य (उशनस), आपल्या कन्येच्या शोकामुळे संतापलेला देवयानीला सांगतो, "असुरांपासून मला धोका आहे कारण त्यांनी माझा आवडता शिष्य मारला आहे. आता तो माझ्यात आहे कारण त्याची राख माझ्या पोटात गेली आहे. हे रुद्राचे भक्त (दानव) माझ्या ब्राह्मणत्वाचा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी तिनदा ब्राह्मणाचा (कचाचा) वध केला आहे. प्रत्येक वेळी मी त्याला माझ्या विद्येने पुनः पुन्हा जीवंत केले". हे ऐकत असलेला कच शुक्राच्या पोटातून उत्तर देतो. "गुरुवर्य मी आता आपल्याच पोटात आहे. माझ्यावर आपल्या पुत्रवत माया करावी. मी आपली पुजा करत आहे. वैशंपायन पुढे बोलतात, ते ऐकून शुक्राचार्य त्याला विचारतात, हे कसे झाले, त्यावर कच सांगतो कीं, असुरांनी त्याला मारून जाळून त्याची राख त्यांच्या सुरेत मिसळून दिली, त्यामुळे तो त्यांच्या पोटात आला आहे. ते ऐकून शुक्राचार्य बोलतात संतापाने, मी आताच्या आता असुरांना सोडून देवांना मिळणार आहे. कच त्यावर बोलतो, त्याचे तपोसामर्थ्य किंचितही कमी झालेले नाही. मी आपल्या देहात त्यामुळे राहू शकतो. असुरांच्या अशा कृत्यामुळे ब्राह्मणांची हि संजीवनी विद्या नष्ट होणार नाही.

हे कचाचे बोलणे ऐकून शुक्र देवयानीला विचारतो, "माझ्या बाळा, आता मी तुझ्यासाठी काय करावे असें तुला वाटते ते सांग. कारण, तुला जर तुझा कच हवा असेल तर मला मरावे लागेल, आता सांग तुला काय पाहिजे"? देवयानी सांगते, "दोनही गोष्टी पापमय आहेत. मी काय करावे समजत नाही. त्यावर शुक्र सांगतात, "मी असे करतो, प्रथम कचला ही ब्राह्मणाची संजीवनी विद्या शिकवतो व नंतर माझ्या पोटातून कच बाहेर येईल व

नंतर तो माझ्या फाटलेल्या शरीराला दुरुस्त करून मला जीवंत करील, असें करणें शक्य आहे".

त्यानंतर शुक्र कचाशी बोलतो, "माझ्या शिष्या, मी माझी विद्या तुला शिकवतो म्हणजे तू यशस्वी रहाशील. तू मी सांगतो ते शिकून घे. तू इंद्र आहेस म्हणूनच तू माझ्या शरीरातून बाहेर येऊ शकशील. ब्राह्मणाचा खून होणे चांगले नाही. तू जीवंत झालास किं मग तू मला जीवंत करशील". कच अशारितीने शुक्राचार्याच्या देहातून बाहेर आला व त्याने त्या शिकलेल्या विद्येचा उपयोग प्रथमच करून तो आपल्या गुरूला जीवंत करतो. कच भावूक होऊन गुरुला सांगतो, "आपण मला ज्ञान अमृत देऊन धन्य केले आहे म्हणून मी तुम्हाला माझे पिता व माता असें दोनही समजतो. गुरु जो ज्ञान देतो त्याच्या विरुद्ध कांहीं करणे हे महापाप असते. असा माणूस नरकात जातो. उपकारांना विसरणे हे महापाप असते असें हा तुमचा शिष्य कच ओळखतो".

वैशंपायन पुढे सांगतात, पुन्हा शरीर प्राप्त झाल्यामुळे शुक्राचार्य आपल्या हातून असा प्रमाद कां झाला ह्याचा विचार करू लागला. आपली दारू पिण्याची इच्छा असुरांनी वापरली ह्याचा त्याला फार राग आला होता. असुरांनी त्याच्या विश्वासाचा घात केलेला होता त्याचा राग शुक्राचार्याला होता. सुरा पिण्यामुळे पिणारा आपली सावधानता हरवून बसतो, कचाला पुढे बसलेला पाहून शुक्राचार्य स्वतःला दोष देतो किं, बेसावधतेच्या अवस्थेत मी माझ्या प्रिय शिष्याला प्यालो ह्या गोष्टीचा त्याला विस्मय वाटतो. ब्राह्मणांनी सुरा पिणे अयोग्य आहे असा विचार त्याच्या मनांत आला. उशनस उठून मोठ्याने ओरडून आदेश देतो, "भ्रष्ट ब्राह्मण तो, जो सुरा पिण्याचा मोह टाळू शकणार नाही. त्याची ब्रह्मविद्या नष्ट होईल. अशारितीने दारु पिणे ब्रह्म हत्त्या करण्या इतके वाईट पाप समजले जाईल. त्याचा तिनही लोकांत तिरस्कार होईल". पुढे शुक्राचार्य ऐलान करतो, "सर्व प्रामाणिक लोक, ब्राह्मण, शुद्ध जीवनाची श्रद्धा असलेले, देव, संन्याशी, आणि तिनही जगाच्या सर्व जबाबदार मंडळींनो ऐका, दारू पिणे निशिद्ध आहे. ज्यामुळे माणूस त्याची सत्सद्विवेक बुद्धी हरवतो". असें आवाहन केल्यानंतर ते दानवांना बोलावतो व सांगतो, "ऐका मूर्ख दानव, असुर व दैत्यांनो आता कचाला ती विद्या उपलब्ध झाली आहे, तो ह्यापुढे माझ्या बरोबर रहाणार आहे, त्याला संजीवनी विद्या अवगत आहे त्यामुळे तो आता

प्रत्यक्ष ब्रह्मदेवासारखा समर्थ झाला आहे. हे सगळे तुमच्या अविवेकामुळे घडले आहे. म्हणून त्याच्या होणार्या परिणामांची जबाबदारी तुमच्यावर असेल".

असें सांगितल्यावर वैशंपायन ऋषी पुढे बोलतात, "भार्गव असें बोलल्यानंतर शांत होतो. सर्व दानव, असुर व दैत्य ते ऐकून आश्चर्यचकित होतात पण कांहीं न बोलता आपापल्या घरी निघून जातात. कचसुद्धा आपल्या गुरूबरोबर एक हजार वर्षे राहून मग भार्गवाची अनुमति घेऊन आपल्या स्वर्गीय जागी निघून जातो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा शाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व सत्त्याहत्तरावा भाग

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी जनमेजय व तेथे जमलेल्या श्रोत्यांस सांगतात, कच त्याचा शपथेचा काळ संपल्यावर त्याच्या गुरूची अनुमति घेऊन स्वर्गाकडे निघणार असतो, त्यावेळी त्याची मैत्रीण देवयानी त्याला सांगते, "अहो, अंगीरस ऋषीच्या पुत्रा, आपल्या उदात्त वर्तणूकीने व त्यागमय आणि संन्यस्त वृत्तीने तू चमकत आहेस, ज्याप्रमाणे माझे बाबा तुझ्या पित्याचा आदर करतात त्याचप्रमाणे मी सुद्धा तुझ्या पित्याचा आदर करते. आपण हे सर्व जाणता म्हणून आता मी जे सांगते ते कृपया चांगले ऐका, तुझ्या सन्यस्त जीवनाच्या काळात जेव्हां तू ब्रह्मचर्य पाळत होतास, तेव्हां मीसुद्धा तुझ्याशी मर्यादेनेच वागले, आता ते व्रत संपले आहे तेव्हां तू माझे प्रेम स्वीकारावेस आणि माझा हात लग्नासाठी माझ्या पित्याकडे मागावास अशी माझी इच्छा आहे". ते ऐकून कच तिला म्हणतो, "ह्या सर्व काळात तू माझ्यासाठी एक आदरणीय, पुज्य होतीस जसें तुझे बाबा होते. मी जाणतो कीं, तू कल्पनातीत अशी आदरणीय व स्तुत्य आहेस. तू तुझे पिता भार्गव ह्याच्यासाठी किती प्रिय आहेस ते मी जाणतो. माझ्या गुरूची मुलगी म्हणून तू मला सदैव पुज्य आहेस. म्हणून सन्माननीय देवयानी, तुझ्या मनात माझ्याबद्दल असें विचार येणे मला अप्रस्तुत वाटते". हे कचाचे बोलणे ऐकून देवयानी त्याला सांगते, "तू माझ्या बाबांच्या गुरूचा मुलगा आहेस म्हणून तूसुद्धा माझ्यासाठी तितकांच आदरणीय व पुज्य आहेस. तुला असुरांनी अनेक वेळा मारले त्या प्रत्येक वेळी मी तुझ्यावरील प्रेमामुळे माझ्या बाबांना तुला पुनः पुन्हा जीवंत करायला लावून माझे तुझ्यावरील प्रेम सिद्ध केले ते तू विसरू नकोस. कृपया माझे ते प्रेम व तुझ्यावरील तन्मयता तू असा विसरू नकोस. ते समजून तू माझा अशाप्रकारे हृदयशुन्यपणे त्याग करू नकोस. माझा काय दोष किं, तू अशारितीने मला विसरावेस? मी पूर्णपणे तुझीच आहे व तशीच राहीन हे लक्षात ठेव". त्यावर कच बोलतो, "अहो, पवित्रतेच्या साक्षात रुपा, देवयानी, हे असें कृपया तू बोलू नये असें मला वाटते. कारण ते पाप ठरेल. तुझे माझ्यावरील प्रेम मी समजतो पण तू माझ्यासाठी माझ्या गुरूपेक्षाही जास्त महान आहेस कारण तू मला अनेक वेळा पुनः पुन्हा जन्माला घातले आहेस. तू गुणी, सत्त्वशिल, सुंदर, चंद्रमुखी, सुहास्यवदनी अशी अतिप्रिय आहेस पण तू

आणि मी असे दोघेही तुझ्या पित्याच्या शरीराचेच भाग आहोत हे आपल्याला विसरून चालेल कां? त्या नात्याने तू माझी आई ठरतेस व दुसर्या नात्याने तू माझी बहीण आहेस, अशा परिस्थितीत हे तुझे विचार पापच ठरतात, नाही कां? आता मी माझ्या स्वर्गातील घरी जात आहे. आपण जे क्षण एकत्र घालवले त्याच्या आठवणी आपल्याला एकमेकाजवळ ठेवण्यास पुरेशा आहेत असें मला वाटते. म्हणून तू मला तुझ्या शुभेच्छा द्याव्यास अशी मी तुला विनंती करतो. तुझ्या शुभेच्छा माझा स्वर्गस्थ प्रवास सुखकर करील. माझ्या गुरूची तू सेवा करावीस व त्यातच माझी आठवण आहे असें तू समजावे अशी माझी प्रार्थना आहे".

कचाचे ते उद्‌गार ऐकून थोड्या रागांनेच देवयानी त्याला सुनवते किं, "तू कांहींही समज पण असे होणार नाही, तू माझा अशा निरर्थक सबबी सांगून अव्हेर करू शकणार नाहीस. कारण, पत्नीच्या प्रेमात आई व बहीण ह्यांच्या प्रेमापेक्षा जास्त माया असते. त्याचा तू एक दिवस स्वीकार करशीलच हे मला माहीत आहे". एवढे बोलून ती शाप देते कीं, कच संजीवनी विद्या स्वतः वापरू शकणार नाही.

हे देवयानीचे हृदयाला भिडणारे बोलणे ऐकून कच तिला विनवणी करतो, "मी तुझा स्वीकार न करण्याचे कारण तुझ्यात कांहीं दोष आहे असा जर तुझा समज झाला असेल तर तो तू सोडून दे कारण ते कारण नाही. मी तुला नाही म्हणण्याचे कारण कृपया समजून घे. पुन्हा सांगतो, तू माझ्या गुरूची मुलगी आहेस म्हणजे तू माझी गुरूभगिनी ठरतेस व असें ब्रह्म विवाह संम्मत नाहीत. त्यांच्या आज्ञेशिवाय आपण परस्पर असे पति-पत्नीचे नाते जमवले तर ते पाप होईल हे समजून घे. कदाचित ते भार्गव अशा संबंधामुळे नाराज झाले व त्यांनी शाप दिला तर आपले काय होईल त्याचा तू विचार केला आहेस कां? तुला माहीत आहे एका ऋषीला कसे जगावयाचे असते. मला तुझे शाप घ्यावयाचे नाहीत, पण तू मात्र मला शाप देऊन मोकळी झाली आहेस, आता मी काय करावे"? पुढे कच बोलतो,

"अहो देवयानीजी, आपण आपल्या स्त्रीसुलभ भावनांत गुंतून हे कृत्य केले आहे. त्यासाठी जर तुझी इच्छा प्रामाणिक असेल तर मला दुसरा जन्म ऋषीपुत्र म्हणून न घेता एकाद्या क्षत्रियाच्या पोटी घ्यावा लागेल कारण त्यांच्यात असें विवाह मंजूर आहेत. तुझ्या

शापामुळे मी संजीवनी विद्या स्वतः वापरू शकणार नाही पण ज्याला मी ती शिकवीन तो तिचा उपयोग करू शकेल हे चांगले झाले. त्याशिवाय आता तुझे पिताश्री असुरांसाठी त्या विद्य्येचा वापर करणार नाहीत हे चांगले घडले आहे".

एवढे सांगून कच त्वरित स्वर्गाकडे निघतो.

वैशंपायन त्यानंतर सागतात, कच स्वर्गाला पोहोचल्यावर इंद्राला भेटतो. त्याचे सहर्ष स्वागत होते व त्याची पुजा होते. त्यानंतर इंद्र त्याच्या कामाची भरपूर स्तुती करतो. तुझ्या मेहनतीमुळे देवांचा अतोनात फायदा होणार आहे. तुझ्या कामाची जेवढी स्तुती करावी तेवढी कमी होईल असे महान कार्य तू केले आहेस. तू ह्यापुढे देवांच्या सर्व यज्ञातील हिस्सेदार होशिल.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा सत्त्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी सांगतात, स्वर्गाचे रहिवाशी कचच्या येण्याने खूष झालेले असतात. त्याने यशस्वीरित्या ती अद्भूत विद्या संपादन केल्यामुळे देवांची ताकद असुरांपेक्षा जास्त झाल्याचा आनंद त्यात होता. देव एका सभेत ठरवतात कीं, आता असुरांना अद्दल घडवण्याची वेळ आली आहे. त्याना मारल्याने ते पुनः जीवंत होणार नाहीत. इंद्रा, तू तुझ्या शत्रूंचा आता नाश करण्यास निघावे असे त्या सभेत ठरते. मेघावत (इंद्र) त्याच्या स्वर्गीय सैन्यानीशी युद्धास निघतात. त्यांच्या प्रवासात तो बर्याच सुंदर ललना एका तलावाजवळ स्नान करण्याच्या तयारीत असलेल्या तो पहातो. गंधर्व राजाच्या चित्ररथ उपवनात त्या खेळत असतात. इंद्राला त्यांची चेष्टा करण्याची हुक्की येते व तो वार्याचे रूप घेऊन त्यांचे तेथे तलावाच्या किनार्यावर ठेवलेली वस्त्रं उडवून देतो. उडलेले कपडे एकमेकांत गुंतून जातात. त्यामुळे असें होते कीं, त्या कपड्याच्या सारखेपणामुळे असेल कदाचित, त्या ललना एकमेकांचे वस्त्र उचलतात. त्यात देवयानीचे वस्त्र शर्मिष्ठा, वृशपर्वनाची (वृशपर्वन असुरांचा राजा) मुलगी नेसते. त्यामुळे त्या दोघींत वाद होतो. त्या वादात देवयानी कठोर शब्दात शर्मिष्ठास बोलते, "अग, असुरांच्या राजाच्या मुली, तू माझे कपडे घातले आहेत. त्यामुळे तू माझी शिष्या ठरतेस! तुझे कधीही बरे होणार नाही". ते ऐकून शर्मिष्ठा पटकन उत्तर देते, तुझे बाबा आमच्या दरबारात नेहमी खाली मान ठेवून बसतात हे मला माहित आहे. तुझ्या बापाची तुलना माझ्या बापाशी कधीच होणार नाही. तुझे बाबा नेहमी दुसर्यांचे भाट म्हणून काम करतात हे सर्वजण जाणतात. ते भिक्षेवर जगतात. मी अशाची कन्या आहे जे नेहमी दान करतात, घेत नाहीत हे लक्षात असू दे. मी तुला माझ्या बाबांच्या सामर्थ्याने त्रास देऊ शकते पण तू असें करू शकत नाहीस. अग, भिकार्याच्या मुली, तुझ्या तोंडी लागण्यात अर्थ नाही, तू माझ्या योग्यतेची नाहीस. तुझ्यासारख्या भांडण उकरण्यात पटाईत असतात तसे माझे नाही. अशारितीने त्या दोघींची बाचाबाची जोरात होत होती. ते अपमानकारक बोलणे ऐकून देवयानी तिचे कपडे शर्मिष्ठाकडून खेचून काढू लागली. त्यावर शर्मिष्ठाने देवयानीला जवळच्या खड्यात

ढकलून दिले. हलकट शर्मिष्ठा समजली कीं, देवयानी मेली, व आपल्या घरी रागाच्या भरात निघून गेली.

शर्मिष्ठा निघून गेल्यानंतर कांहीं वेळाने नहुश राजाचा मुलगा ययाति त्या जागी येतो. तो मृगया करण्यासाठी निघालेला असतो. त्याच्या रथाचे दोन घोडे व एक जादाचा घोडा असें तीन घोडे थकलेले होते. ययाति स्वतः तहानलेला होता. त्याने त्या पाणी भरलेल्या खड्यात पाहिले. तो त्याला त्यात एक सुंदर युवती संतापलेल्या अवस्थेत त्या पाण्यात हातपाय मारत होती. ते पाहून ययाति त्या सुंदर मुलीला प्रेमळ शब्दात विचारतो, "आपण कोण अहात? तुझ्या अगावरील दागिन्यावरून मी समजतो कीं, तू कोणी स्वर्गीय मुलगी आहेस. तू दुःखातिरेकांने रडत आहेस हे मला समजते, तू कशी ह्या पाणी भरलेल्या खड्यात पडलीस! ह्या चिखलाने भरलेल्या डबक्यात तू काय करतेस? तू कोणाची कन्या आहेस ते सांग". ते ऐकून चिडलेली देवयानी ययातिला सांगते, "मी असुरांच्या पुरोहिताची, शुक्राची मुलगी आहे. जे त्यांच्या संजीवनी विद्येने मेलेल्या असुरांना पुनः जीवंत करतात. माझ्या बाबांना माहित नाही किं, मी अशी येथे खड्यात पडलेली आहे. आपण उच्च कुलिन वाटता, मला बाहेर काढू शकाल कां? मला वाटते आपण गुणवान व शक्तिमान अहात तरी तुम्ही मला ह्या खड्यातून बाहेर काढावे. असें बोलून देवयानी तिचा उजवा हात वर करते असें किं, ययाति तो पकडून तिला बाहेर काढेल. ययाति समजतो किं, हि एक ब्राह्मण कन्या आहे. तो तिला तिचा उजवा हात धरून त्या खड्यातून बाहेर काढतो. तिचे भरलेले सुंदर शरीर ययातिच्या मनात भरते, ययाति तिला तिच्या गृही नेण्याबद्दल विचारतो तेव्हां ती त्याला सांगते, माझे पिता मला नेण्यास येतील तरी तुम्ही त्या बद्दल निश्चिंत रहावे. तेवढे बोलल्यानंतर ययाति तिला आपला परिचय देतो. त्यानंतर तो आपल्या राजधानीस परततो. राजा ययाति गेल्यानंतर देवयानी तिच्या दासीस जिचे नांव होते, घुर्निका, आज्ञा करते कीं, ती ताबडतोब शुक्राचार्याकडे जाईल व जे घडले ते सविस्तरपणे त्यांना सांगेल आणि त्यावर ती शुक्रासाठी निरोप देते किं, देवयानी ह्यापुढे कधीही असुरांच्या राजधानीकडे, वृशपर्वनच्या नगरीला जाणार नाही. घुर्निका दिलेल्या आज्ञे प्रमाणे घरी जाते व शुक्राचार्यास जे घडले ते सविस्तर सांगते. ते ऐकून शुक्राचार्य रागाने क्रुद्ध होतो व ताबडतोब देवयानीला आणण्यासाठी घुर्निकेसह वनात जातो. घुर्निका

कव्यास सांगते किं, देवयानी इतकी चिडली आहे शर्मिष्ठाच्या अपमानकारक बोलण्यामुळे किं, ती कधीही वृशपर्वाच्या नगरीत जाणार नाही. नेमके काय घडले ते समजण्यासाठी कव्य देवयानीला पुनः काय घडले त्याचा वृतांत विचारतो. त्याला समजते कीं, घुर्निकेने खरोखर जे घडले तेंच सांगितले आहे. ते समजल्यावर कव्यसुद्धा अस्वस्थ होतो. तेथे देवयानी आपल्या पित्यास विचारते, सांगा तात, काय तुम्ही भिकारी अहात? काय तुम्ही असुरांच्या दरबारात मान खाली घालून बसता? काय तुम्ही वृशपर्वाचे मिंधे अहात? काय तुम्ही असुरांचे भाट अहात? शुक्राचार्य तिला बोलतात, माणसाच्या जीवनात असें प्रसंग येतात त्याचे कारण त्या इसमातील दोष असतात, तुझ्यातील दोष वेळीच तुला दूर केले पाहिजेत. देवयानी फणकारून उत्तर देते, "जे दोष असतील ते असोत पण प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरं द्या. शर्मिष्ठाने माझे कपडे चोरले म्हणून मी तिला दोष दिला तेव्हां ती असे तुमच्याबद्दल बोलली त्याचे स्पष्टीकरण करा बाबा". शुक्राचार्य तिचे सांत्वन करतांना सांगतात, "बाळ देवयानी, तुझा पिता पैसे घेऊन कोणाचीही स्तुती करीत नाही, उलट देव, इंद्र, माझी तारीफ करीत असतात. तुझा पिता कोणाकडूनही दान, भिक्षा घेत नाही, उलट असुरच माझी विनंती, याचना करतात. तुझ्या पित्याला कोणाचीही गरज नाही उलट असुरांना माझी, तुझ्या पित्याची वेळोवेळी गरज पडते. तुझ्या पित्याची ताकद ब्रह्माची विधात्याची ताकद आहे अशाला कशासाठी कोणाची गरज पडेल? तुला कदाचित माहित नसेल म्हणून सांगतो, पृथ्वीवर पाऊस माझ्यामुळे पडतो, माझ्या आज्ञेने हे सर्व प्राणी विश्व जगत आहे, आणखीन काय सांगू तुला माझ्या बाळा". "वृशपर्वन हे सगळे जाणून आहे पण त्या शर्मिष्ठाने तू केलेल्या चोरीच्या आरोपामुळे हे सगळे खोटे बोलून तुला दुखवले, कारण तू तिला प्रथम चोर म्हणून दुखवले आहेस. जी कपड्याची अदलाबदल झाली ती अनवधानामुळे झाली तू तिला चोर म्हणण्याची प्रथम चुक केलीस त्यामुळे तुझ्यावर असा मनस्ताप होण्याचा प्रसंग आला. तू तिच्यावर, जी तुझी मैत्रीणसुद्धा आहे, जर चोरीचा आरोप केला नसतास तर ती तुला दुखवण्याच्या उद्देशाने असें बोलली नसती. भार्गवाने आपल्या प्रिय मुलीची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. अशारितीने मधूर शब्दाने आंजारून गोंजारून तिचा पिता देवयानीला शांत करण्याचा प्रयास करतो. अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा अठ्ठ्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकोणऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

शुक्र पुढे देवयानीला सांगतात, "एक गोष्ट लक्षात ठेव दुसर्याला दुखवले कीं प्रतिक्रीया म्हणून दुसरासुद्धा दुखवण्याचा प्रयत्न करतो. दुसर्याला खोट्या गोष्टीने दुखवणे स्वताच्या नाशाची सुरुवात करण्यासारखे असते. आणखीन एक सांगतो ती समजून घे, जो दुसर्याने केलेल्या खोट्या आरोपांने चंचल होत नाही तो जेता होतो. शहाणे सांगतात जो रथाच्या घोड्याची लगाम घट्ट धरतो तो यशस्वी होतो. क्रोधावर नियंत्रण ठेवणे यशस्वी होण्यासाठी आवश्यक असते. क्रोधामुळे विवेक हरतो व तो चुका करतो. आपण चूक करू नये म्हणजे असे मनस्तापाचे प्रसंग येत नाहीत. क्रोधावर काबू करणारा मोक्ष प्राप्त करतो. जो क्रोधावर काबू करतो तो योग्य काय व अयोग्य काय ते चांगले समजतो कारण त्याचा विवेक जागृत असतो. विवेक नष्ट झाल्याने माणसे विनाकारण भांडणतंटा करण्यात आपला समय व्यर्थ घालवतात. शहाणे अशा वर्तणुकीचे समर्थन करीत नाहीत.

बापाचे बोलणे ऐकल्यावर देवयानी समजते कीं, "मला आता समजले, राग करणे व माफ करणे ह्यातील फरक काय असतो. माफीची योग्यता नसलेले लोक जेथे रहातात तेथे मी रहाणार नाही. जो शिष्य गुरुचा सन्मान करतो तो शिष्य म्हणून घेण्यास योग्य असतो व जो गुरुचा अवमान करतो तो शिष्य होण्यास अयोग्य असतो. म्हणून मी अशा देशात रहाण्यास तयार नाही. कारण येथे पापकृत्याची लाज वाटत नाही.

जेथे पुण्यकृत्याचा प्रभाव आहे अशा ठिकाणीच शहाण्या माणसांने राहिले पाहिजे. शत्रू गुणी असेल तर त्याच्या उत्तम गुणांना मानणे हे मित्राचे अवगुण स्वीकारण्यापेक्षा जास्त योग्य आहे. पुढे ती शुक्राचार्यांस सांगते, "मी तिला बोलले पण त्या विरोधात ती तुम्हाला उणेउसें बोलली, जर तिला कांही बोलावयाचे तर ते माझ्या गुणावगुणा बद्दल बोलायला पाहिजे होते. त्या तिच्या वागण्यावरून ती भांडणखोर आहे, तिला मैत्रीण समजून मी चुक केली आहे ती मला सुधारावयाची आहे. मी तिला माफ करणार नाही".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकोणऐंशीवा भाग संपला.

## आदिपर्व भाग ऐशींवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, भृगु वंशातील कव्य (भार्गव, शुक्र) रागावतात व वृशपर्वास बोलतात, "अरे राजा, पापकर्माची तशी फळे यथावकाश पाप करणार्याला भोगावीच लागतात जसे पृथ्वीचे आहे. ती त्या करणार्याला किंवा त्याच्या मुलास अथवा त्याच्या वंशातील कोणाला तरी भोगावेच लागतात. ती पापाची फळे त्याला कधीच पचत नाहीत. तू कपटाने माझ्या कचास अनेक वेळा मारले आहेस. तो अंगिरस ऋषीचा नातु होता. ब्राह्मणाची हत्या करण्याचे महा पातक तू करवून घेतले आहेस. तू असाच सदैव पापा मागून पाप करीत आहेस. त्याचा तुला पश्चात्तापसुद्धा नाही". तुझ्या कन्येने माझा अपमान माझ्या कन्येपुढे केला त्यामुळे मी आता तुझ्या सह न रहाण्याचा विचार करीत आहे. जेथे माझ्याबद्दल विनाकारण अनादर आहे अशा ठिकाणी ब्राह्मणाने रहावयाचे नसते".

ते ऐकून वृशपर्व कव्यास सांगतो, "अहो भृगुकुलीन ब्राह्मणा, मी कधीही तुझ्यावर असा खोटा आरोप केला नाही किं, तू सत्त्वशिल, व्रतस्थ, पवित्र आणि पुण्यवान नाहीस. माझ्यावर कृपा कर व आम्हाला सोडून जाऊ नकोस कारण, जर तू गेलास तर आम्हा असुराना खोल महासागरात जाऊन देवांपासून लपावे लागेल. आम्हाला त्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही".

शुक्र त्यावर रागांने वृशपर्वास सुनावतो, "तुम्ही खोल समुद्रात जा नाहीतर कुठे उडून जा मला त्याची पर्वा नाही. तुझ्या मुलीने जे खोटे आरोप माझ्यावर करून माझ्या मुलीला दुखवले आहे ते मी कदापिही सहन करू शकत नाही. माझी मुलगी मला सर्वात जास्त प्रिय आहे तिला दुखवलेले मी कधीच सहन करणार नाही. माझे जीवनच तिच्या भोवती फिरत असते हे तुला माहित आहे. तुला मी येथे रहावे असें वाटत असेल तर तू देवयानीला शांत करण्यासाठी कांहीं केले पाहिजेस जसे वृहस्पति इंद्राचे नेहमी भले इच्छित असतो. त्याप्रमाणे मी सुद्धा तुझे भले इच्छित असतो हे तुला माहित आहेच".

तो ऐकून वृशपर्व उत्तेजित होऊन भार्गवाला सांगतो, "तुम्ही असुरांचे सर्वश्रेष्ठ धनी आहात. असुरांची सर्व संपत्ति जसें हत्ती, घोडे, रथ, अगदी मी सुद्धा तुमचाच आहे".

ते ऐकून शुक्र त्याला बोलतो, "जर तू जे हे बोलतोस ते खरे असेल तर आत्ताच्या आत्ता जाऊन माझ्या मुलीची समजूत काढ व तिला शांत करशील".

वैशंपायन सांगत रहातात, असें बोलून भार्गव देवयानीला त्यांचे संभाषण सांगतात पण त्याने ती मानिनी शांत होत नाही, ती बापाला सांगते, "जर तुम्ही म्हणता तसे तुम्ही वृशपर्वासकट सर्व असुरांचे धनी अहात असें तो वृशपर्व सांगत असेल तर ते त्यांनी येथे येऊन ते सर्व पुन्हा मला सांगितले तरच मी त्यावर विश्वास ठेवील".

त्यानंतर असुरांचा राजा वृशपर्व देवयानीकडे स्वतः जाऊन तसे बोलतो व तिला स्वगृही परतण्याची कळकळीने विनंती करतो. त्याचे विनवणी करणारे बोलणे ऐकून देवयानी सुखवते व त्याला सांगते, "जर तसे असेल तर तुम्हाला माझी एक अट मान्य करावी लागेल, ती अशी किं, तुमची कन्या शर्मिष्ठा तिच्या हजार सेविकांसह माझी दासी बनून माझ्याबरोबर राहील जेथे माझे बाबा मला लग्न करून पाठवतील तेथेसुद्धा ती माझी दासी म्हणून येईल". असुर राजा वृशपर्व ताबडतोब तेथे असलेल्या दासीस आज्ञा करतो किं, "शर्मिष्ठास देवयानीच्या आज्ञांचे पालन करण्याचे आदेश देऊन घेऊन ये".

ती दासी शर्मिष्ठाकडे जाऊन तिच्या बापाची आज्ञा सांगते. ती म्हणते, "आपल्या सर्व असुरांच्या भल्यासाठी तुला हे करावे लागेल. कारण, देवयानीला खूष पहाण्यासाठी तिचा बाप, शुक्र असुरांची बाजू सोडून देवांकडे जाण्याच्या गोष्टी करू लागला आहे. ते जर झाले तर आपल्या असुरांचा नाश निश्चित होईल ते टाळण्यासाठी तुला असें करावेच लागेल". "तुला देवयानीची दासी बनून रहावेच लागेल". विवेकी व चतूर आणि धुर्त शर्मिष्ठा सांगते, "माझ्यामुळे जर असुरांचे भले होणार असेल तर मी देवयानीची दासी बनण्यास तयार आहे. तसे करणे माझ्या दृष्टीने राज्यकर्तव्यच ठरेल".

त्यानंतर ती तिच्या हजार दास्यांसह पालखीने देवयानी जेथे होती तेथे येते व उतरून देवयानिला सांगते, "ज्यात माझ्या स्वकीयांचे भले आहे ते सगळे करण्यासाठीच मी असुरांची राजकन्या झाली आहे केवळ राजविलास भोगण्यासाठी नाही, त्यासाठी मी तुझी पाठराखीण दासी आत्तापासून झालेली आहे. तुझे पिताश्री जेथे तुला देतील त्या घरीसुद्धा मी तुझी पाठराखीण म्हणून राहीन".

ते ऐकून देवयानी उद्‌गारते, "मी अशा ऋषीची कन्या आहे ज्याची सगळे स्तुती करतात, ज्याच्याकडे मदतीची भिक मांगतात, हे आता तू मान्य केले आहेस तेव्हां तू एका राजाची राजकन्या असतांना व माझी मैत्रीणसुद्धा असतांना तू माझी दासी कशी होशिल"? शर्मिष्ठा तिला उत्तर देते, "आपल्या नातेवाईकांच्या भल्यासाठी कोणताही त्याग मोठा नसतो, ज्यात सगळ्यांचे भले आहे ते करावे अशी मला शिकवण आहे त्यामुळे मी तुझ्या अटी आनंदाने मान्य केल्या आहेत. म्हणून मी ह्याच्यापुढे तुझ्या बरोबर, तू जेथे लग्न करून जाशिल तेथे येणार आहे". अशा तिच्या प्रेमळ बोलण्याने देवयानी संतुष्ट होते व शर्मिष्ठास माफ करते. त्यातील शर्मिष्ठाचा धूर्त डाव मात्र त्या ब्राह्मण कन्येला उमगत नाही.
ते ऐकल्यावर समाधानाने वृशपर्व राजा कव्याला सांगतो, "अहो ऋषीवर तुमच्या विद्येचा हा विजय आहे. मी आता आपल्याबरोबर समाधानाने माझ्या राज्यात जाऊ शकेन". त्यांबरोबर शुक्र व त्याची मानी कन्या असुरांच्या राजधानीकडे निघतात. देवयानी आपल्या पित्याची सेवा करू लागते.
अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा ऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकांऐशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, कांहीं काळानंतर देवयानी ती गौरवर्णी, देखणी ऋषीकन्या त्याच वनात मजा करण्यासाठी जाते. शर्मिष्ठा व तिच्या हजार दास्या घेऊन ती गंमत करीत त्याच ठिकाणी येते जेथे तो प्रकार घडला होता. देवयानी फार आनंदात होती. तेथे त्या सगळ्याजणी फुलं फुलपाखरं ह्यांच्या बरोबर खेळत होती, फुलातील मकरंद त्या चोखून खात होत्या, फळं खात होती, माहोल आनंदाचा असतो. त्याच वेळी नहुष राजाचा मुलगा ययाति तेथे शिकार करण्यासाठी नेहमी प्रमाणे आला होता. तो थकलेला व तहानलेला होता. तो त्या दोघी मैत्रीणींना तेथे पहातो. त्यांच्या पाठराखीणी त्यांच्या बरोबर तेथे खेळतांना तो पहातो. गोड फळे व मकरंद सेवन केल्यामुळे त्या त्यांच्या तारुण्यातील उन्मत्ततेत तेथे नाचत होत्या. तेथे त्यांना कोठलाही धोका नव्हता त्यामुळे ते मस्तवाल नाचणे चालू होते. देवयानी तिच्या मादक सौंदर्याने नटलेल्या स्थितीत तेथे आरामात पहुडली होती व शर्मिष्ठा आणि इतर दास्या तिचे पाय चेपत होत्या. ययाति ते दृष्य पाहून स्वताशी बोलतो, अहो सुंदरीनो, तुमची नांवे व कोठून आला ते समजले तर मजा येईल. आणि त्या सर्व ललना काय तुम्हा दोघींची सेवा करीत आहेत. ययाति जरी स्वगत बोलत होता तरी ते त्या बायकांना ऐकू आले असावे कारण, त्या सावध झाल्या देवयानी त्याला ओळखते व उठून बोलते, "अहो राजकुमार, माझे ऐका, मी असुरांच्या अध्यात्मिक गुरूची, शुक्राचार्यांची कन्या आहे. ही बाजूला आहे ती माझी पाठराखीण आहे ती नेहमी माझ्या बरोबर असते. तिचे नांव शर्मिष्ठा आहे. ती असुर राजा वृशपर्वाची कन्या आहे".

देवयानीचे ते बोलणे ऐकून ययातिला आश्चर्य वाटते व तो विचारतो, "मला समजत नाही, अशी वृशपर्वाची, असुरांच्या राजाची राजकन्या तुझी दासी कशी असु शकेल"? देवयानी त्याला उत्तर देते, "अहो राजश्री हा सगळा नशीबाचा खेळ आहे. त्याबद्दल विचार करू नकोस. प्रथम मला सांगा आपण कोणी राज घराण्याचे दिसता, आपल्या चेहर्यावरून व कपड्यावरून तसे वाटते. आपले बोलणे वेदासारखे सुसंस्कृत आहे". "आपला परिचय द्याल तर बरे होईल".

ययाति तिला सांगतो, "तुमचे बोलणे खरे आहे कारण, माझ्या ब्रह्मचर्याच्या काळात सगळे वेद माझ्या मुखात बसले आहेत. माझे नांव ययाति आहे, माझ्या वडिलांचे नांव नहुष आहे. मी एक राजा आहे".

ते ऐकून देवयानी त्याला विचारते, "येथे काय कारणांने आपले येणे झाले? कमळं गोळा करण्यासाठी कां मासेमारीसाठी कां शिकारी साठी आला आहात". "मी शिकारीसाठी हरणामागून जात होतो परंतु, ती पळाली व मी आता थकलो आहे व तहानसुद्धा लागली आहे". ययाती तिला उत्तर देतो.

"माझ्या दोन हजार दास्या व माझी पाठराखीण शर्मिष्ठा आपल्या सेवेस हजर आहेत". देवयानी त्याला सांगते. आपल्याला उत्कर्ष मिळो माझे मालक, असे ती बोलते. ते देवयानीचे बोलणे ऐकून ययाति थोडा गोंधळून जातो व बोलतो, "अहो, सौंदर्यवती, मी तुझ्या योग्यतेचा नाही. तू भार्गवाची कन्या आहेस, ते फार श्रेष्ठ आहेत त्याच्या कन्येचा मी साधा विचारसुद्धा करू शकत नाही. कोणताही मोठा राजा तुझ्या पित्यापुढे क्षुल्लक आहे". ते ऐकल्यावर देवयानी बोलते, "आपल्याला कदाचित माहित नसेल पण पूर्वीसुद्धा ब्राह्मणांनी आपल्या कन्या क्षत्रियांना दिल्या आहेत. आपण एका ऋषीचेच पुत्र अहात व मीसुद्धा ऋषीकन्याच आहे. म्हणून अहो नहुषपुत्रा तुम्ही माझा पत्नी म्हणून स्वीकार करावा". ययाति त्यावर तिला सांगतो, "मला माहित आहे चारही वर्ण एकाच ब्रह्मदेवातून उत्पन्न झाले आहेत तरीसुद्धा ब्राह्मण त्यांच्या व्रतस्थतेने व पुण्याईने सर्वात सरस ठरतात". देवयानि तिचा उजवा हात दाखवून त्याला प्रेमांने सांगते, "माझा हा हात तुझ्याशिवाय कोणीही धरलेला नाही. म्हणून मी तुमचा माझे मालक म्हणून स्वीकार आधीच केलेला आहे. एक ऋषीच माझा हात धरू शकतो". ते ऐकून ययाति तिला काकुळतीला येऊन सांगतो, "ब्राह्मणाचा राग एकाद्या विषारी सर्पापेक्षा जास्त दाहक असतो, एकाद्या शस्त्रापेक्षा जास्त बोचणारा असतो, धगधगत्या आगीपेक्षा जास्त घातक असतो म्हणून कोणीही शहाणा ब्राह्मणाच्या मुलीचा अशारितीने विचार करीत नाही".

ते ऐकून देवयानी त्याला विचारते, "तुम्ही हे मला कां ऐकवता"?

ययाति तिला सांगतो, ब्राह्मणाचा राग ह्या सर्वांपेक्षा जास्त कांहीं नष्ट करू शकतो म्हणून मी हे बोललो कारण तुझे पिताश्री एक फार मोठे ब्राह्मण आहेत. तुझ्याशी लग्न करण्याचा

विचार केल्याने माझा नाश होऊ शकतो कारण तू एका महान ब्राह्मणाची कन्या आहेस, तू मला भित्रा हवेतर समज पण मला माझ्या राज्याची माझ्यापेक्षा जास्त काळजी आहे. ते नष्ट झालेले मला चालणार नाही.

ते ऐकून देवयानी ययातिला समजावते, "अरे राजा, मी तुला मांगणी घालत आहे त्यामुळे माझ्या बाबांचा राग तुझ्यावर होण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. मी ज्याला स्वीकारीन त्याला ते माझ्यासाठी स्वीकारतील.

तू मला मांगणी घालण्याची आवश्यकता नाही कारण तेच तुला माझ्यासाठी मांगणी घालतील, मग तर झाले".

देवयानी तिच्या एका दासीला कव्याकडे पाठवते व सर्व वृतांत तिला त्यांना सांगण्याची आज्ञा करते. त्या प्रमाणे ती दासी कव्याकडे जाऊन सर्व वृतांत सांगते. ते ऐकून भार्गव स्वतः तेथे येतात व त्याला, ययातिला पहातात. ययाति त्यांचे यथोचित पुजन करतो, आणि काय आज्ञा आहे असे विचारून त्यांच्यापुढे हात जोडून उभा रहातो.

देवयानी ययातीचा परिचय आपल्या बापास करते, "हे नहुष राजाचे पुत्र, ययाती आहेत. ह्याने मला माझ्या वाईट परिस्थितीत हात देऊन मदत केली तेंच हे. मी ह्यांच्याशीच विवाह करणार इतर कोणाशीही नाही, तरी अहो तात, तुम्ही माझा हात त्यांच्या हातात द्यावा".

"अरे नशीबवान पुरुषा, तुला माझ्या मुलींने स्वीकारले आहे तेव्हां मी ती तुला पत्नी म्हणून देण्याचे निश्चित केले आहे. म्हणून अरे नहुषाच्या मुला, माझ्या मुलीचा तू पत्नी म्हणून स्वीकार कर".

ते ऐकून ययाति नम्रपूर्वक म्हणतो, हा मी तुमचा आशिर्वाद समजून देवयानीला मी स्वीकारतो. तुम्हीच तिला दान करीत अहात तेव्हां वर्णसंकर केल्याचे पाप मला लागणार नाही असें समजतो. शुक्र त्याला समजावतात, मी त्या पापाचे पारिपत्य करीन. असें बोलून नंतर ते ययातिला विचारतात, बोल, तुला काय आशिर्वाद मी द्यावा असें वाटते ते सांग. माझ्या कन्येशी विवाह करण्यास भिऊ नकोस. माझ्या देखण्या मुलीची तू नीट काळजी घे तिला संतुष्ट ठेव. तिची ही पाठराखीण शर्मिष्ठा तुमच्या बरोबर असेल परंतु, तू तिच्याशी संभोग मात्र करणार नाहीस.

वैशंपायन पुढे सांगतात, भार्गवाचे ते बोलणे झाल्यावर ययाति त्यांना एक प्रदक्षिणा घालतो. त्यानंतर त्यांचा यथासांग विधीनुसार विवाह संपन्न होतो, त्यावेळी शुक्राचार्य व त्यांचे असुर त्या नवजोडप्यास शुभाशिर्वाद देतात. अशारितीने देवयानी व शर्मिष्ठा अशी दुहेरी भेट त्यांच्या बरोबर त्यांच्या दास्या असा मोठा परिवार घेऊन ययाति आपल्या राजधानीकडे मोठ्या आनंदाने निघतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एक्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग ब्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन नंतर सांगतात, इंद्राच्या अमरावती प्रमाणे संपन्न असलेल्या त्याच्या राजधानीत तो परततो. तेथे देवयानी त्याला सांगते किं, तिच्या पाठराखीणीसाठी त्यांने एक साजेसा वाडा अशोक वनात तयार करावा म्हणजे ती, शर्मिष्ठा तेथे सुखरुप राहील. तेथे ती व तिच्या हजार दास्या रहातात. तेथे त्या सर्वाची खाण्या पिण्याची सगळी व्यवस्था असते. देवयानी बरोबर मात्र तो नहुशाचा पुत्र सुखोपभोग घेत जीवन मजेत घालवत असतो. यथावकाश देवयानीला एक सुंदर बाळ होते. त्यानंतर हजार वर्षानी जेव्हां शर्मिष्ठा ऋतुस्नात होते तेंव्हा तिला प्रश्न पडतो किं, आता तिला पुरुषाची सोबत मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी कोण योग्य उपवर कोठे, कसा मिळणार हा प्रश्न तिला भेडसावू लागतो. मी अजून माझा नवरा शोधलेला नाही, आता काय करावे. असें विचार तिच्या मनांत येत असतांना एकदा ययाति तिच्या वाड्यावर सहजपणे भेटण्यास आलेला असतो. त्याला पाहून शर्मिष्ठा विचार करते, ययाति असतांना मी दुसर्या कोणाचा कशासाठी विचार करावा. तो विचार तिच्या मनांत पक्का होतो किं, ययातिलाच पटवावयाचे. ती तिच्या कपटी व आसुरी प्रवृत्तीने प्रेरीत अशी ययातिला पटवण्यासाठी युक्तीवाद ठरवते. तसें पाहिले तर शर्मिष्ठा एका राजाची, वृशपर्वाची कन्या असल्यामुळे तिची राणी होण्याची क्षमता यत्किंचितही कमी नव्हती.

शर्मिष्ठा ययातिला तिच्या वाड्यात बोलावते. त्यांचे सुरुवातीचे औपचारीक बोलणे झाल्यावर ती मुख्य विषयाला हात घालते. ती त्याला सांगते, राजश्री मी आता वयात आली आहे व आता मला माझा नवरा निवडावा लागणार आहे. मला कांही समजत नाही कीं, मी काय करावे. मला कोण संपन्न करणार? आता देवयानी माता झाली आहे, म्हणजे तशी तिची गरज संपली आहे, आणि येथे मी व्याकुळ झाली आहे. माझे तारुण्य असेंच वाया जाणार कां? आता तुम्ही मला ह्यात मदत केली पाहिजे. मी एक राजकन्या आहे हे तुम्ही जाणता तेव्हां मला एका राजाशीच नाते जोडावे लागणार हे सुद्धा आपण जाणता. तरी तुम्ही मला कां नाही स्वीकारत? मला वाटते तुमच्या पासूनच मला एक पुत्र व्हावा. असें बोलून शर्मिष्ठा मोठ्या कळकळतीच्या नजरेने ययातिकडे पहात रहाते. ययाति जवळ

ती अलगदपणे सरकत ती त्याच्या अंगाला स्पर्श करीत आपला विचार त्याला सांगते. ययाति शर्मिष्ठाच्या अप्रतिम सौंदर्यावर आधीच खूष होता पण ताबडतोब तिला स्वीकारणे कितपत योग्य होईल त्याचा अंदाज तो करीत असतांना ती बोलते, "अहो नहुश पुत्रा, आपण जाणताच किं, सोमाच्या, इंद्राच्या, विष्णूच्या, यमाच्या, वरुणाच्या व आपल्या अंतःपुरात असलेल्या स्त्रीकडे कोणीही पाहू शकत नाही. आपण जाणताच कीं, मी सौंदर्यवती आहे, कुमारिका आहे, व्रतस्थ जीवन जगले आहे, राजकुमारी आहे, मीसुद्धा आपल्या योग्य आहे तरी आपण मला शांत करण्यासाठी कांहींतरी केले पाहिजे. केवळ अन्न, वस्त्र व निवारा देऊन महिलेची सुटका होत नाही, तिला आणखीन कांहीं लागते ते तुम्ही मला द्यावे, मी शब्द देते कीं, तुम्ही येथे आलात व मला भेटलात हे कोणालाही समजणार नाही. माझ्या दास्या माझ्याच आहेत, म्हणून त्या माझीच मदत करतील तरी तेवढे करून ह्या अभागिनीवर कृपा करावी. आपल्या कृपेने मी माता होऊ इच्छिते".

ते तिचे कळकळीचे बोलणे ऐकून आधीच उत्तेजित झालेला ययाति तिला सांगतो, "मी जाणतो किं, तुला माझी मदत पाहिजे व तेसुद्धा तुझ्या योग्यतेनुसार मला मान्य आहे पण, तुला माहीत आहे किं, देवयानी मला देतांना तिच्या पित्याने एक अट घातली होती किं, मी तुझ्याशी संभोग करतां कामा नये.

ते ऐकून ती हुशार असुर कन्या राजाला सांगते, "राजे, आपल्याला मी सांगावयाचे कारण नाही किं, खोटे बोलण्यास पांच प्रसंगी माणसास परवानगी आहे, ती अशी, विनोद करतांना, स्त्रीला पटवतांना, लग्न जुळवतांना, कठीण प्रसंगी, सर्वस्व नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी, तरी त्याकारणांने आपल्याला मला मदत करण्यामुळे कोणताही दोष लागणार नाही. दुसरे असें पहा, देवयानी व मी दोघी सख्या आहोत ते तुम्ही जाणता, आता आपण जाणताच कीं, मैत्रीणीचा नवरा आपला नवरा असतो असें त्या बाईस समजण्याचा हक्क आहे. म्हणून जेव्हां तुम्ही देवयानीला वरले तेव्हांच तुम्ही मलासुद्धा वरले आहे हे समजून घ्या व त्यात कांहींही गैर नाही असें लक्षात घ्या. आपण असेंसुद्धा लक्षात घ्या कीं, जेव्हां भार्गवाने तुम्हाला ते सांगितले तो केवळ एक आदेश होता एका बापाचा त्याच्या मुलीच्या प्रेमापोटी केलेला, ती अट नव्हती. तसेंच तेव्हां तुम्ही कांहीं न बोलता गप्प होता, हो अथवा नाही, असें कांहीं बोलला नाही म्हणजे, आपण तो आदेश,

अट कांहींही समजा, ते मान्य केले होते असें समजण्याचे कारण नाही. म्हणून ते क्षम्य खोटे बोलणे होते. महाराज, आपल्याला मी सुरुवातीपासून पसंत होती हे नाकारू नकां कारण ते अक्षम्य खोटे ठरेल. खरे ते मान्य करा व कृपया आणखीन वेळ वाया न घालवता माझा स्वीकार करा. कारण, देवयानीनी तुमच्या कडून असे वचन घेतलेले नाही कीं, तुम्ही मला संभोगसुख देऊ नये".

ययाति तिचे युक्तिवाद पूर्ण बोलणे ऐकून तिला उत्तर देतो, "हे पहा, मी केवळ पुरुष नाही तर एक जबाबदार राजासुद्ध आहे. मला प्रजेच्या दृष्टीचा विचार करावा लागतो ते समजून घे. जो राजा प्रजेच्या दृष्टीकडे दुर्लक्ष करतो त्याचा विनाश अटळ असतो. तू जी कारणे सांगितली आहेस ज्यात खोटे बोलण्यास परवानगी आहे त्यातील सर्वनाशाचे कारण मी मानत नाही, म्हणजे मी त्या प्रसंगीसुद्धा खोटे बोलणार नाही".

शर्मिष्ठा त्यावर बोलते, "अहो नरेशवर्य ते सर्व सोडा, एक समजून घ्या किं, तुमच्या बायकोची मैत्रीण तुमची अर्धी बायको असते हे तरी समजून घ्या, समाजातील हि मान्यवर कल्पना आहे त्याचा स्वीकार तुम्ही केल्याने त्यात खरे खोटेचा मुद्दांच उपस्थित होत नाही. तसेंच जर कोणी स्त्री स्वताहून पुरुषाला विनंती करीत असेल तर अशावेळी तिचा अव्हेर करणे पापकारक असते हे तरी समजून घ्या! मी तुम्हाला तेव्हांच वरले आहे, आठवा जेव्हां, तुम्ही माझ्यासाठी हा वाडा बांधला तेव्हा तुम्ही मला सर्वकांही देण्याचा शब्द दिला होता ते तरी आठवा. केवळ भार्गावाचाच मुद्दा महत्वाचा ठरत नाही, इतर गोष्टींकडे सुद्धा एका राजाला लक्ष दिले पाहिजे". हे ऐकून ययाति शेवटी तिच्या युक्तिवादांपुढे थकतो व तिला सांगतो, "जर मी तुला असा शब्द दिला आहे तर तो मी निश्चित पाळेन. आता सांग मी तुझ्यासाठी काय करावे".

ते ऐकतांच उत्साहाने शर्मिष्ठा त्याला सांगते, "मला सुख दे. मला तुझ्या मुलांची माता व्हावयाची इच्छा आहे ती पूर्ण करावी". ती पुढे सांगते, "तुम्ही जाणताच किं, पत्नी, गुलाम व मुलगा हे त्या पुरुषाची संपत्ती असतात. तुम्ही देवयानीचे पति व मी देवयानीची दासी म्हणून तुम्ही माझे मालक ठरता. अशा बर्याच कारणांनी तुम्ही मला संतुष्ट करण्यासाठी बांधलेले अहात.

वैशंपायन ऋषी नंतर सांगतात, एवढे संभाषण झाल्यानंतर राजा शर्मिष्ठाची लाज राखण्यासाठी तिच्याशी संभोग करतो व तिला शांत करतो. शर्मिष्टा ययातिला भरपूर सुख देते व नंतर ते दोघे आपापल्या ठिकाणी जातात. यथावकाश शर्मिष्ठाला एक मुलगा होतो जो स्वर्गीय तेजांने चमकत असतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा ब्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्र्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, जेव्हां देवयानीला हे समजते कीं, तिच्या दासीला, शर्मिष्ठाल एक पुत्र जन्मला आहे तेव्हां ती संतापते. ती तिला वाचारते, "अग, तू अशी वासनेच्या आहारी कशी गेलीस? तू अशा पापात कशी अडकलीस"? तिला शर्मिष्ठा सांगते, "कांहीं दिवसापूर्वी एक वेदशास्त्र संपन्न ऋषी माझ्या वाड्यात आले होते. त्यांच्याकडे आशिर्वाद देण्याची सिद्धी होती. त्यांने मला माझ्या पाहुणचारामुळे प्रसन्न होऊन विचारले किं माझी काय इच्छा आहे. मी त्यांना माझी इच्छा सांगितली कीं, माझे पुण्य कमी होणार नाही अशी गोष्ट मला द्या . त्यावर माझे स्मितहास्य पाहून त्यांनी मला हा मुलगा दिला". ते ऐकून देवयानी म्हणते, "असें असेल तर ठिक आहे. पण जर तुला त्या ब्राह्मणाच्या कुळाचा व वंशाचा पत्ता माहित असेल तर तो मला सांग". ते ऐकून शर्मिष्ठा सांगते, "तत्त्वशिलतेत व तपोसामर्थ्यात ते ऋषी सूर्यासारखे तेजस्वी होते. ते पाहून त्यांना त्यांच्या जातकुळीबद्दल विचारण्याची मला आवश्यकता वाटली नाही".

तू हे जे मला सांगतेस ते खरे असेल तर खरोखर, एका उच्च दर्जाच्या ब्राह्मणाचा मुलगा आहे, आता मला तुझ्या बद्दल कसलाही राग नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, अशा प्रकारे गप्पा मारून हसत हसत त्या निरोप घेतात. देवयानी शर्मिष्ठाने सांगितलेली माहिती खरी आहे अशा समजुतीत तिच्या महालात शिरते. त्याच सुमारास देवयानीला आणखीन दोन मुलगे ययाति पासून होतात, त्यांची नांवे असतात, यदु व तुर्वसु जे इंद्र व विष्णू सारखे तेजस्वी होते.

त्याच प्रमाणे शर्मिष्ठा, वृशपर्वाची  कन्यासुद्धा आणखीन तीन मुलांची आई होते, त्या मुलांची नांवे अशी, द्रह्यु, अनु आणि पुरु.

एकदा देवयानी व ययाति असेंच एका उपवनात रमण्यासाठी गेले असतां तिला तेथे तीन स्वर्गीय सौंदर्य व तेज असलेली बालके खेळतांना दिसतात. देवयानी ययातिला विचारते, "ही कोणाची मुलं असावीत बरे? अगदी तुझ्या सारखी दिसतात". ययाति तिला कांही उत्तर देण्या आधी देवयानी त्या मुलांकडे जाऊन त्यानाच विचारते, "बाळांनो, तुमचा वंश कोणता, तुम्ही कोणाची मुलं. मला खरे उत्तर द्या? मला ते सर्व माहित करून घ्यावयाचे

आहे". त्या तिनही बालकांनी राजा ययातिकडे बोट करून आपली आई शर्मिष्ठा असल्याचे सांगितले. एवढे करून ती तिनही मुलं ययातिचे पाय धरतात जसें मुलांनी आपल्या बापाचे पाय धरावेत. ययाति मात्र देवयानीपुढे आपण त्यातले नाही अशा अविर्भावात दुसरीकडे तोंड करून तसांच उभा राहिला त्याने त्या मुलांना जवळ घेतले नाही. त्याचे असें वागणे त्या तिनही मुलांना चकित करते. ती मुलं तेथून थेट आपल्या घरी जातात व रडत रडत आपल्या आईला सांगतात किं, बाबानी आम्हाला साधी ओळखसुद्धा दाखवली नाही. देवयानी मात्र हा प्रकार पाहून जे समजायचे ते पक्के समजते व शर्मिष्ठास खडसावून विचारते, "ए माझ्या दासी, तुझी हिम्मत कशी झाली तुझी मर्यादा ओलंडण्यास? तू असुर आहेस हे मला माहित आहे पण आता तू माझी दासी असल्याने तुला माझ्याशी खोटे बोलण्याची हिम्मत कशी झाली"?

शर्मिष्ठा त्यावर तिला सांगते, "मी तुला जे सांगितले ते शब्दशः खरे आहे. मी शास्त्रार्थानुसारच वागले आहे म्हणून मला तुझी भिती बाळगण्याची आवश्यकता वाटत नाही. जसें तू राजाला पति म्हणून निवडलेस तसेंच मी सुद्धा त्याला माझा पति म्हणून निवडले ह्यात कांहींच चुकले नाही. तुला माहित आहे आपला रिवाज, मैत्रीणीचा पति आपला पति म्हणून स्वीकारण्याची पद्धत आहे हे तू विसरलीस का? तू ब्राह्मण कन्या आहेस म्हणून मी तुझा मान राखते पण एक गोष्ट लक्षात ठेव किं, मी त्याच्यावर तुझ्यापेक्षा जास्त प्रेम करते म्हणून माझा त्याच्यावर जास्त अधिकार आहे, तू त्याला तुझ्या मर्जीनुसार अपमानीत करतेस तसें मी कधीच करीत नाही. पुरुषाचा अहंकार जपण्यातच बायकांचे हित असते ते तुला समजत नाही. मी मात्र त्याचा अहंकार प्राणपणाने जपते म्हणून तो जास्त माझा झाला आहे". ते शर्मिष्ठाचे बोलणे ऐकून देवयानी दुःखाने राजाला सांगते, "मी ह्यापुढे एक क्षणसुद्धा तुमच्या बरोबर राहू शकणार नाही कारण तुम्ही माझा विश्वासघात केला आहे. असे बोलून देवयानी अश्रूपूर्ण अवस्थेत तेथून निघून आपल्या बापाच्या घरी जाते ते पाहून ययातिला फार दुःख होते. पुढील परिस्थितीची कल्पना ययातिला तत्क्षणी जाणवते व तोसुद्धा तसांच तिच्या मागोमाग निघतो. जात असतांना तो तिची पुनःपुन्हा विनवणी करीत असतो पण हट्टी देवयानी त्याला बधत नाही. अश्रूपूर्ण डोळ्याने ती मानिनी आपल्या पित्याच्या घरी पोहोचते. तेथे ती उशनसाच्या, भार्गवाच्या

जवळ जाऊन बसते. तिच्या डोळ्यांत अश्रू व राग असें दोनही भाव तिचा बाबांना स्पष्टपणे दिसतात. ती रिवाजाप्रमाणे त्यांना वंदन करते व उभी रहाते. ययातिसुद्धा तितक्यातच तेथे पोहोचतो व तसेंच करून त्यांच्यापुढे उभा रहातो.

शुक्राचार्य तिला कुशल विचारतात तेव्हां ती अश्रूपूर्ण डोळ्याने त्याला सांगते, "बाबा, पुण्याचा नाश पापाने केला आहे म्हणून मी येथे आपल्याकडे आली आहे. माझ्या दासीने, शर्मिष्ठाने पुन्हा एकदा मला मान खाली घालावयास लावली आहे. तिची तिनही मुलं ययातिची आहेत असें मला समजले. देव ब्रह्माच्या कृपेने मला दोन पुत्र आहेत. हा माझा नवरा, महान राजा ज्याला सर्व शास्त्रे अवगत आहेत तो हे सर्व जाणूनही असा शर्मिष्ठाच्या जाळ्यात सापडला आहे. त्याने राजा असूनही नैतिकतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत". शुक्र हे त्याच्या मुलीचे बोलणे ऐकून त्रस्त होतात व ययातिला बोलतात, "अरे राजा ययाति, तू तुझ्या ह्या प्रमादासाठी शिक्षेस पात्र ठरतोस. म्हणून ह्यापुढे तुझे तारुण्य व देखणेपण नष्ट होऊन तू कुरूप व पक्षघाताने लुळा होशिल. ती वाणी ऐकून ययाति सांगतो, "अहो ऋषी जरा माझे ऐका, त्यानंतर काय तो निर्णय घ्या, दानव राजाच्या मुलींनी मला तिचे शमन करण्याची विनंती केली व ती करणे हे एक पवित्र कार्य आहे हे आपण जाणताच, मी जे केले ते तिला मदत करण्याच्या उद्देशांने केले त्यात वासना नव्हती म्हणून तुमची मुलगी जसे दाखवते तसे ते नव्हते हे जरा समजून घ्या. आपण जाणताच किं, जर एकाद्या ऋतुस्नात महिलेलने पुरुषाला तिचे शमन करण्याची विनंती केली व त्या पुरुषाने ती फेटाळली तर ते भृणहत्त्येचे पाप त्याला लागते. ते पाप न व्हावे एवढ्या एकाच उद्देशाने मी त्या अभागिनीला केवळ मदत करीत होतो. जर मी इच्छा दाखवली असती तर मी देवयानी जसे सांगते तसा दोषी ठरलो असतो पण परिस्थिती तशी नाही हे जरा समजून घ्या". ते ययातिचे बोलणे ऐकून भार्गव समाधानी न होता उलट चिडतात, ययातिला बोलतात किं, "राजा तू माझा मिंधा आहेस माझ्या शब्दात अडकलेला आहेस, म्हणून जे कांहीं तुला ह्या संदर्भात करावयाचे त्यासाठी तू माझी संम्मति घ्यावयास पाहिजे होतीस. तरीसुद्धा उद्देश भृणहत्त्या टाळण्याचा होता असें सांगतोस म्हणून व माझ्या मुलीच्या भल्यासाठी मी तुला उःशाप देतो कीं, तुला दिलेले कुरुपपण व पक्षघात तू दुसर्या कोणालाही देऊन त्यातून मुक्त होऊ शकतोस", असें बोलून भार्गव पुढे ययातिला सांगतात

कीं, "मी तुला माझ्या सर्व बंधनांतून मुक्त करतो". ययातिला ते ऐकून थोडा धीर येतो व शुक्राचार्यास विचारतो, "जर मी माझे हे रुप माझ्या राज्याच्या बदल्यात माझ्या एका मुलाला दिले तर ते चालेल कां"? ऋषी बोलतात, "तू कोणालाही ते देऊ शकतोस व जर तुझ्या कोणा मुलांने ते स्वीकारले तर तो दीर्घायुषी व यशस्वी राजा होईल व त्याचा वंश वाढेल असा मी आशिर्वाद त्याला देतो".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा त्र्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौर्यांऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी पुढे सांगतात, ययाति त्याचे कुरुप रुप घेऊन घरी परततो. तो त्याच्या सर्व मुलांस बोलावतो. प्रथम मोठ्या मुलांस बोलावतो, ज्याचे नांव यदु असते. यदु मोठा पराक्रमी व सिद्धहस्त असतो. त्याला विचारतो, "भार्गवाने दिलेल्या शापामुळे मला हे स्वरूप प्राप्त झाले आहे, तरी माझे कामसुखाची वासना अजून पूर्ण झालेली नाही तरी तू हे माझे रुप घे, त्याच्या बदल्यात माझे सर्व साम्राज्य मी तुझ्या नांवे करण्यास तयार आहे. तुझ्या तारुण्याने मी माझी वासना संपुष्टात आणीन व नंतर ते तारुण्य मी तुला देऊन टाकीन". ते ययातिचे बोलणे ऐकून यदु त्याला सांगतो, "तात अशा परिस्थितीत जगणे सोपे नसते. खाणे, पिणे, चालणे सगळ्याच गोष्टीत त्रास होत असतो म्हणून मी तुमची विनंती मान्य करू शकत नाही. पुढे यदु बोलतो राजे तुम्हाला आणखीनही मुलगे आहेत त्यांना कां नाही विचारत"? ययाति त्याला सांगतो अरे माझ्या पुत्रा तू माझ्या हृदयाचा तुकडा आहेस म्हणून मला वाटले किं, तू माझ्यासाठी तयार होशिल पण तू माझी घोर निराशा केली आहेस. त्यानंतर तो त्याच्या दुसर्या मुलांस, तुर्वसूला तेच विचारतो. हजार वर्षे सुख भोगल्यानंतर तुला मी तुझे तारुण्य परत करीन व संन्यास घेईन, राज्य मांगणार नाही. तुर्वसू बोलतो, बाबा, अशा परिस्थितीत माणसाला खाता पिता हालचाली करतांना किती विपळा होतात ते तुम्ही तूर्त स्वतः अनुभवता आहात ते मला जमणार नाही.

ययाति त्यालासुद्धा यदुला जे बोलला ते बोलतो पण त्याचा कांहीं उपयोग होत नाही. तुर्वसू ययातिच्या वासनांच्या आहारी जाण्याची मोठ्याने निर्भत्सना करून स्पष्ट नाकार देतो. त्याच्या त्या उद्धटपणाने रागावून ययाति त्याला शाप देतो कीं, अरे बापाचे उपकार न जाणणार्या तुझा वंश नाश पावेल. तुझे वंशज अशा लोकांवर राज्य करतील जे तामसी असतील, व्यभिचार करणारे, वाटेल ते खाणारे, मालकाच्या बायकांशी संभोग करणारे, जनावरांप्रमाणे व्यवहार करणारे पापमय जीवन जगणारे, अनार्य असतील.

त्या नंतर ययाति शर्मिष्ठाच्या मुलांस, द्रह्यूस विनंती करतो पण तोसुद्धा त्या विनंतीचे हंसे करतो व आपल्याला असे जीवन जगण्याचे व त्या बदल्यात मिळणारे राज्यसुद्धा नको असें सांगून नाकारतो त्यावर चिडून ययाति त्याला दुःश्वास देतो व बोलतो "तू अशा

जागेचा राजा रहाशिल जेथे मजा करण्यासारखे कांहींही नसेल, तू नांवापुरता राजा असशिल, तेथे रस्ते नसतील, वाहने नसतील, उपयोगाची जनावरे नसतील, लोक पाण्यावर तराफे टाकून त्याद्वारा दळणवळण करणारे असतील". त्यानंतर तो खजिल झालेला ययाति, त्याच्या शर्मिष्ठापासून झालेल्या दुसर्या मुलांस, अनुस तींच विनंती करतो. अनु सांगतो, "अशा परिस्थितीत कोणीही यज्ञ करू शकणार नाही. त्याशिवाय राज्य कारभार कसा सांभाळणार, शत्रूला कसे तोंड देणार? मला नाही झेपणार असे जीणे". अनुच्या नाकाराने संतापलेला ययाति त्याला सुद्धा शाप देतो. तो बोलतो, "तू अपंगत्वाला एवढे दोष देतोस तर तू सुद्धा उत्तर आयुष्यात अपंग होशिल. तू यज्ञ करू शकणार नाहीस. तुझी मुलं मोठी करती झाल्यावर तुझ्या समोर मरतील".

शेवटी ययाति फार निराश झालेल्या मनस्थितीत धाकट्या मुलास, पुरुला तीच विनंती करतो, "माझ्या सर्वात धाकट्या व मला प्रिय अशा मुला, हे माझे कुरुपपण, अपंगत्व जे उशसनाच्या शापामुळे मला प्राप्त झाले आहे, तू ते घेऊन पितृऋण फेडशिल कां"? ते ऐकून पुरु त्याच्या वडलांना सांगतो, "बाबा, मी आपल्या आज्ञेबाहेर नाही. तुम्ही जे सांगाल ते मी आनंदाने करीन. माझे तारुण्य घेऊन जर तुम्हाला सुख मिळणार असेल तर ते व्हावे. माझे तारुण्य घ्या व मला आपले दोषपूर्ण स्वरूप द्या". पुरुच्या त्या वचनाने उत्तेजित झालेला ययाति त्याला अनेक आशिर्वाद देतो. तो सांगतो, "माझ्या प्रिय लेकरा, तुझे राज्य वैभवसंपन्न राहील".

त्यानंतर ययाति कव्याचे स्मरण करून आपले कुस्वरूप पुरुला देतो व त्या बरोबर पुरु म्हातारा, अपंग, कुरुप, असा दिसू लागतो व ययाति सुंदर तरूण दिसू लागतो. पुरु ते स्वरूप प्राप्त झाल्यावर ययातिला विनती करतो कीं, "अशा अवस्थेत राज्य कारभार करणे अशक्य असल्याने ते जरी आता पुरुचे झालेले असले तरी कारभार ययातिनेच पहावा". अशारितीने ययाति पुरुच्या वतीने ते राज्य हजार वर्षे सांभाळतो.

असारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा चौर्याऐंशीवा भाग संपला.

# आदि पर्व भाग पंच्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, गुणी राजा, नहुशाचा मुलगा, ययति त्याच्या मुलाकडून तारुण्य व देखणेपण घेतल्यावर अति प्रसंन्न होतो. तारुण्य प्राप्त झाल्याने तो पुनः त्याच्या वासनामय जीवनास सुरुवात करतो. भोग भोगण्यात कांहीं कमी रहाणार नाही ह्याची तो पूर्ण दक्षता बाळगतो. परंतु, ते करतांना ययाति नैतिकतेचे नियम तंतोतंत पाळतो. पुरुच्या वतीने तो राज्य कारभार व्यवस्थितपणे करतो. अनेक यज्ञ, दानं, ब्राह्मणांचा संन्मान, श्राद्धविधी इत्यादी सर्व शास्त्रानुसार करतो. सज्जनांचा सत्कार व दुर्जनांचा नाश असें जे एका राजाचे काम असते तें तो निर्दोषपणे करतो. त्याच्या कारभारात ब्राह्मण सुखी असतात व ते त्यांचे वैदिक कार्य विनाव्यत्यय निर्विघ्नपणे पार पाडू शकतात. क्षत्रिय आपल्या मर्यादा ओलांडत नाहीत, वैश्य प्रामाणिकतेने उद्योग, शेती इत्यादी करत रहातात, स्त्रिया व शुद्रांचे राजा संरक्षण करतो. कोणालाही कांहीं तक्रार करण्याची वेळ येत नाही असा राजकारभार ययाति करीत राहून त्याच वेळी उपभोगसुद्धा यथासांग करीत असतो. त्याचा कारभार इंद्राच्या कारभारासारखा असतो. असें सगळे व्यवस्थितपणे होत असतांना ययातिला एक गोष्ट खुपत असतें किं, ती एक हजार वर्षे संपत आली आहेत. काळ व कष्ट ह्यांचे भान ठेवून तो स्वर्गीय अप्सरा विश्वाची हिच्यासंग बराच काळ इंद्राच्या उपवनांत व कांहीं वेळा कुबेराच्या अलकापुरीत तर कांहीं वेळा उत्तरेस मेरू पर्वताच्या शिखरांवर असा तो त्याचे उपभोग घेत असतो. ते करत असतांना ययाति त्या सर्व भोगांचा अभ्यास करीत होता. त्याला एक गोष्ट स्पष्टपणे जाणवत होती कीं, हे भोग भोगून संपत नाहीत तर जसें भोगाल तसें ते अधिकच तीव्र होऊन पुढे येतात. अखेरीस ती हजार वर्षे पूर्ण होतात तेव्हां ययाति पुरुला सांगतात, "अरे माझ्या प्रिय मित्रा तुझ्यामुळे मला भोगांचा अभ्यास करण्यासाठी एक हजार वर्षे मिळाली आता तू हे तुझे राज्य तारुण्य स्वतःकडे घे व माझे अपंगत्व, कौरुप्य मला दे". अशारितीने ययाति पुनः त्याच्या खर्या रुपात येतो व नंतर संन्यासाश्रमात प्रवेश करून तप साधना करू लागतो. खरे सुख भोग भोगण्यात नसते तर त्याच्या त्यागात असते हे वैश्विक सत्य ययातिला समजले. भोग शरीराचे असतात व ते शरीर आहे तोवर रहाणारच त्या करतां त्यांत माणसांने मर्यादेने ध्यान द्यावयाचे असते हे

तो समजला. मी व माझे शरीर हे दोन वेगळे आहेत व शरीराच्या गोष्टींत मी मर्यादे पेक्षा जास्त लक्ष घातले तर माझे केवळ नुकसानच होणार हे वैश्विक सत्य ययाति त्या हजार वर्षात शिकला. मी कोण ते समजण्यासाठी मला शरीरात न रमणे जमावे लागेल, जर ते नाही जमले तर मी कधीच मला ओळखणार नाही. वासना शरीरासाठी असतांत त्या शरीरा पुरत्या ठेवणे ज्यांना जमते तोंच स्वतातील मी समजू शकतो हे ययातिच्या लक्षात आले व तो ज्ञानी झाला कारण माझ्यातल्या मला ओळखणे म्हणजेच ज्ञान. जो मी शरीरात रमतो तो कधीही ज्ञानी होऊ शकत नाही. दुःख व सुख ह्या शरीराच्या अवस्था आहेत मी दुःखी किंवा सुखी असा कांहींही नसतो. कारण मी त्या अवस्थांच्या पलिकडे असतो. हे ब्रह्मज्ञान त्याला झाले. ययाति पुरुला सांगतो, "तू माझा मुलगा असलास तरी त्यापेक्षा जास्त माझा मित्र आहेस असे मी समजतो कारण जर तू मला तुझे तारुण्य दिले नसतेस तर मी कांहीं वैश्विक सत्यता कधीच समजू शकलो नसतो. अरे, पुरु, माझ्या मित्रा, तुझे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत त्या बद्दल मी तुला आशिर्वाद देतो किं, तुझे वंशज मोठे राजे होतील व तुझे वंशज पौरव म्हणून ओळखले जातील.

वैशंपायन सांगतात, ययाति पुरुला त्याचा उत्तराधिकारी नेमण्याचे ठरवतो. त्याला त्याचे दरबारी व राज पुरोहित आक्षेप घेतात. ते सांगतात रिवाजानुसार मोठा मुलगा उत्तराधिकारी झाला पाहिजे, त्यानंतर दुसरा व त्यानंतर तिसरा अशा क्रमाने तो अधिकार दिला गेला पाहिजे अशी मान्यवर प्रथा आहे, असें त्यांचे म्हणणे होते. त्यावर ययाति त्यांना सांगतो, "अहो ब्राह्मणांनो, माझे ऐका, माझ्या मोठ्या तीनही मुलांनी माझा अपमान केला आहे, ते माझे ऐकत नाहीत. तोच माझा खरा वंशज जो माझे ऐकतो, माझे भले पहातो, जो स्वतःचे देऊन माझे पाप घेतो, जो माझ्या दुःखात सामील होतो. ह्यापैकीं कोणतीही गोष्ट माझ्या पहिल्या चारही मुलांनी केली नाही. पुरुने ह्या सर्व गोष्टी माझ्या समाधानात केल्या आहेत म्हणून तोंच माझा उत्तराधिकारी होण्यास योग्य ठरतो. त्याशिवाय कव्यानेसुद्धा तसें सांगितले आहे कीं, जो मला आधार देईल तोंच माझा उत्तराधिकारी होईल". हे ऐकल्यावर सर्व राज पुरोहीत व मंत्री, अमात्य राजाच्या विचाराशी संम्मति दाखवतात. पुरु अखेरीस ययातिचा वारस म्हणून जाहिर केला जातो. प्रजासुद्धा ययातिच्या निर्णयाला मान्यता देतात. पुरुची नेमणूक राजा म्हणून केल्यावर ययाति संन्यासाश्रमात जाण्याचा विधी

उरकतो. ययाति त्यानंतर आपली राजधानी सोडून ब्राह्मणांच्या व इतर सोबती वैराग्यांच्या सानिध्यात जंगलात निघून जातो.

त्यानंतर यदुचे वंशज यादव म्हणून ओळखले जाऊ लागले, तुर्वसुचे वंशज यवन म्हणून ओळखले जाऊ लागले. द्रुह्युचे भोज, अनुचे म्लेच्छ म्हणून ओळखले जाऊ लागले. आणि पुरुचे वंशज पौरव म्हणून ओळखले जाऊ लागले. अरे, जनमेजया तू पुरु वंशाचा आहेस. तूं तुझ्या वासनांच्या आहारी न जाता अनेक वर्षे राज्य करशिल.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा पंच्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग श्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन जनमेजयाला नंतर सांगतात, राजा ययाति पुरुला गादीवर बसवून मोठ्या आनंदाने रानात जण्याची तयारी करतो. अशारितीने संन्यास घेतल्यावर ब्राह्मण व इतर वैराग्याबरोबर संन्याशाची व्रतवैकल्ये करीत केवळ फलाहार व कंदमुळं खाऊन राहू लागतो. कांहीं काळ अशारितीने व्यतीत करतो व नंतर योग्य वेळी स्वर्गात जातो. ययाति स्वर्गात कांहीं काळ राहिल्यावर इंद्र त्याला पुन्हा पृथ्वीकडे फेकून देतो. पण तो पृथ्वीवर न येता मध्येच तरंगत रहातो. असें मला समजले. ययाति पुनः स्वर्गात शिरण्याचा प्रयत्न करतो पण त्याला ते जमत नाही. परंतु, नंतर वसुमन, अष्टीक, प्रतार्धन आणि शिवी ह्यांच्या मदतीने तो पुन्हा तेथे पोहोचतो.

ते ऐकल्यावर जनमेजय वैशंपायनाना विनंती करतो, मला आपल्या कडून समजून घ्यावयाचे आहे कीं, प्रथम ययाति स्वर्गात जातो व नंतर थोड्याच काळात तो पृथ्वीकडे फेकला जातो व पुन्हा इतरांच्या बरोबर स्वर्गात शिरतो, हा काय प्रकार आहे. हे येथे जमलेल्या सर्वच साधूंना समजले तर बरे होईल. असें विचारण्याचे कारण, ययाति हा इंद्रासारखाच असतांना हे कां घडले ते समजले पाहिजे. ययाति जगप्रसिद्ध, तेजस्वी, आणि अनेक प्रकारचे यश मिळवलेला होता त्याचे असें कां झाले ते व त्याच्या जीवनातील कारणीभूत प्रसंग स्वर्गातील व पृथ्वीवरील असें सर्वच मला समजून घेण्याची इच्छा आहे. वैशंपायन जनमेजयाला मोठ्या उत्साहाने सांगतात, त्या सर्वच, ययातिच्या जीवनात घडलेल्या घटना, मी तुम्हा सगळ्या शहाण्या मंडळींना आता सांगणार आहे. त्या ऐकल्याने तुमचे पापक्षालन होईल.

वैशापायन नंतर सांगतात, नहुशाचा मुलगा, ययाति त्याच्या सर्वात लहान मुलाला पुरुला, राजगादीवर बसवतो व इतर वडिल मुलांना म्लेच्छ दर्जाला फेकून देतो. त्यानंतर तो महान राजा वनात तपस्या करण्यास निघतो. एकाद्या जोग्याचे जीवन तो जगण्यास सुरुवात करतो. पितर व स्वर्गीय देवांना शुद्ध लोण्याचे अर्ध्य देऊन शास्त्रात सांगितल्याप्रमाणे तपस्या सुरु करतो. तेथे त्याला भेटण्यास येणार्या पाहुण्यांना व त्रयस्थांना तो फळे व कंदमुळं देऊन त्याचा पाहुणचार करतो व स्वतः शेतात पडलेली धान्य गोळा करून त्यावर

गुजराण करत रहातो. अशारितीने तो एक हजार वर्षे रहातो. आहारासाठी फक्त हवा घेतो, निद्रा घेण्याचे टाळतो, अशा तीव्र तपस्या तो अंगिकारतो. संपूर्ण व्रतस्थ जीवन जगतो. शरीराला पिडा देणार्या कष्टकारक यातनामय साधना करतो. चौफेर चार होम करून त्या तापात दिवसा सूर्याच्या तापात तो बसून तपस्या करतो. अशारितीने आणखीन कांहीं काळ तो कठोर तपस्या करत रहातो. एका पायावर उभे राहून सहा महिने तो तपस्या करतो. अशारितीने सर्व साधना त्याकाळातील मान्यतेनुसार पूर्ण करतो. त्यानंतर आपला देह सोडून तो स्वर्गात प्रवेश करतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा श्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग सत्त्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

ययाति, राजांचा राजा, पृथ्वीवरचा कांही काळ स्वर्गात रहात होता. देव, साध्य, वसु, मरुत अशा सर्वांचा तो आवडता झाला होता. स्वर्गात व ब्रह्मात असा तो ये जा करीत असें. वैशापायन नंतर सांगतात, त्यांच्या माहितीनुसार असा तो बराच काळ स्वर्गात रहात होता. असाच एकदा तो इंद्राला भेटण्यास जातो. तेथे इंद्र त्याला विचारतो, "अरे ययाति, जेव्हां तू तुझे अपंगत्व तुझ्या मुलाला, पुरुला दिलेस तेव्हां तू त्याला काय बोललास"? ते ऐकून ययाति त्याला सांगतो, "मी त्याला सांगितले किं, गंगा नदी व यमुना नदी ह्यांच्या मधील सर्व भूमी त्याची आहे. म्हणजे तो पृथ्वीचा मध्य भाग आहे, त्या बाहेरील प्रदेश त्याच्या भावंडांचा आहे. त्याना आणखीन एक सांगितले कीं, जे क्रोध नियंत्रित करू शकत नाहीत त्याच्या पेक्षा क्रोधात अडकणारे (ज्याच्यावर क्रोध झाला आहे तो) जास्त उच्च असतात. जो क्षमा करतो तो क्षमा केलेल्यापेक्षा जास्त उच्च असतो. माणूस इतर प्राण्यांपेक्षा उच्च आहे. माणसांत जे सुशिक्षित आहेत ते अशिक्षितांपेक्षा जास्त उच्च असतात, जर तुला कोणी त्रास दिला तर तू त्याच्या बदल्यात त्याला त्रास देणार नाही, रागावणारा माणूस त्या क्रोधामुळे स्वताच जळत असतो, क्रोधामुळे विवेक नष्ट होतो व त्यामुळे तो पाप करण्यास प्रवृत्त होतो. हिंसक शब्दांचा उपयोग करून इतरांशी तू बोलणार नाहीस, तुझ्या शत्रूचासुद्धा तू कधीही अपमान करणार नाहीस, अपशब्द व पिडा देणारी भाषा ही राक्षसाची लक्षणे आहेत, राक्षसी प्रवृत्तीमुळे दैवी संपदा व दैवी संपत्ती नष्ट होते, सद्गुण तुझा आदर्श असले पाहिजेत, तुझे वागणे पुण्यप्रद आहे कीं, नाही त्यावर बारीक लक्ष ठेव, वाईट भाषा वापरणार्याकडे तू दुर्लक्ष करशील, गुणीजनांचे वागणे तुझा आदर्श असला पाहिजे. वाईट बोलण्यामुळे जे दुःख होते ते तीक्ष्ण बाणांने बोचण्यापेक्षा जास्त त्रासदायक असते, म्हणून शहाणे कधीही वाईट भाषा बोलतांना वापरत नाहीत, ह्या जगातील देवतांची पुजा करण्यासाठी क्षमाशिलता व सद्भाव हींच पुजेची फुलं समजावीत, दयाधर्म व प्रेमळ वागणे हेंच तुझे धोरण असले पाहिजे, नेहमी तू मधूभाषी असले पाहिजेस, तू देण्याच्या स्थितीत असले पाहिजेस, घेण्याची परिस्थिती तुझ्यावर कधीही येणार नाही अशी दक्षता बाळगशील. समाजातील चार वर्णाचे लोक आपली प्रजा आहे. त्यातील ब्राह्मणांना त्यांच्या

वेद विद्या, मंत्रविद्या व यज्ञकर्मात तू नेहमी सहाय्य करशील व त्यांचा आदर करशील. क्षत्रियांना आपले सामर्थ्य मर्यादेने वापरण्यास भाग पाडशील, त्याशिवाय राष्ट्राचे संरक्षण, शस्त्र निर्मिती, लढण्याचे तंत्र ह्यात त्यांना उत्तेजना देशील. वैश्य त्यांच्या शेती, उद्योग, तंत्र, शास्त्र, संशोधन, ज्योतिष, वैद्यकी, गणित, खगोल विद्या, स्थापत्य, शल्य चिकीत्सा इत्यादित काम करण्यासाठी योग्य परिस्थिती राहील असें पहाशिल. शुद्रांचा अपमान होणार नाही हे पहाशिल. त्याशिवाय त्यांना कला, संगीत, नृत्य, पाककला, नाट्य अशा विविध क्षेत्रात काम करण्यासाठी तू उत्तेजन देशील त्यामुळे तुझे राज्य संमृद्ध, संपन्न, सामर्थ्यवान राहील. एक गोष्ट त्याने चांगली लक्षात ठेवावी असें त्याला सांगितले किं, शुद्र जरी चौथ्या श्रेणीचे असले तरी त्यांच्या मदतीशिवाय द्विज आपली कामं चांगली करू शकत नाहीत. म्हणून शुद्रांचा तिरस्कार करण्याने राष्ट्र नष्ट होऊ शकते हे समजून त्याना सांभाळून घे.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा सत्त्यांऐशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठ्याऐंशीवा

(संभव पर्व पुढे चालू)

एवढे सांगून झाल्यावर वैशंपायन पुढे सांगतात, ययातिने असें सांगितल्यावर इंद्र त्याला पुन्हा विचारतात, अरे ययाति तू तुझे कर्तव्य केल्यानंतर वानप्रस्थाश्रम स्वीकारलास, आता नहुशाच्या मुला, मला सांग, वैराग्यातील सत्त्वशिलतेत तू कोणाच्या बरोबरीचा आहेस असें समजतोस? ययाति त्याला उत्तर देतो, माझ्या बरोबरीचे पुरुष, स्वर्गातील गंधर्व, ऋषी असें कोणीही नाहीत असें मला वाटते. ते त्याचे उत्तर ऐकून इंद्र त्याला ताकीद देतो कीं, अरे राजा तू तुझ्या पुण्यसंचाचा असें बोलून र्हास केला आहेस. ज्यांच्या योग्यतेची तुला जराशीही कल्पना नाही अशांचा तू अशारितीने अवमान करुन तुझा पुण्यसंच कमी केला आहेस व म्हणून तू आता स्वर्गात रहाण्यास योग्य नाहीस. मी तुला पृथ्वीवर धाडणार आहे. ते ऐकून ययाति काकुळतीने वसवास, इंद्रास, विनंती करतो किं, पृथ्वीवर पाठवायचे तर निदान मला पुण्यवान लोकांत पाठवा.

ते ऐकून इंद्र त्याला बोलतो, ठिक आहे, तुझी रवानगी पुण्यवान व तुझ्या बरोबरीच्या लोकांत होईल. तेथे तुला आणखीन पुण्यकर्म करण्याची संधीसुद्धा मिळेल. पण अशी चुक तू पुन्हा  करणार नाहीस. तुझा अहंकार अजून निवाला नाही म्हणून असें झाले. वैशंपायन पुढे सांगत रहातात, ययाति स्वर्गातून खाली येऊ लागतो. ते राजर्षी अष्टीक, नागवंशाचा संरक्षण कर्ता, प्रथम पहातात ते त्याला विचारतात, तू कोण आहेस?

इंद्रासारखा देखणा, साक्षात अग्नी असा तेजस्वी दिसतोस. अरे तू तो ढगांतून बाहेर येणार्या सूर्यासारखा दिसतोस. तुला खाली पडतांना पाहून आम्हा सर्वांनी कुतुहल वाटते तुझ्याबद्दल समजून घेण्यासाठी, तरी तू कोण ते सांग. तू प्रथमच आमच्याबद्दल माहीती करून घेतली असती तर असें झाले नसते. आता तरी सांग, तू कोण आहेस म्हणजे तुझी भिती कमी होईल. तू तूर्त पुण्यवंतांच्या व शहाण्याच्या सानिध्यात आहेस. वलाचा वध करणारा शक्रसुद्धा तुझे येथे कांहीं बिघडवू शकणार नाही. म्हणून येथे सुखात रहा, अग्नीच केवळ उष्णता देतो, केवळ पृथ्वी बिजांतून रोपांची वाढ करू शकते, सूर्यच केवळ प्रकाश देत असतो, म्हणून तू पाहुणा आमच्याकडून चांगल्या वागणूकीची अपेक्षा करू शकतोस. ययातिचे अशा प्रकारे त्या पातळीवर स्वागत होते.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा अठ्ठ्यांऐशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकोणनव्वदावा

(संभव पर्व पुढे चालू)

ययाति अष्टकाला सांगतो, मी ययाति, नुहुशाचा मुलगा, पुरुचा पिता, स्वर्गातून फेकला गेलो आहे, जेथे ऋषी व सिद्ध असतात, कारण मी माझा अहंकार आवरू शकलो नाही. माझ्या अहंकारामुळे माझे पुण्य कमी झाले आहे. वस्तुतः मी तुझ्यापेक्षा वयांने मोठा आहे. म्हणून मी तुम्हाला वंदन केले नाही. ब्राह्मण नेहमी त्यांच्यापेक्षा वयाने मोठ्या किंवा ज्ञानाने मोठा किंवा तपस्येने मोठा असलेल्याला आदराने वागवतात.

ते ऐकून अष्टीक त्याला सांगतो, अरे, राजा, तू सांगतोस किं, वयाने मोठा आदरणीय असतो परंतु, शास्त्र सांगते, जो ज्ञानाने, तपस्येने मोठा तोंच खरा आदरणीय असतो व मोठा समजला जातो. ययाति त्यावर सांगतो, मला असें समजते कीं, पापकर्मामुळे पुण्याचा नाश होतो व त्यामुळे त्या इसमाचे मोठेपणसुद्धा कमी होते. अहंकारामुळे माणूस नरकात जातो. गुणीजन वाईट मार्गाने कधीच जात नाहीत. ते नेहमी असें वागतात किं, त्यांचे पुण्य वाढत रहाते. मी फार मोठा पुण्यवान होतो परंतु, माझ्या अहंकाराने ते व्यर्थ ठरले. ते गेलेले पुण्य मी कदाचित कधीच मिळवू शकणार नाही. माझा हा अनुभव सांगतो किं, ज्याला महान व्हायचे आहे तो त्याचा अहंकार नियंत्रित करील. ज्याने गुणवत्ता वाढवली आहे तो अनेक त्याग करून आपला अहंकार मर्यादित ठेवेल. ज्याने कर्तृत्व वाढवले आहे तो सदैव नम्र राहील. ज्यांने वेदांचा अभ्यास केला आहे तो वैराग्यपूर्ण जीवन जगेल. जो प्रापंचिक सुखापासून दूर राहित तो स्वर्गात जाईल. केवळ अफाट यश मिळाल्याने, वेदांचा अभ्यास केल्याने, कर्तृत्व गाजवल्याने इसम स्वर्गात जात नाही हे मी समजलो आहे. निरहंकारी होणे जरुरीचे असते. माणसाचा अहंकार त्याच्या अध्यात्मिक प्रगतीतील मोठा अडथळा आहे हे मी समजलो. सगळी माणसे सारखी नसतात. दैव सर्वशक्तिमान असते व ते आपणच आपल्या गेल्या जन्मातील चांगल्या वाईट कर्माने रचलेले असते. म्हणजे ह्या जन्मातील दैव गेल्य जन्मातील कर्माचा परिणाम स्वरुप असते. केवळ सामर्थ्यवान असून उपयोगाचे नसते. पुढील जन्माचे नशीब आपण ह्या जन्मात रचत असतो. त्यामुळे ह्या जन्मात ते आपण बदलू शकत नाही. म्हणून कोणत्याही अनुभवाने आनंदी अथवा दुःखी न होता निर्व्याजपणे आपण ते अनुभव पहावयाचे असते. आपण जगतांना आपण पुढील

जन्माचे नशीब लिहीत आहोत ह्याचे भान ठेवून आपले काम, विचार ह्यांचे संयमन करावयाचे असते. अरे अष्टीका ह्याची जाणीव असल्यामुळे मी कधीही जास्त सुखी अथवा दुःखी झालो नाही. मला माहित होते कीं, ह्या जगातील सर्व सजीव, निर्जीव त्यांचा भोग काळ संपला कीं, विधात्याच्या आदेशानुसार त्यांच्या ठरलेल्या गतिस जाणार. सुख व दुःख ह्या आपल्या कल्पनांचा खेळ आहे, मानले तर ते सुख व ते दुःख असते म्हणून अष्टीका, मी कधीही सुखी अथवा दुःखी झालोच नाही. सर्वगुणसंपन्न असा ययाति जो अष्टीकाचा आईकडून आजोबा होता, त्याचे हे भाषण संपवल्यावर त्याला अष्टीक विचारतो, आकाशात वास्तव्य करणार्या माझ्या आजोबा, राजाधिराज, ययाति, मला ऐकायला आवडेल त्या सर्व जागांबद्दल जेथे तुम्ही तुमचे आयुष्य मजेत व्यतित केले. आपण अशारितीने बोलतां किं, तुमचा धर्माचा अभ्यास चांगला आहे.

त्यावर ययाति त्याला उत्तर देतो, मी पृथ्वीचा फार मोठा राजा होतो, बराच प्रदेश माझ्या अधिपत्या खाली होता. त्याशिवाय माझ्या दानशूरपणाने मी आणखीन बराच प्रदेश माझ्या संरक्षणाखाली आणला होता. तेथे मी पूर्ण हजार वर्षे राज्य केले. त्यानंतर आणखीन उच्च अशा ठिकाणी जेथे इंद्र रहातो तेथे गेलो. अनेक योजने पसरलेला तो प्रदेश सौंदर्याने भरलेला होता. तेथे मी एक हजार वर्षे होतो. तेथून मी गेलो कांही कधीच नासत, कुजत नाही अशा प्रदेशांत. तेथे मी हजार वर्षे राहिलो, जेथे कोणी माणूस जाऊ शकत नाही. त्यानंतर आणखीन वरच्या भागात मी गेलो. जेथे देव विष्णू, रहातात. तेथे मी मजेत रहात होतो. मी स्वर्गीय प्रदेशांत बराच राहिलो आहे तेथे मी मनात आणीन त्या स्वरुपात जाऊ शके. तेथून मी नंदनवनात गेलो. जेथे अप्सरा विहार करतात. तेथे मी लक्ष वर्षे राहिलो. जेथे फळांनी डवरलेली झाडे होती. सर्वत्र सुगंध पसरलेला असें. अशी अनेक वर्षे गेली. ते सर्व मजेत होत असतांना एका गंभीर आवाजात आकाशवाणी तिनदा झाली किं, माझे पुण्य संपले आहे व म्हणून मी खाली फेकला जाणार आहे. मी खाली घसरू लागलो. मला समजले किं, माझा सुवर्ण काळ संपला आहे तेव्हां मी मोठ्याने ओरडून विचारले, "मी कोठे फेकला जाणार आहे? तेथे मी विनंती केली कीं, माझे आधीचे पुण्यकर्म, त्याग, दानशुरता वगैरे गुण लक्षात घेऊन मला तशांच पुण्यवंतांच्या प्रदेशात न्यावे". तेव्हां तो धीरगंभीर आवाज बोलला, "तू तशाच प्रदेशात जात आहेस जेथे शुद्ध तुपांने यज्ञ चेतावले जातात".

"तसा मी आता तुझ्या भागात आलो आहे. मला हायसे वाटते किं, मला तुमच्यात आणून सोडले आहे".

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एकोणनव्वदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग नव्वदावा

(संभव पर्व पुढे चालू)

ते ऐकून अष्टीक त्याला विचारतो, पाहिजे ते स्वरुप धारण करून तुम्ही लक्षावधी वर्षे नदनवनातील उपवनात राहिलात, मग असें काय कारण झाले किं, तुम्हाला कृतयुगाच्या राजाला, ते सोडून येथे यावे लागले? ते ऐकून ययाति त्याला सांगतो, "पृथ्वीवर जसें ज्याची संपत्ती संपली त्याला त्याचे मित्र, सहकारी, आप्त विसरतात तसेंच येथे जेव्हां तुमचे पुण्यसंच संपतो तेव्हा येथील राजा, इंद्र तुम्हाला खाली फेकून देतो". ते ऐकून अष्टीक ययातिला विचारतो, "मला कुतुहल आहे समजून घेण्यासाठी ते असें कीं, कोणत्या कारणांने माणसाचे पुण्य नष्ट होते. तुम्ही त्या अनुभवातून गेला अहात तेव्हां ते मला सांगा. अहो राजश्री, मला सांगा, कोणत्या पुण्यामुळे अथवा पापामुळे कोणत्या लोकांत माणूस फेकला जातो. तुम्ही ते सर्व जाणता म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

"अष्टीका, आता नीट ऐक, ते सर्व मी तुला सांगत आहे, जे स्वताची स्तुति स्वतः करतात ते भौम नांवाच्या नरकात खितपत पडतात. नंतर ते नरकाचे भोग भोगल्यामुळे अशक्त व कमजोर झालेले आपल्याच कुळात पुनः जन्म घेतात. तेथे ते विविध श्वापदांचे खाद्य बनतात. म्हणून स्वताची स्तुति करण्याची खोड फार घातक असते हे लक्षात ठेव. एवढे बोलून ययाति अष्टकाला विचारतो, आणखीन काय तुला माझ्या कडून ऐकावयाचे ते विचार. अष्टीक विचारतो, "आयुष्य संपल्यावर माणूस मरतो, त्याचे शरीर गिधाडे, मोर, आणि किडे खातात मग तो आत्मा कोठे असतो"? अष्टीक आणखीन विचारतो, "पृथ्वीवर भौम नांवाचा नरक कोठे आहे ते सांगा". ययाति सांगतो, "मला असें वाटते, शरीर नष्ट झाल्यावर तो आत्मा त्याच्या पुढील जन्मीच्या मातेच्या उदरात सुप्तपणे रहातो व योग्य वेळी तो पुन्हा जन्म घेत असावा". ते ऐकून अष्टीक हसतो. नंतर ययाति सांगतो,

"ही पृथ्वी हाच भौम नरक आहे. कारण, येथे जन्मलेला आपले भविष्य पाहू शकत नाही व स्वताच्या मुक्तिसाठी प्रयत्न करू शकत नाही. कांहीं पुण्यवान साठ, सत्तर वर्षे स्वर्गात रहातात व पुण्य संपल्यावर पृथ्वीवर जन्म घेतात. स्वर्गातून जेव्हां ते पडतात तेव्हां जर त्यांच्या वंशजांनी त्यांचे श्राद्ध केले नसेल तर त्यांना कांहीं राक्षस पकडतात".

अष्टीक विचारतो, "आणखीन कोणत्या पापामुळे राक्षस त्याना पकडतात, ते कायमचे नष्ट कां होत नाहीत? खाली आल्यावर कसें गर्भात शिरतात"? ययाति सांगतो, "स्वर्गातून ते सुक्ष्म स्वरुपात खाली येतात. ते पाण्यात प्रथम रहातात. तेथून ते माणसाच्या (पुरुषाच्या, म्हणजे त्याच्या पुढील जन्माच्या पित्याच्या) वीर्यात रुपांतरीत होतात. तेथून ते त्यांच्या आईच्या उदरात शिरतात व अखेरीस फळतात जसें झाडांना फळे येतात. पंचमहाभूतांची त्यात मदत होत असते. सर्वच प्राणी अशारितीने जन्म घेतात".

एवढे ऐकल्यावर अष्टीक ययातिला बोलतो, "मी तुम्हाला हे सगळे विचारतो कारण मला कांहीं शंका आहेत व आपल्याकडून त्याचे निरसन होईल अशी मी अपेक्षा करतो आहे. मला सांगा, हे नव्याने जन्मणारे त्यांच्या देहात डोळे, कान, नाक अशी सर्व इंद्रिये कशी उत्पन्न होतात. जर तुम्ही जाणत असाल तर ते मला सांगा".

ययाति सांगतो, "माझ्या माहितीनुसार, ज्याच्या त्याच्या पूर्व कर्मानुसार ह्या गोष्टी घडतात. तो सुक्ष्म देह (लिंगदेह) मातेच्या गर्भात नैसर्गिक शक्तिंच्या प्रभावामुळे शिरतो. आत्मा त्या लिंगदेहाच्या कवचांत अडकलेल्या अवस्थेत असतो. यथावकाश तो गर्भात वाढत जातो. प्रथम अंकुर असतो, त्याला विविध अवयव त्यातून वाढत जातात व त्यामुळे विविध इंद्रिये त्याला प्राप्त होतात. गर्भातून बाहेर आल्यावर त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव होते. कानाने ऐकणे, डोळ्याने पहाणे, नाकांने श्वास घेणे व गंध ओळखणे, जिभेने रुची ओळखणे व उच्चार करणे असें तो करु लागतो. त्वचेने स्पर्श समजणे, मनाने ह्या सगळ्यांचा यथायोग्य अर्थ काढणे, बुद्धिने विचार करणे असे तो करू लागतो. अशारितीने साधारणपणे त्या जीवाचा विकास होत असतो". अष्टीक नंतर विचारतो, "मृत्यूनंतर तो व्यक्त देह कोठल्याना कोठल्या रीतीने नष्ट होतो मग, तो पुन्हा कसा उत्पन्न होतो? असें कोठले तत्त्व आहे जे त्याला पुन्हा जन्माला घालते?

ययाति अष्टीकाला सांगतो, "माणूस मरतो तेव्हां त्याचा आत्मा पुन्हा त्या सुक्ष्म देहात (लिंगदेहात) जातो. त्या अवस्थेत त्याच्या सर्व जाणीवा शाबूत असतात. फक्त तो त्या व्यक्त करू शकत नाही कारण लिंगदेहाला स्थुल कर्मेंद्रिये (हात, पाय, लिंग, तोंड, त्वचा) नसतात. तो त्याच्या अध्यात्मिक अवस्थेनुसार त्या गतित जातो. पापी त्या दुःख दायक गतित व पुण्यवान सुखदायक गतित जातात. दुष्ट नरकात जातात. अरे, जेवढे मला माहीत

आहे तेवढे तुला सांगितले आहे". अष्टीक ययातिला विचारतो, "मला सांगा, माणूस मेल्यानंतर त्याचे शरीर नष्ट होते मग त्या अवस्थेत तो कसें पाहू शकतो, कसे ऐकू शकतो, कसें रुची ओळखू शकतो व कसें गंध समजू शकतो ते सांगा". ययाति सांगतो, "माणूस मरतो म्हणजे तो देह मरतो. देह मृत झाल्यावर माणूस म्हणजे, तो आत्मा, त्याच्या बरोबर लिंगदेह घेऊन शरीरातून बाहेर पडतो व अवकाशात तरंगत रहातो. त्याचा लिंगदेह सुक्ष्म स्वरुपात असतो व त्या सुक्ष्म लिंगदेहाला सर्व ज्ञानेंद्रिये असल्याने तो त्या सगळ्या जाणीवा करू शकतो. मोक्ष जोवर प्राप्त होत नाही तोवर त्याचा लिंगदेह त्या आत्म्याबरोबर नेहमी असतो. साधारण भाषेत आपण त्या लिंगदेहाच्या अस्तित्वाला पिशाच्च असें सांगतो. लिंगदेहाला कर्मेंद्रिये नसतात म्हणून त्या पिशाच्च अवस्थेत तो पाप किंवा पुण्य असें कांहींही करू शकत नाही. त्यामुळे तो त्याच्या अध्यात्मिक अवस्थेत बदल करू शकत नाही. म्हणून आत्म्याला अध्यात्मिक विकास करण्यासाठी शरीर असणे आवश्यक असते. म्हणून तो आत्मा पुनः पुन्हा जन्म घेत असतो. तरीसुद्धा असा लिंगदेहधारी आत्मा इतर सजीवांना संपर्क करण्याचा प्रयत्न करू शकतो".

अष्टीक ययातिला नंतर विचारतो, "अहो माझ्या पुर्वजा, मला सांग, मोक्ष प्राप्त करण्यासाठी काय आवश्यक असते, त्याग प्रवृत्ती कां ज्ञान, कोण जास्त प्रभावी असते? कृपया एवढे सांगा".

ययाति त्यावर बोलतो, "असे बघ जाणकार जे सांगतात जे मी शिकलो ते असें किं, मोक्षासाठी सात दरवाजे आहेत. ते असें, त्यागवृत्ती, दयाबुद्धि, मनाचा समतोल (चांगल्या वाईट अनुभवांने विचलित न होणे), नम्रता, सर्व प्राणिमात्रांसाठी प्रेम, संयम, साधेपणा. ज्ञानी असेसुद्धा सांगतात, अहंकारामुळे हे सद्गुण नष्ट होतात. ज्यांच्यात हे गुण आहेत त्याला जर त्याचा गर्व झाला तर तो दरवाजा बंद होतो. म्हणजे ते गुण असले तरी त्याचा अहंभाव होता कामा नये. अहंकार माणसासाठी हे मोक्षोचे दरवाजे बंद करतो. असें सांगतात, अभ्यासाने ते शक्य होते. स्तुतीने खुष होणारा व टीकेने चिडणारा असें दोघेही त्या पदासाठी अयोग्य ठरतात. आपल्या ज्ञानाचे, कर्तृत्वाचे, यशाचे श्रेय जो ब्रह्माला देतो व स्वतः नामानिराळा रहातो तोंच मोक्षपदाला जाऊ शकतो. ययाति अष्टीकाला शेवटी बोलतो, "तू असा ब्रह्मपदी आहेस कारण, तू तुझ्या ज्ञानाचे, कर्तृत्वाचे, यशाचे श्रेय ब्रह्माला

देतोस. तुला जर अहंकार झाला तर तू सुद्धा माझ्यासारखा खाली फेकला जाशील. माणूस विसरतो किं, त्याला कोणीतरी पृथ्वीवर धाडले आहे आणि तो त्या शक्तिला त्याच्या कर्माचे जाब देण्यास बांधला आहे. पृथ्वीवर जन्मणारा प्रत्येक प्राणी एका प्रकारच्या परीक्षेस बसला आहे व त्याला त्यात उत्तीर्ण व्हावयाचे असते. जर त्याची जाणीव ठेवून प्रत्येक माणूस आपले आयुष्य व्यतित करील तर तो कधींच पापकृत्य करणार नाही. नैतिक मुल्ये त्यासाठीच सांगितली आहेत ज्ञानी लोकांनी. मला त्यांचा विसर पडला कारण, माझा अहंकार वाढला होता. म्हणून असें झाले". अष्टीक विचारतो, "अहंकाराचे किती प्रकार असतात ते सांगा". ययाति सांगतो, "माझ्या माहीतीनुसार दैविक, सात्त्विक, रजोगुणी, तमोगुणी आणि आसुरी असें प्रमुख पांच असतात. त्याशिवाय इतर प्रकार इतर अवस्थां प्रमाणे असतात. माणसांने त्याचा अहंकार दैविक राहिल असें करावयाचे अशी विधात्याची (जी शक्ति परीक्षा घेते) अपेक्षा असते. देवांचे अहंकार दैविक असतात म्हणून ते देव समजले जातात आणि असुरांचे आसुरी असतात म्हणून ते असुर समजले जातात.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा नव्वदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एक्याण्णवावा

(संभव पर्व पुढे चालू)

अष्टीक बोलतो, जे वेद जाणतात त्यांच्यात मतभेद आहेत हे तुम्ही जाणत असालच, ते मतभेद आहेत मानव धर्मातील (हिंदूंतील) चार जीवन पद्धती बाबत, गृहस्थी, भिक्षूक, ब्रह्मचारी आणि वानप्रस्थी. त्यांनी त्यांची अध्यात्मिक कर्तव्ये कशी करावीत ह्यात ते फरक करतात. ते ऐकून ययाति सांगतो, माझ्या अभ्यासाप्रमाणे, ब्रह्मचारी त्याच्या गुरुच्या घरी रहात असतांना त्याने गुरुच्या आज्ञेनुसार वेदाभ्यास केला पाहिजे. तो गुरुच्या सांगण्याची वाट न पहाता स्वताच्या बुद्धीने त्याला काय पाहिजे व काय नको ते समजून ती कामं करेल. तो गुरुच्या आधी उठेल व गुरु झोपल्यानंतर झोपेल. तो सदैव नम्रपणे वागेल व तो त्याची भोग इंद्रिये पूर्णपणे संयमित ठेवेल. तो सदैव दक्ष असला पाहिजे व तो अभ्यासात हुशार असला पाहिजे. अशारितीने त्याने त्याचे वागणे ठेवले तर तो त्याच्या ब्रह्मचर्यात यशस्वी होईल.

एवढे ब्रह्मचार्याबद्दल सांगून तो पुढे सांगतो, अगदी प्राचीन उपनिषदात गृहस्थाबद्दल काय सांगितले आहे ते आता तुला सांगतो. गृहस्थ उत्तम व नैतिक मार्गांने संपत्ति जमा करील. तो यथोचित यज्ञ करेल. तो सदैव दानं करील, तो त्याच्याकडे येणार्या अतिथीचा यथोचित सन्मानपूर्वक सत्कार करील. त्याच्या मिळकतीचा कांहीं भाग तो संबंधित लोकांत वाटून देईल.

त्याच्या कुवतीनुसार वानप्रस्थी जंगलात राहिल. तो कोणत्याही वासनिक कर्मात त्याचा काळ व्यतीत करणार नाही. कांहीं दान करील ते त्याच्या कुवतीप्रमाणे असेल. तो वनात रहातांना तेथील जीवांना त्रास देणार नाही. अशारितीने संयमाने तो राहिला तरच तो त्या जीवनात यशस्वी होईल.

विद्वान वानप्रस्थी कांहीं योग्य शास्त्रोक्त विधी करून खाण्यावर संयम राखून जगेल. तो गृहस्थीसारखे कमाई करण्याचे प्रयत्न करणार नाही.

आता भिक्षूक कसा जगेल ते सांगतो, भिक्षू कधीही मेहनत करून त्याची उपजिविका करणार नाही. तो त्याच्या शारिरीक वासनांबद्दल उदासिन राहून त्या मर्यादित ठेवेल. तो जीवनाच्या विविध कामांत निष्णात असला पाहिजे. तो जीवनातील घटनांत उदासिनपणे

दुर्लक्ष करणारा असेल. तो गृहस्थाच्या घरात रहाणार नाही. तो एकाच जागी फार काळ रहाणार नाही. तो अविवाहीत असेल. तो देशाच्या विविध भागात फिरत राहिल. जर अशा व्रतस्थ जीवन जगणार्या भिक्षूचे तेथे देहावसान झाले तर त्याच्यासह त्याच्या दहा पूर्वजांचे कल्याण होते.

अष्टीक विचारतो, किती प्रकारचे मुनी असतात? त्यातील किती मौनव्रताचे पालन खरोखर करतात?

ययाति सांगतो, वनात रहाणारा परंतु, वस्तीत घर असलेलासुद्धा मुनी समजला जातो, तसेंच घरात रहाणारा परंतु, वनात जागा असलेला सुद्धा मुनी समजला जातो. अष्टीक त्यावर विचारतो, म्हणजे काय?

ययाति सांगतो, त्याचे असें कीं, जो प्रापंचिक सर्व सांसारी बंधने व आकर्षणांपासून स्वाभाविकपणे विरक्त झाला आहे म्हणून संसारी जगापासून दूर रहाण्यासाठी वनात रहाणे पसंत करतो तो मुनी समजला जातो. संसारी जीवनात रहाण्यामुळे नाही म्हंटले तरी कांहीं व्याप मागे लागतातच ते टाळण्याचा त्या मागे उद्देश असतो. जंगलात राहूनही तो त्याच्या आवश्यक गरजा प्राप्त करू शकतो, त्याच्या वैराग्याच्या सामर्थ्याने. त्याचप्रमाणे, असेंही कांहीं मुनी असतात जे समाजात राहूनही सर्व आकर्षणांपासून मुक्त असतात. असा मुनी कधीही त्याच्या घराण्याचा अथवा सामाजिक प्रतिष्ठेचा गर्व करीत नाही. भिकार्यासारखे वस्त्र नेसला असला तरी तो असा वावरतो जणूकाय, त्यांने श्रीमंती वस्त्र परिधान केले आहेत. वनात जे तुटपुंजे खाद्य मिळेल त्यावर तो बिनातक्रार गुजराण करतो. कोठल्याही गोष्टीत स्वारस्य नसल्यामुळे तो मितभाषी अथवा पूर्ण अबोला पाळतो. तो सदैव आपल्या ध्यानात रमलेला असतो, असा संयमी, व्रतस्थ, त्यागी इसम सर्वांच्या आदरास पात्र ठरतो. जो कारण असतांना अथवा नसतांनासुद्धा कोणालाही इजा करीत नाही, जो इच्छाविरहीत त्रयस्थपणे सर्व भोगांकडे पहातो, तो त्या भोगांचा तिरस्कार करीत नाही अथवा त्यांचे समर्थनसुद्धा करीत नाही, जो अल्पाहारामुळे शरीराने क्षीण, हाडकुळा झाला आहे, परिस्थिती कितीही विरोधात असली तरी सदैव शांत रहातो, तो ब्रह्मस्थितीला पोहोचण्यास लायक असतो. मान, अपमान, सुख, दुःख ह्या अवस्थांपासून तो मुक्त असतो. तो काय खातो, शाकाहार कां मांसाहार काय पितो, दारु कां पाणी कां अमृत त्याचे

त्याला भान नसते जसें आईच्या मांडीवर पिणारे अर्भक तो काय पितो ते जाणत नसतो. जो शरीराच्या भोगांपासून स्वतःला (त्याच्या आत्म्याला) दूर ठेवू शकतो असा मुनी मोक्षप्राप्त करतो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा एक्याण्णववा भाग संपला.

# आदिपर्व भाग ब्याण्णववा

(संभव पर्व पुढे चालू)

अष्टीक ययातिला विचारतो, "अहो राजश्री, बैरागी व ज्ञानी असें दोघेही मोक्षप्राप्तीसाठी चंद्र सूर्यासारखे सतत प्रयत्न करीत असतात मग त्यातील कोणाला मोक्ष जास्त सहजपणे प्राप्त होतो ते सांगा".

ययाति उत्तर देतो, "ज्ञानी वेदाच्या माहितीमुळे जाणत असतो किं, हे जग एक भ्रम आहे त्यामुळे तो मोक्ष जास्त सहजपणे प्राप्त करण्याची शक्यता असते. कारण, ह्या जगाच्या पलिकडे जे अंतिम अस्तित्व आहे तेंच खरे सत्य आहे हे तो ओळखतो. त्या ज्ञानमुळे त्याला ह्या जगातील आकर्षण प्रभावित करू शकत नाहीत. मोक्ष प्राप्ती त्यामुळे सोपी होते. त्या उलट बैराग्याला ते त्याच्या ध्यानमार्गाने समजण्यास बराच अवधी लागतो. हे जग हा एक भ्रम आहे असें ज्ञानी समजत असल्याने तो त्या बद्दल औदासिन्य दाखवून त्या सर्व आकर्षणांपासून दूर सहजपणे राहू शकतो. परंतु, त्या औदासिन्याच्या अवस्थेत जाण्यास योग्याला बराच अवधी लागतो. अशा कारणांने, एकाद्या योग्यास मोक्ष प्राप्त करण्यासाठी एक जन्म पुरेसा नसतो. त्या परिस्थितीत त्याने कमावलेली साधना त्याच्या बरोबर त्याच्या लिंगदेहात सामावली जाते व त्याच्या पुढच्या जन्मी त्याला पुन्हा प्राप्त होते. अशा दैवी व्यवस्थेमुळे ह्या जन्मात मिळवलेली अध्यात्मिक संपदा त्या योग्याला त्याच्या पुढच्या अवतारात उपयोगी येते व त्याची मोक्ष साधना पुढे चालू राहू शकते. म्हणजे कदाचित एक ज्ञानी एका जन्मात मोक्षप्रद होऊ शकतो पण तसें बैराग्याच्या बाबत शक्य नसते. योगी असो किंवा ज्ञानी असो, शरीराच्या गरजांमुळें बर्याचवेळा दोघेही वास्तविक गोष्टींत आकर्षित होऊ शकतात, असें झाले तर ज्ञानी त्या आकर्षणांमुळे जास्त लवकर ज्ञानभ्रष्ट होऊ शकतो, योगी मात्र त्याच्या भोगइंद्रियांवरील संयमांमुळे तितक्या सहजपणे भ्रष्ट होत नाहीत. मात्र जर ज्ञानी साधकाचे ज्ञान सदैव जागृत असेल तर तो शरीराच्या गरजांच्या आहारी न जाता त्या, औदासिन्यपूर्वक राहून, पूर्ण करू शकतो व जर असें त्याला जमले तर तो भ्रष्ट होत नाही. त्यासाठी त्याला शरीराच्या आवश्यक गरजांचा सन्मान करून तेवढ्याच ठेवण्याची मर्यादा समजण्याची समज असावी लागते". पुढे ययाति सांगतो,

"आयुष्यात बर्याच गोष्टी साधकाला एक कर्तव्य म्हणून कराव्या लागतात, त्या करतांना त्यात गुंतून न जाता त्या करणे ह्यालाच योग असें समजले जाते".

अष्टीक विचारतो, "राजर्षी मला सांगा कुरुवीर्य राजाने आयुष्यभर अनेक दानं केली, गरीबांना मदत केली, अन्नछत्र चालविली, आजारी लोकांना औषधी दिल्या असें सर्व सेवाकार्य करूनही तो मृत्यूनंतर नरकांत कां गेला ते सांगा". ययाति सांगतो, "अरे ऋषी अष्टीका, कुरुवीर्य राजांने ते सर्व त्याचा अहंकार वाढवण्यासाठी व प्रजेत महत्व मिळवण्यासाठी केले होते, ते त्याचे कार्य कितीही उत्तम होते तरी ते त्याचा रजोगुणी अहंकार वाढवत होते ते कार्य ब्रह्माच्या सेवेत नव्हते त्यामुळे ते काम जरी वरकरणी सेवा वाटत असले तरी त्यात सुप्तपणे असुरसंपदा होती म्हणून तो नरकात गेला, त्यांने केलेल्या कांमाने पुण्य वाढत नव्हते. रजो व तमोगुणांनी जे कार्य केले जाते ते कितीही चांगले प्रथमदर्शनी वाटले तरी ते पापकारक असू शकते. त्या दोन गुणातील अहंकार विकृत असतो. म्हणजे हे लक्षात घे किं, कामापेक्षा त्या मागील उद्देश जास्त महत्वाचा असतो".

अष्टीक त्यानंतर ययातिला विचारतो, "अहो राजे, तुम्ही देखणे दिसता, तुमच्या गळ्यात स्वर्गीय माळा आहेत, तुमचे तेज लक्षणीय आहे, मला कुतुहल वाटते किं, आपण कोठून आला अहात व कोठे जाणार अहात ते सांगाल तर बरे. आपण कोणाचे संदेशवाहक अहात"? ययाति त्यावर सांगतो, अरे अष्टीका, माझे पुण्य मी संपवले त्यामुळे आता मी पृथ्वीवरील नरकांत फेकला गेलो आहे. तुझ्याशी हे माझे संभाषण संपले कीं, मी तेथे जाईन. आत्ता सुद्धा यमाचे दूत मला आग्रह करीत आहेत किं, मी माझे तुझ्याशी होत असलेले संभाषण त्वरित संपवून त्यांच्या बरोबर पृथ्वीवरील नरकात जावे. मला इंद्राने दुवा दिला आहे किं, जरी मी पृथ्वीवर गेलो तरी तेथे मी गुणी व ज्ञानी लोकांतच राहीन.

मी पहातो, येथे तुम्ही सर्व गुणीजन जमला अहात.

अष्टीक बोलतो, आपण सर्व जाणता म्हणून मी आपल्याला विचारतो किं, अरे राजा, तेथे कोठे असा प्रदेश आहे ह्या आकाशात जेथे मी स्वर्गीय सुख मिळवू शकेन? जर अशी जागा असेल तर तू पृथ्वीवर कोसळणार नाहीस. ते ऐकून ययाति त्याला उत्तर देतो, अहो राजश्री, तेथे बर्याच जागा आहेत जेथे तू स्वर्गीय सुख मिळवू शकतोस. तेथे जनावरं, घोडे, जंगलं, डोंगर, नद्या असें सगळे आहे. ते ऐकून अष्टीक ययातिला सांगतो, अरे राजा जर

तेथे माझ्या पुण्यकर्मामुळे अशा जागा स्वर्गात असतील तर त्या सगळ्या मी तुला देण्यास तयार आहे. तसें झाले कीं, तू पृथ्वीवर कोसळणार नाहीस. जा राजा तू त्या सर्व जागा घे म्हणजे तू स्वर्गात राहू शकशिल, म्हणजे तुझे दुःख संपेल.
ते ऐकून ययाति उद्गारतो, अरे राजश्री, ब्रह्माला जाणणार्या ब्राह्मणा, तू जाणतोस कीं, फक्त तसांच ब्राह्मण अशी दानं स्वीकारू शकतो. मी स्वतः अनेक लायक ब्राह्मणांना दानं केली आहेत. मी त्या योग्यतेचा नसल्याने अशी दानं मी घेऊ शकत नाही. अष्टीका बरोबर असलेल्या प्रतर्दन नांवाचा स्वर्गीय ब्राह्मण मध्येच बोलला, अहो, सौंदर्यवान राजा ययाति, मला तू सांग, माझ्यासारख्या ब्रह्मसिद्धाकरता कांहीं प्रदेश ह्या आकाशात आहे कां? तू सगळे जाणतोस म्हणून मी तुला विचारत आहे.
ययाति सांगतो, अशा असंख्य जागा आहेत ह्या जगात जेथे विना व्यत्यय तू तुझे अध्यात्मिक जीवन जगू शकतोस. इतक्या जागा आहेत किं, जरी तू प्रत्येक जागी आठवडाच राहिलास तरी अनेक वर्षे तुला पुरतील अशा जागा आहेत. ते ऐकल्यावर प्रतर्दन ययातिला सांगतो, अशा सगळ्या  जागा स्वर्गातील व आकाशातील, मी तुला देऊन टाकतो तेथे तू जा म्हणजे तुझी भिती संपेल.
ते ऐकून ययाति त्याला पुन्हा सांगतो, माझ्या सारखा समर्थ राजा, तुमच्या तपस्येने तुम्हाला मिळालेले स्थान घेऊ शकत नाही. जो राजा माझ्यासारख्या अडचणीत सापडला आहे तो सावधगिरीनेच त्याचे निर्णय घेईल. केवळ कोणी कांहीं मदत करतो म्हणून व ती मदत वरकरणी सोयिस्कर दिसते म्हणून तो ती कधीही स्वीकारणार नाही. तो त्याच्या जबाबदार्या चांगल्या ओळखून निर्णय घेईल. तो कधीही दानं स्वीकारणार नाही. जर तुम्ही, जे अध्यात्मिक प्रगती करता, कधीही दानं स्वीकारत नाही, तर मी तुमच्या कडून कसे दान स्वीकारणार?
ययातिचे ते प्रभावी अर्थपूर्ण बोलणे ऐकल्यावर तेथे हजर असलेले वसुमत त्याला सांगतात.
अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा ब्याण्णववा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्र्याण्णववा

(संभव पर्व पुढे चालू)

वसुमत ययातिला सांगतो, मी वसुमत, उशदस्वाचा मुलगा. मला तुम्हाला कांहीं विचारावयाचे आहे. माझे अध्यात्मिक पुण्य पहाता माझ्यासाठी कांहीं पुण्यप्रद जागा ह्या आकाशात आहेत कां? तुम्ही सगळ्या अशा जागांबद्दल जाणता, म्हणून हे विचारत आहे. ययाति त्याला सांगतात, तुझ्या पुण्याईच्या योग्यतेच्या बर्याच जागा पृथ्वीवर व आकाशात आहेत जेथे सूर्याचे किरण पोहोचतात.

ते ऐकल्यावर वसुमत त्याला सांगतो, मी त्या सगळ्या तुला देतो म्हणजे तू पृथ्वीवर फेकला जाणार नाहीस. जर तुला त्या दान म्हणून घेणे अप्रस्तुत वाटत असेल तर तू त्या माझ्याकडून विकत घे. त्यांची सगळी किंमत मी करतो आहे, वसुमत जवळील एका तृणाकडे निर्देश करून बोलतो, हे तृण! ते ऐकून ययाति त्याला सांगतो, अरे ब्राह्मणा, मी कधीही अयोग्य मुल्याला कांहींही विकत घेतल्याचे आठवत नाही. अशारितीने कोणताही खरा राजा व्यवहार करीत नाही मग मी कसा करणार? जर तुला विकत घ्यावयाचे नसतील तर भेट म्हणून घे कारण मी कधीही त्या जागी जाणार नाही. त्यांचा मला कांहीं उपयोगसुद्धा नाही म्हणून तू त्या घ्याव्यास.

ययातिला सिवी सांगतो, मी उशिनराचा मुलगा, माझे नांव सिवी, माझ्या योग्य ज्या जागा तुमच्या दृष्टीने असतील त्या मी तुम्हाला देण्यास तयार आहे. कारण, मी तेथे कधीही जाणार नाही, त्यांचा मला कांहींही उपयोग नाही. अशा जागात ज्ञानी माणसास शांति मिळत नाही. विकत नाही तर भेट म्हणून तू घेऊ शकतोस.

अहो सिवी तू इंद्रासारखा तेजस्वी, सामर्थ्यवान आहेस तुझ्या योग्यतेच्या जागा अप्रतिम आहेत पण मी दुसर्याने सोडलेल्या जागा स्वीकारू शकत नाही.

ते ऐकून अष्टीक त्याला बोलतो, अहो राजश्री, आम्ही सगळ्यानी तुम्हाला मदत करण्याची इच्छा दाखवली. परंतु, तुम्ही ती घेण्यास असमर्थ असल्याचे सांगितले कारण ती घेणे तुमच्या सिद्धांतात बसत नव्हते. जर तू त्या स्वीकारल्या असत्यास तर आम्हाला पृथ्वीवरील नरकात जांवे लागले असते. ते ऐकून ययाति त्यांना सांगतो, तुम्ही सगळे सत्यप्रत अहात, मला मदत करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नाने ते दाखवून दिले. परंतु, मी जे

आधी कधी केले नाही ते भविष्यातसुद्धा करू शकत नाही. ते ऐकून अष्टीक त्याला स्मित करत सांगतो, तेथे पहा पांच सोनेरी घोडे असलेला रथ आहे, तो कोणासाठी आहे, कोण तो चालवतो?

ययाति त्यावर बोलतो, तो अग्नीसारखा चमकणारा रथ स्वर्गाकडे जाणारा आहे. तो तुम्हाला तेथे घेऊन जाणार आहे. अष्टीक ययातिला सुचवतो, राजे आपणसुद्धा चला त्यातून कारण, आपण आमच्या परिक्षेत उत्तीर्ण झाला अहात. आम्हाला दिलेल्या उत्तराने तुम्ही तुमचे गेलेले पुण्य परत मिळविले आहे. आपण सर्वच स्वर्गाकडे जाऊ. स्वर्गात गेल्यावर पृथ्वीवरील भोग भोगण्याची वासना अंगिकारावयाची नसते हे तुम्ही शिकलात म्हणून तुमचे गेलेले पुण्य तुम्हाला प्राप्त झाले. आम्ही तुमच्या मागोमाग येत आहोत. ययाति त्या सगळ्यांना बोलतो, चला आपण एकत्रच त्या रथातून जाऊ. कारण आपण सर्वांनी स्वर्ग जिंकला आहे. पहा स्वर्गाचा मार्ग दिसू लागला आहे.

एवढे सांगून ऋषी वैशंपायन पुढे सांगू लागतात, एवढे बोलणे झाल्यावर ते सर्व तपस्वी त्या रथातून स्वर्गाकडे निघतात. त्यांच्या त्या चमकणार्या रथामुळे सर्व आसमंत उजळून निघाले होते. तेवढ्यात अष्टीक विचारतो, अरे, तो सिवी कोठे दिसत नाही? मला वाटत होते कीं, इंद्र माझा सर्वात चांगला मित्र आहे पण येथे पहाता असें दिसते कीं, उशिनराचा मुलगा माझ्यापेक्षा जास्त पुढे आहे. ययाति त्यांना सांगतो, ह्या सिवीने त्याचे सर्वस्व ब्रह्माला देऊन टाकले, त्याचे वैराग्य, तपस्या, सत्यप्रति, पुण्य, नम्रपणा, दैव, क्षमाशिलता, प्रेमळपणा, सहृदयता, सर्वांना मदत करण्याची प्रामाणिक इच्छा ह्या गुणांमुळे तो सर्वांच्या पुढे जात आहे.

वैशंपायन सांगत असतात, कुतुहलाने प्रेरित झालेला अष्टीक त्याच्या आईकडूनच्या आजोबास, जो प्रति इंद्रच आहे,  विचारतो, "अहो राजश्री, मी पुन्हा तुम्हाला विचारतो आपण कोठून अहात, आपण कोणाचे पुत्र, आपण जी पुण्यकृत्ये केलीत पृथ्वीवर ती केलेला दुसरा कोणी ब्राह्मण अथवा क्षत्रिय आधी होऊन गेला आहे कां? मला खरे ते सांगा".

ययाति त्यावर त्याला सागतो, मी ययाति, नुहुशाचा मुलगा, पुरुचा पिता, सर्व पृथ्वी मी जिंकली. मी पृथ्वीचा मालक होतो, तुम्ही सगळे माझे नातलग अहात, मी सर्व जग

जिंकल्यानंतर ब्राह्मणांना दानं केली. त्यात वस्त्रं, यज्ञासाठी उत्तमोत्तम घोडे वगैरे बरेच कांहीं होते. त्यामुळे जे पुण्य मला मिळाले त्यामुळे इंद्र माझ्यावर संतुष्ट झाला. ब्राह्मणांना मी पृथ्वीवरील सर्व घोडे, हत्ती, गुरंढेरं, दागदागिने, शंभर अब्ज उत्तम दुध देणार्या गाई दिल्या. ज्यामुळे ते चांगला यज्ञ करू शकत होते. हि पृथ्वी व आकाश माझ्या ह्या पुण्यकर्मामुळे टिकून आहेत. अग्नी तेवत आहे कारण माझे हे पुण्यकर्म, मी हे जे सांगतो त्यातील एकही शब्द खोटा नाही. अरे अष्टीका, प्रतर्दना, वसुमत, सिवी हे जे मी तुम्हाला सांगतो, ते फक्त सत्य आहे, दुसरे कांहींही नाही".

मला माहीत आहे किं, हे जग चालते ते केवळ सत्याच्या जोरवर. जो कोणी हे आपले स्वर्गावरोहण ब्राह्मणांना सांगेल तोसुद्धा स्वर्गात जाईल. अशारितीने ययाति त्याच्याच वंशजांच्या मदतीने स्वर्गाच्या दरवाजात जातो. त्याच्या किर्तीने तिनही जगं संपन्न झाली.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा त्र्याण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौर्याण्णववा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, अहो आदरणीय ऋषी, माझ्या माहितीनुसार पुरुचे वंशज सद्वर्तनी होते, त्यातील कोणीही निपुत्रिक नव्हते. त्यांचे सामर्थ्य अप्रतिम होते. मला सांगा त्या सर्व राजांचा इतिहास जे पुरुचे वंशज सुसंस्कृत, सुविद्य व कर्तृत्ववान व जे पुण्य प्रतापी होते.

तू विचारत आहेस म्हणून आता मी तुम्हा सर्वांना त्या प्रतापी राजांची माहिती सांगतो. त्यांच्या अनेक उत्तम गुणांमुळे ते सर्व ऋषीवरांत आदरणीय झाले होते. पुरुला त्याच्या पत्नी पौषथी पासून तीन मुलगे झाले. त्यांची नांवे, प्रवीर, ईश्वर व रौद्रस्व. सगळे महारथी होते. त्यांतील प्रवीर पुरु साम्राज्याचा कर्ता होता. प्रवीराला त्याची बायको सुरसेनी पासून एक मुलगा झाला होता. त्याचें नांव मनश्यू होते. त्याचे राज्य चार समुद्राने सिमीत केलेले असें विस्तीर्ण होते. मनश्यूची पत्नी सौवीरी, तिच्यापासून त्याला तीन मुलगे झाले, त्यांची नांवे शक्त, सहन व वग्मी. ते सगळे मोठे थोर योद्धे व महारथी होते. बुद्धिमान रौद्रस्वाला अप्सरा मिश्रकेशी पासून दहा मुलगे झाले. ते सगळे मोठे तिरंदाज होते. ते मोठे योद्धे म्हणून ख्यातनाम झाले. त्यांनी अनेक यज्ञ विविध देवतांना प्रसन्न करण्यासाठी केले. त्या सर्वांना अनेक मुलं झाली जी सगळी गुणी व विद्वान होती. अनेक शास्त्रात ते प्रवीण होते. ते पुण्यप्रद होते. त्याच्यातील ऋचेयु व कस्बेयु, व्रिकेयु मोठे शक्तिमान होते, आणि स्थंदीलेयु, वनेयु व जलेयु त्याच्या कर्तृत्वामुळे ख्यातनाम झाले. तेजेयु ताकदवान व हुशार होता. सत्येयु इंद्रासारखा तेजस्वी होता. धर्मेयु, सनतेयु स्वर्गीय कर्तृत्वासाठी ओळखले जात होते. परंतु, त्यातील ऋचेयु राज्याचा वारसदार झाला. त्याला अनाध्रिष्टी असा किताब मिळाला म्हणून तो त्या नांवाने प्रसिद्ध झाला. कर्तृत्वात तो स्वर्गातील वसवासारखा होता. अनाध्रिष्टीला एक मुलगा होता त्याचें नांव मतिनर होते व त्याने त्याच्या कुळातील इतरांप्रमाणे कर्तबगारी गाजवली व राजसूय व अश्वमेध यज्ञ केला. मतिनराला चार मुलगे झाले ते सगळे कर्तबगार होते. त्यांची नांवे, तंशु, महत, अतिरथ, द्रह्यु. ते त्याच्या कर्तबगारीने सर्वत्र मशहूर झाले. त्यातील तंशु पुरुच्या वंशाचा वारस झाला. त्यांने सगळी पृथ्वी जिंकली व सर्व विरोधकांचा नाश केला. तंशुला इलीना नांवाचा

मुलगा झाला. इलीनाला त्याची बायको, रथन्तर्या पासून पांच मुलगे झाले. त्यातील सर्वात मोठा, दुश्मंत, त्यासह सर्व भावंड, सुर, भीम, प्रवसू आणि वसू त्याच्या सारखीच सामर्थ्यवान होती.

जनमेजया, त्यातील दुश्मंत गादीवर आला. त्याला त्याच्या पत्नीपासून भरत नांवाचा पुत्र झाला जो त्याच्या राज्याचा राजा झाला. त्यांने त्याचे नांव त्याच्या पासून होणार्या वंशास दिले. त्यापासून त्या घराण्याचा उदय झाला. भरताला त्याच्या तीन बायकांपासून नऊ पुत्र झाले. भरताची मुलं त्याच्यासारखी कर्तबगार नव्हती. त्यामुळे तो नाराज असें. ते पाहून त्याच्या तिनही बायका इतक्या चिडल्या किं, त्यांनी त्यांची मुलं मारून टाकली. भरताचा वंश नष्ट झाला. भरताने त्यासाठी एक यज्ञ केला व भारद्वाज ऋषीच्या कृपेने त्यास एक मुलगा झाला ज्याचे नांव भुमन्यु. पुरुचा वंशज भरत त्यालाच आपला वारस समजून त्याची उत्तराधिकारी म्हणून नेमणूक करतो. भुमन्यु राज्य चांगले करतो व त्याला त्याची बायको पुश्करीणी पासून सहा मुलं होतात. त्यांची नांवे, सुहोत्रा, सुहोत्री, सुहवी, सुयाजू, दिवीरथ. सर्वात मोठा सुहोत्रा गादीवर बसतो. तो अनेक राजसूय व अश्वमेध यज्ञ करतो. सुहोत्रा राज्याचा विस्तार करतो. त्याचे राज्य धनदौलत, गुरंढोरं, हत्ती, घोडे, रथ ह्यांने विपुल झाले. तरी त्या काळात पृथ्वीवरची माणसांची संख्या इतकी वाढली कीं, त्याचा भार पृथ्वीला पेलेना. ते संकट टाळण्यासाठी सुहोत्रा आपल्या राज्यात ठिकठीकाणी यज्ञकुंड तयार करून यज्ञ करू लागला . सुहोत्राला त्याच्या पत्नी, ऐक्शकीपासून, तीन मुलगे होतात. त्यांची नांवे, अजमीना, सुमिदा व पुरुमिदा अशी होती. त्यातील मोठा मुलगा अजमीना त्या राज्याचा वारस झाला. त्याला सहा मुलं झाली, रिक्श धुमिनीला झाला, दुश्मंत व परमेस्थीनी नीलीपासून झाले. जन्ह्यु, जल आणि रुपीना केशीनीला झाले. सर्व पांचाल परंपरा दुश्मंत व परमेस्थीनीचे वंशज आहेत आणि कुशिक जन्ह्युची प्रबळ मुलं आहेत. रिक्शा जो जल व रुपीनपेक्षा मोठा होता तो गादीवर बसला. रिक्शाला संवर्ण झाला. तो त्याच्या राजवंशाचा पूर्वज ठरला. संवर्णाने मोठे राज्या प्रस्थापित केले. त्याच्या राज्यात भयानक दुष्काळ, महामारीच्या साथी, पूर, अशी अनेक संकटे आली व त्यात शत्रूंच्या स्वार्यापुढे तो भरत वंश हार मानतो व पांचाल मोठ्या तयारीने सगळी पृथ्वी पादाक्रांत करतात. ते भरतांचासुद्धा पराभव करतात. संवर्ण आपल्या परिवार व मंत्र्यांना

घेऊन पलायन करतो. तो सिंधू नदीच्या तटावर जंगलात आसरा घेऊन रहातो. तेथे ते एक किल्ला बनवून त्यात हजार वर्षे रहातात. एके दिवशी ऋषी वसिष्ठ त्यांच्या कडे येतात. त्यांचे ते भरताचे वंशज त्यांचे मोठ्या आदरपूर्वक स्वागत करतात. वसिष्ठ ऋषींचे अशारितीने आदरतीथ्य केल्यावर ते त्यांना त्यांचे राजगुरू होण्याची विनंती करतात. ते ऋषीला सांगतात कीं, जर ते त्यांचे राजगुरू झाले तर भरत वंशाचे लोक पुन्हा भरभराटीस येऊ शकतील. वसिष्ठ ऋषी त्याला मान्यता देतात.

वैशंपायन नंतर सांगतात, असे ऐकिवात आहे कीं, वसिष्ठ ऋषी भरत वंशाला सर्व क्षत्रियांचे प्रमुख नेमतात. वसिष्ठ ऋषींच्या मंत्र सामर्थ्याने ते भरत कुळी संवर्ण वंशाचे राजे सर्व शक्तिमान होतात. भरत कुळी त्यांचे गेलेले राज्य पुनः जिंकून घेतात. अशारितीने ते इतर सर्व राजांना त्यांचे मांडलिक बनवतात. ते अनेक यज्ञ व ब्राह्मणांना महागडी दानं करतात.

संवर्णाला त्याच्या पत्नीपासून, ताप्तीपासून, एक कन्या, सूर्या, होते. तिला मुलगा होतो, त्याचे नांव कुरु. कुरु अतिशय सत्शिल असतो म्हणून त्याला त्याच्या राज्याची प्रजा गादीवर बसवतात. त्याच्या नांवावरून कुरु जंगल ख्यातनाम झाले. त्याच्या तपस्येमुळे त्या क्षेत्राला कुरु क्षेत्र असें नांव प्राप्त झाले. त्याची बुद्धिमान पत्नी वहिनी, तिला पांच मुलं झाली. त्यांची नांवं, अविक्षित, अभिश्यत, छत्ररथ, मुनी आणि ख्यातनाम जनमेजय. अविक्षीताला झाला शक्तिमान परिक्षीत, सवोलस्व, आदिराजा, विराजा, बलमली, शक्तिमान उचैश्रव, भंगकर व जितारी असें आणखीन आठ पुत्र झाले. अशारितीने त्या कुळात त्याच्या तपस्येमुळे एकाहून एक असें शूरवीर, महारथी, कर्तृत्ववान तेजस्वी सात राजे उत्पन्न झाले. परिक्षिताला राजकारण, धर्मकारण व हितवर्धन ह्या विषयाचे ज्ञान असणारे पुत्र झाले. त्यांची नांवं अशी, कक्षसेन, उग्रसेन, चित्रसेन आणि इंद्रसेन, सुसेना, भिमसेन होती. परिक्षिताचीहि सगळी मुलं ख्यातनाम झाली. जनमेजयाची मुलंसुद्धा प्रतिथ यश होती. त्यात मोठा ध्रुतराष्ट्र त्यानंतर पंडू आणि वल्हिक, निषाध हे सगळे मोठे शक्तिशाली होते. त्याशिवाय नांव घेण्यासारखे जम्वुनाद, कुंद्घोदर , पडती, वसती आठवा असें होते. हे सगळे राजे गुणवान, ज्ञानी व सर्व प्राणिमात्रांबद्दल भूतदया असणारे, दैवीसंपदा असलेले होते. त्यातील मोठा ध्रुतराष्ट्र गादीवर बसला. त्याला आठ पुत्र होते. कुडिक, हस्ती, वितर्क, क्रथ पांचवा, हवित्श्रव, इंद्रभ, अजिंक्या असा भूमन्यु. त्याला अनेक नातवंडं होती.

त्यांतील फक्त तीन ख्यातनाम होते. त्यांची नांव अशी, प्रदीप, धर्मेत्र व सुनेत्र. ह्या तिघांतील प्रदीप अजिंक्य ठरला. त्याला तीन मुलं झाली. त्यांची नांवं अशी, देवपी, संतनु व महारथी वल्हिक. त्यातील मोठ्या देवपीने आपल्या दुसर्या भावंडांसाठी संन्यासधर्म स्वीकारला. त्यामुळें राज्यकारभार संतनु आणि वल्हिक अशा दोघांकडे आला. ह्याच्या शिवाय भरत वंशात अनेक तेजस्वी व महारथी असें थोर राजे उत्पन्न झाले आहेत. त्यांचे तेज ऋषींसारखे प्रखर असें, स्वर्गीय सामर्थ्य त्यांच्यात होते. त्याचप्रमाणे, मनुच्या वंशातसुद्धा तसेंच गुणी ऋषीतुल्य राजे जन्मले होते त्यांच्या कर्तृत्वामुळें ऐल घराण्याचा प्रचंड विकास झाला.

अशारितीने आदिपर्वातील संभवपर्वाचा चौर्याण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग पंच्याण्णवावा

(संभव पर्व पुढे चालू)

जनमेजय बोलतो, अहो ब्राह्मण, मी आता पर्यंत त्या महान पूर्वजाचा इतिहास ऐकला. आपण ह्या उच्च घराण्यात जन्मलेल्या सम्राटांबद्दलची माहिती सांगितली. परंतु, हा सर्व इतिहास इतका संक्षिप्त स्वरूपात आपण सांगितला ते मला रुचलेले नाही. म्हणून अहो श्रेष्ठ ब्राह्मणा, मनुपासून नंतरचा तो इतिहास जास्त तपशिलात जाऊन आपण सांगू शकाल कां? अशा पवित्र आठवणी ऐकण्यास कोणाला नाही आवडणार? त्या महान राजांची किर्ती त्यांच्या अनेक सद्गुणांमुळे, इतकी पसरली तिन्ही जगात किं ती पुनः पुन्हा ऐकण्याचा मोह होतो जसें अमृत पिण्याचा व्हावा. त्यांचे शहाणपण, पुण्यसिद्धी, कर्तृत्व, नैतिकता, धैर्य, संयम, क्षमाशिलता, मनोनिग्रह हे समजण्यासाठी कोणाही चांगल्या राजाला उत्सुकता होणे समजण्यासारखे आहे. ते ऐकून वैशंपायन म्हणतात, असें असेल तर ऐक हे राजा, मी तुला ते सर्व तपशिलात जाऊन सांगतो. जो द्वैपायनांनी पूर्वी सांगितला आहे.

दक्षाला अदिती झाली व तिला विवस्वात, विवस्वातला मनु आणि मनुला ईला व ईलाला पुरुरव झाला. पुरुरवाला अयुष, अयुषला नहुष आणि नहुषला ययाति. ययातिच्या दोन बायका होत्या. त्यातील एक देवयानी, उशनसाची मुलगी व दुसरी शर्मिष्ठा वृशपर्वाची. येथे एक गोष्ट मला आठवते, जी ययातिच्या वंशजांबद्दल आहे, देवयानी यदु व तुर्वसु अशा दोन मुलांना जन्म देते. यदुच्या वंशजांना यादव म्हणतात आणि पुरुच्या वंशजांना पौरव. पुरुला त्याची बायको कौसल्या, तिला त्याच्यापासून एक मुलगा होतो त्याचे नांव जनमेजय. जनमेजय तीन अश्वमेध यज्ञ आणि विश्वजित यज्ञ करतो. त्यानंतर तो वनात जाऊन राहतो, तेथे तो माधवाची मुलगी अनंता बरोबर लग्न करतो. तिच्यापासून त्याला प्रचिन्वत होतो. प्रचिन्वत पूर्वेकडील सर्व प्रदेश जिकून तेथे साम्राज्य स्थापन करतो. प्रचिन्वत यादव कन्येशी लग्न करतो. तिच्यापासून त्याला सन्यति होतो. सन्यति नंतर दृषद्वताची मुलगी वरंगी बरोबर लग्न करतो. त्यांना अह्यंति नांवाचा मुलगा होतो. तो कृतवीर्याची मुलगी, भानुमति बरोबर लग्न करतो. त्याला तिच्यापासून एक मुलगा होतो त्याचे नांव सर्वभौम. सर्वभौम केकया राजपुत्राची कन्या सुनंदाशी राक्षस विवाह करतो. त्यांना जयत्सेन होतो. तो शुश्रवाशी विवाह करतो. तिचा बाप विदर्भाचा राजा असतो. त्यांना अवचिन होतो.

त्यांचा मुलगा पुनः विदर्भातील राजकन्या मर्यादाशी लग्न करतो. त्यांना अरिहन होतो. तो अंगीशी लग्न करतो त्यांना महाभौम होतो. तो प्रसेंजिताच्या मुलींशी लग्न करतो जिचे नांव असते सुयजा. त्यांना एक मुलगा होतो, अयुतनयी. त्याला असें नाव नंतर मिळाले कारण, त्यांने जो यज्ञ केला त्यात सर्पण म्हणून दहा हजार नरांचे मेद (चरबी) वापरले गेले. तो पृथुश्रवाच्या मुलीशी लग्न करतो. तिचे नांव कामया होते. त्यांना एक मुलगा होतो त्याचें नांव अक्रोधन होते. तो कलिंग देशाच्या राजकन्येशी, करंभेशी लग्न करतो. त्यांना देवतिथी होतो. देवतिथी मर्यादाशी लग्न करतो. ती विदर्भदेशाची राजकन्या असते. त्यांना मुलगा होतो त्याचे नांव अरीहन. अरिहन सुदेवाशी लग्न करतो. ती अंग देशाची राजकन्या असते. त्यांना मुलगा होतो त्याचे नांव रिक्षा असते. तो ज्वालाशी लग्न करतो. ती तक्षकाची मुलगी होती. त्यांना मतिनर होतो. मतिनर त्याच्या काळात सरस्वती नदीच्या किनारी एक तप करतो ते अतिशय यशस्वी होते. त्या तपामुळे प्रसन्न झालेली सरस्वती स्त्रीरुप धारण करून अवतरते व मतिनराला तिच्याशी लग्न करण्याची विनंती करते. त्या लग्नातून एक पुत्र होतो त्याचे नांव तंगशु. तंगशुला एक मुलगा होतो, त्याचे नांव ईलिना. त्याची पत्नी कलिंग देशाची राजकन्या होती. ईलिनाचा विवाह रत्नतथीशी होतो व त्यांना पांच मुलं होतात. त्यातील दुश्मंत सर्वात मोठा असतो. तो शकुंतलेशी कसा विवाह करतो ते आपण आधी पाहिले आहेच. त्यांना सर्वदमन होतो ज्याचे नांव नंतर भरत असें ठेवले गेले. दुश्मंतला शकुंतला जे त्यावेळी ऐकवते त्यात असें सांगितले आहे, "आई मुलाला शरीराचे कवच पुरवते, त्यात त्याचा पिता पुनः जन्म घेतो. त्यासाठी पित्याच्या पापांपासून त्याचा पुत्रच फक्त वाचवू शकतो. म्हणून पित्यालाच मुलाचा खरा कर्ता समजतात, आई केवळ कारणमात्र समजतात". त्याकारणांने त्याचे नांव भरत म्हणजे वाचवणारा, आधार असें ठेवले गेले. सर्वसेनाच्या मुलीशी, सुनंदाशी, भरताचा विवाह होतो. सर्वसेन काशीनरेश असतो. त्याला त्या पासून भूमन्यू मुलगा होतो. त्याचा विवाह विजयाशी होतो. ती दशर्हाची कन्या होती. त्यांना त्यातून सुहोत्र नांवाचा पुत्र होतो त्याचा विवाह सुवर्णाशी होतो. ती ईक्षाकूची कन्या होती. त्यांना एक मुलगा होतो त्याचे नांव हस्ती. त्याने हे नगर स्थापन केले म्हणून त्याचे नांव हस्तिनापूर झाले आहे. हस्तीचे लग्न होते यशोधरेशी, त्यांना विकुंथन होतो. त्याचे लग्न होते सुदेवाशी, त्यांना एक पुत्र होतो, अजमिद त्याचे नांव.

अजमिदच्या चार बायका असतात. त्यांची नावे अशी, रैकेय्री, गांधारी, विशाला आणि रिक्षा. त्याला त्या चार बायकांपासून दोन हजार चारशे मुलं होतात. त्यांतील फक्त एकच मुलगा, संवर्ण त्या राजसत्तेचा धनी होतो. त्याचा विवाह विवस्वाताच्या मुलीशी, ताप्तीशी होतो. त्यांना एक मुलगा होतो त्याचे नांव कुरु. त्याचे लग्न होते दस्रह देशाच्या राजकन्येशी. तिचे नांव शुभांगी असते. त्यांना मुलगा होतो, विदूरथ. त्याचे लग्न होते सुप्रियाशी, माधव वंशाची मुलगी. त्यांना एक मुलगा होतो, अनस्वान. अनस्वानाचे लग्न होते अमृताशी. अमृतासुद्धा माधव वंशाची असते. त्यांना परिक्षीत होतो. त्याचे लग्न वहुदासाच्या मुलीशी, सुवसाशी होते. त्यांना भिमसेन होतो. त्याचे लग्न होते कुमारीशी, केकया देशाची राजकन्या. त्यांना पर्तिश्रव होतो. त्यांचा मुलगा असतो प्रतिप. तो सुनंदाशी लग्न करतो, सिवीची कन्या. त्यांना तीन पुत्र होतात, देवपी, शंतनु व वल्हिक. त्यांतील देवपी संन्यासधर्म स्वीकारतो. त्यामुळे दुसरा, शंतनु राजा होतो. त्याच्या स्तुतीत कांही सांगतात, ज्यां वृद्धांना तो स्पर्श करतो त्यांना विलक्षण आनंद होतो व ते तरुण होतात. म्हणून त्याला शंतनु म्हणतात. शंतनुचे लग्न होते गंगेशी. त्यांना एक मुलगा होतो, त्याचे नांव देवव्रत. पुढे त्याला भिष्म नांवांने लोक ओळखू लागले. भिष्म त्याच्या पित्याचे लग्न सत्यवतीशी लावतो, जिला तिच्या कौमार्य काळात ऋषी पराशरापासून कृष्ण द्वैपायन नांवाचा ऋषी झालेला असतो. सत्यवतीपासून शंतनुला दोन मुलं होतात, त्यांची नांव होती चित्रंगद व विचित्रवीर्य. त्यांतील चित्रंगदाला तो लहान असतां गंधर्व ठार मारतात. त्यामुळें विचित्रवीर्य राजा होतो. त्याचा विवाह काशीनरेशाच्या दोन मुलींशी, अंबिका व अंबालिका होतो. विचित्रवीर्य निपुत्रिक मरतो. सत्यवतीला चिंता पडते तिचा पति दुश्मंताचा वंश पुढे कसा चालवावा? तिला आठवते किं, तिचा पराशरापासूनचा मुलगा कृष्ण द्वैपायन आहे, त्याने तो वंश पुढे चालवावा. कृष्ण द्वैपायनाने तिला शब्द दिलेला असतो किं, जर तिने त्याला बोलावले तर तो येऊन तिची इच्छा पूर्ण करील. सत्यवती कृष्ण द्वैपायनाला आठवते व त्याला सांगते, "तुझा भाऊ विचित्रवीर्य निपुत्रिक मेला आहे तेव्हा तुला तो वंश पुढे चालवावा लागेल". द्वैपायन ती इच्छा मान्य करतो व त्यापासून तीन मुलं होतात. त्यांची नांव अशी, धृतराष्ट्र, पंडु व विदूर. धृतराष्ट्र राजा होतो परंतु, तो एका शापामुळे अंध झालेला असल्याने पंडु राज्य कारभार पाहू लागतो. धृतराष्ट्राला द्वैपायनाने दिलेल्या

आशिर्वादामुळे गांधार देशाच्या राजकन्येपासून, गांधारीपासून शंभर मुलं होतात. त्या शंभर मुलांपैकी चार विशेष प्रसिद्ध होते. त्यांची नांवे दुर्योधन, दुःशासन, विकर्ण व चित्रसेन अशी होती. पंडुच्या दोन बायका असतात, कुंती व माद्री . एके दिवशी पंडु मृगयेस गेला असतां तो एका हरणाच्या युगुलास संभोग करतांना पहातो. त्या अवस्थेत ते असतांना पंडु नरावर शरसंधान करतो व तो हरण त्यामुळें मरतो. परंतु, मरण्या आधी त्या हरणाचे एका ऋषीत रुपांतर होते. तो पंडुला शाप देतो किं, जसे तुझ्यामुळे माझा संभोग करतांना नाश झाला तसांच तुझासुद्धा होईल जेव्हां तू तुझ्या स्त्रीशी संभोग करण्याचा प्रयत्न करशील. पंडुला फार दुःख होते पण वेळ गेलेली असते. पंडु त्याच्या पत्नीस, कुंतीस सांगतो ते आणि तिला विनंती करतो कीं, ती वंश चालू ठेवण्यासाठी योग्य पुरुषाकडून संतति जन्माला घालावीस. कुंती त्यावर आज्ञा प्रमाण मानून तिच्याकडे द्‌ुर्वास ऋषींनी दिलेल्या वरांचा उपयोग करून प्रथम यमापासून युधिष्ठीराला, मरुतापासून भिम, इंद्रापासून अर्जुन असें तीन मुलं जन्माला घालते. पंडु कुंतीला पुनः विनंति करतो किं, तिची मैत्रीण व संवत माद्रीसुद्धा विनासंतति आहे तेव्हा तिने तिला मदत करावी. त्यावर कुती तिला मिळालेले मंत्र माद्रीला देते व त्यामुळें माद्रीला अश्वीनीकुमारांपासून नकुल व सहदेव असें जुळे होतात. असें दिवस जात होते परंतु, एके दिवशी पंडु माद्रीला तिच्या साजशृंगारासह पहातो व त्याला तिला स्पर्श करण्याची तीव्र इच्छा होते. तो तिच्याजवळ जातो व तिला स्पर्श करतांच तो मरून पडतो. माद्रीच्या मुळें पंडु मरतो म्हणून ती स्वेच्छेने सती जाते. त्या आधी ती तिच्या संवतेस, कुंतीला सांगते किं , तिने माद्रीच्या मुलांकडे आपल्या मुलांप्रमाणे प्रेमांने लक्ष द्यावे. त्यानंतर कुती नकुल व सहदेवांची स्वताच्या मुलांप्रमाणे कायम काळजी घेते. त्यानंतर त्या पांच मुलांचा उल्लेख पांडव (पंडुची मुलं असा अर्थ) असा होऊ लागला. ते सख्ख्या भावांप्रमाणे राहू लागले. कांहीं काळांनी कोणी अज्ञात संन्यासी त्या पांच पांडवाना त्यांच्या गुरुकुलांतून घेऊन हस्तिनापुरी येतात व त्यांना भिष्म आणि विदुरांच्या स्वाधीन करतात. तो सोहळा झाला तेव्हां ते जोगी प्रसंगानुरुप भाषण करतात व त्या नंतर आकाशातून फुलांचा वर्षाव होतो व स्वर्गीय वाद्यांचा नाद होतो. त्यानंतर ते जोगी अदृश्य होतात. पांचही पांडव आपल्या पिता व माता ह्यांच्या मृत्यू प्रित्यर्थ अंतिम श्राद्ध विधी करतात. त्यानंतर पांडव राजवाड्यात राहू लागतात. पंडुच्या मृत्यूनंतर राज्य कारभार पुनः

धृतराष्ट्राकडे गेलेला असतो व त्यामुळें कौरवांचे महत्व वाढलेले असते. पांडव राजवाड्यात राहू लागल्यामुळें दुर्योधनाचा तिळपापड होतो. तो त्या सगळ्या पांचही भावंडांचा द्वेष करू लागतो. दुर्योधन पांडवांशी राक्षसा सारखा वागू लागतो. तो पांडवांचा पाडाव व्हावा व त्यांची राजवाड्यातून हकालपट्टी व्हावी म्हणून विविध क्लुप्त्या करू लागतो. परंतु, त्या मध्ये त्याला यश येत नाही. त्यामुळे धृतराष्ट्र घरात शांतता नांदावी म्हणून कपट बुद्धीने पांडवांना वरणावत नांवाच्या नगरी रहाण्यास पाठवतो. वरणावत हस्तिनापुरासारखेच मोठे असते. पांडव आज्ञाधारक असल्याने ती आज्ञा मान्य करतात व आनंदाने तेथे रहाण्यास जातात. कौरवांचा हस्तक पुरोचना त्यांना मारण्याचा प्रयत्न करतो पण त्यात तो यशस्वी होत नाही, उलट ते त्याला मारून टाकतात. ते असेंच भटकत असतांना त्यांना हिडींब राक्षस व त्याची बहिण भेटते. त्यात भिम हिडींबला मारतो व त्याच्या बहिणीशी लग्न करतो. तिच्यापासून त्या भिमाला घटोत्कच होतो. तेथून ते एकचक्र नांवाच्या गांवाला जातात. तेथे ते (भिम) बकासुर नावांच्या राक्षसास ठार मारतात. तेथून ते अज्ञातवासांत पांचालांच्या देशात राहू लागतात. तेथे पांचाल देशाची राजकन्या पांचाली, द्रौपदी त्यांना सर्वांची समाईक पत्नी म्हणून मिळते. ते होते तसें त्याचा अज्ञातवास संपतो व ते हस्तिनापुरास परत येतात. तेथे ते कांहीं काळ शांतपणे रहातात. तेथे त्यांना द्रौपदीपासून मुलं होतात. युधिष्ठीराला प्रितीविंद्य, भिमास सुतोसम, अर्जुनाला श्रृतकिर्ती, नकुलास सतनिक व सहदेवाला श्रृतकर्मन अशी अपत्ये होतात. त्याशिवाय, शैव जमातीतील गोवशनाची मुलगी देविका युधिष्ठीर वरतो व तीपासून त्याला यौधेय होतो. भिम काशीच्या राजाची मुलगी वलंधराशी लग्न करतो व त्याला सर्वग नावाचा पुत्र होतो. अर्जुन द्वरावती (द्वारका) येथे कृष्णाकडे (वासुदेवाकडे) रहात असतांना त्याच्या बहिणीशी, सुभद्रा, विवाह करतो. सुभद्रा सुंदर व प्रियभाषी असते. तिला घेऊन तो त्याचा विजनवास संपल्यावर हस्तिनापुरास परत येतो. सुभद्रेपासून अर्जुनाला अभिमन्यू होतो. अभिमन्यू कर्तृत्ववान होता व वासुदेवास फार प्रिय होता. नकुलास त्याची पत्नी करेनुमति, छेडा देशाची राजकन्या, पासून एक पुत्र होतो, त्याचे नांव निरमित्र. मद्र देशाचा राजा द्युतिमताची मुलगी विजया सहदेवाशी स्वयंवर पद्धतीने लग्न करते. त्यांना सुहोत्र होतो. भिमाचा विवाह हिडिंबाशी होतो व त्यापासून त्याला घटोत्कच होतो. अशी पांडवांची अकरा मुलं असतात.

त्यातील अभिमन्यू त्या घराण्याला अमर करणारा होता. तो उत्तराशी विवाह करतो. ती विराट देशाची राजकन्या होती. विराट कन्या एका मृत अर्भकाला प्रसवते. ते कलेवर माडीवर घेऊन ती वासुदेवाला सांगते कीं, त्याने त्याला सजीव करावे. कृष्ण तिला सांगतो, "मी त्याला केवळ सहा महिन्यासाठी जीवंत करू शकतो. तो अश्वत्थामाने जाळल्यामुळे जन्माआधीच मेलेला आहे". वासुदेव त्या मृत जळलेल्या अर्भकात जीव घालतो. असा जीवंत झाला म्हणून त्याचे नांव परिक्षित असें कृष्णाने ठेवले, त्याचा अर्थ वंश मेल्यानंतर जन्मलेला. परिक्षिताचा विवाह मद्रवतीशी म्हणजे तुझ्या आईशी होतो. अहो राजश्री, तुम्ही अशा कुळातील अहात. तुलासुद्धा वपुश्तमेपासून दोन मुलं झालेली आहेत. त्यांची नांव आहेत सतनिक व सनकुकर्ण. सतनिकास सुद्धा एक मुलगा आहे ज्याचे नांव अश्वमेधदत्त. त्याची आई आहे, विदेही.

अहो नृप, अशारितीने मी तुला पुरु वंशाचा व पांडवांचा इतिहास सांगितला आहे. सर्व व्रतस्थ ब्राह्मणांनी, क्षत्रियांनी व वैश्यानी तसेंच द्विजांना सहाय्य करणार्या शुद्रांनी हा इतिहास मनापासून ऐकला तर त्यांचे कल्याण होईल, ते स्वर्गात जातील. त्यांचा देवसुद्धा सन्मान करतील. हा इतिहास पुज्य कृष्ण द्वैपायन व्यासांनी रचला आहे. त्या लोकांनी पाप केले तरी त्यांना माफी मिळेल. त्यावर एक गोष्ट सांगतात ती अशी, त्यात सांगतात किं, हा इतिहास (भारत) वेदांच्या बरोबरीचा आहे ज्ञानामध्ये. म्हणून त्याचे नियमितपणे श्रवण केले पाहिजे.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा पंच्याण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग शहाण्णवावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ईश्वाकु घराण्यात एक महाभीष नांवाचा राजा होऊन गेला तो सर्व जगाचा राजा होता. तो सत्यवचनी, सामर्थ्यवान व सद्गुणी म्हणून पुण्यवंत होता. हजार अश्वयज्ञ व शेकडो राजसूय यज्ञ करून तो स्वर्गात स्थान मिळवतो. असेंच एक दिवस स्वर्गातील मंडळी ब्रह्माची पुजा करीत असतात. त्या ठिकाणी अनेक ऋषी, राजर्षी व राजा महाभीष उपस्थित होते. ब्रह्माला अभिवादन करण्यासाठी नद्यांची राणी गंगासुद्धा तेथे आली होती. तेथे गंगेचे शुभ्र वस्त्र वार्यामुळे उडून जाते. गंगा त्यामुळे उघडी होते व ते न पहावे म्हणून सर्व स्वर्गस्थ महाजन खाली मान घालतात. महाभीषमात्र त्या इतरांप्रमाणे खाली मान न करता तसांच गंगेकडे एकटक पहात रहातो. ते पाहून ब्रह्मदेव त्याला शाप देतात. ते बोलतात, "अरे नीच पुरुषा तू गंगेकडे निर्लज्जपणे पहात बसलास म्हणून आता तू स्वर्गात रहाण्यास योग्य राहिला नाहीस म्हणून तू पृथ्वीवर माणसात जन्म घेशिल. तेथे तू पुनः पुन्हा जाशिल व गंगासुद्धा तुला तेथे भेटून त्रास देत रहाशिल". जेव्हां तुला त्यामुळे तिचा राग (तिच्या बद्दलची वासना संपेल) येईल तेव्हां हा शाप निष्क्रिय होईल.

महाभीष त्याचे सर्व पूर्वज आठवतो व ब्रह्मांला विनंती करतो किं, त्याला प्रतिपाच्या घराण्यात जन्म मिळावा. गंगा जेव्हा पहाते कीं, राजा महाभीष स्वर्गातून ढळत आहे तेव्हा तीसुद्धा तेथून निघून जाते. गंगामात्र महाभीषाला विसरू शकत नाही. गंगा स्वर्गातून जात असतांना तेथे इतर स्वर्गस्थ वसु त्याच मार्गाने जात असतांना ती पहाते. ती त्यांना विचारते, "तुम्ही सगळे असें उदास कां दिसता? तुम्ही खुशाल अहात ना"? त्यावर वसुं सांगतात, वसिष्ठ ऋषीने आम्हाला चोरी केली म्हणून शाप दिला आहे त्याचा परिणाम स्वरुप आम्हाला कांहीं क्षम्य मामुली चुकीसाठी ब्रह्माने शाप दिले आहेत व त्यामुळें आम्ही पृथ्वीकडे जात आहोत". वसु पुढे तिला सांगतात, "आम्ही संध्या करीत होतो, त्यावेळी तेथे बसलेले ब्रह्मदेव आम्ही पाहिले नाहीत म्हणून, आम्हाला पुनः पृथ्वीवर माणसात पाठवले आहे. त्याच्या शापाला आम्ही अडवू शकत नाही, ते आमच्या ताकदीबाहेर आहे म्हणून आम्ही तुला विनंती करतो कीं, तूसुद्धा स्त्रीरुपाने तेथे जन्म घेऊन आम्हा वसुंना तुझी मुलं म्हणून जन्म घेण्याची संधी दे. आम्ही वसु कोणत्याही इतर सामान्य बाईच्या

गर्भात जाऊ इच्छित नाही". ते ऐकून गंगा बोलते, "तथास्तु". त्यावर नंतर गंगा त्या सगळ्या वसुंना सांगते, "तुमच्या प्रमाणे मला ब्रह्मांने पृथ्वीवर जाऊन महाभीषची पत्नी होण्याचा आदेश दिला आहे म्हणून मी जात आहे. तेथे तुमचा पिता कोण असावा असें तुम्हाला वाटते ते सांगा, बहुधा महाभीषच तुमचा पिता होईल". त्यावर सगळे वसु सांगतात, "आम्हाला प्रतिप राजाच्या वंशात जन्म घेणे उचित वाटते. त्या घराण्यात शंतनु म्हणून ख्यातनाम राजा होणार आहे". ते ऐकून गंगा त्यांना सांगते, "माझीसुद्धा तीच इच्छा आहे. महाभीषच शंतनु म्हणून माणसांत जन्म घेणार आहे. तेथे त्याचे नांव शंतनु असेल. मी शंतनुचे भले करु इच्छिते. आपली सुद्धा तीच इच्छा आहे असें दिसते". ते ऐकल्यावर वसु बोलतात, "तू तुझी मुलं ती जन्मल्यावर पाण्यात फेकतेस हा तुझा स्वभाव आहे. म्हणजे तू आम्हाला जन्म दिल्यावर ताबडतोब पाण्यात टाकून मारशिल व त्यामुळें आम्हाला फार काळ पृथ्वीवर माणसात रहावे लागणार नाही". ते ऐकल्यावर गंगा त्यांना सांगते, "मी तुमच्या इच्छेप्रमाणे करीन परंतु, जर त्याच्या सह होणारा माझा संभोग यशस्वी झाला तरच ते शक्य होईल. मी फक्त एकच मुलगा ब्रह्माच्या आदेशानुसार जीवंत ठेवीन". त्यावर ते वसु तिला सांगतात, "आम्ही सगळे आठ आमचा आठवा भाग त्या मुलासाठी देऊ. त्यामुळें असा पुत्र तुला त्याच्यापासून होईल जो फार सामर्थ्यवान असेल जसे तुला आवडेल. परंतु, तो ब्रह्मचारी राहील व त्याचा वंश होणार नाही. अशारितीने गंगेबरोबर संगनमत केल्यावर ते सगळे आठही वसु तेथून निघून जातात. अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा शहाण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग सत्त्याण्णवावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, प्रतिप नांवाचा एक राजश्री होता. तो सर्व प्राणिमात्राशी फार प्रेमांने वागत असें. तो घोर तपस्येच्या व्रताने अनेक वर्षे गंगा नदीच्या उगमस्थानी रहात होता. एक दिवशी गंगा एका सुस्वरुप स्त्रीचे रुप धारण करून त्याच्या उजव्या मांडीवर येऊन बसते. ते पाहून राजा प्रतिप तिला शांतपणे विचारतो, "अहो सुंदरी तुझ्यासाठी मी काय करावे"?

ती सुंदरी गंगा नदी आहे हे त्याला माहीत नव्हते. ती प्रतिपला सांगते, "अहो कुरु घराण्याचे अग्रणी, राजश्री, माझी इच्छा आहे किं, तुम्ही माझे पति व्हावे. आपण जाणता किं, जर कोणी लायक स्त्री स्वेच्छेने पुरुषांस मांगणी घालत असेल तर खर्या पुरुषांने तिला नकार देणे श्रेयस्कर समजले जात नाही". ते ऐकून राजा प्रतिप तिला सांगतो, "वासनेच्या आहारी गेलेल्या सुंदरी, मी दुसर्याच्या स्त्रीचा स्वीकार करू शकत नाही, तसेंच माझ्या वर्णाची नसलेल्या बाईचा मी साधा विचारसुद्धा करू शकत नाही. असें माझे तत्त्व आहे".

ती सुंदरी म्हणजे गंगा त्यावर बोलते, "मी अपवित्र अथवा कुरुपसुद्धा नाही. मी स्वर्गीय स्त्री आहे त्यामुळें माझ्या कुळाचा प्रश्न उद्भवत नाही. माझ्या उच्चतेबाबत शंका घेऊ नकोस. माझी इच्छा आहे कीं आपण माझी मनिषा समजून पूर्ण करावी. मला नाकारू नये".

"अहो स्वर्गीय सुंदरी एक गोष्ट मी स्पष्ट करतो किं, जर मी तुझी इच्छा मान्य केली तर मी व्रतभंग केला म्हणून माझा मृत्यू होईल, तसेंच तू माझ्या उजव्या मांडीवर बसली आहेस, जी माझ्या मुलीची किंवा मुलीसारख्या सूनेची जागा आहे हे तुला माहित असेलच त्यामुळे मी तुझ्याशी संभोग करू शकत नाही. डावी मांडी पत्नीसाठी असते हे लक्षात घे. हे समजून तू माझी सून होण्याची तयारी असेल तर ते शक्य आहे. कदाचित् मी तुला माझ्या मुलाची जागा देऊ इच्छितो. ते ऐकून स्त्रीरुपातील गंगा बोलते, अहो पुण्यवंत, जर तसें तुम्हाला योग्य वाटत असेल तर तसें होईल, मी तुमच्या मुलांशी लग्न करण्यास तयार आहे. मी तुमच्या सुप्रसिद्ध भरत घराण्याची सून होण्यास तयार आहे. हे असें घराणे आहे ज्यात महान सम्राट जन्मले आहेत. ह्या महान घराण्याच्या कर्तृत्वाची स्तुती मी जरी शंभर वर्षे करीत राहीली तरी ते कमी पडेल. ती नंतर सांगते, अहो राजर्षी आता मी असें समजते

किं, तुम्ही मला आपली सून म्हणून स्वीकारली व तुमचा पुत्र माझ्या स्वातंत्र्यावर घाला न घालता आम्ही पति पत्नी म्हणून एकत्र राहू शकू. अशा रितीने आम्ही राहून एकमेकांना अधिक सुखी करू शकू. अखेरीस तुमचा मुलगा माझ्यापासून झालेल्या पुत्रांच्या कर्तृत्वामुळें स्वर्गात जाईल.

वैशंपायन पुढे सांगत रहातात, एवढे बोलून ती स्वर्गीय सुंदरी तत्क्षणी अंतर्धान पावते. राजा प्रतिप, कुरु घराण्याचा कुलदिपक, सर्व क्षत्रियांत अग्रणी, आपले आश्वासन पुरे करण्यासाठी पुत्राला जन्म देण्यासाठी आपले वैराग्य संपवून आपल्या राणीबरोबर रममाण होण्याच्या तयारीस लागतो. जेव्हां ते वृद्ध होतात तेव्हां त्यांना एक पुत्र होतो. तोच महाभीष असतो, ज्याला ब्रह्माने गंगेकडे एकटक पहात होता म्हणून शाप देऊन मानव लोकांत पाठवले होते. त्याचे नांव ठेवले गेले शंतनु. असें नांव कारण, त्याच्या पित्याने आपले वैराग्य सोडून त्याला जन्म देण्यासाठी गृहस्थाश्रम पुनः स्वीकारला होता. शंतनु मोठा झाल्यावर एक दिवस राजा प्रतिप त्याला बोलावून सांगतो किं, तू आता विवाहयोग्य झाला आहेस तरी एक गोष्ट सांगतो ती नीटपणे ऐक. एकादी स्वर्गीय सुंदरी तुला एकांतात भेटून तुझ्याशी समागम करण्याची इच्छा व्यक्त करील तर तू तिला पत्नी म्हणून स्वीकारशिल व तुम्हाला एक पुत्र होईल कारण, तसें आधीच ठरले आहे. असें सांगून राजा प्रतिप शंतनुला गतप्रसंगांची माहिती देतो. पुढे प्रतिप शंतनुला सांगतो आणखीन ऐक, तिच्या वागण्याबद्दल विषेश लक्ष देऊ नकोस ती कांहीं करील ते सगळे तेथे दुर्लक्ष करून स्वीकारशिल. ती कोण, कोठून आली, तुलाच कां विचारते असें कांहीं विचारू नकोस. कारण, तसें मी तिला आश्वासन दिले आहे. एवढे सांगून राजा प्रतिप शंतनुला समजावतो. वैशंपायन पुढे सांगतात, राजा प्रतिप शंतनुला गादीवर बसवून पुन्हा वानप्रस्थाश्रमी निघून जातो.

शंतनु अप्रतिम बुद्धिमत्ता व हुशार राजकर्ता असलेला, जणू प्रतिइंद्र मृगयेचा छंद स्वीकारतो. व तो वेळोवेळी शिकारीस जाऊ लागतो. तो वनातील सांबर व रेडे ह्यांची शिकार करीत असें. एके दिवशी तो असांच शिकारीस गेला असतां, गंगेच्या किनारी फिरत असतो जेथे सिद्ध व शरणांची वस्ती आहे. तेथे त्याला एक अप्रतिम लावण्य असलेली तरुण स्त्री, जणू साक्षात लक्ष्मी, फिरतांना दिसते. शुभ्र दंतपंक्ती असलेली व अंगावर स्वर्गीय जड जवाहिरांचा साजशृंगार आहे अशी ती फारच लोभसवाणी दिसत होती. तिला

पाहून शंतनुचे वीर्य ढळले. तो तिच्याकडे कितीही वेळ एकटक पहात राहिला परंतु, त्याचे समाधान होत नव्हते. न राहून अखेरीस राजा शंतनु तिला मृदू शब्दात विचारतो, "आपण कोण अहात, कोणी स्वर्गीय अथवा दानव, अप्सरा कां गंधर्वकन्या, यक्षकन्या कां नागकन्या अहात कां मानवी अहात"? आपण कोणीही असां मी तुझ्याशी समागम करू इच्छितो.

अशारितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा सत्त्याण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग अठ्ठ्याण्णव

(संभव पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, ते मधूर बोलणे ऐकून ती सुंदरी संतुष्ट झाल्यासारखी त्याला सांगते, "अहो पुण्यवंत राजश्री, मी वसुंना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे, तुमची पत्नी होण्यास तयार आहे पण त्याकरतां माझ्या कांहीं अटी तुला मान्य कराव्या लागतील". ते तिचे बोलणे इतके प्रभावी व तिचा आवाज इतका मधूर कीं, त्यामुळे ऐकणार्याला अवर्णनीय आनंद होत होता. त्यावरून ती कोणी सामान्य मानव नाही हे स्पष्ट होत होते. पुढे ती बोलते, "माझ्या अटी अशा किं, माझ्या वागण्याबद्दल तू कधीही आक्षेप घेणार नाहीस व विरोध करणार नाहीस. तुला माझी कृती आवडो अगर न आवडो तू कांहीं प्रतिक्रिया देणार नाहीस. तू माझा अपमान करणार नाहीस, अथवा माझ्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या गैरवर्तन करणार नाहीस. ह्या अटी तू जोवर प्रामाणिकपणे पाळत आहेस तोवर मी तुझ्यासह संसार करीन व तुला कोणताही आक्षेप घेण्याची वेळ येणार नाही. परंतु, जर तू ह्या माझ्या अटीं एकदा नाही पाळल्यास तरी मी ताबडतोब तुला सोडून जाईन.

शंतनु त्यावर बोलतो, "तथास्तु". त्यांचा विवाह होतो व ती त्याच्याशी सुखाने संसार करते. त्याला ती असें संसारी सुख देते किं, त्याची तुलना कशाशीही करता येणार नाही. दोघेही एकमेकांना संतुष्ट करण्यात गुंतले होते. त्यात तिला सात पुत्र होतात, पण ती प्रत्येक वेळी जन्मलेला मुलगा हसत हसत गंगेत फेकून देत असे व ते पाहूनही शंतनु कांहीं न बोलता गप्प राहून तिच्या अटीचे पालन करीत असें. शेवची आठवा मुलगा होतो व तोसुद्धा ती गंगेत हसत हसत फेकणार असते तेवढ्यात राजा शंतनु तिला ते करण्यास आक्षेप घेतो. आपल्या मेलेल्या आधीच्या पुत्रांबद्दलचे दुःख तो लपवू शकत नाही. तो क्रोधाने तिला विचारतो, "तू इतकी कशी निर्दय होऊ शकतेस? स्वताची मुलं अशारितीने गंगेत फेकून त्यांचे खून तू कां करतेस? हे पाप तू कां करतेस"? त्याच्या प्रश्नांना ती उत्तरे न देतां ती त्याला तिच्या अटींची आठवण करावयास सांगते व त्यानुसार ती तत्क्षणी ते बाळ त्याच्या हातात देऊन सांगते किं, "हे राजा आपल्या समझौत्यानुसार मी आता तुला सोडून जात आहे. हा शेवटचा मुलगा मी तुझ्याकडे सुपूर्द करीत आहे. हे सगळे विधीलिखीत होते तसेंच होत आहे. मी गंगा आहे, जन्हूची कन्या, सर्व ऋषी माझी पुजा

करतात, वसुंना अपवाने शाप दिला होता. त्याकारणांने, वसुंशी स्वर्गात झालेल्या समझौत्यानुसार मी तुझ्याशी विवाह केला व त्या सर्व वसुंना पृथ्वीवर जन्म घेण्यात मदत केली. आता जो हा तेजस्वी शेवटचा मुलगा आहे तो त्या सगळ्या आठ वसुंचा सारांश आहे म्हणून फार प्रभावी आहे, त्याला सांभाळ. मी जे पहिले सात मारले ते सात वसु होते व त्यांच्या इच्छेनुसार ते मारले गेले अथवा माझ्यात, गंगेत एकरुप झाले आहेत, म्हणून त्याबद्दल तू काळजी व दुःख करू नकोस". पुढे जान्हवी त्याला सांगते, "मी त्या वसुंना पृथ्वीवर येण्यास व परत जाण्यात मदत करण्यासाठी तुझ्याशी विवाह केला होता, आता तो उद्देश पूर्ण झालेला आहे. वसुंच्या म्हणण्यानुसार तूंच एक असा राजर्षी आहेस किं, त्याच्यापासून ते मानवरुपात पृथ्वीवर येऊ शकत होते. तसेंच त्यांनी जन्म घ्यावा अशी मानवी स्त्री नसल्यामुळे मला ते करावे लागत आहे. मी त्या आठ वसुंना आश्वासन दिले होते किं, त्यांच्या जन्मानंतर ताबडतोब माझ्या प्रवाहात समाविष्ट करून त्याद्वारा स्वर्गात पाठवीन. तसें झाले म्हणून हे राजा तू संतुष्ट हो कारण, तू त्या सगळ्या आठ वसुंचा पिता झाला आहेस. हे राजा तुझे कल्याण होणार आहे. तुझा वंश वृद्धिगत होत जाईल. आता जो तुझा पुत्र जीवंत आहे त्याचे नांव आहे गंगादत्त". असें बोलून ती अंतर्धान पावली.

अशारितीने आदिपर्वातील अठ्ठ्याण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग नव्याण्णवावा

(संभव पर्व पुढे चालू)

शंतनु गंगेला विचारतो, "असा कोणता गुन्हा वसुंनी केला होता म्हणून त्यांना पृथ्वीवर पाठवले गेले व हा अपव कोण"? ज्याने दिलेल्या शापामुळें वसुंना पृथ्वीवर यावे लागले? मला आणखीन सांग, हा आपला पुत्र गंगादत्त माणसांत कां आला? अहो जान्हवी मला सगळे समजून घ्यावयाचे आहे. एवढे बोलून नंतर वैशंपायन पुढे सांगतात, ते प्रश्न ऐकून गंगा शंतनुला सांगू लागते, वरुणाचा मुलगा वसिष्ठ जो सिद्धी प्राप्त केल्यानंतर अपव ह्या किताबाने ओळखला जाऊ लागला. मेरु पर्वताच्या वनांत त्याचा आश्रम होता. त्या वनात प्रत्येक मोसमानुसार विविध वनस्पती बहारत असतं. विविध प्रकारची फुलं, फळं व कंदमुळं तेथे उपलब्ध होती. अशा पवित्र स्थळी अपवचा आश्रम होता.

दक्ष प्रजापतिला एक कन्या होती तिचे नांव सुरभी होते. तिला काश्यपाच्या संयोगाने एक मुलगी झाली. ती गाईच्या अवतारात होती. तिचे नांव नंदिनी होते. सर्व पाळीव जनावरांत ती सर्वश्रेष्ठ होती. नंदिनी, जे तिच्याकडे मांगाल ते देऊ शकत असें. अपवाला ती नंदिनी त्याच्या कर्मकांडात मदत करण्यासाठी मिळते. अपवाच्या आश्रमात तिचे वास्तव्य होते पण ती सर्व ऋषींना प्रिय असल्यामुळे ती सर्वकडे स्वच्छंदपणे फिरत असे.

एके दिवशी त्या वनात त्यांच्या परिवारासह वसु, जे सर्व देव व ऋषींचे आदरस्थान होते, फिरण्यासाठी आले. त्याचा मुख्य पृथु होता. त्यांच्या बायकांबरोबर ते त्या वनात व मेरु पर्वताच्या इतर परिसरात मजेत फिरत होते. त्याचा आनंद त्याना प्रसन्न करीत होता. ते फिरत असतांना त्यातील एका वसुची बायको नंदिनीला बघते. तिचे सौंदर्य, कांती, काळेभोर डोळे, भरलेली आंचळ, सुंदर खुरं व शेपटी व इतर शुभ लक्षणं पाहून ती तिच्याकडे आकर्षित होते. ती वसुची पत्नी तिच्या नवर्यास, दियुला सांगते कीं, तिला ती गाय पाहिजे. दियु नंदिनीला पाहून खुष होतो. तो आपल्या बायकोला सांगतो, ही गाय एका महान ऋषीची आहे ज्याच्या आश्रमाच्या परिसरात आपण फिरत आहोत. दियु तिला सांगतो जो मानव त्या गाईचे दुध प्राशन करील तो दहा हजार वर्षे निरोगी जीवन जगू शकतो. ते ऐकून त्याची बायको दियुला आग्रह करते किं ती गाय तिला मिळालीच पाहिजे. दियुची बायको त्याला सांगते, "पृथ्वीवर माझी एक मित्रीण आहे तिचे नांव जितवती,

अप्रतिम सोंदर्यवती आहे. ती उशीनराची कन्या आहे. मला वाटते ही गाय व तिचे वासरु मी तिला देईन. म्हणजे जसें ती ह्या गाईचे दुध प्राशन करील ती पृथ्वीवर हजार वर्षे निरोगी जीवन जगू शकेल". ह्याच्या पेक्षा जास्त चांगली भेट नसेल. असें भाषण ऐकल्यावर दियु ती गाय आपल्या भावंडांच्या मदतीने पकडतो. आपल्या पत्नीच्या खुषीसाठी तो वसु हे विसरतो की, त्याने जी गाय चोरली ती एका महान ऋषींची संपत्ति आहे. अशी चोरी केल्यामुळे तो स्वर्गातून खाली फेकला जाणार आहे हे त्याच्या लक्षात आले नाही.

जेव्हां वरुणाचा मुलगा वसिष्ठ आश्रमात परत आला तेव्हां त्याला समजले किं नंदिनी गायब झाली आहे. तो तिला शोधण्याचा बराच प्रयत्न करतो पण व्यर्थ. अखेरीस तो त्याच्या दिव्य दृष्टीने पहातो कीं, नंदिनीची चोरी दियु नांवाच्या वसुंनी केली आहे. वसिष्ठ सात्त्विक क्रोधाने लाल होतो कारण ती चोरी होती. वसिष्ठ त्या वसुला शाप देतो कीं, तो वसु पृथ्वीवर माणसात येईल. असा शाप दिल्यानंतर अपव आपल्या अध्यात्मिक साधनेत गर्क होतो. तेथे वसु दियुला ते समजते कीं, अपवाने त्याला त्याने केलेल्या चौर्यकर्माबद्दल पृथ्वीवर माणसात जाण्याचा शाप दिला आहे. ते समजल्यावर तो दियु त्वरित वसिष्ठांच्या आश्रमात येतो, ऋषीला शांत करण्याचा प्रयत्न करतो. पण सर्व प्रयत्न व्यर्थ जातात.

पुण्यकर्माचे सगळे नियम चांगले ज्ञात असणारे वसिष्ठ दियुला सांगतात, "मी तुम्हा सर्व वसुंना चोरी करण्याबद्दल शाप दिला आहे परंतु, तुमची योग्यता पहाता मी तुम्हाला एक उःशाप देतो, तुम्ही गंगेच्या पोटी जन्माल व जन्मल्याबरोबर ती तुम्हाला तिच्या पाण्यात फेकून मारून टाकील फक्त दियुच्या सांगण्यामुळें तुम्ही हे चौर्यकृत्य केले म्हणून दियु मात्र पृथ्वीवर मानव म्हणून राहिल परंतु, तो स्त्रीसंग करू शकणार नाही. तो सर्व धर्मशास्त्र जाणता असेल, तो आपल्या पित्याचा आज्ञाधारक असेल. असें सांगून वसिष्ठ निघून जातात. नंतर ते सगळे वसु गंगेकडे जातात व अपवाने सांगितल्याप्रमाणे तिने त्यांना जन्मल्याबरोबर पाण्यात फेकून देण्याचे आश्वासन घेतात. अशारितीने त्या महान ऋषीची वाणी खरी होते.

त्या शापामुळे शंतनुचा मुलगा जो होतो त्याचे नांव गंगादत्त अथवा गंगेय किंवा देवव्रत असें होते पण पुढे तो भिष्म ह्या नांवांनेच जास्त ओळखला जातो. गंगा तिच्या मुलाला घेऊन निघून जाते.

गंगेच्या निर्वाणानंतर अतिदुःखी असा शंतनु आपल्या राजधानीत रहातो. वैशंपायन सांगतात, मी तुला शंतनुच्या व त्याच्या वंशजांच्या अनेक उत्तम गुणांची माहिती देणार आहे. त्या इतिहासाला महाभारत असें म्हणतात.

अशारितीने आदिप्रवातील संभव पर्वाचा नव्याण्णवावा भाग संपला.

## आदिपर्व भाग शंभरावा

(संभव पर्व पुढे चालू)

वैशपायन सांगतात, शंतनु राजा सगळ्या जगात त्याच्या दूर घोरणाबद्दल, शहाणपणाबद्दल, सत्यवचनाबद्दल, पुण्यवर्तनाबद्दल, क्षमाशिलतेबद्दल, संयमाबद्दल, विचार स्वातंत्र्याबद्दल, विनम्रतेबद्दल आणि बुद्धीमत्तेबद्दल ख्यातनाम होता. असा कर्तृत्ववान, धर्माने वागणारा, हित व अहिताचा योग्य अंदाज असणारा शंतनु भरतकुळास व इतर सर्व प्रजेला सारखाच प्रिय होता. त्याशिवाय तो हत्तीसारखा शक्तिमान होता. त्याची अंगयष्टी एकाद्या शुराला शोभणारी अशी होती. त्याच्या अंगावर सगळी शुभलक्षणे होती. त्याची वर्तणूक पाहून इतर पुरुष शिकत कीं, सद्‌गुण हे स्वार्थ व हितापेक्षा जास्त महत्वाचे असतात. अशी एकंदर शंतनुची ख्याति होती. असा नरपुङ्गव राजा झाला नाही असें त्याचे भाट गात असत. शंतनुच्या पुण्यप्रभावाने सर्व पृथ्वीवरील राजे सद्‌गुणाचे महत्व समजत होते. शंतनु राज्य करीत होता तेव्हां पृथ्वीवर कोणीही राजा केवळ हव्यासामुळें दुसर्या राजाशी युद्ध छेडत नसें. केवळ पाप प्रवृत्तीचा नाश करण्यासाठी त्या विरुद्ध युद्ध होत होती. चांगल्या राजांत सदैव समझौता असे व त्यामुळे उद्यम व व्यापार वाढून सर्वत्र समृद्धी होत होती. सर्वत्र दैवी संपदा आचरणात असें. शंतनुनी सर्व इतर राजांना असा आदर्श दिला किं, त्यांनी आपला अधिकार दैवीसंपदा वाढवण्यासाठी वापरावयाचा असतो. अशा संस्कारामुळे प्रजा शांतपणे निवात झोपू शकत असें. लोक सुरक्षितपणे प्रवास करत असत, त्यांना चोर, डाकू, दरोडेखोर ह्यांची भिती नव्हती. ते सुखस्वप्न पहात व ती पूर्ण करण्यात आपला काळ व्यतीत करीत असत. साक्षात इंद्राचा स्वर्ग पृथ्वीवर शंतनुनी उतरवला आहे कां, असें ऋषी, साधक, स्नातक, स्त्रिया व शुद्र, वृद्ध समजत असत. थोडक्यात सांगतो, वैशंपायन सांगतात, भरत कुळाचा कुळदिपक, शंतनु, राजांचा राजा झाला होता. युद्ध न करतां केवळ सत्प्रवृत्तीने त्याने साम्राज्य उभे केले होते. शंतनु व त्याच्या प्रमाणे राज्य कारभार करणार्या इतर राजांमुळें, धर्म, संस्कृती, विचार स्वातंत्र्य ह्यांचा विकास होत होता. सत्ययुग अवतरले आहे असें त्यांचे भाट मोठ्या कौतुकांने गात असत. चारही वर्णाचे लोक आपापली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत असत. सर्व वाद सामोपचाराने सोडवले जात असत. स्वतः राजा शंतनु हस्तिनापूरात राहून सर्व पृथ्वीवर राज्य अशारितीने करीत

होता, त्याच्या राज्याच्या सीमा समुद्राला भिडलेल्या होत्या. शंतनु सत्यवादी व मोकळ्या मनाचा होता. त्याच्याशी वागतांना कोणालाही भय वाटत नसें उलट, तो बोलणारा, आदरपूर्वकपणे आपले मन त्याच्याकडे मोकळे करीत असें. केवळ गंमत म्हणून शिकार करणे असभ्यपणाचे समजले जात होते परंतु, वेदात दिल्याप्रमाणे, जीवोजीवस्य जीवनं, ह्या पवित्र नियमानुसार अहिंसक हत्त्या करून भक्ष्य प्राणी मारले जात. देव, ऋषी आणि पितर ह्याच्यासाठी बळीचे प्राणी विनावेदना (छळ होणार नाही अशारितीने) मारले जात, त्या व्यतिरीक्त प्राणी मारले जात नसत. राजा शंतनुने त्रेसष्ट वर्षे राज्य केले व त्यानंतर तो वानप्रस्थाश्रमात जातो. शंतनुचा एकमेव पुत्र देवव्रत शंतनु सारखाच सर्व बाबीबाबत होता. त्याचे स्वरुप, बोल, वागणे, ज्ञान असें सगळेच शंतनुची दुसरी आवृत्ती होता. वास्तविक व अध्यात्मिक अशा सगळ्या विद्यांत तो असामान्य विद्वान होता. तो महारथी आणि एक श्रेष्ठ प्रतिचा योद्धा होता. एक दिवस मृगया करतांना शंतनु गंगा किनारी एका हरणाचा पाठलाग करीत होता. त्याचा बाण त्या हरणाला लागलेला असतो. नदी किनारी घोटाळत असतां त्याच्या लक्षात येते कीं, नदीचे पाणी कमी झाले आहे. त्याचा ते पाहून आश्चर्य वाटले. गंगा नदी आणि पाणी कमी हे त्याला नवल करणारे होते. शंतनु जसे नीट निरीक्षण करतो तसें त्याला दिसते किं, एक इंद्रासारखा बलिष्ठ व देखणा तरुण त्याच्या स्वर्गीय अवजारांच्या मदतीने गंगेच्या पाण्याचा प्रवाह रोखून धरत होता. ते पाहून राजा चकीत झाला. तो युवक दुसरा तिसरा कोणीही नसून त्याचा गंगापुत्र देवव्रत होता. परंतु, राजाने त्याला फक्त फार लहानपणी व तेसुद्धा अगदी थोड्या वेळेपुरते पाहिले होते त्यामुळें तो देवव्रताला ओळखू शकला नाही. देवव्रत मात्र आपल्या जन्मदात्यास त्वरित ओळखतो. ओळखून सुद्धा तो त्याच्या स्वर्गीय सिद्धीचा वापर करून तेथून अदृष्य होतो. राजा अचंबित होतो, अरे, आत्ता तेथे दिसणारा युवक एकदम नाहीसा कसा झाला, असा विचार करत रहातो. शंतनुला शंका येते व म्हणून तो गंगेला विचारतो, "अहो गंगे, मला आपला मुलगा पहाण्याची इच्छा आहे तरी तो पुढे आण".

गंगा नेहमी प्रमाणे अप्रतिम लावण्यवती स्त्रीचे रुप घेऊन सादर होते व आपला पुत्र रत्नजडीत अलंकाराने सजवलेल्या स्वरुपात त्याला दाखवते व बोलते, "अहो राजेंद्र, आपला आठवा मुलगा हा येथे आहे. आता हा तुझा पुत्र सर्व शस्त्रांचा वापर करण्यात

निपुण झाला आहे. मी आजवर त्याला सांभाळले परंतु, ह्यापुढे तू त्याला घेशिल. वसिष्ठ ऋषींच्या कडून शिकून तो सगळे वेद, वेदांगे, त्यांच्या शाखा अशा सगळ्या ज्ञानात निपुण आहे. तो आता उत्तम तिरंदाज झाला आहे, तो जणू इंद्रच आहे असा झाल्यामुळे सगळे देव व असुर त्याचा आदर करतात. उशनांना जे कांहीं माहित असते ते सगळे ह्याला माहीत आहे. जी शास्त्रे व विज्ञानं अंगिरसाच्या मुलांना माहीत आहेत ज्यामुळे ते देव व असुरांमध्ये मान्यवर ठरले आहेत ती सगळी ह्याला माहीत आहेत. जमदाग्नी पुत्र परशुरामाला जे शस्त्रज्ञान आहे तेसुद्धा हा जाणतो. असा सर्वगुणसंपन्न आपल्या दोघाचा मुलगा आता तू घेऊन जा. कारण, हा आता राज्यकारभाराच्या कामासाठी सर्वथा तयार आहे". असें गंगा शंतनुला सांगते. गंगेचे ते बोलणे ऐकून शंतनु समजतो व त्या, सूर्यासारखा तेजाने तळपणारा, त्याच्या पुत्रास गंगेकडून घेतो व आपल्या राजधानीकडे निघतो. असा पुत्र लाभला म्हणून पुरु वंशाचा शंतनु, मोठ्या समाधानात त्याच्या स्वर्गीय सौंदर्य व थाटमाट असणार्या त्याच्या राजधानीत प्रवेश करतो. त्यानंतर तो सर्व पौरवांना आमंत्रित करून त्यांच्या समक्ष देवव्रताला त्याचा उत्तराधिकारी म्हणून गादीवर बसवतो. लवकरच देवव्रत आपल्या पित्याच्या कामात वाकबगार होतो व सर्व पौरवांच्या आदरास योग्य होतो. खरे तर सगळी प्रजा त्याला शंतनुचा वारस म्हणून स्वीकारते. अशारितीने तो एक कर्तबगार राजा म्हणून शंतनुबरोबर राहू लागतो.

अशाप्रकारे चार वर्षे जातात. एकदा राजा शंतनु वनात यमुना नदीच्या काठावरून जात असतो. तेथे त्याला एक विलक्षण असां सुगंध दरवळलेला आढळतो. तो वास कोठून येतो त्याचे कुतुहल शंतनुला होते. राजा ते शोधण्यासाठी इकडे तिकडे असा फिरू लागतो. शोधत असतांना तो एक काळेभोर नेत्र असलेली लावण्यवती जी स्वर्गीय तेजांने प्रभावित झालेली होती तिला पहातो. तो सुगंध त्याच स्त्रीच्या देहाचा आहे हे तो समजतो. ती कोळ्याची कन्या असावी असें तिच्या पेहेरावामुळें त्यांने ओळखले.  तरीसुद्धा तो तिला विचारतो, "तू कोण आहेस? तू येथे काय करतेस? तू कोणाची मुलगी आहेस"?

ते राजाचे प्रश्न ऐकून ती सुंदर मुलगी त्याला सांगते, "मी येथील कोळ्यांच्या राजाची मुलगी आहे. माझ्या पित्याच्या आदेशानुसार मी नावेतून प्रवाशांना एका तीरावरून पलिकडल्या किनार्यास पोहोचवण्याचे काम करते. तिचे सौंदर्य, नम्रपणा व अंगाचा सुगंध पाहून विचार

करतो किं, तिच्याशी लग्न करावे. त्यानंतर राजा तिच्या पित्यास भेटून आपली मनिषा त्याला सांगतो. कोळ्यांचा राजा ते ऐकून राजाला सांगतो. "अहो श्रेष्ठ राजा, जेव्हापासून मला हि मुलगी मिळाली, माझी एकच मनिषा झाली आहे, जर तू ती माझी इच्छा मान्य करशील तरच मी माझी कन्या तुला दान करीन". ते ऐकून राजा शंतनु त्या कोळ्यांच्या मुख्यास बोलतो, "अरे मला तुझी इच्छा काय ते तरी सांग, त्यानंतरच मी ठरवीन काय करावे". ते ऐकल्यावर तो मुलीचा बाप शंतनुला सांगतो किं, त्याची एकच इच्छा आहे कीं, तिच्यापासून जो पुत्र तुला होईल त्यालाच तू तुझा उत्तराधिकारी करशील". ते ऐकून राजा शंतनु विचारात पडतो कारण, त्यांने देवव्रताला आधीच उत्तराधिकारी म्हणून जाहिर केले होते. तो कोळी पुढे राजाला सांगतो, "जर तुम्ही माझी अट मान्य कराल तर माझ्यासारखा नशीबवान मींच कारण, आपल्यासारखा पती मिळणे म्हणजे माझ्या कन्येचे मोठे भाग्यच समजले पाहिजे".

वैशंपायन ऋषी पुढे सांगतात, अहो भरता, जेसें शंतनु हि अट ऐकतो तसें, तो त्या लग्नाचा विचार सोडण्याचे ठरवतो. तरी त्या स्त्रीची त्याच्या मनातील वासना कमी होत नाही. त्या अस्वस्थ मनस्थितीत तो हस्तिनापुरी येतो. शंतनु सर्व काळ त्या कोळी मुलीच्याच विचारात गुंग झालेला रहातो. एक दिवस देवव्रत आपल्या पित्यास विचारतो, "राजे आपले क्षेमकुशल आहे ना? असें विचारण्याचे कारण, सर्व गोष्टी व्यवस्थित असतांना आपण सदैव बेचैन कां असतां? आपल्याला कसला घोर लागला आहे? आपण नीटपणे जेवत नाही, घोडेस्वारीला जात नाही, कामात सुद्धा लक्ष देत नाही, मला समजेल कां, काय आपल्याला त्रास होत आहे? आपण दिवसेंदिवस निस्तेज दिसता, असें काय कारण ते मला सांगा, मी आपल्याला मदत करू शकेन कां"? देवव्रताचे ते प्रेमळ बोलणे ऐकून राजाला धीर येतो व तो सांगतो, "देवा तुझ्या ह्या बोलण्यामुळें मला थोडा धीर आला आहे म्हणून सांगतो माझ्या अस्वस्थ होण्याचे कारण". एवढे बोलून राजा थांबतो. त्यावर देवव्रत पुनः विचारतो, "आपण थांबला कां"?

शंतनु त्या सांगतो, "अरे ह्या भरतकुळाचा व्याप खूप मोठा आहे. तूंच एक असा आहेस किं, जो तो कारभार यशस्वीपणे चालवू शकेल. तू तुझ्या कामात सदेव व्यस्त असतोस पण मला नेहमी एक चिंता त्रास देते कीं, आयुष्याचा कांहीं भरवसा नसतो, जर तुझे कांहीं बरे

वाईट झाले तर काय होईल ह्या घराण्याचे? असें झाले तर भरत वंश नष्ट होईल. तू माझा एकमेव वारस आहेस, तुझे कांहीं झाले तर काय? माझी दुसरे लग्न करण्याची अजिबात इच्छा नाही, मला इतकीच चिंता वाटते कीं, तुझे सर्व चांगले, भले होवो. म्हणजे आपला वंश अजरामर होईल. जाणकार लोक नेहमी सांगतात, एक पुत्र म्हणजे पुत्र नसण्यासारखेच आहे कारण, त्याच्या आयुष्याचा काय भरवसा? वेदसुद्धा तसेंच सांगतात. सर्व धर्म तेंच सांगतात. केवळ एक मुलगा असून पुरेसे नसते असें धर्मशास्त्र सांगते कारण उघड आहे, त्या एका मुलाचे जर कांहीं बरे वाईट झाले, बापाच्या मृत्यू आधी तर तो पिता व तू पुत्र दोघेही स्वर्गात जाण्याची शक्यता कमी असते. पुराणांचे मुळसुत्र वेद, त्यात त्याची असंख्य उदाहरणे दिली आहेत. तू जाणतोस कीं, तुझे सदैव युद्धावर जाणे होत असते व जरी तू उत्तम योद्धा असलास तरी काय सांगावे, नशीबाचा फेरा कसा फिरतो ते कोणालाही माहीत नसते हे तूसुद्धा ओळखतोसच. अशा विचित्र विवंचनेमुळे मी हल्ली बेचैन असतो. तुला मी माझ्या अस्वस्थतेचे कारण सांगितले तू विचारलेस म्हणून, कारण, हा विषय बोलण्यासारखा नाही हे तू जाणतोसच".

वैशंपायन पुढे सांगतात, देवव्रत अप्रतिम बुद्धीमान होता, त्याला आपल्या पित्याच्या अंतस्थ उद्देशाचा अंदाज आला परंतु, जास्त खात्री करण्यासाठी तो त्यांच्या दरबारातील ज्येष्ठ मंत्र्याचा विचार काय ते समजण्यासाठी त्यांच्याकडे जातो. तेथे तो मंत्री देवव्रताला राजाच्या मनातील खरी चिंता त्या कोळ्याची मुलगी, गंधवती, आहे ते सांगतो. त्यामुळे देवव्रताला त्याचा अंदाज बरोबर होता ते समजते. देवव्रत आपल्या पित्याच्या इच्छे पुढे स्वताचे भवितव्य कमी महत्वाचे असें समजणारा असल्याने तो आपल्या पित्याची इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार करतो व आमात्याबरोबर त्या कोळ्याचा घरी जातो. तेथे त्याला सांगण्याचे ठरवतो किं, त्याच्या अटी मान्य आहेत. तेथे गेल्यावर कोळ्यांचा मुख्या त्यांचे उत्तम स्वागत करतो. तो कोळी त्याला उद्देशून सांगतो, "अहो भरतकुळाचे अग्रणी, आपण महायोद्धे व महारथी अहात, आपली शक्ति अतुल्य आहे, म्हणून मला आपल्याला कांहीं सांगावेसे वाटते, असें बोलून तो सांगतो, "जरी मुलीचा पिता इंद्र असता तरी अशी मांगणी नाकारणे मूर्खपणाचे ठरले असते कारण, ज्या पुरुषापासून ती जन्मली आहे तो तुमच्यापेक्षा कितीतरी जास्त श्रेष्ठ आहे. भरतवंशाचे आपले पिताच माझ्या सत्यवतीसाठी

योग्य वर आहे. मी ह्या आधी आलेल्या बर्याच मांगण्या नाकारल्या आहेत. असीत ऋषीनी मांगणी घातली होती पण ती माझ्या मुलीने झिडकारली परंतु, तुझ्या पित्याला तिने मान्यता दिली हे तुमचे मोठे भाग्य समजावे. तरी पुढची बोलणी करण्या आधी माझी शंका विचारावीशी वाटते, माझी अट पूर्ण करण्यात एक मोठा अडथळा आहे, तो शंतनुच्या आधीच्या पुत्राचा. म्हणजे आपला, कारण, आपण मोठे बलशाली व अजिंक्य अहात, असुर व गंधर्वांना तुम्ही चीत करता त्यापुढे माझ्या मुलीचा पुत्र काय टिकणार? जरी तुझ्या पित्याने कांहीं मान्य केले तरी शेवटी तुझा हक्क तू जर सांगू लागलास तर काय होणार? त्यासाठी मी तुला एक अट घालतो जर ती तू मान्य केलीस तर हा विवाह होण्यात व मला माझी कन्या तुझ्या पित्यास दान करण्यात कांहींच अडचण येणार नाही". देवव्रत विचारतो, "बोला काय आपली अट आहे, ते सांगा". कोळी थोडा घाबरत, दबकत सांगतो, "मला माफ करा पण हे माझ्या मुलीच्या भल्यासाठी मला करावेच लागत आहे, आपल्याला राजगादीचा हक्क माझ्या मुलीच्या मुलासाठी सोडावा लागेल. ते ऐकून देवव्रत ती अट ताबडतोब मान्य करतात. त्यामुळे कोळी पिता अत्यानंदाने भलताच खूष होतो. तो त्या लग्नाला मान्यता देतो परंतु, त्यात सुद्धा तो वैश्य प्रवृत्तीचा कोळी सत्ता व संपत्तीचा लोभी पुनः एक अडचण मांडतो. तो सांगतो, आपण महान अहात परंतु, आपली मुलं काय करतील ते कसें सांगावे? त्यासाठी माझी आणखीन एक अट आहे तीसुद्धा जर तू स्वीकारलीस तर सर्व अडचणी संपल्याने मी माझी गंधवती अर्थात् सत्यवती शंतनुला देण्यास तयार आहे". ते ऐकून देवव्रत पुन्हा विचारतो, "बोला काय आणखीन अट आहे ते सांगा"?

आपण जर आजन्म ब्रह्मचारी रहाण्याचे व्रत स्वीकारणार असलात तरच हे लग्न होऊ शकते"! ते ऐकून देवव्रत विचार करू लागला.

वैशंपायन सांगत असतात, अरे भरतश्रेष्ठा, ते ऐकून आपल्या पित्याला सुखी पहाण्यासाठी आतूर असलेला तो आदर्श पुत्र मोठ्याने ओरडून जाहीर करतो कीं, "अहो सर्व जमलेल्या सज्जन (आर्य) मंडळीनो ऐका, "मी आपली दुसरी अटसुद्धा बिनशर्त मान्य करतो व त्यासाठी मी आजन्म ब्रह्मचर्य व्रताची येथे घोषणा करतो. त्यानंतर तो बोलतो जरी मी अविवाहीत असलो तरी शुक्ल ब्रह्मचर्य पालनामुळे मिळणारा स्वर्गलोक मला मिळेल". ते

ऐकून तो कोळी आनंदाने उड्या मारू लागतो, त्याला हे अपेक्षित नव्हते. कोळी त्या धक्क्यातून बाहेर आल्यावर सद्गतीत मनाने देवव्रतास हात जोडून विनंती करतो किं, "आपणच ह्यापुढे माझ्या मुलीची सर्व देखभाल करावी अशी मी विनंती करतो".

त्यानंतर लगेचच आकाशातून अप्सरा व देव स्वर्गीय फुलांचा वर्षाव देवव्रतावर करतात. ते देव देवव्रताचा उल्लेख भिष्म म्हणून करतात. त्याचे कारण अशी प्रतिक्षा करणे हे एक भयंकर धाडस समजले जात असें, ते तो करतो म्हणून भिष्म. त्यानंतर देवव्रताचा उल्लेख भिष्म असांच सगळीकडे होऊ लागला.

त्यानंतर आपल्या पित्याच्या सुखासाठी तो पिताव्रत पुत्र आपल्या नव्या आईला विनंती करतो किं, तिने तिच्या रथात शिरावे. भिष्म तिला बोलतो, "माझे आई, आपण आपल्या घरी चलावे".

शंतनुला जसें हे सगळे समजते तसा तो खजिल होतो व आपल्या पुत्राच्या त्यागवृत्तीचा आदर करण्यासाठी तो भिष्माला आशिर्वाद देतो कीं, त्याला मरण त्याच्या इच्छेनुसार मिळेल, अर्थात् मृत्यू त्याच्या परवानगीनेच त्याला गाठेल.

अशा रितीने आदिपर्वातील संभव पर्वाचा शंभरावा भाग संपला.

## - आदिपर्व खंड दुसरा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विचारांमुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद